# महाराष्ट्राचे शिल्पकार

## डॉ. पतंगराव कदम



डॉ. महादेव सगरे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार

# डॉ. पतंगराव कदम


**लेखक**

डॉ. महादेव शिवलिंग सगरे

M.Sc., Ph.D., D.Sc.



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.



एच-३३०

१

➢ **पुस्तकाचे नाव** : महाराष्ट्राचे शिल्पकार डॉ. पतंगराव कदम

➢ **लेखक** : डॉ. महादेव शिवलिंग सगरे, M.Sc., Ph.D., D.Sc.

➢ **आयएसबीएन** : ९७८-९३-९३५९९-६९-८

➢ **प्रथमावृत्ती** : २०२३

➢ **प्रकाशक** : **सचिव**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रविंद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन**

➢ **मुद्रक** : **व्यवस्थापक,**
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी.पी.ओ.नजीक, पुणे - ४११ ००१.

➢ **किंमत** : **१०२/- रुपये**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने महाराष्ट्राचे शिल्पकार या मालिकेत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सहकार क्षेत्राच्या उन्नतीत मोलाचे योगदान देणाऱ्या डॉ. पतंगराव कदम यांचे चरित्र प्रकाशित करण्याचे ठरविले. डॉ. पतंगराव कदम यांचे निकटचे स्नेही व सहकारी डॉ. एम.एस. सगरे यांनी ही चरित्र लेखनाची जबाबदारी स्विकारली व यशस्वीपणे पार पाडली त्याबद्दल मला समाधान वाटते.

कसलीही कौटुंबिक, आर्थिक आणि राजकीय पार्श्वभूमी नसताना सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डॉ. पतंगराव कदम यांनी शून्यातून जे विश्व निर्माण केले आणि कर्तृत्त्व घडविले त्याचा प्रेरक इतिहास महाराष्ट्रासमोर येणे गरजेचे होते. डॉ. पतंगराव कदम यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. त्यांनी गुणवत्तेच्या बळावर देशात नावलौकिक प्राप्त केलेल्या भारती विद्यापीठाची स्थापना केली आणि शिक्षणाची गंगा बहुजन समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत नेण्यासाठी मोठे योगदान दिले. एकीकडे ही शैक्षणिक क्षेत्रात क्रांतिकारी कामगिरी करीत असताना त्यांनी राजकारण आणि सहकार क्षेत्रात दिलेले योगदानही तितकेच महाराष्ट्राचे प्रागतिक शिल्प घडविण्यात त्यांचाही मोलाचा वाटा आहे म्हणून त्यांचे चरित्र, महाराष्ट्राचे शिल्पकार या मालिकेत प्रकाशित करताना आनंद वाटत आहे. हे चरित्र वाचकांच्या पसंतीस उतरेल अशी मला खात्री आहे.

**डॉ. सदानंद मोरे**

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

## लेखकाचे मनोगत

डॉ. पतंगराव कदम यांचा १९६५ पासून एकूण ५३ वर्षांचा माझा परिचय होता. स्वाभिमानी, स्पष्टवक्ता, गरिबीची जाण असणारा मित्र म्हणून संबंध होता. १९७८ पासून मी भारती विद्यापीठाचा प्रथम प्राचार्य (यशवंतराव मोहिते कॉलेज) म्हणून त्यांच्या संपर्कात सतत होतो. २००२ मध्ये प्राचार्य पदावरून निवृत्त झाल्याबरही गेली २१ वर्षे भारती विद्यापीठाचा सहकार्यवाह म्हणून(जबाबदारी आजपर्यंत सोपविल्याने)त्यांच्याशी घनिष्ठ शेवटपर्यंत संपर्क राहिला.

डॉ. पतंगराव कदम भारती विद्यापीठाच्या स्थापनेपासून (१९६४) स्वत:ला शिक्षण कार्यात झोकून दिले. भारती विद्यापीठाच्या घटनेत लिहिल्याप्रमाणे भारती विद्यापीठाला अभिमत विश्वविद्यालयाचा दर्जा १९९६ मध्ये प्राप्त करून दिला. भारती विद्यापीठाला गुणवत्तेनुसार शैक्षणिक दर्जा प्राप्त करून भारतात व परदेशात एकूण १८४ शैक्षणिक शाखांचा विस्तार केला.

त्याचबरोबर डॉ. पतंगराव कदम यांनी शिक्षण क्षेत्राबरोबर सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात विकासाची उंच भरारी घेतली. शिवाय टी. डी. पासून एम.ए., एल.एल.बी. व पीएच.डी. पदवी प्राप्त करून ते उच्चविद्याविभूषीत झाले. भारती विद्यापीठाचे संस्थापक व भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे ते तहह्यात कुलपती झाले. शिक्षण, सहकार, राजकारण आणि समाजकारण अशा सर्व क्षेत्रांत त्यांनी केलेल्या कामगिरीमुळे महाराष्ट्रात विकासाची पावले अधिक गतीने पडली.

महाराष्ट्राच्या विधानसभेत ३० वर्षे आमदार म्हणून व विविध खात्यांचे मंत्री म्हणून यशस्वी कार्यभार केला. अशाप्रकारे डॉ. पतंगराव कदम यांनी सर्व क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी केली असल्याने त्यांच्यावर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने ''महाराष्ट्राचे शिल्पकार डॉ. पतंगराव कदम'' हे पुस्तक लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर सोपविल्याने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचा मी आभारी आहे, तसेच महाराष्ट्राचे माजी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम व कुलपती प्रा.डॉ. शिवाजीराव कदम यांचा ऋणी आहे.

– डॉ. महादेव शिवलिंग सगरे
M.Sc., Ph.D., D.Sc.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | जन्म, बालपण व शिक्षण | ०१ |
| २. | भारती विद्यापीठाचे संस्थापक | १४ |
| ३. | शंकरराव मोरे विद्यालय : एक अभिनव शैक्षणिक प्रयोग | २४ |
| ४. | एस्.टी. महामंडळाचे संचालक | ३४ |
| ५. | महाविद्यालयीन शिक्षणाच्या उंबरठ्यावर | ४२ |
| ६. | आर्थिक स्वावलंबनाचा पाया-भारती विविध उद्योग समूह | ५१ |
| ७. | गतिमान प्रगतीची धाडसी गरूडझेप | ६० |
| ८. | भारती विद्यापीठ भवन | ६६ |
| ९. | वस्त्रोद्योगाच्या पंढरीत आणि शाहूनगरीत मुहूर्तमेढ | ७१ |
| १०. | स्त्रीशिक्षणाचा आदर्श उपक्रम | ७८ |
| ११. | सहकाराची गंगा सोनहिरा खोऱ्यात | ८२ |
| १२. | सहकारमहर्षीच्या सांगली जिल्ह्यात शिक्षणमहर्षी | ९१ |
| १३. | भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती | ९८ |
| १४. | ग्रामीण विकास प्रतिष्ठान | १०४ |
| १५. | निवडणुका, आमदार, नामदार लोकसेवा | ११० |
| १६. | आदिवासी शिक्षण विकासासाठी भारती विद्यापीठ | १३२ |
| १७. | दूरदृष्टिने हिताचे निर्णय घेणारे शिक्षणमंत्री | १३७ |
| १८. | पतंगस्वामिनीची खंबीर साथ | १४८ |
| १९. | समाजाभिमुख कदम कुटुंब | १५३ |
| २०. | उद्योग, जलसंधारण मंत्री आणि उद्योग, व्यापार व वाणिज्य मंत्री | १६१ |
| २१. | नावामागील प्रेरणा | १७८ |
| २२. | सेवक मेळावा ५४ व्या वाढदिवसाचा | १८६ |
| २३. | डॉ. पतंगराव कदम - जीवनपट | १८९ |

## भारती विद्यापीठाचे आधारस्तंभ



डावीकडून आ. मोहनराव कदम, डॉ. पतंगराव कदम, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम




भारती विद्यापीठ प्रवेशद्वार, धनकवडी, पुणे.

# १. जन्म, बालपण व शिक्षण

सोनहिरा खोऱ्यातील सोनसळ हे डॉ.पतंगराव कदम यांची जन्मभूमी. या गावाजवळच सागरेश्वर या जागृत दैवताचे मंदिर आहे. या मंदिराशेजारी सागरेश्वर अभयारण्य हे पर्यटनस्थळ आहे. पूर्वी सोनसळ हे दळणवळणाच्या साधनांअभावी दुर्लक्षित असे गाव होते. सोनसळच्या ग्रामस्थांना बाहेरगावी जाण्यास शेणोली खिंडीतून उतरून शेणोली रेल्वे स्टेशन गाठून रेल्वेने प्रवास करावा लागे. कारण तेच जवळचे बाजाराचे ठिकाण होते. शेणोलीच्या शनिवारच्या आठवडे बाजारात गरजेच्या वस्तू मिळत असत. दर बाजारी डोक्यावर धान्याची गाठोडी घेऊन बायका बाजारास जात असत. सोनसळच्या एखाद्या गंभीर आजारी माणसास उपचारासाठी पाळण्यातून शेणोलीस न्यावे लागे.

अशा सोनसळ गावात दीडएकशे घरे व पाचसहाशे लोकवस्ती होती. सोनसळमधील कोणाचे वऱ्हाड लग्नासाठी परगावी जायचे असेल, तर शेणोली खिंडीपर्यंत बैलगाड्यांतून वऱ्हाड जाई. तेथून डोक्यावरून लग्नाचे सामान खिंडीखाली उतरून न्यावे लागे. वऱ्हाडातील मंडळींनाही पायी खिंड उतरावी लागे. ज्या गावाला वऱ्हाड जावयाचे असेल, तेथील बैलगाड्यांतून वऱ्हाडी मंडळींना पाचव्याशी जावे लागत असे. अशा अडचणींमुळे सोनसळला आपल्या मुली देण्यास वधूपिते कचरत असत.

''अगदी अशाच रीतीने माझ्या लग्नाच्या वेळी सोनसळहून येडेमच्छिंद्रास वऱ्हाड आले होते. पाच दिवस लग्नाचा सोहळा चालला होता. माझ्या भावकीतील नाना पाटील हे लग्नाचा पाठपुरावा करीत होते. त्यांनी मला बाशिंग बांधू दिले नाही. हार घालून विवाह झाला. विवाहानंतर वऱ्हाड आमच्या गावाबाहेर गेल्यानंतर बाशिंग बांधले होते. हेच नाना पाटील पुढे क्रांतिवीर झाले'' अशी आठवण डॉ.पतंगरावांच्या मातुःश्री श्रीमती बयाबाई यांनी सांगितली.

श्रीपतराव कदम सोनसळचे एक कष्टाळू शेतकरी होते. ३०-३५ एकरामध्ये शेती करण्यास हत्तीच्या पिलासारख्या खिलारी बैलांच्या चार जोड्या नेहमी बाळगून असत. शेतातली नांगरणी, कुळवणी आणि

पेरण्यासाठी दुसऱ्यांचे बैल आणावे लागत नसत. खिलारी बैलांबरोबर गोठ्यात गाई, म्हशी व वासरांचा मोठा बारदाना होता, त्यामुळे सोनसळचे श्रीपतराव कदम हे एक प्रतिष्ठित शेतकरी समजले जात असत. चुलत्यांच्या व त्यांच्या एकत्र कुटुंबात ३०-४० माणसे होती. त्याचबरोबर पाहुण्यांची वर्दळ सदैव त्यांच्या घरात असायची.

अशा श्रीपतरावांच्या कुटुंबात मोहनराव या पहिल्या सुपुत्रानंतर दिनांक ०८ जानेवारी, १९४४ या दिवशी पहाटे द्वितीय सुपुत्राचा जन्म झाला. या गुटगुटीत नि बाळसेदार मुलाचे नाव पतंग असे ठेवले. बारशाच्या दिवशी नाव ठेवताना कोणी भास्कर म्हटले, कोणी श्रीकृष्ण म्हटले; पण शेवटी सर्वांना आवडणारे व सर्वांच्या पसंतीचे नाव 'पतंग' असे ठेवले गेले. नावाप्रमाणे स्वयंप्रकाशित, इतरांना प्रकाश देणारा हा सुपुत्र पुढे शिक्षणदानाच्या क्षेत्रात नावारूपास आला.

गुटगुटीत पतंग बाळपणी शेजारपाजारच्या आयाबहिणींचा व घरातल्या बायकांचा कौतुकाचा विषय बनला होता. निसर्गनियमाप्रमाणे पतंग पाच वर्षांचा झाल्यावर त्याला थोरल्या मोहनबरोबर १९४९ साली सोनसळच्या मराठी शाळेत घातले. पूर्वी शिक्षणाच्या सोई नसल्यामुळे श्रीपतरावांचे शिक्षण फार झाले नव्हते. मात्र त्यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणाकरिता जिवापाड मेहनत घेतली. सोनसळची शाळा कदम इनामदारांच्या वाड्यातल्या एका खोलीत भरत असे. वर्गात १५-२० मुले असत.

चौथीची परीक्षा पास झाल्यानंतर १९५३ साली सोनसळशेजारच्या शिरसगावच्या शाळेत पतंगाचे नाव पाचवीसाठी घातले. शिरसगाव हे सोनसळपासून फक्त एक मैलाच्या अंतरावर होते. तिथल्या महादेवाच्या देवळाच्या पूर्वेस बैठ्या इमारतीत ही प्राथमिक मराठी शाळा भरत असे. १९५४-५५ साली डॉ.पतंगराव सातवीची परीक्षा उत्तीर्ण झाले. सातवीच्या परीक्षेचे केंद्र त्यावेळी विटा या तालुक्याच्या ठिकाणी होते.

सुट्टीच्या दिवशी पतंग वडिलांना शेतीच्या कामात मदत करीत असे. वेळ पडल्यास जनावरांना सांभाळण्यास डोंगरात जात असे. उन्हाळ्यात डोंगरात करवंदे खाण्यासाठी नि पाडाचे आंबे खाण्यासाठी मित्रांबरोबर पतंग

जात असे. वर्षातला सर्वांत मोठा करमणुकीचा आणि आनंदाचा दिवस म्हणजे ग्रामदैवत चौरंगीनाथाची वार्षिक जत्रा नि उदाई देवीची जत्रेनिमित्त निघणारी पालखी, बैलगाड्यांच्या शर्यती व कुस्त्या हा होता.

सातवीचा निकाल जाहीर झाल्यावर पुढल्या शिक्षणासाठी या मुलाला कोठे पाठवायचे याची श्रीपतरावांना काळजी होती. कुंडलच्या प्रतिनिधी हायस्कूलची व ल. रा. तांबटकाकांनी चालवलेल्या नाना पाटील बोर्डींगची माहिती त्यांना होती. तसेच कुंडलला श्रीपतरावांचे नातेवाईकही होते. त्यामुळे डॉ.पतंगरावांना कुंडलच्या नाना पाटील बोर्डींगमध्ये व प्रतिनिधी हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षणासाठी नाव घातले. योगायोगाने त्यावर्षी डॉ. पतंगरावांच्या बरोबर चिंचणीचे वसंतराव माने हेही त्या बोर्डिंगमध्ये व हायस्कूलमध्ये दाखल झाले होते. डॉ. पतंगराव कदम व वसंतराव माने एकाच खोलीत राहत होते. वसंतराव माने यांच्या सहवासामुळे डॉ. पतंगरावांचे नव्या गावातले वास्तव्य सुखावह झाले. दोघांनाही कुंडलहून आपल्या घरी येताना शेणोलीच्या खिंडीतूनच यावे लागे. माध्यमिक शिक्षण संपल्यावर डॉ. पतंगरावांचा हा वर्गमित्र पुढच्या शिक्षणात व भावी जीवनात कायमचा साथीदार बनून राहिला. भारती विद्यापीठाच्या केंद्रीय कार्यालयात एक अधिकारी म्हणून वसंतराव माने सध्या कार्यरत आहेत.

सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर याच कुंडल गावात औंधच्या राजाच्या मदतीने त्या भागातल्या विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून प्रतिनिधी हायस्कूल सुरू केले होते. बाहेरगावाहून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून स्वातंत्र्य सैनिक ल. रा. तांबट काकांनी नाना पाटील बोर्डिंग चालवले होते. या बोर्डिंगमध्ये गरीब व गरजू मुलांना प्रवेश मिळावा म्हणून तांबटकाका यांनी आपले घरदार विकून पैसा उभा केला होता. तसेच दानशूर व्यक्ती व किर्लोस्कर उद्योगसमूहासारख्या संस्थाही बोर्डिंगला मदत करीत असत. तसेच त्यांना त्या भागातले ग्रामस्थ 'कुंडलचे साने गुरुजी' म्हणत. बोर्डिंगमधल्या मुलांच्या अभ्यासावर तांबटकाकांचे लक्ष असे. भावी पिढी चांगल्या संस्कारांतून तयार व्हावी म्हणून ते सदैव प्रयत्नशील असत.

डॉ. पतंगराव ज्या शाळेत किंवा संस्थेत शिकत असत तिथल्या मुख्य चालकांची ओळख करून घेण्यात त्यांचे आपल्याकडे लक्ष जाईल असे आचरण करण्यास व त्यांचे प्रेम संपादन करण्यात डॉ. पतंगरावांचा नेहमी पुढाकार असे. प्रतिनिधी हायस्कूलच्या प्रत्येक वर्गातल्या दोन हुशार मुलांना फी माफीची सवलत होती. ती मिळवण्यासाठी गांधी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व औंध संस्थानचे मंत्री बाबुराव तात्या लाड यांना डॉ. पतंगराव व वसंतराव माने भेटले. आपल्या घरची परिस्थिती समजावून सांगितली व निम्मी फी-माफीची सवलत मिळवली होती.

बोर्डिंगमध्ये असताना डॉ.पतंगराव तांबटकाकांचे एक आवडते व लाडके विद्यार्थी होते. काही कामानिमित्त बाहेरगावी जाताना ते डॉ. पतंगरावांना बरोबर नेत असत. याच काळात कुंडल-शेजारच्या किर्लोस्कर कारखान्याचे संस्थापक लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचे वृद्धापकाळामुळे २६ सप्टेंबर, १९५६ या दिवशी निधन झाले.

किर्लोस्करवाडीच्या पंचक्रोशीतून आणि बाहेरगावाहून हजारो संबंधित लोक लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या अंत्यदर्शनासाठी किर्लोस्करवाडीस आले होते. अशा प्रसंगी आपण उपस्थित राहावे, अशी डॉ. पतंगरावांना इच्छा झाली. तांबटकाकांकडून त्यासाठी त्यांनी परवानगी घेतली व खूप मोठ्या रांगेत उभे राहून लक्ष्मणराव किर्लोस्करांचे अंत्यदर्शन घेतले आणि अंत्यविधी सोहळा गंभीर वातावरणात पाहिला. लहान वयातही आपल्या आसपास घडणाऱ्या प्रमुख सामाजिक घटनांमध्ये भाग घेण्यास त्यांचा नेहमीच पुढाकार असे.

डॉ. पतंगरावांचा स्वभाव पहिल्यापासूनच धाडसी व त्यामुळे कोणत्याही प्रसंगात पुढाकार घेण्याचा होता. कुंडलला असताना श्रावण महिन्यातल्या एका सोमवारी महादेवाचे दर्शन घेण्यापूर्वी त्यांचे स्नेही वसंतराव माने व ते ताकारीजवळील कृष्णा नदीत स्नान करण्यास गेले होते. कृष्णा नदीस भरपूर पाणी होते. अशा पाण्यात उड्या मारून अंघोळ करणे तसे धोक्याचेच होते; पण कशाचाही विचार न करता डॉ. पतंगरावांनी नदीत उडी मारून अंघोळ केली. त्यांच्या अशा धाडसी स्वभावाच्या कृत्याची त्यांच्या बरोबरीच्या मित्रांना नेहमी भीती वाटे व आश्चर्यही वाटत असे. पुढे काही वर्षांनी

डॉ. पतंगरावांनी शिक्षणक्षेत्राच्या महापुरात अशीच धाडसाने उडी मारली. आज ते यशस्वी रीतीने त्यात विहार करत आहेत.

हायस्कूलमध्ये पहिल्यापासून डॉ. पतंगरावांचे गणित व इंग्रजी हे आवडते विषय होते. त्यामुळे वर्गशिक्षकांचे त्यांच्यावर लक्ष असे. ग्रामीण भागातली इतर मुले या विषयांत मागे राहत. अशा गोष्टी त्यांच्या चांगल्या ध्यानात राहिल्या होत्या. ही उणीव कशी भरून काढावयाची याचा ते नेहमी विचार करीत असत. भारती विद्यापीठ स्थापन करण्याची मूळ प्रेरणा याच प्रसंगातून त्यांना मिळाली असावी असे वाटते.

सन १९५५ साली डॉ. पतंगराव आठवीत असताना त्यावेळच्या मुंबई राज्याचे मंत्री बाळासाहेब देसाई कुंडलमार्गे(बलवाडी), ता. खानापूर इथल्या धरणाच्या भूमिपूजनासाठी जाणार होते. त्यावेळी कुंडलच्या पोलीस ठाण्याजवळून जाणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा प्रतिनिधी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना मंत्र्यांच्या स्वागतासाठी उभे केले होते. वसंतराव माने व डॉ. पतंगराव कदम मुख्य कमानीशेजारी रांगेत उभे होते. मंत्रिमहोदयांची गाडी आली. माथ्यावर उघडझाप करणाऱ्या तांबड्या दिव्याच्या काळ्या लांबसडक मोटारीतून बाळासाहेब देसाई मुख्य कमानीजवळ उतरले. पुढाऱ्यांनी त्यांना हार घालून स्वागत केल्यावर देसाई यांनी वसंतराव मानेंशेजारी उभ्या असलेल्या खाकी हाफ पँट व पांढरा हाफ शर्ट घातलेल्या डॉ. पतंगरावांच्या खांद्यावर हात टाकून व पाठीवर हात फिरवून विचारले, ''बाळा ! तू शिकून कोण होणार?'' क्षणाचाही विलंब न लावता छोटा व चुणचुणीत डॉ. पतंगराव म्हणाला, ''एम.ए., एल.एल.बी. होऊन आमदार होणार.'' त्याठिकाणी जवळच उभी असलेली पुढारी मंडळी हे ऐकून मोठ्याने हसली. ध्येय दृष्टीसमोर ठेवणारी मुलेच उद्या देशाचे आधारस्तंभ होतात. डॉ. पतंगरावांचा त्यावेळचा धीटपणा पाहून त्यांच्या वर्गमित्रांना मात्र आश्चर्य वाटल्याशिवाय राहिले नाही.

कुंडलच्या प्रतिनिधी हायस्कूलमधून डॉ. पतंगराव १९५९ साली एस.एस. सी. परीक्षा पास झाले. सोनसळ गावातले डॉ. पतंगराव हे पहिले एस.एस. सी. पास झालेले विद्यार्थी होते. एस.एस.सी. पास झाल्याचा डॉ. पतंगरावांना आनंद झाला. तसेच आई-वडिलांना धन्यता वाटली. आता पुढील कॉलेजचे

शिक्षण स्वावलंबनाने व स्वतःच्या हिमतीवर घेण्याचे त्यांनी ठरवले. सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'कमवा व शिका' या योजनेद्वारे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय साताऱ्याच्या शिवाजी कॉलेजमध्ये केली होती. कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले यांचा वारसा घेऊन कर्मवीरांनी बहुजन समाजातील मुलांना कॉलेज शिक्षण देण्याचा हा धाडसी प्रयोग सुरू केला होता. कॉलेजच्या फीसाठी विद्यार्थ्यांना दररोज श्रमाचे काम करावे लागे. डॉ. पतंगराव कदम यांनी याच सातारच्या शिवाजी कॉलेजमध्ये नाव घालण्याचा विचार आपल्या आई-वडिलांना सांगितला. तुटपुंज्या आर्थिक स्थितीमुळे सोनसळपासून दूरच्या सातारा शहरात डॉ. पतंगरावांना पाठवताना त्यांच्या मातापित्यांना काळजी वाटत होती, परंतु डॉ. पतंगरावांचा निर्धार पाहून पुढच्या शिक्षणासाठी साताऱ्याला जाण्यासाठी परवानगी द्यावी लागली. डॉ. पतंगरावांनी घरातील जुन्या ट्रंकमध्ये जुजबी कपडे, इतर सामान व वळकटी घेऊन घराचा निरोप घेतला. वडील श्रीपतरावांनी जपून राहा, अभ्यास करीत जा, वगैरे सूचना काळजीच्या भावनेपोटी केल्या.

त्यानंतर अनंत अडचणींना तोंड देत देत डॉ. पतंगराव पुणे विद्यापीठाचे पदवीधर झाले. एस.टी. महामंडळाचे संचालक असताना कामाचा व्याप सांभाळूनसुद्धा एम.ए., एल.एल.बी., पी.एचडी. झाले व १९८५ साली आमदारही झाले. तीस वर्षांपूर्वी ज्या मंत्रिमहोदयांनी शाळकरी मुलगा असलेल्या डॉ. पतंगरावांचे कौतुक करून शाबासकी दिली, त्याच बाळासाहेब देसाई यांनी १९६८ मध्ये डॉ. पतंगरावांनी स्थापन केलेल्या भारती विद्यापीठासाठी चार एकर सरकारी जागा मंजूर करून देऊन डॉ. पतंगरावांच्या कार्याचा गौरव केला होता.

डॉ. पतंगरावांनी आपल्या भावी आयुष्यात जी सार्वजनिक कामे पुरी करून दाखवली त्याची स्वप्ने त्यांना अनेक वर्षे अगोदर पडली होती. डॉ. पतंगराव १९५९ साली सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये आल्यावर दोन महिन्यांनी दोन दिवसांच्या सुट्टीवर सोनसळला जाण्यास निघाले होते. बरोबर वसंतराव माने आणि होस्टेलमध्ये राहणारा कोकणातला तांबोळकर नावाचा

मित्र होता. शेणोली स्टेशनवरून ते तिघेजण सोनसळला जाण्यासाठी चालत निघाले होते. चौरोबाच्या खिंडीतून जाणारी ती दगडधोंड्यांची खडकाळ, चढ असलेली पायवाट डोंगरमाथ्यावर आल्यानंतर वळसे घेत गावापर्यंत शेतातून व गवताच्या बांधावरून गेली होती. या खिंडीतून माथ्यावर येताना घामाघूम झालेले मित्र थोडा वेळ एका खडकावर बसले होते. खोलवर पायथ्याशी असलेल्या शेणोली स्टेशनकडे पाहतपाहत डॉ.पतंगरावांनी आपल्या मित्रांना भविष्यवाणी ऐकवली, ''या खिंडीतून गाड्या, मोटारी येण्या-जाण्यासारखा मोठा घाटरस्ता मी तयार करणार आहे.'' मित्रांना ही भविष्यवाणी विनोदी वाटली, तरीसुद्धा डॉ. पतंगराव आपली कल्पक योजना मित्रांजवळ व इतरांजवळही बोलून दाखवत असत.

पुढे काही वर्षांनी हडपसरला साधना विद्यालयात अर्धवेळ शिक्षक असताना आपल्या गावाकडे जाण्यासाठी शेणोलीचा घाटरस्ता शासनाकडून मंजूर करून घेण्यासाठी डॉ. पतंगरावांनी घाटावरील लोकांच्या रस्ता-मागणीचा अर्ज तयार करून शासनाकडे पाठवला. तसेच त्यावेळचे केंद्रीय गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीस पत्र पाठवून शेणोली घाटरस्त्याच्या कामात लक्ष घालून घाटरस्ता होण्यास मदत करावी अशी विनंती केली होती. त्यावरून यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राचे त्यावेळचे सार्वजनिक बांधकाममंत्री दादासाहेब जगताप यांना घाटरस्ता मंजूर करण्याचे सुचवले होते, व त्या पत्राची नक्कल डॉ. पतंगरावांना पाठवली होती. त्या पत्राच्या आधारे डॉ. पतंगराव दादासाहेब जगताप यांना भेटून वरचेवर आठवण करीत असत. या घाटरस्त्याची अडचण अशी होती, की हा घाटरस्ता सातारा जिल्ह्याच्या हद्दीत होणार होता. सातारा जिल्ह्याच्या डोंगरातल्या एका कोपऱ्यात हा रस्ता होणार होता आणि सातारा जिल्ह्यातल्या लोकांना तर या घाटरस्त्याचा फारसा उपयोग नव्हता; परंतु, सांगली जिल्ह्यातल्या खानापूर तालुक्यातल्या पश्चिम भागातल्या लोकांना या घाटरस्त्याचा उपयोग होणार होता, त्यामुळे लाखो रुपये खर्चाचा हा घाटरसता दोन जिल्ह्यांचा राजकीय वादाचा विषय बनला होता; परंतु पतंगरावांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्र शासनाने घाटरस्ता मंजूर केला आणि डॉ. पतंगरावांची भविष्यवाणी खरी ठरली.

ग्रामीण भागातील आडवळणाच्या गावात शेती करणाऱ्या श्रीपतरावांना वरील शब्दांत जरी सूचना देता आल्या नसल्या, तरी त्या अर्थाच्या भावना डॉ. पतंगरावांनी आपल्या मनात जोपासल्या असाव्यात, असे त्यांच्या पुढील जीवनातील घडामोडींवरून दिसून येते. शिक्षण घेऊन डॉ. पतंगराव यांनी कर्मवीरांच्या 'कमवा व शिका' या ध्येयवाक्यात भर घालून 'कमवा शिका व शिकवा' या ध्येयपूर्तीसाठी आपले पुढील आयुष्य भारती विद्यापीठ स्थापन करून विद्यादान करण्यात खर्ची घातल्याचे दिसून येते.

सातारा येथे आल्यावर शिवाजी कॉलेजमध्ये प्री डिग्री क्लासमध्ये त्यांनी नाव घातले. 'कमवा व शिका' या योजनेखाली ते श्रमाचे काम करू लागले. त्यावेळी शिवाजी कॉलेजच्या या लेबर स्कीमचे सेक्रेटरी कऱ्हाडजवळच्या कापील गावचे ना. ई. जाधव हे होते. तसेच कुंडलच्या हायस्कूलमधील वर्गमित्र वसंतराव मानेही होते. साताऱ्याच्या रिमांड होम समोरच्या बखले यांच्या बंगल्यात शिवाजी कॉलेजचे चार नंबरचे होस्टेल होते. त्यामध्ये डॉ. पतंगराव कदम व वसंतराव माने राहत होते. चार नंबरच्या होस्टेलचे रेक्टर प्रा. एस. आर. सूर्यवंशी होते आणि तीन नंबरच्या होस्टेलचे रेक्टर प्रा. पी. ए. पानवळ होते. डॉ. पतंगराव कदम प्रा. एस. आर. सूर्यवंशी यांच्या खोलीतच राहत आणि फुरसतीच्या वेळी प्रा. पी. ए. पानवळांच्या खोलीत सामाजिक, शैक्षणिक, राजकारणाच्या चर्चा करण्यास जात असत. पुढे भारती विद्यापीठाची घटना तयार करताना प्रा. पी. ए. पानवळ व प्रा. एस. आर. सूर्यवंशी यांनी डॉ. पतंगरावांना खूप मदत केली आणि आजही भारती विद्यापीठाच्या कार्यकारी व नियामक मंडळावर हे दोघेजण होते.

कॉलेजचा अभ्यास करतकरत कॉलेजमधील सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यात डॉ. पतंगरावांचा पुढाकार होता. पुढे कॉलेजच्या डिबेटिंग सेक्रेटरीची निवडणूक झाली. त्यासाठी त्यांनी आपल्या संघटनकौशल्याचा वापर करून आणि लेबर स्कीमचे सेक्रेटरी ना. ई. जाधव यांची मदत घेऊन डिबेटिंग सेक्रेटरीची निवडणूक जिंकली. कॉलेजमधल्या पहिल्या वर्षातील त्यांच्यासारख्या नवख्या मुलाने वरच्या वर्गातील मुलांचा पाठिंबा मिळवला, हा डॉ. पतंगरावांचा कौतुकाचा विषय कॉलेजच्या प्राध्यापकांत व प्राचार्यांमध्ये

झाला होता. त्यामुळेच डॉ. पतंगराव हे प्राचार्य बॅ. पी. जी. पाटील यांचे आवडते विद्यार्थी झाले.

डॉ. पतंगरावांना वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याची प्रथमपासून आवड होती. त्यांनी पुण्याच्या रानडे वक्तृत्त्व स्पर्धेत भाग घेऊन पुण्यातील श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले होते. होतकरू वक्ता म्हणून या स्पर्धेमुळे त्यांना मान्यता मिळाली, तसेच मुंबईच्या दादर येथील रूपारेल कॉलेजच्या वक्तृत्व स्पर्धेतही डॉ. पतंगरावांनी भाग घेतला होता. त्यावेळी स्पर्धेचा विषय 'समाजवादाची परिणती हुकूमशाहीत होणे अपरिहार्य आहे' हा होता.

साताऱ्याच्या कॉलेजमध्ये बहुजन समाजामधील मुलांना उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध करून कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात इतिहास घडवला. नांदेडच्या प्राचार्य नरहर कुरुंदकरांनी दि. ३१ मार्च, १९७४ च्या एका पत्रात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या महान कार्याचे वर्णन करताना म्हटले होते, की 'समाजाला शिकवणे, त्याला जागा करणे, हलवणे, त्यांच्यात सामाजिक, राजकीय नेतृत्व निर्माण करणे असे समाजपरिवर्तनाचे काम त्यांनी केले.' ब्राम्हणी संस्कृतीवर त्यांनी प्रचंड टीका केली; पण ब्राम्हण माणसाशी कधी वैर केले नाही. त्यांच्या संस्थेत सगळ्या जाति-जमातीची मुले अतिशय काटकसरीने जीवन जगत होती. शारीरिक श्रम करीत होती. सगळे मिळून दुःख वाटून घेत होती, अडचणी वाटून घेत होती. उपासमार वाटून घेत होती आणि खांद्याला खांदा लावून कष्ट करीत होती. या दुःखातच त्यांचे बंधुत्व सतत वाढत होते. अशी माणसे सहसा वैर करू शकत नाहीत. खेड्यापाड्यातील हरिजन मुलांना पोटाशी धरून त्यांना शिक्षण दिले, जागृत केले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला कार्यकर्ते पुरवले. हे कार्य महाराष्ट्रात भाऊरावांशिवाय अन्य कोणीही केले नाही. भाऊरावांचे कार्य नसते तर महाराष्ट्रातील राजकीय सूत्रे संस्थानिक, जमीनदार, वतनदार व ब्राम्हण यांच्याच हाती राहिली असती. हे चित्र भाऊरावांनी आपल्या आपल्या कार्याने बदलून टाकले व ग्रामीण भागातून नवे नेतृत्व निर्माण केले. या वस्तुस्थितीचे व विचारांचे डॉ. पतंगराव साक्षीदार विद्यार्थी आहेत. अशा विचारांमुळेच डॉ. पतंगरावांनी स्वतःच्या शिक्षणापेक्षा बहुजन समाजाला शिक्षणाने जागरूक

करण्याचा संकल्प मनात सोडला असावा; कारण सातारा येथून ते टी.डी. होण्यासाठी पुण्यास गेले व काही वर्षे रयत शिक्षण संस्थेच्या हडपसर येथील साधना विद्यालयात अर्धवेळ शिक्षकाची नोकरी करून नंतर भारती विद्यापीठाची स्थापना केली. सातारा येथील वास्तव्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या निःस्वार्थी कार्याची प्रेरणा घेऊन ज्या ज्या विद्यार्थ्यांनी पुढील आयुष्यात शिक्षणातून समाजपरिवर्तनाचे काम पुरे केले आणि कर्मवीरांची इच्छा पुरी केली, त्यापैकी डॉ. पतंगराव कदम हे रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विकास कार्याचे खरे वारसदार झाले, असे म्हणावयास हरकत नाही.

शिवाजी कॉलेजमध्ये वर्षभर राहून डॉ. पतंगराव कदम खूप काही शिकले असावेत; कारण याच शिदोरीवरून त्यांना पुढे समाजपरिवर्तनासाठी विद्यापीठ स्थापन करण्याचे महत्त्वाकांक्षी विचार सुचले असावेत. ही ध्येयपूर्ती होण्यासाठी त्यांनी शिवाजी कॉलेजमधील शिक्षण थांबवले व पुण्यातील वाडिया कॉलेजमधून टी.डी. डिप्लोमा होऊन शिक्षकाची नोकरी करीत पुढील उच्च शिक्षण पुरे करण्याचे निश्चित केले.

त्यापूर्वी घरच्या कौटुंबिक, आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या हेतूने डॉ. पतंगरावांनी कऱ्हाड येथील कोयना जलविद्युत योजना कार्यालयातील स्टोअरमध्ये लेखनिकाची नोकरी एक वर्षभर अस्वस्थ मनःस्थितीमध्ये केली होती. नोकरीची बांधिलकी त्यांना मानवली नाही; म्हणून स्वतःहून राजीनामा देऊन ते मुक्त झाले आणि अपुरे राहिलेले शिक्षण पुरे करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी पुण्यास जाण्याचे ठरवले.

पुण्यास जाण्याची आर्थिक तरतूद करण्यासाठी आपल्या घरच्या लोकांची सहमती मिळवण्यात बराच काळ गेला. घरातील होकार-नकार मिळणे क्रमप्राप्त होते; कारण डॉ. पतंगरावांनी आता कुटुंबाच्या आर्थिक जबाबदारीचा भार हलका करावा अशी अपेक्षा असणे स्वाभाविक होते; परंतु उच्च शिक्षणासाठी पुण्यास जाणारच, हा त्यांचा पक्का निर्धार असल्यामुळे घरातील लोकांचा रोष पत्करून डॉ. पतंगराव पुण्यास निघून आले. जाताना त्यांनी शिवाजी कॉलेजमधील इतिहासाचे प्राध्यापक ए. ए. पाटील यांच्या

घेतलेल्या पत्रामुळे त्यांना वाडिया कॉलेजमध्ये टी.डी.च्या कोर्ससाठी प्रवेश मिळाला. तसेच रयत शिक्षण संस्थेच्या हडपसर येथील साधना विद्यालयात पाठ घेण्याची परवानगीसुद्धा मिळाली. हडपसरला त्यावेळी प्रा. ल. ना. सुभेदार हे मुख्याध्यापक होते. साधना विद्यालय त्यावेळी हडपसर येथील पुणे महानगरपालिकेच्या बंटर नावाच्या इमारतीमध्ये भरत होते. ही पूर्वीची एका चर्चची जागा होती. प्रा. ए. ए. पाटील यांच्या पत्रामुळे डॉ. पतंगरावांची राहण्याची सोय साधना विद्यालयाच्या एका खोलीत करण्यात आली होती व त्याच खोलीत विद्यालयातील कलाशिक्षक बा. ग. पवार राहत होते.

रयत शिक्षण संस्थेचे साधना विद्यालय हे मोठे माध्यमिक विद्यालय होते. ते दुबार पद्धतीने म्हणजे सकाळी काही वर्ग व दुपारी काही वर्ग भरत असत. डॉ. पतंगराव टी.डी.च्या तासाकरता वाडिया कॉलेजमध्ये सकाळी जात व दुपारी साधना विद्यालयात टी.डी.चे तास घेत असत. एका उडप्याच्या खानावळीत दुपारचे जेवण घेऊन साधना विद्यालयातच थांबत असल्यामुळे मोकळ्या तासिकांवर ते शिकवण्यास जात असत. अशा दिनक्रमामध्ये डॉ. पतंगराव कदम यांनी वाडिया कॉलेजमधून टीचर्स डिप्लोमा १९६२ मध्ये मिळवला आणि ते माध्यमिक शिक्षकांच्या नोकरीस एक योग्य उमेदवार झाले.

साधना विद्यालयाचे मुख्याध्यापक ल. ना. सुभेदार यांनी डॉ. पतंगरावांना टी.डी. झाल्यावर नोकरीसाठी अर्ज करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांचा अर्ज रयत शिक्षण संस्थेकडे प्रा. सुभेदार यांनी शिफारशीसह पाठवला व जॉइंट सेक्रेटरी, प्राचार्य रा. सु. पाटील यांनी साधना विद्यालयात डॉ. पतंगरावांची अर्धवेळ शिक्षकाची ऑर्डर काढली. त्याप्रमाणे साधना विद्यालयात शिक्षक म्हणून डॉ. पतंगराव रूजू झाले.

साधना विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. ल. मा. सुभेदार हे एका सुसंस्कृत स्वातंत्र्य सैनिकाचे सुपुत्र होते. बाणेदार स्वभाव व आकर्षक व्यक्तिमत्त्व असलेल्या या विद्वान शिक्षकाचा नेहमीचा पोशाखही आदर्श असा होता. ते नेहमी खादीचा शर्ट, धोतर व गांधी टोपी वापरत असत. परदेशात जाऊन आलेल्या व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या आजीव सभासद असलेल्या या मुख्याध्यापकांचे सहकारी शिक्षक म्हणून काम करण्याची संधी

डॉ. पतंगरावांना साधना विद्यालयात लाभली होती. या विद्यालयात प्रशिक्षित शिक्षकवर्ग मोठा होता. त्यात डॉ. पतंगराव सर्वांत लहान वयाचे अर्धवेळ शिक्षक होते; परंतु, काम पूर्ण वेळ करीत असत. शाळेच्या प्रत्येक कार्यक्रमात हिरिरीने भाग घेत असत. मुख्याध्यापक, सहशिक्षक यांच्याबरोबर शिक्षणाबद्दल चर्चा करीत. डॉ. पतंगरावांचे त्यावेळी अठरा वर्षांचे वय होते. तरी त्यांचे बसणे-उठणे मोठ्या लोकांमध्ये असे, त्यामुळे डॉ. पतंगरावांनी आपल्या भावी आयुष्यात शिक्षक, शिक्षण संस्था-संस्थापक व चालक म्हणून मिळवलेल्या लौकिकाचा पाया हडपसर येथील वास्तव्यात घातला गेला असावा.

डॉ. पतंगरावांच्या उत्साही स्वभावामुळे आणि संस्थेच्या कोणत्याही कार्यक्रमात स्वतःहून पुढाकार घेण्याच्या स्वभावामुळे त्यांनी शिक्षकांमध्ये आपले आगळेवेगळे स्थान निर्माण केले होते. शाळेच्या कोणत्याही कार्यक्रमाचे नियोजन त्यांच्याकडेच असे. निमंत्रणपत्रिका छापण्यापासून ते प्रमुख पाहुण्यांना आणण्यात आणि नियोजित कार्यक्रम यशस्वी करण्यात त्यांचा पुढाकार असे, त्यामुळे त्यांनी शिक्षकांमध्ये आदराचे व कौतुकाचे स्थान आपल्या कार्यकुशलतेने मिळवले होते. सन्माननीय पाहुण्यांच्या सहवासात राहून त्यांचे आचारविचार ऐकण्याचा, त्यांचे अनुकरण करण्याचा छंद डॉ. पतंगरावांना होता. लहान वय असूनही मोठ्या वयाच्या प्रतिष्ठितांची ओळख करून घेण्यातही त्यांना आनंद वाटत असे.

डॉ. पतंगराव साधना विद्यालयात असताना तेथील शिक्षक शं. मा. डिंगणे, दे. मु. महादार, व्ही. बी. म्हेत्रे, ना. गो. निलाखे, बा. ग. पवार हे सर्व एकाच चाळीवजा घरात राहत होते. दररोज सायंकाळी शिक्षकांची बैठक भरत असे. त्यामध्ये मुख्याध्यापक सुभेदारही भाग घेण्यास येत. इतर विषयांबरोबर मुख्यतः ग्रामीण विद्यार्थ्यांचे इंग्रजी व गणित विषयाचे मागासलेपण कसे सुधारावे यावर चर्चा होई. सुभेदार सरांनी डॉ. पतंगरावांना मानसपुत्र मानलेले होते. एकदा सुभेदार डॉ. पतंगराव कदमांना विनोदाने म्हणाले, ''तुम्ही मराठे घराण्याचा फुकट बडेजाव मारता. मी ब्राम्हण असूनही वेळ पडल्यास भजी तळण्यास मला कमीपणा वाटणार नाही.'' आणि मग कोणाच्या तरी घरातून भज्यांच्या प्लेटी यावयाच्या आणि त्यावर हात मारून बैठक विसर्जित व्हावयाची.

डॉ. पतंगरावांच्या धाडसी स्वभावामुळे अधिकाऱ्यांकडून रयत शिक्षण संस्थेची कामे करून घेण्यात त्यांचा हातखंडा होता. कोणत्याही अधिकाऱ्यावर डॉ. पतंगराव अशा तऱ्हेची मोहिनी टाकीत, की त्यांचे काम निश्चित होत असे. माणसे मिळवण्यात, त्यांची पारख करण्यात आणि जिंकण्यात ते पारंगत झाले होते. ''हाउ टु विन फ्रेंडस् अँड इन्फ्ल्युएन्स पीपल'' या अमेरिकेच्या डेल कार्निजीच्या या तत्त्वप्रणालीचे डॉ. पतंगरावांना उपजत ज्ञान असावे असे त्यांच्या वागण्या-बोलण्यातून निश्चितपणे दिसून येत असे.

डॉ. पतंगराव साधना विद्यालयात असतानाच रयत शिक्षण संस्थेची पिंपरी, मांजरी, वडगाव, मावळ, गराडे या ठिकाणी नव्याने विद्यालये सुरू झाली. पिंपरी येथे रयत शिक्षण संस्थेचे विद्यालय सुरू झाल्यावर फक्त टी.डी. असूनही त्या विद्यालयाचे पहिले प्रभारी मुख्याध्यापक म्हणून डॉ. पतंगरावांची नेमणूक झाली होती. डॉ. पतंगरावांनी ही जबाबदारी मोठ्या कौशल्याने पार पाडली. पिंपरी येथील नवमहाराष्ट्र विद्यालय आता दिमाखाने संस्थेच्या स्वतः च्या मालकीच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे.

मुंबई येथील कुलाबा भागात रयत शिक्षण संस्थेचे नवीन विद्यालय मंजूर झाले होते. श्री. शं. मा. डिंगणे यांची या नवीन विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली होती. डिंगणे यांनी डॉ. पतंगरावांना मुंबईस मदतीस म्हणून नेले होते. तेथेही डॉ. पतंगरावांनी डिंगणे यांना मौलिक सहकार्य केले होते. हे करत असताना आपल्या मागास भागाचा विकास करण्याच्या योजना मंजूर करून घेण्याचे प्रयत्न डॉ. पतंगरावांनी केले होते. त्यांचे हे प्रयत्न म्हणजे लहान वयात सामाजिक बांधिलकीची जाण असल्याचे द्योतक होते.

एक शिक्षक म्हणून रयत शिक्षण संस्थेत डॉ. पतंगरावांनी केलेले प्रामाणिक काम हे शिक्षण संस्थेमध्ये शिक्षकांनी आपले काम प्रामाणिकपणे कसे करावे याचा आदर्श वस्तुपाठच म्हणावा लागेल. या अनुभवाच्या शिदोरीवरच पुढे त्यांनी भारती विद्यापीठाची उभारणी यशस्वीपणे केल्याचे दिसून येते.

***

## २. भारती विद्यापीठाचे संस्थापक

भारती विद्यापीठाची स्थापना होण्यामागचा इतिहास सांगताना डॉ. पतंगराव कदम यांनी १९७७ च्या एका समारंभात सांगितले, की ''माझ्यासारखा एक विद्यार्थी एकोणीसशे एकसष्ट साली शिक्षणासाठी खानापूर तालुक्यातल्या सोनसळसारख्या पाचसहाशे वस्तीच्या खेड्यामधून पुण्यामध्ये आला. त्यावेळी तेथे फारशी कुणाशी ओळख नव्हती. नाही म्हणायला एक प्राध्यापक ए. ए. पाटील ओळखीचे होते. त्यांची चिठ्ठी घेऊन आलो. त्यावेळी स्वप्नाळू कल्पना होत्या, की आपण काहीतरी केले पाहिजे. काय करायचे, कसे करायचे, काही माहीत नव्हते; पण उगीचच्या उगीच वाटायचे, आपण समाजासाठी काहीतरी केले पाहिजे, म्हणून एकत्र बसून संस्था काढण्याची कल्पना मनामध्ये आली. माझे मित्र आनंदराव पाटील यांनी आणि आम्ही विचार केला, की महाराष्ट्रामध्ये गणित आणि इंग्रजी या विषयांचा विद्यार्थ्यांना फार बाऊ वाटतो. हे विषय अवघड वाटतात. ते सोपे वाटावे, त्यांत गोडी निर्माण व्हावी आणि म्हणून आपण या विषयांचे पद्धतशीर शिक्षण देणारे विद्यापीठ काढूया. लोक हसायला लागले. हे मोठे शहाणे आलेत ! पुण्यासारख्या शहरात विद्वानांना तोटा नाही आणि या सगळ्या विद्वानांच्या शहरामध्ये कसले विद्यापीठ काढायला लागलेत ! तुमचे काय शिक्षण झालेय? मी त्यावेळी मॅट्रीक नंतर फक्त टी.डी. झालो होतो. मोठी पंचाईत झाली ! शिक्षण फारसे झाले नाही, परंपरा नाही, आर्थिक बळ नाही आणि शिक्षण संस्था काढायला निघालोय! मला संस्था रजिस्टर करायला अकरा रूपये देणारे अकरा लोकसुद्धा त्यावेळी मिळत नव्हते; पण निराश न होता जिद्दीने काम सुरू केले आणि गणित आणि इंग्रजी विषयाचे ज्ञान देऊन परीक्षा घेण्याचे काम महाराष्ट्रात सुरू केले. ''

डॉ. पतंगरावांच्या वरील विचारातून भारती विद्यापीठ स्थापन करण्याचा त्यांचा उद्देश व तो साध्य करण्याची तळमळ, शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजातील विद्यार्थ्यांबद्दल कळकळ आणि ध्येय साध्य करताना आलेल्या अडचणी व अडथळ्यांची कल्पना येते. कोणतीही संस्था स्थापन करताना कसलेही व कोणाचेही पाठबळ नसेल; तर तारेवरची कसरतच करावी

भारती विद्यापीठाचे संस्थापक पदाधिकारी



आनंदराव पाटील (कार्याध्यक्ष), डॉ. पतंगराव कदम (कार्यवाह)
यशवंतराव मोहिते (अध्यक्ष), डॉ. भास्कर पाटील (उपाध्यक्ष)



डॉ. पतंगराव कदम, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील

लागते. अवमानित करणारे शब्द ऐकावे लागतात; परंतु जिद्दीचे व चिकाटीचे प्रयत्न असतील, तर समाजपरिवर्तन करण्याच्या कामात यश मिळणे शक्य होते, हे डॉ. पतंगरावांनी आपल्या अनेक यशस्वी उपक्रमांतून सिद्ध करून दाखवले आहे.

शिक्षणक्षेत्रात १९६४ सालच्या सुमारास जशी परिस्थिती होती, तशी ती आजही आहे. गणित आणि इंग्रजी विषयात प्रावीण्य मिळवल्याशिवाय आधुनिक विज्ञान युगातील शास्त्राचा, नवीन शोधाचा अभ्यास करता येत नाही. इंग्रजी भाषा ही जगाकडे पाहण्याची एक खिडकी समजली जाते; कारण प्रगत विज्ञान इंग्रजीत आहे. तसेच लोकसेवा आयोगामार्फत वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याची निवड करण्यासाठी होणाऱ्या स्पर्धा परीक्षेत महाराष्ट्रातील विद्यार्थी फार थोड्या संख्येने उत्तीर्ण होत असत. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेशासाठी होणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेतही महाराष्ट्रीय तरूण फार मोठ्या संख्येने उत्तीर्ण होत नव्हते. या वस्तुस्थितीचे वर्णन करताना विचारवंत म्हणत, 'राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी महाराष्ट्रात आहे; पण प्रबोधिनीमध्ये महाराष्ट्र नाही.' या उणिवांचे कारण इंग्रजी भाषेवर महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रभुत्व व प्राविण्य नसणे हे होय. त्याचबरोबर इंग्रजी व गणित हे विषय ऐच्छिक असल्यामुळे बहुजन समाजातील बहुसंख्य विद्यार्थी हे दोन विषय सोडून एस.एस.सी. परीक्षा देत असत. यासाठी कोणीतरी महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांची गणित व इंग्रजी विषयांची तयारी करून घेणारी यंत्रणा सुरू करण्याची अत्यंत आवश्यकता होती. सर्वजण या परिस्थितीची निकड लक्षात आणून देत होते; पण त्यावर उपाय म्हणून कोणी पुढाकार घेत नव्हता. काहींनी प्रयोग केले; पण ते अपुरे पडत होते. भविष्यकाळातील मोठमोठी स्वप्ने पाहणाऱ्या डॉ. पतंगरावांसारख्या तरूणाने हे आव्हान स्वीकारले आणि समविचाराच्या आनंदराव पाटील, मुकुंद पवार, श्यामराव माने या शिक्षणक्षेत्रातील सहकारी मित्रांच्या सहकार्याने एक अभिनव उपक्रम सुरू करण्याचे ठरवले. परंतु, उपक्रमाचा विचार साकार करणे तसे इतर मित्रांना अवघडच होत; पण डॉ. पतंगराव म्हणत, की महाराष्ट्रात तज्ज्ञांच्या गोंधळात इंग्रजीचे तीन तेरा वाजले तरी आपणांस जे वाटते व पटते ते प्रतिकूल परिस्थितीतही आपल्या कुवतीप्रमाणे करण्यात नक्कीच यश मिळेल. अशा आशावादी विचाराने झपाटलेले डॉ. पतंगराव भविष्यातील यशोमंदिराची शिखरे पाहत होते.

अगदी याच काळात अकलूजच्या सदाशिवराव माने विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंदराव पाटील यांनी पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या 'नवे जग' या मासिकातील जानेवारी, १९६४ च्या अंकात 'रशियातील गणित मंडळे' या विषयावर डॉ. केळकर यांचा लेख हाता. त्यांनी मुकुंद पवार या आपल्या मित्राशी चर्चा करून पुण्यामध्ये समविचारी शिक्षकांची एक बैठक आयोजित केली. त्या बैठकीस डॉ. पतंगराव कदम व त्यांचे साधना विद्यालयातील शं.मा. डिंगणे, व. भा. म्हेत्रे, ना. गो. निलाखे, बा. ग. पवार वगैरे सहकारी शिक्षक उपस्थित होते.

या बैठकीत फक्त गणित या विषयाच्या परीक्षा घेण्यासाठी नियोजित संस्थेचा कच्चा आराखडा तयार करून मांडला होता. या संस्थेचे आजीव सदस्य होण्यासाठी आनंदराव पाटील यांनी आवाहन केल्यावर उपस्थितांकडून उभे राहून प्रथम अकरा रुपये भरणारे डॉ. पतंगराव कदम हे पहिले आजीव सदस्य झाले. आपल्या मनातील विचार प्रत्यक्षपणे कृतीत आणणाऱ्या या संस्थेच्या संस्थापकांमधील पहिले आजीव सदस्य होण्याचा मान डॉ. पतंगरावांना मिळाला होता. त्या बैठकीतच शं. मा. डिंगणे यांनी श्रीफळ वाढवून संस्थेच्या कार्याचा शुभारंभ केला. सर्वानुमते संस्थेचे 'भारती विद्यापीठ' हे नाव कायम केले गेले व 'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन' हे संस्थेचे ध्येय ठरवण्यात आले.

नियोजित संस्थेचे नाव ठेवण्याच्या प्रसंगावरून मला यशवंतराव मोहिते यांनी कऱ्हाडच्या सद्गुरू गाडगे महाराज कॉलेजच्या १९६६च्या स्नेहसंमेलनात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या नावामागील प्रकट केलेले विचार आठवले. त्याप्रसंगी ते म्हणाले होते, की अण्णांना आपल्या संस्थेला एखादे जाडजूड नाव देता आले असते, परंतु कर्मवीरांनी आपल्या शिक्षण संस्थेला 'रयत शिक्षण संस्था' हे नाव दिले. कित्येक वेळा काही तत्त्ववेत्ते 'नावात काय आहे!' असा प्रश्न विचारतात; पण सामान्य, भावनाप्रधान माणसाला असा प्रश्न विचारवासा वाटतो; कारण 'शिवाजी' नाव घेताच समस्त मराठी जनांची छाती स्वाभिमानाने भरून येते आणि मान आदराने लवते, ती का? आणि हीच गोष्ट लक्षात घेऊन संस्थेच्या नावातून अण्णांनी

आपला रयतेकडील ओढा स्पष्ट केला आहे. या विचारांची आठवण होताना मला डॉ. पतंगराव कदम आणि त्यांच्या सहकारी मित्रांनी आपल्या संस्थेस 'भारती विद्यापीठ' म्हणजे 'सर्व भारतीयांचे विश्वविद्यालय' हे कसे समर्पक नाव दिले आहे याचे कौतुक वाटते. या नावामुळे संस्थेचा भारतीयांबद्दलचा असलेला ओढा स्पष्ट झाला आहे. तसेच भारती विद्यापीठ हे नाव देण्यामागे संस्थापकांचा विशाल दृष्टिकोनही लक्षात येतो. मानव ही जात व माणुसकी हा धर्म. विश्वबंधुत्वाच्या या पायावर त्यांनी संस्थेची स्थापना केली आणि 'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन' या महान व पवित्र ध्येयाने प्रेरित होऊन शिक्षण कार्याला सुरुवात केली. शिक्षणक्षेत्रातील पदविका घेण्यासाठी आलेला हा विद्यार्थी विश्वबंधुत्वाची जोपासना करणारे शिक्षण देणारा शिक्षक केव्हा झाला हे पुणेकरांना कळलेच नाही !

भारती विद्यापीठाचे बोधवाक्य निवडले. आता संस्थेचे बोधचिन्ह कसे असावे याची चर्चा डॉ. पतंगराव आणि आनंदराव पाटील यांनी करून ते तयार करण्याची जबाबदारी कला-शिक्षक असलेले सहकारी बा. ग. पवार यांच्यावर सोपविली. त्यांनी आशययुक्त व अर्थपूर्ण बोधचिन्ह मोठ्या निष्ठेने तयार केले. ते सर्वांना आवडलेही. त्याबद्दलचे पंचवीस रूपये मानधन डॉ. पतंगरावांनी बा. ग. पवार यांना दिले.

भारती विद्यापीठाच्या बोधचिन्हाचा बाह्याकार गरूडासारखा आहे. वरील चोचीसारखा दिसणारा निमुळता भाग रॉकेटचा दाखवला आहे. त्याच्या खालील गोलाकार भाग विश्वाचे प्रतीक म्हणून घेतलेला आहे. मध्यभागात मातृभूमीचा-भारताचा नकाशा घेतलेला आहे. गोलाकार भागाच्या दोन्ही बाजूस झेपावणारे पंख दाखवले आहेत. दोन पंखांमध्ये 'भारती विद्यापीठ' ही अक्षरे आहेत. गोलाच्या खाली 'विद्येचे अधिष्ठान' असलेले 'पुस्तक' आहे. पुस्तकाच्या दोन पानावर 'गणित व विज्ञान' यांचे, तसेच अणूचे प्रतीकात्मक चिन्ह आहे. संस्थेची स्थापना 'विद्येचे माहेरघर' अशा पुण्यात झाल्यामुळे 'पुणे' ही अक्षरे रेखाटली आहेत. असे हे बोधचिन्ह आशययुक्त आहे.

भारती विद्यापीठाच्या कार्यासाठी जागेचा प्रश्न होता. मुकुंद पवार यांनी तो सोडवला. त्यांच्याकडील पुण्यातील ५३०अ, कसबा पेठ येथील रहाळकर

मंदिराच्या वरच्या मजल्यावरील एक खोली दरमहा ३० रूपये भाड्याने घेतली. त्या खोलीबाहेर-भारती विद्यापीठ असा भारती विद्यापीठाचा बोर्ड लावला. ही जागा तशी बोळातच होती. त्याचा संदर्भ देऊन 'बोळात सुरू झालेले विद्यापीठ बोळातच विसर्जित होणार' अशी काकवाणी काहींनी काढली होती. एक जुने टेबल, एक जुनी खुर्ची हे भारती विद्यापीठाचे सुरूवातीचे फर्निचर होते. एवढ्या साधनसामग्रीनिशी भारती विद्यापीठाचे काम सुरू झाले.

ज्या कसबा पेठेत भारती विद्यापीठाच्या कार्यास सुरुवात झाली, त्या कसबा पेठेचा इतिहास मला आठवतो. शहाजीराजांची पुणे व सुपे परगण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी राजमाता जिजाबाई व बालशिवाजी शिवनेरीहून पुण्यास १६३६ मध्ये आले व त्यांनी कसबा पेठेतील प्राचीन गणेश मंदिराचा जीर्णोद्धार केला. हाच तो पुण्यातील प्रसिद्ध कसबा गणपती. त्या गणेश मंदिराजवळच बाल शिवाजीसाठी लाल महाल नावाचा राजवाडा बांधला. येथेच बाल शिवाजींना लिहिणे, वाचणे व जहागिरीचा कारभार पाहणे यांचे शिक्षण मिळाले. बाल शिवाजींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या कसबा पेठेतच बहुजन समाजातील मुलांना इंग्रजी व गणित या विषयांची तयारी करून घेण्यासाठी भारती विद्यापीठाची स्थापना व सुरूवात झाली. हा एक नियतीने घडवलेला अपूर्व असा योगायोग म्हणावा लागेल. पुढे बाल शिवाजी कर्तबगार व जाणते छत्रपती शिवाजीराजे झाले व त्यांनी मराठी राज्याचा विस्तार महाराष्ट्रात केला. अगदी तोच आदर्श समोर ठेवून डॉ. पतंगरावांनी कसबा पेठेत स्थापन केलेल्या भारती विद्यापीठाचा विस्तार महाराष्ट्रातील प्रमुख शहरांत तर केलाच; पण भारताची राजधानी दिल्लीतही भारती विद्यापीठाच्या विविध शाखा सुरू करून शिक्षणक्षेत्रात एक नवा इतिहास घडवला. त्याची दखल घेऊन भारत सरकारने भारती विद्यापीठास अभिमत विद्यापीठाचा दर्जा देऊन डॉ.पतंगराव कदम यांना या विद्यापीठाचे तहहयात कुलपती म्हणून १९९६ मध्ये जाहीर केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा लाल महाल राजवाडा सन १६३६ मध्ये बांधला. त्या वर्षाचा शुभांक १+६+३+६=१६=१+६=७(सात) हा येतो. तसेच भारती विद्यापीठास अभिमत विद्यापीठ म्हणून मान्यता सन १९९६

मध्ये मिळाली. त्या वर्षाचा शुभांक १+९+९+६ =२५ = २+५=७(सात) हाच येतो. दोन्ही घटनांचा शुभांक एकच येत आहे हाही एक योगायोगच आहे. डॉ.पतंगराव कदम आणि त्यांचे बंधू मिळून सातजण आहेत. हीसुद्धा लक्षात येणारी गोष्ट आहे. असे महत्त्वाचे योगायोग ज्यांच्या जीवनात येतात, त्या असामान्य पुरुषांना म्हणूनच महापुरुष असे संबोधले जाते. तो उच्च विद्याविभूषित असेल, कुशल संघटक असेल, मानवधर्माचा पुजारी असेल, सामाजिक परिस्थितीचा जाणकार असेल, तर त्यास लोक जाणता महापुरुष म्हणतात. डॉ.पतंगराव कदम यांच्या प्रस्तुत चरित्रास म्हणूनच महाराष्ट्राचा शिल्पकार हे नाव दिले आहे.

भारती विद्यापीठास सामाजिक प्रतिष्ठा मिळावी, या हेतूने विद्यापीठाचा अध्यक्ष मंत्री असावा या उद्देशाने डॉ. पतंगराव कदम, आनंदराव पाटील व मुकुंद पवार मुंबईस गेले. प्रथम ते बाळासाहेब देसाई यांच्याकडे गेले. त्यांनी सांगितले, की 'मी सध्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा अध्यक्ष आहे म्हणून मला दुसऱ्या संस्थेचा अध्यक्ष होता येणार नाही.' नंतर राजाराम बापू पाटील म्हणाले, 'माझी स्वतःचीच एक शिक्षण संस्था आहे'. दादासाहेब जगताप म्हणाले, 'मी साताऱ्च्या महाराष्ट्र हिंदी विद्यापीठाचा अध्यक्ष आहे'. अशा तऱ्हेचा अनुभव आल्यानंतर डॉ. पतंगराव कदमांचे नातेवाईक-बोरगावचे माजी आमदार आत्माराम बापू पाटील यांना ही मंडळी भेटली आणि अडचण सांगितली. आत्माराम बापूंनी डॉ. पतंगरावांना लगेच यशवंतराव मोहिते यांच्यासाठी पत्र देऊन त्यांच्याकडे पाठवले. वास्तविक पाहता डॉ. पतंगरावांना यशवंतराव मोहिते यांच्याबद्दल आदर व ओढाही होता. मोहिते यांच्याकडे जाताना डॉ. पतंगरावांनी खानापूर तालुक्याचे आमदार बी. एल. पवार यांना बरोबर घेतले व मोहिते यांनी सांगितले, की अध्यक्षबिध्यक्ष असल्या भानगडीत मी कधी पडत नाही आणि मी अध्यक्ष व्हावे असा तुमचा फारच आग्रह असेल तर ते एका अटीवर, की माझ्याकडून तुम्हाला काही मदत मिळणार नाही. हे जर मान्य असेल तर तुम्ही मला खुशाल अध्यक्ष करा! यानंतर भारती विद्यापीठाचे माहितीपत्र मोहिते यांनी ठेवून घेतले आणि ६ महिन्यांनंतर

पोस्टाने अध्यक्षपद स्वीकारल्याचे पत्र पाठवले. सुरुवातीची एक लढाई डॉ. पतंगरावांनी जिंकली होती व त्यामुळे विद्यापीठाच्या कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला होता.

यानंतर भारती विद्यापीठाच्या गणित व इंग्रजी विषयाची परीक्षा घेण्याच्या कामास जोराने सुरुवात झाली. डॉ. पतंगराव कदम व आनंदराव पाटील यांच्या प्रयत्नांमुळे परीक्षांबद्दलचा खूप प्रचार झाला. अनेक ठिकाणी परीक्षा केंद्रे सुरू झाली आणि पहिल्याच वर्षी परीक्षा-फीचे पंचवीस हजार रुपये जमा झाले. सर्व खर्च वजा जाता सहा हजार रूपये शिल्लक राहिले. त्या पैशातून संस्थेसाठी टिळक रोडवर ४२४, सदाशिव पेठ या जागेवरील पहिल्या मजल्याची जागा बांधून घेण्याचे ठरले. नाना बढे यांनी ही जागा घेण्यासाठी मदत केली होती. त्यांच्यावरच बांधकाम करण्याचे काम सोपवले. सिमेंट उपलब्ध झाले व लवकरच बांधकाम पुरे झाले. त्यामुळे १९६५ साली ४३४, सदाशिव पेठ येथे भारती विद्यापीठाचे कार्यालय स्वतःच्या जागेत सुरू झाले. या जागेत कार्यालय आणल्यावर डॉ. पतंगराव यांचा मुक्काम कार्यालयातच असायचा. दैनंदिन कामकाज डॉ. पतंगरावच पाहू लागले. कार्यवाह डॉ. पतंगराव, लेखनिक डॉ. पतंगराव, शिपाई डॉ. पतंगराव असा 'कर्मचारी वर्ग' त्यावेळी होता.

विद्यापीठाच्या प्रचारासाठी सातारा येथे गेले असता विद्यापीठाचे उपाध्यक्ष होण्यासाठी रयत शिक्षण संस्थेतील बॅ. पी. जी. पाटील यांना डॉ. पतंगराव भेटले, पण त्यांनी नकार दिला. त्यांनी गणित विषयातील तज्ज्ञ प्रा. शं. नस. सुखटणकर यांना भेटण्यास सांगितले; पण त्यांनीही उपाध्यक्ष होण्याचे नाकारले. नंतर सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. भास्करराव पाटील यांना विनंती केली ती त्यांनी मान्य केली.

दिनांक ०१ मार्च, १९६६ रोजी उपाध्यक्ष डॉ. भास्करराव पाटील यांच्या निवासस्थानी सातारा येथे भारती विद्यापीठाच्या कार्यकर्त्यांची बैठक भरली होती. त्या बैठकीमध्ये विद्यापीठाच्या कामास पूर्ण वेळ वाहून घेणारा कार्यवाह निवडण्याचा विचार झाला. विद्यापीठाचे सर्व आजीव सदस्य इतर ठिकाणी कायम नोकरीत होते. त्यापैकी कोणीही नुकत्याच सुरू झालेल्या भारती विद्यापीठाच्या कामासाठी आपली नोकरी सोडून येण्यास तयार झाले नाहीत;

परंतु, याचवेळी डॉ. पतंगरावांची भारती विद्यापीठाच्या कामाबद्दलची तळमळ, धाडसी स्वभाव आणि भविष्याबद्दल अचूक वेध घेण्यातील तत्परता दिसून आली. सर्वानुमते डॉ. पतंगरावांची संस्थापक-कार्यवाह म्हणून निवड झाली व ती त्यांनी आनंदाने स्वीकारली. त्यास याबेळी सर्वानुमते मान्यता मिळाली.

डॉ. पतंगरावांच्या एका सहकाऱ्याने मला सांगितले, की त्यावेळी डॉ. पतंगरावांना सर्वजण एक आमदार म्हणूनच बोलवत होते. आता ते एका संस्थेचे प्रमुख जबाबदार पदाधिकारी झाले होते. भारती विद्यापीठाच्या प्रगतीबरोबरच आता संस्थेस प्रतिष्ठित पदाधिकारी लाभले होते. भारती विद्यापीठाचे अध्यक्ष यशवंतराव मोहिते, उपाध्यक्ष, डॉ. भास्करराव पाटील, कार्याध्यक्ष आनंदराव पाटील व कार्यवाह डॉ. पतंगराव कदम झाले होते. या संस्थेचे ट्रस्टी म्हणून डॉ. भास्करराव पाटील, आ. ब. पाटील, प्रा. पी. ए. पानवळ यांची निवड झाली होती.

डॉ. पतंगरावांनी सातारा, सांगली जिल्ह्यातील पुणे येथे असणाऱ्या पदविधारकांची संघटना स्थापन केली. या संघटनेचे अध्यक्ष बॅ. जी. डी. पाटील, उपाध्यक्ष डॉ. पतंगराव कदम व प्रा. सगरे सचिव झाले होते. संघटनेच्या मिटींग प्रत्येक महिन्याला होत होत्या.

भारती विद्यापीठाच्या इंग्रजी व गणित परीक्षांचा व्याप वाढत होता. अशा काळात म्हणजे १९६८ ते १९७३ या कालावधीमध्ये डॉ. पतंगरावांची एस.टी. बोर्डाचे मेंबर म्हणून नेमणूक महाराष्ट्र शासनाने केली होती. सामाजिक प्रतिष्ठेच्या या नेमणुकीमुळे डॉ. पतंगरावांना एका विशाल क्षेत्रात सामाजिक कार्य करण्याची संधी मिळाली. एस.टी.च्या कामामुळे अनेक शिक्षण संस्थांशी, शासनातील अधिकाऱ्यांशी संपर्क वाढला. भारती विद्यापीठास त्यास खूप उपयोग झाला. भारती विद्यापीठ घेत असलेल्या इंग्रजी व गणित विषयाच्या परीक्षा घेण्यास नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा यांनी परिपत्रक काढून शिफारशी केल्या होत्या. त्यामुळे विद्यापीठाचे कार्यक्षेत्र व कार्य मोठ्या प्रमाणात वाढले आणि पश्चिम महाराष्ट्रातील एक नामवंत, प्रतिष्ठित शिक्षण संस्था म्हणून राजमान्यता व लोकमान्यता मिळाली.

दिनांक १४ नोव्हेंबर, १९७१ रोजी महाराष्ट्राचे त्यावेळचे शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी भारती विद्यापीठास भेट दिल्यावर म्हटले होते, की ''नवगणित हे शास्त्राचे शास्त्र आहे. विज्ञानाला पायाभूत होणाऱ्या या गणिताचे महत्त्व समाजात बिंबवण्याचे अभिनंदनीय कार्य ही संस्था डॉ. पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जोमाने करीत आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रम संस्थेने हाती घेतले आहेत. समाजाला नवे विचार देणारी ही संस्था खऱ्या अर्थाने 'भारती विद्यापीठ' आहे. नवीन गणिताची गोडी समाजात निर्माण व्हावी, म्हणून हे विद्यापीठ परिश्रम घेत आहे. त्याबद्दल धन्यवाद ! पण या विद्यापीठाने यापेक्षा कितीतरी अधिक मोलाचे कार्य केले आहे. डॉ. पतंगरावांची ही झेप हनुमंताची झेप आहे आणि ती यशस्वी झेप आहे.''

महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांची गणित व इंग्रजी विषयाची तयारी करून घेणारी संस्था सुरू करून निकडीची शैक्षणिक व सामाजिक गरज भारती विद्यापीठामुळे भागली आहे. महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांनी या परीक्षांचा फायदा करून घेतला आहे आणि आजपर्यंत घेत आहेत. त्यामुळे भारती विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक कार्यास खूप मोठा हातभार लावला आहे असेच म्हणावे लागेल. १९६४ साली भारती विद्यापीठाने जी उणीव ओळखली ती महाराष्ट्र शासनाच्या लक्षात यायला १९७२ साल उजाडावे लागले आणि मग जून १९७२ पासून अभ्यासक्रम बदलून इंग्रजी व गणित हे विषय शासनाने माध्यमिक विद्यालयांतून सक्तीचे केले. या ऐतिहासिक परिवर्तनाला डॉ. पतंगराव कदम यांची दूरदृष्टी, सामाजिक उणिवांची जाणीव आणि भावी पिढीच्या शिक्षणाबद्दलची तळमळ कारणीभूत आहे हे महाराष्ट्राचा शैक्षणिक इतिहास कधीच विसरणार नाही.

आपण असे पाहतो, की कोणा एकाच्या मनात सुंदर व भव्य मंदिर उभे करण्याचा विचार येतो. मनातील विचार साकार करण्यासाठी प्रथम पायातील दगड व्यवस्थित रचून मंदिराचा पाया घातला जातो. त्यावर मंदिराच्या भिंती उभारल्या जातात आणि शेवटी सुंदर व आकर्षक कळस उभारून मंदिराची इमारत उभी राहते. त्यानंतर कुशल कारागिरांकडून उत्कृष्ट दगडातून सुंदर मूर्ती

घडवून घेतली जाते व त्या मूर्तीची प्रतिष्ठापना मंदिराच्या गाभाऱ्यात केली जाते. मूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर मंदिराचे श्रद्धेचे स्थान देवतेची मूर्ती असते. बाहेरून पाहणाऱ्यांना पायातील दगड, भिंतीतील दगड दिसत नाहीत. प्रथमदर्शनी सर्वांचे लक्ष जाते ते मंदिरातील मूर्तीकडे. अगदी अशीच घटना कोणत्याही संस्थेच्या उभारणीच्या बाबतीत घडलेली असते. भारती विद्यापीठाच्या बाबतीत तसेच घडले आहे.

नियतीच्या योजनेनुसार भारती विद्यापीठाचे ज्ञानमंदिर उभे राहिले आहे. नियतीनेच डॉ. पतंगराव कदम यांना भारती विद्यापीठाच्या ज्ञानमंदिरातील वंदनीय स्थान दिले आहे; परंतु हे सर्वोच्च स्थान मिळवण्यासाठी; त्यांना अनेक टाकीचे घाव सोसावे लागले आहेत आणि त्यानंतरच त्यांना अनेकांच्या आशाआकांक्षा पुऱ्या करण्याचे सामर्थ्य लाभले आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होते असे म्हणतात. हजारो वर्षांपूर्वी कदंब राजे राज्य करीत होते. त्यांचा वारसा लाभलेले, घराण्यात जन्मलेले डॉ.पतंगराव कदम आज भारती अभिमत विश्वविद्यालयाचे संस्थापक-कुलपती झाले आहेत हे आपण पाहत आहोत.

❊❊❊

## ३. शंकरराव मोरे विद्यालय : एक अभिनव शैक्षणिक प्रयोग

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ऐतिहासिक कार्याचे मूल्यमापन करताना भारती विद्यापीठाचे अध्यक्ष यशवंतराव मोहिते म्हणाले होते, की 'शहाणे करुनि सोडावे सकळ जन' या विश्व कल्याणाच्या भूमिकेने भारून त्यांनी आपले कार्य सुरु केले होते. पंडितांच्या कोंडीत सापडलेली ज्ञानगंगा सोडवून आणून साऱ्या बहुजन समाजाच्या घराघरांपर्यंत पोहोचविण्यासाठी हा महापुरूष झटत होता. पैसा नव्हता, माणसे नव्हती, विद्यार्थी नव्हते, समाज अनुकूल नव्हता, होती फक्त प्रभावी इच्छा. हा शैक्षणिक क्रांतीचा पलिता हाती घेऊन अण्णा आपले कार्य करू लागले. बहुजन समाजातील खेड्यापाड्यातील दरिद्री अशा कुटुंबातील मुले अण्णांनी हाताशी धरली. या दृष्टिने अण्णा मानवतावादी होते. अण्णांच्या कार्यात जात, धर्म, पंथ याचा कसलाही भेदभाव नव्हता. त्यांनी ज्ञानगंगा सर्वांसाठी खुली ठेवली होती. 'जो लुटला गेला आहे, जो पीडला गेला आहे, त्याला शिक्षण दिले पाहिजे. ज्याला गावात घर नाही, रानात शेत नाही, मग तो ब्राम्हणसुद्धा माझा नातलग आहे, ज्याला मी या क्रांतीच्या कार्यात माझ्याबरोबर नेणार', हे अण्णांचे तत्त्व होते. अगदी अशाच विचाराने डॉ. पतंगराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी भारती विद्यापीठाची स्थापना करून शैक्षणिक प्रबोधनाचे कार्य सुरू केले.

डॉ. पतंगराव यांनी कुंडलला माध्यमिक शिक्षण घेताना, पुण्याला शिक्षणशास्त्राची पदविका घेताना, किंवा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून नोकरी करताना सतत डोळ्यांसमोर कर्मवीरांनी ज्या ध्येयाने आपले संपूर्ण जीवन बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी व्यतीत केले, त्याच ध्येयधोरणाचा, ऐतिहासिक कार्याचा वसा घेऊन आणि कर्मवीरांनी पेटवलेल्या पलित्याची स्फूर्ती घेऊन भारती विद्यापीठ कार्य करीत होते. कर्मवीरांना आपले ध्येय साध्य करताना ज्या हाल-अपेष्टांना व कष्टांना तोंड द्यावे लागले, त्याचे डॉ. पतंगराव साक्षीदार आहेत. त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी कॉलेजमध्ये प्री-डिग्रीचे शिक्षण घेताना नुसते शिखण घेतले नाही व हडपसरच्या साधना विद्यालयात नोकरी करताना नुसते विद्यादानाचे कार्य केले नाही; तर रयत शिक्षण संस्थेने प्राथमिक शाळा,

माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये कशी व कोणत्या परिस्थितीत स्थापन केली गेली, याचाही सूक्ष्मपणे अभ्यास केला असावा. त्यामुळेच त्यांच्या शिक्षक सहकाऱ्यांमध्ये चर्चा करताना नेहमीच बॅ. रामराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासारख्या शिक्षण संस्था सुरू करण्याची स्वप्ने ते पाहत होते आणि तसे ते बोलूनही दाखवत असत. कर्मवीरांना सुरूवातीला ज्या अडचणी होत्या अगदी तशाच अडचणी डॉ. पतंगरावांनाही होत्या; पण नियतीची इच्छाच तरी जबरदस्त असल्यामुळे ध्येयपूर्तीसाठी हाती घेतलेल्या कार्यात आलेल्या अडचणी व संकटे यांवर मात करून त्यांनी यशोमंदिर गाठले, तेही आपल्या तरूण वयात.

भारती विद्यापीठाचे कार्य टिळक रोडवरील सदाशिव पेठेतील जागेत सुरळीतपणे सुरू झाल्यावर त्यांची पुण्यातील एरंडवणे भागातील नगरसेवक आरू यांच्याशी ओळख झाली. तसेच त्या भागातील कार्यकर्ते बढे यांनी सदाशिव पेठेतील संस्थेची इमारत बांधून दिल्यामुळे तेही संस्थेचे हितचिंतक व विद्यापीठाच्या कार्यातील सहकारी झाले होते.१९६२ साली सार्वत्रिक निवडणुकीमध्ये खासदार म्हणून निवडून गेलेले शंकरराव मोरे हे महाराष्ट्रातील थोर विचारवंत व बहुजन समाजाबद्दल तळमळ असलेले पुरोगामी विचारांचे लोकनेते होते. शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना त्यांच्याच अध्यक्षतेखाली अहमदनगर येथे १९४७ साली झाली होती. यशवंतराव मोहिते, शंकरराव मोरे यांना आपले राजकीय गुरू मानीत असत. १९६० मध्ये शंकरराव मोरे व यशवंतराव मोहिते कॉंग्रेसमध्ये आल्यावर दोघांनीही देशासाठी योगदान दिले होते. १९६१ साली शंकरराव मोरे यांच्या निधनानंतर ज्या शिवाजीनगर मतदार संघातून खासदार म्हणून ते निवडून गेले होते, त्याच शिवाजीनगर भागात ते राहत होते, म्हणून शंकरराव मोरे यांचे योग्य असे स्मारक शिवाजीनगर भागात करावे अशी कल्पना पुढे आली होती.

१९६२ च्या लोकसभा निवडणुकीत भांबुर्डे पोलीस वसाहतीमधील पोलीस मतदार संघात स्वतः शंकरराव मोरे यांच्यासाठी काम केले होते. त्यावेळी महाराष्ट्र विधानसभेकरता शिवाजीनगर मतदार संघातून स. गो. बर्वे

व लोकसभेकरता पुणे मतदार संघातून शंकरराव मोरे काँग्रेस पक्षाचे उमेदवार होते. विरोधी पक्षातील उमेदवारांनी खूप तयारी करून निवडणूक लढवली; पण पुण्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी श्री. शंकरराव मोरे व स. गो. बर्वे यांना भरघोस मतांनी निवडून आले.

भारती विद्यापीठाचे अध्यक्ष यशवंतराव मोहिते विद्यापीठाच्या स्थापनेनंतर प्रथमच पुण्यात आले असता विद्यापीठाच्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना त्यांच्या राजकीय गुरुस्थानी असलेल्या शंकरराव मोरे यांचे उचित स्मारक पुणे येथे करावे अशी इच्छा त्यांनी व्यक्तकेली होती; कारण ग्रामीण भागातील सुशिक्षित तरूणांना अर्थकारणाची व समाजकार्याची दिशा देण्याचे कार्य शंकरराव मोरे यांनी केले होते. तसेच भारती विद्यापीठाचे कार्य अधिक व्यापक व्हावे म्हणून यशवंतराव मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली शंकरराव मोरे स्मारक समिती स्थापन करण्यात आली. स्मारक समितीच्या सचिवपदी डॉ. पतंगराव कदम होते. स्मारक उभारण्यासाठी एक स्मरणिका काढण्यात आली. स्मरणिकेला मिळालेल्या जाहिरातींद्वारा निधी गोळा करण्यात आला. पुण्यातील ज्येष्ठ शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्याकडून शंकरराव मोरे यांचा सुंदर अर्धपुतळा तयार करून घेतला. त्या निधीतूनच शंकरराव मोरे राहत होते, त्या शिवाजीनगर भागातील जंगली महाराज मंदिराच्या पुढील चौकात त्यांचा अर्धपुतळा उभारण्यात आला. त्या पुतळ्याचे अनावरण त्यावेळचे भारताचे संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते दिनांक ०१ मे, १९६९ या दिवशी झाले. त्याप्रसंगी यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, की 'शंकरराव मोरे म्हणजे बुद्धिवादाची तळपती तलवार होती'. महाराष्ट्रात मोरे यांच्यापूर्वी समाजवाद लिहिला गेला, वाचला गेला; परंतु समाजवादासाठी संघटना बांधून सामान्य जनापर्यंत समाजवाद नेण्याचे श्रेय शंकरराव मोरे यांनाच आहे. शंकरराव मोरे स्मारक समितीच्यावतीने यशवंतराव मोहिते म्हणाले होते, की ''बदलत्या परिस्थितीतही मूलगामी राष्ट्रनिष्ठा, बुद्धिनिष्ठा या वैचारिक बैठकीचा आधार जेधे-मोरे-गाडगीळ यांनी दिला. त्यांच्या विचाराचा आदर्श पुढे ठेवावयास हवा''.

स्मारक समितीकडे शिल्लक राहिलेल्या निधीतून एखादे वैचारिक व्यासपीठ निर्माण करावे असे यशवंतराव मोहिते यांचे म्हणणे होते; पण डॉ. पतंगराव कदम यांनी त्यास विरोध केला व त्याऐवजी भारती विद्यापीठाची पहिली शाखा म्हणून एरंडवणे भागात दुर्लक्षित मुलांसाठी एक विद्यालय सुरू करून त्यास शंकरराव मोरे यांचे नाव द्यावे अशी मागणी केली. डॉ. पतंगरावांच्या या कल्पनेचे सर्वांनीच स्वागत केले.

या हायस्कूलचा इतिहास सांगताना दिनांक ०८ जानेवारी, १९७७च्या एका समारंभात डॉ. पतंगराव म्हणाले होते, की ''आम्ही ज्या वेळी हायस्कूल सुरू करण्याचे ठरवले त्यावेळी अध्यक्षांनी विचारले, की कशासाठी हायस्कूल सुरू करतोस? मोहिते साहेबांचा मला सतत विरोध होता. त्यांना आम्ही सांगितले, की पुणे शहरात हायस्कूले नाहीत किंवा ती कमी आहेत म्हणून आम्ही हायस्कूल काढीत आहोत असे नाही. या शाळेच्या ठिकाणच्या माझ्या कल्पना वेगळ्या आहेत. मी हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम केले असल्यामुळे माझ्या स्वतंत्र अशा यासंबंधीच्या कल्पना आहेत. अनेक प्रश्न आहेत. त्या प्रश्नांचा विचार या शाळेमध्ये व्हावा. या सर्व कल्पना आणि योजना याठिकाणी राबवल्या जाव्यात आणि राबवण्यासाठी एक प्रायोगिक केंद्र आम्हाला याठिकाणी सुरु करावयाचे आहे म्हणून आम्ही ही शाळा सुरु केली''.

शंकरराव मोरे विद्यालय सुरू करण्याचे ठरवल्यानंतर डॉ. पतंगरावांनी शिक्षण खात्याकडे हायस्कूल मंजुरीसाठी अर्ज केला; पण काही कारणाने परवानगी मिळण्यास विलंब झाला; पण डॉ. पतंगराव यांच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळे त्यांनी शेवटी परवानगी मिळवलीच. वास्तविक त्या काळात अशी परिस्थिती होती, की लकडी पुलाशेजारील गरवारे हायस्कूलनंतर पुण्याच्या पश्चिम भागात एकही माध्यमिक विद्यालय नव्हते. गरवारे हायस्कूलमध्ये पश्चिम भागातील झोपडपट्ट्यांतील मागासवर्गीयांच्या मुलांना प्रवेश मिळणे कठीण झाले होते, आणि ही वस्तुस्थिती जाणून भारती विद्यापीठाने पुण्याच्या पश्चिम भागातील विद्यार्थ्यांची विशेषतः गरीब-कुटुंबातील मुलांची सोय करण्यासाठी माध्यमिक विद्यालयास परवानगी घेतली होती.

त्यावेळी भारती विद्यापीठाकडे नियोजित हायस्कूलसाठी जागा नव्हती, माणसे नव्हती, पैसा नव्हता, होती फक्त शिक्षणाची गंगा गरिबांच्या घरापर्यंत पोहोचवण्याची जबर महत्त्वाकांक्षा आणि त्या बळावरच शासनाकडून परवानगी मिळताच एरंडवणे भागातील एका दुकानातील भाड्याच्या जागेत शंकरराव मोरे हायस्कूल दिनांक १० जून, १९६८ रोजी सुरू झाले.

स्मारक समितीच्या स्मरणिकेच्या उपक्रमातून ३०-३५ हजार रूपये शिल्लक राहिले होते. त्यातून हायस्कूलसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यात आले. सुरूवातीचे मुख्याध्यापक बी.आर.येरी हे होते. नंतर दि.०१ जून, १९६९ ते दि.०७ जून, १९८५ पर्यंत दे. मु. महादार हे मुख्याध्यापक होते. त्यांनी विद्यालयात विद्यार्थी गोळा करण्यास, दैनंदिन खर्च भागवण्यास, निधी गोळा करण्यास, विद्यालयासाठी इमारत बांधण्यास अशा सर्व तऱ्हेच्या बाबींची पूर्तता करून विद्यालयाच्या प्रगतीसाठी अहोरात्र कष्ट घेतले होते. पहिल्या वर्षी आजूबाजूच्या झोपडपट्ट्यांमधील ३२ विद्यार्थिनींना घेऊन सुरू केलेल्या या विद्यालयाने पुण्यातील एक आदर्श विद्यालय म्हणून आज प्रतिष्ठा मिळवली आहे.

शंकरराव मोरे विद्यालयाच्या स्थापनेमागील हेतू स्पष्ट करताना यशवंतराव मोहिते म्हणाले होते, की ''नव्या युगाची दिशा, नव्या युगाचे तत्त्वज्ञान खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचवण्याचे फार मोठे कार्य शंकरराव मोरे यांनी केले. त्यांच्या विचारांची पूर्तता केली पाहिजे व ते करणारी संस्था उभारली गेली पाहिजे. याकरता शंकरराव मोरे विद्यालयाच्या रूपाने ही संस्था काढली आहे. ही संस्था म्हणजे त्यांचे जिवंत शैक्षणिक व वैचारिक स्मारकच आहे''.

भारती विद्यापीठाचे हे पहिलेच विद्यालय असल्यामुळे विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी व सहकारी मोठ्या उत्साहाने कामाला लागले. शाळेमध्ये अधिक मुलांनी प्रवेश घ्यावा यासाठी मुख्याध्यापक आपल्या सहकाऱ्यांनिशी प्रयत्न करीत होते; तर संस्थेचे संस्थापक-कार्यवाह डॉ. पतंगराव कदम विद्यालयासाठी कायम स्वरूपाची सरकारी जागा मिळवण्यासाठी प्रयत्न करीत होते. शासनाकडून सरकारी जागा मिळवण्यात काय यातना आणि अडथळे असतात याची कल्पना होती; परंतु त्या काळात डॉ. पतंगराव कदम महाराष्ट्र

एस.टी. बोर्डाचे मेंबर असल्यामुळे सरकारी जागा मिळण्यातील अडथळे दूर झाले व त्यावेळचे महसूलमंत्री बाळासाहेब देसाई यांनी शंकरराव मोरे विद्यालयासाठी एरंडवणे भागात ३ एकर ३५ गुंठे जागा मंजूर केली व ती जागा भारती विद्यापीठाने दिनांक ०९ फेब्रुवारी, १९६९ या दिवशी ताब्यात घेतली. त्याच दिवशी खऱ्या अर्थाने भारती विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याचा पुण्यात भक्कम पाया घातला गेला असे म्हणावयास हरकत नाही. त्या जागेवर एक महिन्याच्या अवधीत पाच खोल्या बांधून स्वतःच्या जागेत शंकरराव मोरे विद्यालय दिनांक ०९ जून, १९६९ पासून भरू लागले.

या मोरे विद्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन दिनांक २२ जून, १९६९ या दिवशी ज्या महसूलमंत्र्यांनी विद्यालयासाठी जागा मंजूर केली होती, त्या नामदार बाळासाहेब देसाई यांच्याच हस्ते करण्यात आले. शासनाकडील जागा मिळवण्यात, त्या जागेवर सामाजिक गरजेचे असलेले एक विद्यालय सुरू करण्यात आणि अवघ्या पाच महिन्यांत पाच खोल्यांची इमारत उभी करून महसूलमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा घडवण्यात डॉ. पतंगराव कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जो आनंद झाला असेल, त्या ध्येयपूर्तीच्या समाधानाला तोडच नाही. डॉ. पतंगरावांनी पुण्यामध्ये वामनरूपी पहिले पाऊल टाकून एरंडवणे येथे सरकारी जागा मिळवली व पहिले विद्यालय सुरू केले. दुसरे पाऊल टाकून भारती विद्यापीठाची 'भारती भवन' ही पुण्यामधील सर्वांत उंच अशी १० मजली इमारत उभी केली व तिसरे पाऊल टाकून धनकवडी भागात ६९ एकर शासनाची जमीन मिळवून त्या जागेवर भारती विश्वविद्यालयाच्या विविध २१ शाखांसाठी भव्य इमारती उभारल्या आहेत.

या यशामागे डॉ. पतंगरावांचे मार्गदर्शन आणि मुख्याध्यापक महादार यांनी सुरुवातीपासूनच्या काळात घेतलेले अविश्रांत श्रम व कष्ट कारणीभूत होते. महादार यांनी झोपडी-झोपडीत फिरून तेथील गरीब कष्टकऱ्यांना आपली मुले विद्यालयात घालण्यास प्रवृत्त केले. विद्यालयात येणारा विद्यार्थी हा जरी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय असला, झोपडपट्टीतील किंवा ग्रामीण भागातील असला, तरी गुणवत्तेच्या बाबतीत तो किंचितही कमी पडत नाही हे ओळखून कोणालाही या विद्यालयात प्रवेश नाकारला जात नाही.

अशाच मागास वर्गातील एखाद्या रामोश्याचा मुलगा धीटपणे संस्कृतमध्ये भाषण करतो, मजुरांची मुले इंग्रजीमध्ये कार्यक्रम करून दाखवतात. ही किमया मोरे विद्यालयातच घडू शकते.

झोपडपट्टीत राहणाऱ्या दहावीमध्ये शिकत असलेल्या एका मांगाच्या मुलीस महादार सरांनी एक वर्षभर आपल्या घरी ठेवून एस.एस.सी. पास केली. पुढे ती स्वावलंबनाने आपल्या पायावर उभी राहिली. तिचे नाव वत्सला उभे आहे. महादार सरांचे घर म्हणजे भारती विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांना व कार्यकर्त्यांना वेळीअवेळी जेवणखाण वगैरेसाठी हक्काचे मुक्तद्वार होते. दिवसभर शाळेसाठी देणग्या मिळवण्यासाठी व घरी आल्यावर शाळेतील मुलांचा अभ्यास करून घेण्यासाठी महादार सरांना दिवस पुरत नसे. महादार सरांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला.

याच दरम्यान भारती विद्यापीठाचे सदाशिव पेठेतील कार्यालय मोरे विद्यालयाच्या इमारतीमध्ये दिनांक २३ सप्टेंबर, १९७० पासून आणले गेले. त्यामुळे विद्यालयाच्या दैनंदिन कामात, विद्यालयाच्या प्रगतीत डॉ. पतंगराव जातीने लक्ष घालत असत. एस.टी. बोर्डाचे मेंबर म्हणून स्वीकारलेली जबाबदारी पार पाडून विद्यालयाच्या कामातही त्यांनी लक्ष घातले होते. या विद्यालयाचा प्रायोगिक सेंटर म्हणून सुरू केलेला प्रयोग यशस्वी करणारच, या जिद्दीने त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्न करण्याचा विडा उचलला होता. मोरे विद्यालयाच्या पोर्चच्या वरती दहा बाय बाराच्या एका खोलीत डॉ. पतंगरावांचे कार्यालय थाटले होते. साधे टेबल व चारपाच खुर्च्या फक्त तेथे होत्या. दररोज सकाळी नऊ वाजता न चुकता ते मोरे विद्यालयात हजर होत असत. आल्याबरोबर सर्व शिक्षकांना बोलावून हजेरीपटावरून सतत गैरहजर विद्यार्थ्यांची माहिती घेण्यास शिक्षकास सांगत, अडचणी असतील, तर त्या विद्यार्थ्यांना मदत करीत.

विद्यालयात येणारा विद्यार्थी हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला असल्यामुळे परीक्षा-फी, गणवेश, शालेय साहित्य, चष्मे, औषधे याबाबत विद्यार्थ्यांना सतत अडचणी येऊ लागल्या. आर्थिक कारणासाठी कोणताही विद्यार्थी शिक्षणाला

वंचित होऊ नये, या डॉ. पतंगरावांच्या ध्येय-धोरणानुसार विद्यालयात विद्यार्थी सहाय्यक योजना सुरू केली होती. प्रत्येक शनिवारी हनुमान पूजनाचा कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थी आपल्या ऐपतीनुसार दहा-पाच पैसे देऊ लागले. शिक्षकांनीही त्यात भर घालून एक मोठा निधी जमा झाला. भारती विद्यापीठाने या योजनेत भरीव मदत दिली आहे. या निधीतूनच गरजू विद्यार्थ्यांना मदत मिळते. पर्यायाने विद्यार्थ्यांमध्ये एकमेकांना सहकार्य करण्याची, मदत करण्याची भावना जोपासली जात आहे.

डॉ. पतंगरावांच्या सूचनेनुसार मोरे विद्यालयातील विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करून घेतले. त्यानंतरच्या शिक्षकांच्या सभेत त्यांनी शिक्षकांना सांगितले, की या संस्थेतल्या वर्गशिक्षकाला प्रत्येक मुलाची सबंध वंशावळ माहिती झाली पाहिजे. हा मुलगा कुठला आहे, त्याचे वडील काय करतात, त्याची आई काय करते हे माहीत झाले पाहिजे. डॉ. पतंगरावांनी विद्यालयात अनुभवलेला एक प्रसंग सांगताना म्हटले होते, की ''मी विद्यालयात आलो असताना परीक्षा चालली होती. एक विद्यार्थी उशिरा आला. त्यातच त्याने फी भरली नव्हती; म्हणून वर्गशिक्षकाने त्याला बाहेर काढले होते. मी त्या विद्यार्थ्याला विचारले, की, 'तू बाहेर का उभा आहेस?' तो विद्यार्थी म्हणाला 'साहेब, फी नाही माझ्याजवळ भरायला, बाप दररोज दारू पिऊन येतो आणि आईला मारतो. आई भांडी घासते. त्यात भागत नाही.' हे ऐकून त्याच दिवशी मी निर्णय घेतला की फी भरता येत नाही म्हणून एकही विद्यार्थी भारती विद्यापीठातून परत घरी जाता कामा नये''. डॉ. पतंगरावांची ही सूचना आजही अमलात आणली जात आहे.

मोरे विद्यालयाच्या मिळालेल्या यशामुळे नंतर पतंगरावांच्या डोक्यात एक दुसरे स्वप्न होते. ते म्हणजे के.जी. टू पी.जी. (पूर्व प्राथमिक शिक्षणापासून पदव्युत्तर शिक्षण) एके ठिकाणी देण्याची सोय करण्याचा प्रकल्प उभा करण्याचे. माँटिसरीत शिक्षणासाठी आलेला मुलगा पदवीधर होऊनच बाहेर पडला पाहिजे आणि त्याची सुरुवात म्हणून माँटिसरी वर्ग मोरे विद्यालयाच्या परिसरातच सुरू केले व काही वर्षांनंतर पदवी व पदव्युत्तर शिक्षणाचे महाविद्यालयही डॉ. पतंगरावांनी सुरू केले.

पुण्यातील विविध क्षेत्रांतील लोकांशी जवळीक व मित्रत्व निर्माण व्हावे या उद्देशाने डॉ. पतंगरावांनी एक 'भारती संगीत सभा' स्थापन केली होती. या सभेमध्ये व्यापारी, डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक व समाजसेवक अशा सर्व थरांतील दोनशे सभासदांना सामील करून घेतले होते. या सभेच्यावतीने संगीताचे कार्यक्रम आयोजित करून मनोरंजन होत असे; पण त्याबरोबरच मोरे विद्यालयाच्या इमारती उभारण्याच्या कामी काही पैसाही उपलब्ध होत असे.

डॉ. पतंगरावांनी मोरे विद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी पैसा उभारण्यासाठी एक नवीन कल्पना अमलात आणली. भारती विद्यापीठाचे अध्यक्ष यशवंतराव मोहिते यांचे 'शुगर केन इंडस्ट्री इन महाराष्ट्र' या इंग्रजी पुस्तकाचे प्रा. एस. आर. सूर्यवंशी, प्रा. पी. डी. पुराणिक, प्रा. म. शि. सगरे, डॉ. पाटोळे यांच्या मदतीने एक महिन्यात मराठीत भाषांतर करून ते भारती विद्यापीठाच्या वतीने प्रसिद्ध करण्याचे ठरले. त्यासाठी शासनाची परवानगी मिळवली व 'महाराष्ट्रातील ऊस उद्योग' हे पुस्तक पुण्यातील संगम प्रेसमध्ये छापून प्रसिद्ध केले. याकामी श्री. बा. ग. पवार यांनी खूप मेहनत घेतली. सहकारी क्षेत्रात साखर कारखाने महाराष्ट्रात सुरु होत असताना शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर ऊसाचे उत्पादन कसे काढावे, ऊसापासून कोणकोणते उद्योग निर्माण करता येतील याची माहिती शेतकऱ्यांना करून देण्यास अशा पुस्तकाची गरज होती. ती डॉ. पतंगरावांनी ओळखली आणि या पुस्तकाच्या साठ हजार प्रती छापून घेण्याचे धाडस डॉ. पतंगरावांनी केले होते. त्या काळात पुस्तक प्रकाशनाच्या व्यवसायात हा एक चमत्कार घडावा अशी गोष्ट होती. डॉ. पतंगरावांनी साखर कारखान्यातील शिक्षण फंडातून या पुस्तकांची खरेदी करून त्याच्या प्रती सभासद शेतकऱ्यांना द्याव्यात असा सहकार खात्यामार्फत आणि साखर संचालकांमार्फत आदेश काढल्यामुळे हजारो प्रती महाराष्ट्रभर खपल्या. महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी या पुस्तकाचे दिनांक ०९ जानेवारी, १९७५ या दिवशी पुण्यामध्ये प्रकाशन करताना म्हटले होते, की 'सहकार क्षेत्रात व ग्रामीण भागात शेतीमालावर विशेषतः ऊस, कापूस व भुईमूग याबाबतचे प्रक्रिया उद्योग काढले पाहिजेत. उद्योग वाढतील तरच बेरोजगारी कमी होईल व खेड्यापाड्यातील श्रमशक्ती वाढेल. ऊस उद्योगाच्या विविध प्रश्नांचा श्री. यशवंतराव मोहिते यांनी साकल्याने अभ्यास

करून दोषदिग्दर्शन, तसेच सुयोग्य मार्गदर्शन या ग्रंथात केले असल्याने तो सर्वांनी अभ्यासावा. तसेच पैशाची नगदी पिके घेणाऱ्यांना हा ग्रंथ म्हणजे गीता होय'. अशा या पुस्तकाच्या विक्रीतून भारती विद्यापीठास एक लाख रूपये मिळाले. त्या पैशाचा उपयोग मोरे विद्यालयाची तीन मजली इमारत उभी करण्यासाठी झाला.

पुणे महानगरपालिकेने संस्थेस ४० हजार रूपयांची देणगी दिली. त्यामुळे शंकरराव मोरे विद्यालयासाठी शैक्षणिक दृष्ट्या सुसज्ज अशी ३० खोल्यांची तीन मजली इमारत सुमारे १० लाख खर्च करून बांधली. या इमारतीचे उद्‌घाटन दिनांक २६ नोव्हेंबर, १९७७ या दिवशी भारताचे त्यावेळचे उपपंतप्रधान नामदार यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नामदार वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. आज या विद्यालयात आवश्यक त्या सर्व उपकरणांनी सुसज्ज अशी प्रयोगशाळा, सर्व विद्याशाखांना उपयुक्त असलेल्या भरपूर पुस्तकांनी समृद्ध असलेले ग्रंथालय, ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालवले जाणारे विद्यार्थी वस्तू भांडार व प्रशस्त क्रीडांगणही आहे. सर्वश्री दे. मु. महादार, बा. ग. पवार, ना. गो. निलाखे, व. भा. म्हेत्रे, ना. ई. जाधव अशा आदर्श शिक्षकांच्या कार्यकुशलतेमुळे या विद्यालयाची नेत्रदीपक प्रगती झाली आहे. विद्यालयाचा एस.एस.सी.चा निकाल दरवर्षी ८० ते१०० टक्केपर्यंत लागतो. आदर्श विद्यालय म्हणून ही शाखा अनेकवेळा पुरस्कारांची मानकरी ठरली आणि निवडली गेली आहे.

श्री. दे. मु. महादार यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाल्यानंतर व. भा. म्हेत्रे, आ.ब.पाटील, ना. ई. जाधव यांनी मुख्याध्यापक म्हणून मोरे विद्यालयात काम करीत विद्यालयाची प्रतिष्ठा वाढवली. आदर्श शिक्षक म्हणून शासनाकडून त्यांना पुरस्कार मिळाले आहेत. एके काळची पुण्याच्या मागास भागातील मागासवर्गीयांच्या मुलांची शाळा आज पुण्यातील एक आदर्श विद्यालय म्हणून शंकरराव मोरे विद्यालयाने प्रतिष्ठेचे स्थान मिळवले आहे.

शंकरराव मोरे विद्यालयाच्या यशाला भारती विद्यापीठाचे संस्थापक-कार्यवाह डॉ. पतंगराव कदम यांचे अचूक व कुशल मार्गदर्शन, सहकारी कार्यकर्त्यांचे प्रामाणिक योगदान कारणीभूत आहे. डॉ. पतंगरावांचे अनेक वर्षांचे हे स्वप्न साकार झाले आहे.

***

# ४. एस्.टी. महामंडळाचे संचालक

लहानपणापासून डॉ. पतंगराव अतिशय स्वाभिमानी व परखड बोलणारे म्हणून परिचित होते. सामाजिक बांधिलकीची जाणीव असल्यामुळे त्यांनी एक होतकरू तरुण कार्यकर्ता म्हणून खानापूर तालुक्यात आपले एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले होते. या पार्श्वभूमीवर यशवंतराव मोहिते आणि केंद्रीय मंत्री आनंदराव चव्हाण यांनी डॉ.पतंगरावांना खानापूर तालुक्यातून महाराष्ट्र विधानसभेवर जाण्यासाठी १९६७ साली प्रयत्न केले होते, पण ते प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. पुढे यशवंतराव मोहिते महाराष्ट्रात परिवहन मंत्री झाल्यावर त्यांनी डॉ. पतंगराव कदम यांच्या कार्याची दखल घेऊन एस्.टी. बोर्डाचे सदस्य म्हणून १ जुलै, १९६८ या दिवशी नेमणूक केली. अखेर भविष्य खरे ठरले.

एका महत्त्वाकांक्षी तरूणाला एस्.टी.सारख्या विशाल क्षेत्रात सार्वजनिक कार्य करण्यासाठी प्रथम संधी मिळाली. ज्या वेळी डॉ. पतंगरावांची एस्.टी. महामंडळावर नेमणूक झाली, त्या वेळी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी मोठी वाटत होती व ते लहान वाटत होते; पण त्यांनी अंगीकारलेल्या कामाची माहिती घेऊन धाडसाने काम करण्याचा सपाटा त्यांनी सुरु केला. त्या वेळी डॉ.पतंगराव मोठे वाटले व ते करीत असलेले काम लहान वाटत होते, असे त्यांचे त्यावेळचे सहकारी म्हणत.

ज्या वेळी डॉ.पतंगराव कदम एस्.टी. बोर्डाचे मेंबर झाले, त्यावेळी एस्.टी.चा सांगली विभाग अस्तित्वात नव्हता. सातारा व कोल्हापूर एस्.टी. विभागाकडे सांगली जिल्ह्यातील एस्.टी. चा कारभार होता. डॉ. पतंगराव कदम यांनी या प्रश्नात लक्ष घातले आणि स्वतंत्र सांगली एस्.टी. विभाग नव्याने सुरु करण्यास मंजुरी मिळवली. त्याची पूर्वतयारी म्हणून प्रामाणिक, कामसू अशा अधिकाऱ्याची माहिती घेऊन त्यांना सातारा विभागात बदलून घेतले. त्यापैकी एम्. एन्. सावंत हे एक अधिकारी होते. डॉ.पतंगराव कदम यांच्याबद्दल त्यावेळचे सातारा एस्.टी. विभाग नियंत्रक मेजर शिवाजीराव शेळके सांगतात, 'डॉ.पतंगराव हे एक शिस्तप्रिय लोकप्रतिनिधी म्हणून परिचित होते. त्यांना खोटे बोललेले आवडत नसे. एस्.टी.कामगार आणि अधिकाऱ्यांमध्ये शिस्त असावयास पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यांच्या दौऱ्यामध्ये ते नियोजित

कार्यक्रमाप्रमाणे स्वत: वक्तशीरपणे येत, तसेच अधिकाऱ्यांनाही वेळेवर हजर राहावे अशी अपेक्षा करीत'.

एकदा जोतिबा तीर्थक्षेत्राच्या जत्रेच्या वेळी सातारा विभागाने जादा एस्. टी. गाड्या जोतिबा यात्रेसाठी सोडल्या होत्या. त्या कामाची पाहणी करण्यास एम्.एन्.सावंत कोल्हापूरला आले असताना कोल्हापूर एस्.टी. स्टॅण्डवरील गेस्ट हाऊसमध्ये डॉ.पतंगराव कदम यांची भेट झाली. त्यावेळी रात्रीचे बारा वाजले होते. त्यावेळी त्या अधिकाऱ्याची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने एम्.एन्. सावंत यांना दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता सातारा विभागीय एस्.टी. वर्कशॉपमध्ये भेटण्यास सांगितले. वास्तविक पाहता हे अशक्य होते; कारण सावंत यांना जोतिबा डोंगरावर जाऊन परत सातारला हजर होणे अवघड होते; पण शिस्तीचे भोक्ते असलेले अधिकारी सावंत रात्रभर प्रवास करून सातारा येथे सकाळी आठ वाजता हजर राहिले. अर्थात त्यावेळी डॉ.पतंगराव कदमही तेथे हजर होतेच.

तसेच दौऱ्यामध्ये एस्.टी.कामगार युनियन पुढाऱ्यांना डॉ.पतंगराव कदम आवर्जून भेटत असत. एस्.टी. कामगारांच्या अडचणी ऐकून त्या दूर करण्यात ते पुढाकार घेत. एस्.टी. कर्मचाऱ्यांमध्ये नम्रता व विनयशीलता असणे महत्त्वाचे आहे असे ते म्हणत.

एस्.टी.मधून प्रवास करताना प्रवाशांना नम्रतेची वागणूक मिळाल्यास प्रवाशांना प्रवास सुखकर वाटत असतो. असे ते एस्.टी.सेवकांना व अधिकाऱ्यांना नेहमी सांगत. एस्.टी.चा कारभार चांगला चालण्यासाठी कामगार व अधिकाऱ्यांशी संबंध चांगले असावे लागतात, म्हणून डॉ.पतंगराव कदम कामगार प्रश्नात प्राधान्याने लक्ष घालीत असत.

१९६९ च्या शेवटी एस्.टी. महामंडळाने सांगली हा नवीन विभाग सुरू केल्याची घोषणा केली. अर्थात हे घडण्यामध्ये डॉ.पतंगराव कदम यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांना आपल्या जिल्ह्यातील जनतेच्या सोईच्या दृष्टिने स्वतंत्र सांगली विभाग निर्माण करावयाचा होता. नवीन विभागाच्या पूर्वतयारीसाठी नवीन विभाग नियंत्रक नेमण्याचा आग्रह एस्.टी.चे महाव्यवस्थापक यांचा होता; पण त्यास डॉ. पतंगराव कदम यांनी विरोध केला. त्यांच्या सूचनेप्रमाणे

नियोजित नवीन विभागाच्या पूर्वतयारीसाठी साताराचे विभाग वाहतूक अधिकारी एम्.एन्. सावंत यांची सांगलीस नेमणूक झाली.

डॉ.पतंगराव कदम यांच्या पुढाकारानेच नवीन सांगली एस्.टी. विभागासाठी सांगली जिल्हा परिषदेची जुनी इमारत भाड्याने घेतली व तेथे नियोजित विभागीय कार्यालय सुरू केले. डॉ.पतंगराव कदम यांची दूरदृष्टि प्रत्ययास आली ती नियोजित विभागात बदलून येणाऱ्या स्टाफ, अधिकाऱ्यांच्या सोयी करण्यात. डॉ. पतंगराव कदम यांनी सांगली विभागासाठी अनुभवी अधिकारी मागितले. त्यांच्या राहण्यासाठी खासगी जागा भाड्याने घेऊन ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या. बदली होऊन सांगलीस आलेल्या अधिकाऱ्यांना भाड्याने घेतलेल्या जागेच्या किल्ल्या मिळण्याची सोय पाहून तेही केलेल्या सोयीमुळे सुखावले होते. ही दूरदृष्टि दाखवलेल्या डॉ.पतंगराव कदम यांच्याबद्दल त्यांच्या मनातील आदर दुणावला.

त्या दरम्यान डॉ.पतंगराव कदम सांगली जिल्हा परिषदेच्या हॉलमध्ये सांगलीच्या नागरिकांची एक बैठक घेतली. उपस्थितांना नियोजित सांगली एस्.टी.विभागाची माहिती दिली. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना डॉ. पतंगराव कदम आपल्या जिल्ह्याच्या विकासकामाकरता कसे प्रयत्नशील आहेत, तेही समजले.

सांगली एस्.टी. विभागाच्या मुख्य कार्यालयाकरता जिल्हा परिषदेची जुनी इमारत मिळाली होती; पण विभागीय वर्कशॉपसाठी जागा पाहिजे होती. डॉ.पतंगराव कदम यांनी सांगली जिल्ह्याचे नेते वसंतदादा पाटील यांच्याकडून माधवनगर सहकारी साखर कारखान्याचे एक गोडाऊन व सर्व्हिस रॅम्प नाममात्र भाड्याने मिळवला. जागेचे भाडे ठरवण्यासाठी मुंबईहून आलेल्या एस्.टी. अधिकाऱ्यांना वसंतदादा पाटील म्हणाले, ''अहो, भाडे कसले ठरवता ! आमच्या साखर कारखान्याच्या मोठ्या गोडाऊनसह असलेल्या जागेत स्वतंत्र सांगली एस्.टी. विभाग होत आहे, यात मलाही आनंद आहे. शिवाय डॉ.पतंगराव कदम यांनी विनंती करून आग्रह धरला म्हणून साखर कारखान्याची जागा तात्पुरती देण्यास तयार झालो. या जागेचे भाडे दरमहा एक रुपया याप्रमाणे द्या म्हणजे झाले.'' अधिकारी लाजले आणि योग्य ते भाडे ठरवले आणि ते वसंतदादांनी मान्य केले.

त्यावेळी सांगली व मिरज यामध्ये याबाबत वाद होता. एस्.टी.चे विभागीय कार्यालय सांगलीत होत आहे, तर नियोजित विभागीय वर्कशॉप मिरजेमध्ये व्हावे अशी मिरजकरांची मागणी होती. त्याकरता निषेध म्हणून मिरजकरांनी मिरजेतील व्यवहार दोन दिवस बंद ठेवले होते. त्यामुळे एस्.टी.चे महाव्यवस्थापक चर्चेसाठी मुंबईहून आले-चर्चा झाल्या. तो वादही डॉ. पतंगराव कदम यांनी मोठ्या कल्पकतेने सोडवला. सांगली एस्.टी. विभागाचे कायमस्वरूपी वर्कशॉप मिरज हद्दीत होण्यास मान्यता दिली. नियोजित जागा सांगली नगरपरिषदेच्या हद्दीच्या वेशीवर ठरवण्यात आली. त्यामुळे मिरजकरांचे आणि सांगलीकरांचे समाधान झाले.

त्यावेळी सांगली बस स्टेशनवर अतिथिगृहात पाहुणे मंडळींना बसावयाची स्वतंत्र सोय नव्हती. ती उणीव डॉ. पतंगराव कदम यांच्या लक्षात आली. त्याप्रमाणे एस्.टी.च्या स्थापत्य अभियंत्यास सुचवले; पण त्यांच्या दृष्टिने योग्य न वाटून त्यास मान्यता दिली नव्हती. डॉ.पतंगराव कदम हट्टी. त्यांनी स्वत: सुचवल्याप्रमाणे गेस्ट हाऊससमोरच्या गच्चीत एक हॉल बांधून घेतला. तेथे १०० लोकांच्या बैठकीची सोय झाली. डॉ.पतंगराव नवीन काम सुचवण्यापूर्वी विचार करून कार्यवाही अपेक्षित असत आणि तसेच करूनही घेत असत.

सांगली एस्.टी.विभागाची सुरुवात मोठ्या भव्य समारंभाने २८ नोव्हेंबर, १९७०ला करण्याचे डॉ. पतंगरावांनी ठरवले होते. प्रमुख पाहुणे म्हणून त्यावेळचे केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वसंतदादा पाटील, महाराष्ट्राचे वीज व राज्य परिवहनमंत्री शंकरराव चव्हाण, सहकार मंत्री यशवंतराव मोहिते, राजारामबापू पाटील, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष र.गो.सरैया, परिवहन महामंडळाचे मुख्य व्यवस्थापक पी. जी. साळवी यांना निमंत्रित केले होते आणि ते समारंभास उपस्थित होते. अशा रीतीने हजारोंच्या उपस्थितीत सांगली जिल्ह्याच्या सामाजिक गरजेच्या एका ऐतिहासिक पर्वास सुरुवात झाली.

एस्.टी. चा सांगली विभाग व्हावा असा प्रयत्न केलेले एस्.टी. महामंडळाचे सदस्य डॉ. पतंगराव कदम पाहुण्यांचे स्वागत करताना म्हणाले,

''सातारा-कोल्हापूर विभागाप्रमाणे सांगली जिल्ह्याचा एस्.टी. विभाग सुरू झाल्यामुळे कोल्हापूर विभागावर सध्या असलेला ताण कमी होईल. सध्या सांगली जिल्ह्यातील प्रवाशांना आपल्या एस्.टी. बाबतीतील सूचना, तक्रारी कोल्हापूरला जाऊन कराव्या लागतात. सांगली विभाग झाल्यामुळे सांगलीला आपल्या सूचनांचे, तक्रारींचे निवारण करता येईल. सांगली, इस्लामपूर, तासगाव, मिरज, जत व विटा या डेपोंची कार्यक्षमता अधिक वाढवता येईल. त्यामुळे एस्.टी. प्रवाशांच्या सुखसोयींकडे अधिक लक्ष पुरवता येईल. सांगली जिल्ह्याचा औद्योगिक विकास घडण्यासाठी दळणवळण व वाहतूक व्यवस्था अधिक कार्यक्षम होण्याची गरज आहे. अपेक्षित साध्य होण्यासाठी एस्. टी. महामंडळाला भांडवली खर्चाचा वाटा जादा व झुकता दिला पाहिजे. त्यामुळे जनतेची अधिक चांगल्या प्रकारे सोय करता येईल. एस्.टी. गाड्यांची कार्यक्षमता टिकवण्यासाठी सांगली जिल्ह्यातील रस्ते सुधारण्याच्या कामास प्राधान्य देण्याची जरूरी आहे.''

''कृपामाई हॉस्पिटलजवळची जागा विभागीय वर्कशॉपसाठी मिळाल्यापासून पंधरा दिवसात तेथे नवीन वर्कशॉप निश्चितपणे होईल. कोणाची गैरसोय करून अथवा कुठल्याही स्वार्थापोटी स्वतंत्र सांगली विभाग स्थापन न करता केवळ अधिकाधिक जनतेची सेवा करता यावी याच मुख्य हेतूने हा विभाग स्थापन करण्यात आला आहे.''

सांगली विभागाचे उद्‌घाटन करताना तेव्हाचे केंद्रीय अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, की ''देशापुढील सर्वांत मोठी समस्या बेकारीची आणि वाढत्या महागाईची आहे. चाळीस हजार कर्मचाऱ्यांबरोबरच दोन लाख लोकांना आर्थिक मदतीचा हात देणाऱ्या एस्.टी. महामंडळाने तांत्रिक कामगार, ड्रायव्हर, हेल्पर अशा लहानसहान स्वरूपाच्या नोकऱ्यात बेकार तरुणांना सामावून घेतले पाहिजे.''

विभागीय वर्कशॉपचे उद्‌घाटन करताना माननीय वसंतदादा पाटील म्हणाले, की''एस्.टी. गाड्यांना काही कोटी रुपयांचे स्पेअर पार्ट लागतात व ते परदेशातून आयात करावे लागतात. हे स्पेअर पार्टस् बनवण्याचे काम स्थानिक कारखानादारांना दिले गेले तर कारखानदारी हळूहळू वाढेल व आपल्या देशाचे

परदेशी चलनही वाचेल. तसेच सांगली विभागाच्या नव्या वर्कशॉपमधून नवे तंत्रही निर्माण होईल. या दृष्टिने महामंडळाने जरूर विचार करावा. यशवंतराव मोहिते यांनी सांगितले, ''एस्.टी. बोर्डाचे सदस्य म्हणून नियुक्ती केलेल्या डॉ. पतंगराव कदम यांनी मिळालेल्या संधीचा सांगली जिल्ह्याच्या विकासासाठी उपयोग केल्यामुळे त्यांची निवड योग्यच आहे हे सिद्ध झाले आहे.''

सांगली विभाग सुरु झाल्यामुळे कोल्हापूर व सातारा विभागातील सांगली, इस्लामपूर, जत, तासगाव, आटपाडी, विटा हे डेपो सांगली विभागाकडे आले. मिरज, शिराळा व कवठे महांकाळ त्यावेळी वाहतूक केंद्रे होती ती पुढे डेपोमध्ये रूपांतरित केली.

सांगली जिल्ह्यातील पारे येथील पाझर तलावाच्या भूमिपूजन समारंभाच्या ठिकाणी हुद्दार व डॉ.पतंगराव कदम यांची भेट झाली. त्यावेळी कृतज्ञतेच्या भावनेने डॉ.पतंगरावांनी विचारले,''काही, काम आहे काय?'' हुद्दार म्हणाले,''माझे गाव खिद्रापूर, तेथील महादेवाच्या तीर्थक्षेत्रास अनेक प्रवासी रोज येतात, पण तिथपर्यंत एस्.टी. बस जात नाही.'' डॉ.पतंगरावांनी ग्रामपंचायतीचा ठराव देण्यास सांगितले व ती पूर्तता केल्याबरोबर दोन दिवसांत खिद्रापूरपर्यंत एस्.टी. बस सुरू झाली. अशा प्रकारे धडाकेबाज कार्यपद्धतीमुळे डॉ.पतंगरावांचा त्या काळात 'अँग्री यंग मॅन'' असा उल्लेख करीत असत.

एस्.टी. बोर्डाचे सदस्य म्हणून डॉ. पतंगरावांच्या १९६८ ते १९७३ च्या कार्यकाळात मिरज, आष्टा, विटा, कडेगाव, वांगी येथील एस्.टी. बस स्टॅण्डच्या इमारतीचे काम झाले. अनेक गरजूंना नोकऱ्या उपलब्ध झाल्या. गाव तेथे एस्.टी. सुरू झाल्या आणि अनेकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला.

मला वाटते, व्यवस्थापन कौशल्याचे कोणतेही शिक्षण नसताना डॉ. पतंगरावांनी आपल्या उपजत गुणांनी एस्.टी. बोर्ड मेंबर म्हणून कारकीर्द गाजवली. एस्.टी. बोर्ड मेंबर या सामाजिक स्थानास प्रतिष्ठा मिळवून दिले. या काळात त्यांनी केलेल्या कामामुळेच त्यांना सांगली जिल्ह्याच्या राजकारणात सामाजिक बांधिलकी जपणारा तरुण कार्यकर्ता म्हणून स्थान मिळाले व एका शिक्षण संस्थेच्या संस्थापक, आमदार, नामदार, विद्यापीठाचे तहह्यात कुलपती होण्याचे स्वप्न साकार करण्याचा आत्मविश्वास दुणावला.

डॉ.पतंगरावांना आमदार होण्याची संधी कॉंग्रेस पक्षाकडून मिळाली नाही, तरी त्यांना जनसेवेची संधी यशवंतराव मोहिते यांच्यामुळे मिळाली होती. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना डॉ.पतंगराव कदम म्हणतात,''एकोणीशे सदुसष्ट साली भाऊ कॅबिनेट मंत्री झाल्यानंतर त्यांच्याकडे एस्.टी. आणि हाऊसिंग बोर्डाचे खाते आले. त्या काळात एस्.टी. बोर्ड हे अतिशय महत्त्वाचे खाते मानले जात होते. संबंधित राज्यातून सात अशासकीय सभासद नेमले जात होते. अचानकपणे माझ्यासारख्या तरूण कार्यकर्त्याला एक जुलै अडुसष्ट रोजी वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना भाऊंनी एस्.टी.बोर्ड मेंबर (डायरेक्टर) केले नि माझ्यासारख्या एका लहान तरूण माणसाला महाराष्ट्रास दाखवले. पुढे पाच वर्षे पूर्ण वेळ या महामंडळाचा सभासद म्हणून मी काम केले. 'रस्ता तेथे एस्.टी' ही याच काळातील प्रत्यक्ष कृतीत आलेली घोषणा आहे. माझी तेथील मुदत संपल्यावर भाऊंनी मला हाऊसिंग बोर्डाचा चेअरमन करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळेला वसंतराव नाईक यांनी माजी मंत्री तिरपुडे यांचे नाव सुचवले. भाऊंनी त्या वेळी फाईलवर स्वत: सही न करता याबाबत आपणच आदेश काढावेत अशी त्यांना विनंती केली.'' अशा शब्दात डॉ. पतंगरावांनी आपल्या राजकारणातील आणि समाजसेवेतील कामाबद्दल आणि मिळालेल्या संधीबद्दल व मोहिते यांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. जनसेवा करण्याची तीव्र इच्छा असेल तर कोठेतरी व केव्हातरी संधी मिळतेच, हेच यावरून दिसून येते.

सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील एस्.टी. स्टॅण्डच्या भव्य इमारती पाहून लोक म्हणतात, ''हे फक्त डॉ.पतंगराव कदम यांच्यामुळेच झाले.'' या शब्दांमध्येच डॉ.पतंगराव कदम यांचे यश सामावले आहे, असे वाटते.

ग्रामीण भागात जन्मलेला कार्यकर्ता मोठा होतो व आपल्या गाडीने राज्याच्या राजधानीत जातो, पण आपल्या जन्मगावच्या ग्रामस्थांना राज्याच्या राजधानीपर्यंत एस्.टी.ने नेणारा कार्यकर्ता म्हणजे डॉ.पतंगराव कदम हे होत. त्याचे प्रतीक म्हणजे बोर्ड मेंबर नसताना दररोज धावणारी सोनसळ–मुंबई एस्.टी.बस होय. अशी कितीतरी उदाहरणे देता येतील, की ज्यामुळे ग्रामीण भागात एस्.टी.द्वारे प्रवासी सोयी केल्यामुळे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास घडला आहे – घडत आहे.

डॉ.पतंगराव कदम यांच्यामधील कर्तृत्वशक्ती यशवंतराव मोहिते यांनी हेरली व त्यांना तरूण वयात एस्.टी. बोर्डाचे सदस्यत्व दिले. त्या संधीचे त्यांनी सोने केले. एस्.टी. म्हणजे डॉ.पतंगराव कदम असे समीकरण मांडण्यापर्यंत डॉ. पतंगराव एस्.टी.च्या कामात समरस झाले होते. स्वत:चा एक दरारा त्यांनी एस्.टी.मध्ये निर्माण केला. त्याचबरोबर हेल्परपासून ते चेअरमन, जनरल मॅनेजरपर्यंत अनेक जिव्हाळ्याचे मित्र मिळवले. अगदी खालच्या थरातील लोकांना उच्चाधिकाराच्या जागा मिळवून दिल्या. असे अनेक सेवक व अधिकारी भेटल्यावर अतिशय आपुलकीने व प्रेमाने डॉ.पतंगरावांचे स्वागत आणि आदरातिथ्य करतात. अधिकारावर असताना खुर्चीला मान देण्याची सर्वांनाच सवय असते, पण अधिकारावरून खाली उतरल्यानंतरही असे प्रेम मिळण्यासाठी अंतरीचा जिव्हाळा लागतो. अशी जिव्हाळ्याची हजारो माणसे साऱ्या महाराष्ट्रात डॉ.पतंगराव कदम यांनी जोडली आहेत.

डॉ.पतंगराव कदम यांच्या कार्याचे कौतुक करताना थोर विचारवंत यशवंतराव मोहिते म्हणतात, ''एस्.टी. बोर्ड मेंबर म्हणून डॉ.पतंगरावांनी केलेल्या कार्याला तर तोडच नाही. त्या काळात त्यांनी खूप चांगले काम केले. अत्यंत बारकाईने अभ्यास करून स्टॅण्ड बांधण्यापासून हॉटेल्स व तत्सम सोयी, वेळापत्रक अशी उत्कृष्ट व्यवस्था केली. त्यामुळे बोर्डाच्या त्या काळात पाचही वर्षे एस्.टी. नफ्यात चालली. त्या एस्.टी.च्या माध्यमातून त्यांचा महाराष्ट्रातील गावागावांतून संपर्क वाढला; कारण एस्.टी. जात नाही असे एकही गाव त्यांनी शिल्लक ठेवले नाही.''

डॉ.पतंगराव कदम यांची एस्.टी. बोर्ड मेंबर म्हणून ज्यांनी नियुक्ती केली, त्या यशवंतराव मोहिते यांचे वरील उद्‌गार म्हणजे डॉ.पतंगराव कदम यांची नियुक्ती किती योग्य होती हेच यावरून सिद्ध होते.

***

## ५. महाविद्यालयीन शिक्षणाच्या उंबरठ्यावर

डॉ. पतंगरावांनी भारती विद्यापीठाची स्थापना १९६४ साली करून गणित व इंग्रजी या विषयांच्या परीक्षा घेणे सुरू केले. त्यानंतर शंकरराव मोरे विद्यालय सुरु करून शिक्षण क्षेत्रात प्रायोगिक विद्यालय स्थापन केले. संस्थांना पूरक म्हणून गरजा भागवण्यास भारती प्रिन्टींग प्रेस सुरू केला. आपल्या संस्थेची माहिती समाजाला व्हावी, इतरांना प्रेरणा मिळावी म्हणून 'विचार भारती ' मासिक सुरू केले. सुरू केलेल्या शैक्षणिक संस्थांना आर्थिक पाठबळ मिळण्यासाठी भारती सहकारी बँक सुरू केली. संस्थेच्या कार्यकर्त्यांना व सर्वसामान्य जनतेला दैनंदिन गरजेच्या वस्तू रास्त भावात मिळाव्यात म्हणून भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार सुरू केले. आणि १४ वर्षांच्या कालखंडानंतर भारती विद्यापीठाच्या विकासाची नवीन क्षितिजे डॉ. पतंगरावांना खुणावू लागली होती.

दिनांक १० मे, १९७८ रोजी भारती विद्यापीठास चौदा वर्षे पूर्ण झाली. या चौदा वर्षांच्या कालखंडाचे दोन भाग पडतात. पहिली सात वर्षे पूर्वतयारीची, नंतरची सात वर्षे स्वत:च्या पायावर उभे राहण्याची आणि त्यापुढील काळ झेप घेण्याचा, किंवा भरारी मारण्याचा, असे वर्णन केले तर ते सार्थ ठरेल असे वाटते.

मुक्त विद्यापीठ स्थापन करण्याचे डॉ. पतंगरावांचे एक स्वप्न होते. ते स्वप्न साकार होण्यासाठी १९७८ साली त्यांनी मोरे विद्यालयाच्या इमारतीमध्ये एकाच वर्षात तीन महाविद्यालये पुण्यात भारती विद्यापीठाच्या एरंडवणे परिसरात सुरु करण्याचे ठरवले. त्या दृष्टिने कला, शास्त्र, वाणिज्य महाविद्यालय, विधी महाविद्यालय आणि मॅनेजमेंट इन्स्टिटयूट सुरु करण्यासाठी अर्ज करण्यात आले व त्याला विनंतीप्रमाणे पुणे विद्यापीठाची व शासनाची मान्यताही मिळाली.

ही तीन महाविद्यालये स्थापन करण्यामागे डॉ. पतंगरावांचा विचार असा होता, की पूर्व प्राथमिक ते पदव्युत्तर म्हणजे के.जी. टू पी.जी. शिक्षण एकाच परिसरात उपलब्ध व्हावे. त्या दृष्टिने एरंडवणे परिसरात भारती बाल विकास मंदिर, भारती विद्यापीठ प्राथमिक शाळा, शंकरराव मोरे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज अशा शैक्षणिक संस्था स्वत:च्या इमारतीत सुरू करून पहिला टप्पा

डॉ. पतंगरावांनी ओलांडला होता. सुस्थितीत, आदर्श अशा शिक्षणसंस्था आपण चालवू शकतो हे डॉ. पतंगरावांनी प्रत्यक्ष कृतीने समाजाला दाखवले होते. तरूण वयातील या धडपड्या व धाडसी तरुणाने नेत्रदीपक विक्रम करून भारती विद्यापीठास सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. डॉ. पतंगराव व भारती विद्यापीठ हे वेगळे नसून डॉ. पतंगराव म्हणजेच भारती विद्यापीठ असे समीकरण झाले आहे.

भारती विद्यापीठ स्थापन करताना डॉ. पतंगराव फक्त टी.डी.होते; पण भारती विद्यापीठाच्या प्रगतीबरोबरच त्यांनी बी.ए., एम्.ए., एल्एल्.बी.अशा पदव्या कष्टाने व चिकाटीच्या प्रयत्नाने मिळवल्या. एस्.एस्.सी. झाल्यावर नोकरी मिळाल्यानंतर आत्मसंतुष्ट होऊन जीवन जगणाऱ्या महाराष्ट्रीय तरूणांपुढे डॉ. पतंगरावांनी एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी एस्.टी.बोर्डाचे सदस्य म्हणून काम करून दाखवल्यानंतर आता महाविद्यालयीन शिक्षणक्षेत्रात पाऊल टाकण्याचे धाडस केले होते.

**यशवंतराव मोहिते कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय**

पुणे हे विद्येचे माहेरघर आहे. या ठिकाणी अनेक शिक्षण संस्थांची महाविद्यालये कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत भारती विद्यापीठाने नवीन कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय दिनांक १ जुलै, १९७८ रोजी सुरू करून एक धाडसी पाऊल टाकले होते. भारती विद्यापीठाचे कार्यवाह डॉ. पतंगराव कदम यांनी या नवीन उपक्रमाच्या स्थापनेच्या प्रसंगी सांगितले, की पुण्यासारख्या ठिकाणी कॉलेजांची संख्या कमी आहे म्हणून हे कॉलेज काढलेले नाही, तर समाजपरिवर्तनासाठी, सर्वांगीण विकासासाठी आणि तरूणांना राष्ट्राचे आधारस्तंभ बनवण्यासाठी हे कॉलेज सुरू केले आहे.

या महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य म. शि. सगरे व त्यांचे सहकारी यांनी पुणे परिसरात फिरून महाविद्यालयासाठी विद्यार्थी जमवण्यास खूप कष्ट घेतले. शंकरराव मोरे विद्यालयातील इमारतीत सुरू झालेल्या या महाविद्यालयात पहिल्या वर्षी विज्ञान विभागात ६३ विद्यार्थ्यांनी आणि वाणिज्य विभागात ६४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.

दिनांक ७ डिसेंबर, १९७८ रोजी यशवंतराव मोहिते यांचा ५८ वा वाढदिवस भारती विद्यापीठात संपन्न झाला. या दिवशी भारती विद्यापीठाचे अध्यक्ष माननीय यशवंतराव मोहिते यांचे नाव या महाविद्यालयास दिले. यशवंतराव मोहिते यांनी महाराष्ट्राला एक पुरोगामी वैचारिक भूमिका दिलेली आहे. त्यांची ही विचारसरणी संस्थेतील विद्यार्थ्यांच्या आणि सर्व जनतेच्या समोर यावी, त्यांचा आदर्श समोर राहावा आणि त्यांच्या सामाजिक कार्याची स्फूर्ती लाभावी या उच्च हेतूने त्यांचे नाव या महाविद्यालयास दिले. एखाद्या धनिकाचे किंवा सत्ताधाऱ्याचे नाव शाळा-कॉलेजांना देण्याची नेहमीची पद्धत आपण पाहतो; परंतु डॉ. पतंगराव कदम यांनी या कॉलेजला नाव देताना एक वेगळा, ध्येयवादी दृष्टिकोन ठेवला होता आणि तो योग्य होता असेच म्हणावे लागेल.

हे कॉलेज सुरू करण्यामागे भारती विद्यापीठाचे व डॉ. पतंगरावांचे एक निश्चित धोरण होते. फक्त इंग्लिश व गणित परीक्षा घेणारी संस्था असे विद्यापीठाचे स्वरूप राहू नये अशी पहिल्यापासून डॉ. पतंगरावांची इच्छा होती. नर्सरीपासून महाविद्यालयापर्यंत सर्व शिक्षणाची सोय एके ठिकाणी व्हावी, एवढेच नाहीतर खुल्या विद्यापीठाची कल्पनाही प्रत्यक्षात आणता यावी अशी त्यांची कल्पना होती. या सूत्राला धरूनच १९७६ साली पुणे, एरंडवणे येथे ज्युनिअर कॉलेज सुरू करण्यात आले व पुढे १९७८ साली सिनिअर कॉलेज सुरू करण्यात आले.

या कॉलेजमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण भागातून आणि दुर्बल घटकांतून आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त होते. त्यापैकी २५ विद्यार्थ्यांची विनाशुल्क जेवणाची व राहण्याची सोय केली होती. त्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या वेगवेगळ्या शाखांतून दररोज तीन तास काही काम करावे अशी अपेक्षा होती. अशीच योजना सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये सुरू होती. त्यामध्ये डॉ. पतंगराव कदम यांनी स्वत: 'कमवा व शिका' योजनेखाली शिक्षण घेतले होते. तशीच योजना येथे सुरू केली.

आज या महाविद्यालयाची भव्य सहा मजली इमारत आहे. त्यामध्ये प्रशस्त लेक्चर हॉल, सुसज्ज प्रयोगशाळा, संदर्भपुस्तकांचे समृद्ध ग्रंथालय, वाचनालय, अभ्यासिका यांचा समावेश आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी सर्व सोयींनी युक्त असे वसतिगृह आहे. प्राध्यापकांसाठी स्टाफ क्वॉर्टर्स आहेत. खेळासाठी विस्तीर्ण मैदान आहे. विद्यार्थ्यांच्या, प्राध्यापकांच्या या सर्व सोयी उपलब्ध करण्यामागे असे प्रयत्न प्राध्यापकांनी करावेत. त्यामुळेच आता बी.ए.,बी.कॉम, बी.एस्सी. हे पदवी अभ्यासक्रम व एम्.कॉम., एम्.एस्सी. हे पदव्युत्तर अभ्यासक्रम या महाविद्यालयात आहेत.

या महाविद्यालयात दिनांक ११ सप्टेंबर, १९७८ या दिवशी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य देवदत्त दाभोळकर यांचा निरोप समारंभ आयोजित केला होता. त्या प्रसंगी डॉ. पतंगराव कदम आणि भारती विद्यापीठाच्या कार्याची प्रशंसा करताना प्रा. दाभोलकर म्हणाले, की ''येथील सत्काराने मी भारावून गेलो आहे. माझ्या कुलगुरूपदाच्या कारकिर्दीत मी मिळवलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे डॉ. पतंगराव कदम यांचा अकृत्रिम स्नेह, असे मला वाटते. त्यांनी गेल्या काही वर्षांत केलेले कार्य पाहता देशाचे मी काही सांगत नाही, पण महाराष्ट्रात तरी कोणत्याही स्थानावर ते केव्हाही जाऊ शकतील आणि त्यांच्या हातून खूप विधायक कार्य घडेल, याची मला खात्री वाटते. डॉ.पतंगराव अतिशय मोकळ्या आणि उमद्या स्वभावाचे गृहस्थ आहेत; म्हणूनच कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस त्यांच्या स्नेहाचा लाभ होतो. मुंबई विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ यांचा संबंध जुळला पाहिजे असे म्हटले जाते. ह्या दोन विद्यापीठांचा संबंध जुळण्यात जे अनेक टप्पे आहेत, त्यांतला एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे भारती विद्यापीठ आहे असे मला निश्चितपणाने वाटते.''

**व्यवस्थापन आणि उद्योजक विकास संस्था**

भारतातील सर्व तऱ्हेच्या उद्योगांचे एक औद्योगिक केंद्र म्हणून पुण्याचा लौकिक आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक केंद्र म्हणूनही पुण्याला देशभर मान्यता असल्यामुळे औद्योगिक व्यवस्थापनाचे शिक्षण देणाऱ्या पुण्यातील संस्थेकडे देशातील व महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने उद्योजक-विद्यार्थी आकर्षित होत

असताना पुण्यातील एकमेव अशी व्यवस्थापन संस्था त्यासाठी अपुरी पडत होती. तसेच पुण्यात व महाराष्ट्रात अनेक छोटे मोठे उद्योग आहेत, पण त्यामध्ये महाराष्ट्रीय उद्योगपती फार कमी आहेत. ही उणीवही भरून काढण्याची गरज होती.

नेमकी ही सामाजिक गरज डॉ. पतंगरावांच्या दूरदृष्टिने ओळखली आणि पुण्यामध्ये 'इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अ‍ॅण्ड आंत्रप्रेन्युअरशीप डेव्हलपमेंट' ही संस्था सुरू करण्याचे ठरवले आणि भारती विद्यापीठाने पुणे विद्यापीठाच्या सर्व आवश्यक तरतुदी पुऱ्या केल्यानंतर संस्थेसाठी मान्यता मिळाली. ही संस्था सुरु करण्यामागे डॉ. पतंगराव कदम आणि भारती विद्यापीठाच्या काही अपेक्षा होत्या. कारखान्यामध्ये व्यवस्थापक म्हणून नोकरी करू इच्छिणारे विद्यार्थी केवळ खासगी क्षेत्रातीलच नव्हे तर सहकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग व्यवसायातील व्यवस्थापनही कसे यशस्वी करू शकतील, यावर या संस्थेच्या अभ्यासक्रमात भर द्यावा आणि त्याप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाही झाली आहे.

तसेच ग्रामीण भागातील साधनसंपत्तीचा उपयोग करून प्रामुख्याने ग्रामीण भागातच उद्योगधंदे सुरु करणाऱ्या उद्योजकांचा वर्ग निर्माण व्हावा अशीही डॉ. पतंगरावांची इच्छा आहे.

या व्यवस्थापन संस्थेचे औपचारिक उद्घाटन दिनांक ४ सप्टेंबर, १९७८ रोजी करताना महाराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनचे चेअरमन डॉ. के. जी. देशमुख म्हणाले होते, की 'स्पर्धात्मक परीक्षांत महाराष्ट्रीय विद्यार्थी मागे का पडतात, याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. खेड्यातले विद्यार्थी पुढे यावेत; म्हणून आम्ही प्रयत्न करतो, पण विद्यार्थ्यांनीही योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत. आम्ही मुलाखतीला बोलावताना प्रश्न कशा प्रकारचे राहतील याबद्दल सूचना देतो, तरीही अनेक विद्यार्थी काहीही तयारी न करता येतात. आपल्याला काय करावयाचे आहे ते निश्चित ठरवून शिक्षण घेतले पाहिजे आणि त्यासाठी विचार करणे आवश्यक आहे'. त्याच प्रसंगी डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले, की 'मॅनेजमेंट अभ्यासक्रम येथे पुरा करणाऱ्यांनी स्वत:चे उद्योग सुरू करावेत' अशी अपेक्षा आहे.

सन १९८१ साली डॉ. पतंगरावांच्या सल्ल्याने या इन्स्टिट्यूटमध्ये ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी वेगळी व्यवस्था करण्यात आली. ज्या विद्यार्थ्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी झाले आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रथम इंग्लिश, व्यक्तिमत्व विकास, वागण्या-बोलण्यातील कौशल्य याबाबत विशेष प्रशिक्षण सक्तीने दिले जात असे. नंतर व्यवस्थापनाचे शिक्षण दिले जाई. अशी व्यवस्था भारतामध्ये प्रथमच पुणे विद्यापीठातील या इन्स्टिट्यूटमध्ये केली होती. ती डॉ. पतंगरावांच्या प्रयत्नामुळेच शक्य झाली होती.

'उद्योजकता विकास' हा एक वैशिष्ट्यपूर्ण असा विभाग येथे आहे. सर्वच पदवीधरांना काही नोकऱ्या देता येणार नाहीत, हे ओळखून महाराष्ट्रात स्वयंउद्योग-व्यवसाय सुरू करणारे उद्योजक निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न डॉ. पतंगरावांच्या सूचनेनुसार केले जात आहेत. महिलांसाठी, तसेच माजी सैनिकांसाठीही उद्योजकता शिक्षणाचे उपक्रम स्मॉल स्केल इंडस्ट्रीज आणि बँक ऑफ इंडियाच्या सहकार्याने राबवले होते. नमूद करण्यासारखी बाब म्हणजे प्रशिक्षण घेतलेल्या ७०% महिलांनी आपला उद्योग सुरू केला आहे. जिल्हा सोल्जर्स बोर्डाच्या सहकार्याने माजी सैनिकांसाठीही असाच उपक्रम राबवला होता.

### विधी महाविद्यालय

व्यक्तिविकास जोपासण्यासाठी पुणे शहरात १९७८ साली विविध शिक्षण शाखांचे शिक्षण देणाऱ्या संस्था होत्या. त्याच काळात पुणे शहराच्या औद्योगिक विकासाची फार मोठ्या वेगाने वाढ होत होती त्यामुळे शहराची लोकवस्ती बेसुमार वाढत होती. कारखान्यात, न्यायालयात नवीन कायदेपंडितांची गरज वाढत होती आणि ती गरज भागवण्यास त्यावेळी असलेली पुण्यातील दोन महाविद्यालये अपुरी पडत होती. प्रवेशमर्यादेपेक्षा प्रवेश घेणाऱ्यांची संख्या फार मोठी होती आणि ही शिक्षण क्षेत्रातील गरज चाणाक्ष आणि जिज्ञासू डॉ. पतंगरावांनी नेमकी जाणली होती; म्हणून त्यांनी भारती विद्यापीठाचे विधी महाविद्यालय सुरू करण्याचे ठरवले.

या महाविद्यालयाची सुरूवात १० सप्टेंबर, १९७८ रोजी झाली. २० डिसेंबर, १९७८ रोजी या महाविद्यालयाचे उद्घाटन करताना भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती यशवंतराव चंद्रचूड म्हणाले, की भारती विद्यापीठाच्या न्यू लॉ कॉलेजच्या उद्घाटन समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून येथे आलो आणि डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठ या संस्थेच्या उभ्या केलेल्या विविध शिक्षण संस्था पाहून स्तंभित झालो. अगदी थोड्या काळामध्ये डॉ. पतंगराव कदम यांनी जे कार्य केले आहे, ते सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखे आहे. विशेषत: न्यू लॉ कॉलेजची स्थापना करून खेड्यातील तरूणांना कायद्याचे ज्ञान सुलभ रीतीने प्राप्त करून दिले. बोलणारे पुष्कळ असतात; परंतु त्याप्रमाणे कृती करणारे डॉ. पतंगरावांसारखे विरळाच. मला असे वाटते, डॉ. पतंगरावांनी एका वर्षात तीन महाविद्यालये सुरू केल्याचे वर्णन क्रिकेटच्या भाषेत करावयाचे झाले तर, ''डॉ. पतंगरावांनी हॅटट्रीक' केली होती आणि म्हणून भारती विद्यापीठाचे हे कार्य कौतुकास्पद असेच आहे.''

या विधी महाविद्यालयात, एल्‌एल्‌.बी., एल्‌एल्‌.एम्‌., डिप्लोमा इन ह्युमन राईटस्‌, टॅक्सेशन व लेबर लॉ शिक्षणाची सोय आहे; परंतु महाराष्ट्रातील ४५ विधी महाविद्यालयांपेक्षा भारती विद्यापीठाच्या या महाविद्यालयाचे वेगळेपण म्हणजे सुमारे १४ लाख रूपयांच्या संदर्भ ग्रंथांचे सुसज्ज ग्रंथालय, तसेच पर्यावरणविषयक कायदे, मानवी अधिकार, स्त्रीविषयक कायदे, या विषयांचा डिप्लोमा कोर्स या महाविद्यालयात सुरू केला आहे. त्याचबरोबर ग्राहकविषयक, पोलीस व कायदा राबवण्याचा मानवी अधिकार व घरबांधणीविषयक कायद्याचे सर्टिफिकेट कोर्सेसही सुरु केले आहेत. तसेच एल्‌एल्‌.एम्‌. व पीएच्‌.डी. प्रोग्रॅमही सुरू आहेत.

वरील तिन्ही महाविद्यालये स्थापन करून सुरु करण्यात, डॉ. पतंगरावांच्या अनेक दिवसांच्या स्वप्नांची प्रत्यक्ष पूर्तता झाली होती. विशेषत: ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांसाठी उच्च शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याची तीव्र इच्छा फलद्रूप झाली होती. एवढ्यावरच डॉ. पतंगराव समाधान मानून थांबणारे नव्हते. आता वरील तीन महाविद्यालयांतील शैक्षणिक शाखांप्रमाणेच इतर शैक्षणिक शाखांबद्दल विचार त्यांनी सुरू केले असणार, कारण हाती घेतलेले एक काम पुरे झाले की तेथेच थांबणे हे त्यांच्या स्वभावात

नाही. दुसरे अवघड वाटणारे काम हाती घेण्यास त्यांचे हात त्यांना स्वस्थ बसून देत नाहीत, म्हणून त्या कामाची ते सुरूवात करतात.

एरंडवणे परिसरातील महाविद्यालयांना जोडून भारती विद्यापीठाने ३० लाख रूपये खर्च करून स्टुडंटस् होस्टेलची भव्य व देखणी इमारत बांधली. त्या इमारतीचे उद्‌घाटन भारती सरकारचे त्यावेळचे मानवी संसाधनसंपत्ती विकास मंत्री पी.व्ही.नरसिंहराव यांच्या हस्ते दिनांक ४ फेब्रुवारी, १९८६ रोजी महाराष्ट्राचे तेव्हाचे शिक्षणमंत्री राम मेघे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. आमदार डॉ.पतंगराव कदम यांनी महाविद्यालयाबरोबर तेथे शिक्षण घेत असलेल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची पुण्यात राहण्याची माफक दरात सोय व्हावी असा उद्देश स्टुडंटस् होस्टेल बांधण्यापाठीमागे होता.

माननीय पी.व्ही. नरसिंहराव आपल्या उद्‌घाटनपर भाषणात म्हणाले, की 'आज एकविसाव्या शतकाला सामोरे जाण्यासाठी नवा शैक्षणिक आकृतिबंध येऊ पाहत आहे, या संदर्भात शिक्षणाचे विचारमंथन सुरू आहे. नवा शैक्षणिक विचार अवघड असला तरी सर्वांना सांगितला पाहिजे. एक गोष्ट लक्षात घ्या. संकल्पाशिवाय सिद्धी प्राप्त होत नाही. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. पतंगरावांचे भारती विद्यापीठ होय. दिल्लीत चेंबरमध्ये बसून मला जे शक्य झाले नाही, ते पुणे येथील दोन दिवसांच्या वास्तव्यात शिक्षणाचे वास्तव स्वरूप पाहावयास मिळाले. डॉ. पतंगरावांच्या पतंगाची भरारी ही आकाशापुरती मर्यादित नाही, तर त्याच्याही पुढे त्यांची जाण्याची तयारी आहे. महाराष्ट्र ही भारतातील शैक्षणिक क्षेत्राची प्रयोगशाळा आहे, तर भारती विद्यापीठ हे त्यातील एक रत्न आहे.'

'आपल्या देशात चारशे बासष्ट जिल्हे असून त्या प्रत्येक जिल्ह्यात किमान एक संशोधन केंद्र सुरू करण्याचा विचार आहे. जिल्ह्यातील ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, भौगोलिक आणि अन्य माहिती केंद्रात काम करणारे संशोधक एकत्रित काम करतील व त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणात कसा करून घेता येईल ते निश्चित करतील. आज देशात बाराशेपेक्षा अधिक शिक्षण संस्था असून त्यांतून दिल्या जाणाऱ्या पारंपारिक शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याचा विचारही नव्या शैक्षणिक धोरणात केला जाईल.'

'इच्छाशक्ती हा कोणत्याही धोरणाच्या अंमलबजावणीचा पाया आहे, असे मी मानतो. अन्न, वस्त्र, निवारा, औषध आणि शिक्षण या मानवाच्या गरजा आहेत. यांतील शिक्षण ही त्याची एक गरज पुरवली गेली तर बाकीच्या सर्व गरजा तो आपल्या बुद्धिचातुर्यावर पूर्ण करून घेऊ शकतो. केलेल्या चुकांतून नवे शिकण्याची प्रवृत्ती ठेवली तर कोणतेही काम अवघड नाही, अशी माझी धारणा आहे.'

'प्राथमिक शाळेच्या स्तरावर विद्यार्थ्यांची गळती हा एक चिंतेचा विषय आहे. संधी मिळाली तर माणूस काहीही करू शकतो, या अनुभवावरून ग्रामीण भागातील दुर्बलांना संधी प्राप्त करून दिली पाहिजे. ज्यांना संधी मिळाली आहे, त्यांनी ती इतरांना देण्याची तयारी दाखवली पाहिजे. ज्यांच्याकडे पैसा आहे, त्याला शिक्षण. ही पद्धत मुळापासून बदलली पाहिजे ते चालू राहिले, तर ते समाजाला आणि देशाला व लोकशाहीला धोकादायक ठरणार आहे आणि म्हणून शिक्षणाला नवी दिशा देऊन व्यावसायिक शिक्षणाला अधिकाधिक महत्त्व देण्याचा विचार केला गेला पाहिजे.'

नरसिंहरावांचा हा विचार समोर ठेवून भारती विद्यापीठाने भविष्यात वाटचाल केली.

***

# ६. आर्थिक स्वावलंबनाचा पाया

## भारती विविध उद्योग समूह

कसबा पेठेतील एका बोळामध्ये १९६४ साली १०'X १०' च्या भाड्याच्या खोलीत सुरू झालेले भारती विद्यापीठ लवकरच विसर्जित होईल, ही कुजबूज डॉ. पतंगरावांनी अडचणींवर मात करून टिळक रोडवर स्वत:च्या जागेत आल्यावर थांबवली. एरंडवण्यासारख्या दुर्लक्षिलेल्या भागात सरकारी जागा मिळवून शंकरराव मोरे विद्यालय सुरू करून गरिबीमुळे नाडलेल्या व नाकारलेल्या मुलांना सुलभ रीतीने शिक्षण उपलब्ध करण्याच्या संकल्पसिद्धीने भारती विद्यापीठाच्या विशाल दृष्टिकोनाची जनतेस ग्वाही दिली. डॉ. पतंगरावांच्या दीर्घ व चिकाटीच्या प्रयत्नांतून सामाजिक बांधिलकीच्या स्वप्नांचा विचार साकार करून दाखवला. महाराष्ट्राचे त्यावेळचे शिक्षणमंत्री नामदार मधुकरराव चौधरी यांनी डॉ. पतंगरावांनी सुरू केलेल्या शैक्षणिक उपक्रमाची 'अभिनंदनीय' व 'अनुकरणीय' अशा शब्दांत स्तुती केली होती. पुणे महानगरपालिकेने खास अनुदान देऊन विद्यापीठाच्या कार्यास सक्रिय सहकार्य केले होते. पुण्यातील, तसेच महाराष्ट्रातील सुजाण नागरिकांनी व हितचिंतकांनी शक्य ते सहकार्य दिल्यामुळे भारती विद्यापीठ राजमान्यतेस व लोकमान्यतेस पात्र ठरले.

डॉ. पतंगराव एस्.टी. बोर्डाचे मेंबर असताना प्रवासी नागरिकांचा प्रवास सुखकारक होण्यासाठी त्यांनी केलेल्या धाडसी निर्णयाचे जनमानसात खूप कौतुक झाले. प्रसिद्धिमाध्यमाचे महत्त्व ओळखून भारती विद्यापीठाच्या कार्याची नोंद घेणारे साप्ताहिक किंवा मासिक काढण्याचा विचार आता पुढे आला.

डॉ. पतंगरावांनी भारती विद्यापीठाचे मुखपत्र आणि प्रिन्टींग प्रेस काढण्याबद्दल आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांशी चर्चा केली. त्या वेळी विद्यापीठाचे अध्यक्ष यशवंतराव मोहिते व ज्येष्ठ पत्रकार नरूभाऊ लिमये यांनी डॉ. पतंगरावांना सल्ला दिला, की आधी साप्ताहिक सुरू करावे व नंतर स्वत:च्या प्रेसबद्दल विचार करावा, परंतु डॉ. पतंगरावांना हा सल्ला पटला नाही. त्यांनी निर्णय घेतला, की प्रथम विद्यापीठाचा प्रिन्टींग प्रेस सुरू करून तेथेच आपल्या मासिकाची छपाई करू.

आता विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे कामही खूप वाढले होते. पुण्यातील राष्ट्रभाषा मुद्रणालयाचे व्यवस्थापक मु. मा. जगताप यांच्या सहकार्याने भारती विद्यापीठाच्या नव्या प्रेसची योजना तयार केली गेली आणि यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र बँकेकडे रूपये २५,०००/– आर्थिक सहकार्यासाठी विनंती केली. परंतु बँकेकडून योग्य तो प्रतिसाद मिळण्याची चिन्हे दिसेनात. त्यावर डॉ. पतंगरावांनी निर्णय घेतला, की प्रथम आपली सहकारी बँक काढूया. मग आपल्या बँकेच्या सहकार्याने आपला प्रेस सुरू करूया.

**१) भारती सहकारी बँक**

त्यावेळी अशी परिस्थिती होती, की काही मूठभर लोकांच्या फायद्यासाठीच मोठमोठ्या बँकांतील संपत्ती वापरली जात होती. गरिबीमुळे उत्पन्नाचे साधन उपलब्ध नाही व उत्पन्नाचे साधन नाही म्हणून गरिबी हटत नाही. अशा दुष्टचक्रात सर्वसामान्य जनता आजही अडकून पडल्याचे दिसते. पतवान माणसाला कोणीही कर्ज देईल, पण गरिबीमुळे ज्याच्याजवळ पत नाही अशांना कर्ज मिळणे शक्य नसते. अशा सर्वसामान्य माणसांना दिलासा देण्यासाठी भारती सहकारी बँकेची मागणी पुढे आली आणि डॉ. पतंगरावांच्या नेतृत्वाखाली भारती सहकारी बँक स्थापन करण्याचे निश्चित झाले.

भारती विद्यापीठाचे कल्पक कार्यवाह डॉ. पतंगराव यांनी आपल्या सहकाऱ्यांसमोर भारती सहकारी बँकेची कल्पना मांडली–पटवून दिली, आणि १४ ऑगस्ट, १९७१ रोजी शंकरराव मोरे जयंतीच्या दिवशी समारंभात त्यांनी भारती सहकारी बँक सुरू करण्याची घोषणा केली. त्याच दिवशी नियोजित बँकेचे ५३ हजार रूपयांचे भागभांडवल जमाही झाले आणि दि. ८ सप्टेंबर, १९७१ रोजी भारती सहकारी बँकेची नोंदणी पुणे जिल्हा डेप्युटी रजिस्ट्रार श्री. दळवी यांच्या कार्यालयात झाली.

भारती सहकारी बँकेचा उद्देश सांगताना डॉ. पतंगराव म्हणाले होते, की ज्या देशात बँकिंगचे व्यवहार विस्तृत प्रमाणावर होतात तो देश प्रगत मानला जातो, म्हणून बँकिंग क्षेत्र अधिक व्यापक, सर्वस्पर्शी होण्याच्या दृष्टिकोनातून बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे धाडसी पाऊल भारत सरकारने उचलले. परिणामत: सर्वसाधारण जनता जी आजपर्यंत बँक–संबंध स्वप्नवत

मानत असे, ती आज प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करीत आहे. इतकेच नव्हे तर बँकांची निर्मिती करण्याचे धाडसही करू लागली आहे. आपली ही बँक सर्वसाधारण जनतेचे जीवनमान उंचावण्यास, समाजाच्या शिक्षणास हातभार लावण्यास साहाय्यभूत होईल अशी आशा आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याने हे उचललेले नवे पाऊल न डगमगता गतिमान होईल अशी उमेद आहे. छोटे-छोटे उद्योगधंदे, शिक्षणसंस्था, विद्यार्थी, अधिकारी व आर्थिकदृष्ट्या मागासलेला समाज यांच्या प्रगतीसाठी ही बँक सदैव तत्पर राहील.

भारती बँकेचे मुख्य प्रवर्तक डॉ.पतंगराव कदम यांच्या वेगळ्या कार्यपद्धतीतून प्रकट झालेली कल्पना दि. ८ सप्टेंबर, १९७१ रोजी प्रत्यक्षात साकार झाली. भारती विद्यापीठाच्या इतिहासात ही उल्लेखनीय अशी घटना होती. पुढे दि. ३० सप्टेंबर, १९७१ रोजी भारती सहकारी बँकेचे उद्घाटन सहकारमहर्षी वसंतदादा पाटील यांच्या हस्ते बँकेचे भागधारक व विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीत संपन्न झाले.

भारती सहकारी बँकेचे कार्यालय ४३४, सदाशिव पेठ, पुणे येथे संस्थेच्या स्वत:च्या जागेत सुरु झाल्यामुळे भारती विद्यापीठाचे कार्यालय शंकरराव मोरे विद्यालयाच्या आवारात एरंडवणे येथे दि. २३ सप्टेंबर १९७१ पासून स्थलांतरित झाले.

डॉ. पतंगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली १९७१ साली सुरू झालेल्या भारती सहकारी बँकेचे पहिल्या वर्षी १०७९ सभासद होते व भागभांडवल १ लाख ३४ हजार ६५० रुपये होते. पहिल्या संचालक मंडळात डॉ. पतंगराव कदम, द.धों. आरू, नामदेवराव बढे, हरकचंद नहार, कृष्णा नाडकणी, हेमराज राठी, चिंतामण नातू, भाऊसाहेब कारळे, नारायण गांधी, शंकरराव डिंगणे व शशिकांत कदम हे होते. पी.जी.चिपलकट्टी हे भारती सहकारी बँकेचे पहिले व्यवस्थापक होते.

सध्या भारती सहकारी बँकेच्या २३ शाखा कार्यरत असून एकूण शेअर्स भांडवल रुपये २८ कोटी इतके आहे. नेट एनपीए १.७० आहे. बँक सभासद संख्या २८, ७०० पर्यंत आहे.

प्रत्येक उपक्रमामागे डॉ. पतंगरावांची प्रेरणा व मार्गदर्शन असले तरी नेहमी ते त्या संस्थेच्या व्यवस्थापकांना व संचालकांना प्रगतीचे व यशाचे मानकरी मानत असत आणि यातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठेपणा दिसून येतो.

**२) भारती प्रिंटींग प्रेस**

भारती प्रिंटींग प्रेस सुरू करण्याचे डॉ. पतंगरावांचे स्वप्न महाराष्ट्र बँकेच्या असहकारामुळे अपुरे राहिले होते. ते स्वप्न त्यांनी भारती सहकारी बँकेच्या आर्थिक सहकार्यातून पुरे करण्याचे ठरवले. भारती सहकारी बँक सुरू झाल्याबरोबर त्यांनी भारती प्रिन्टींग प्रेस सुरू करण्याच्या कामात लक्ष घातले.

भारती प्रिंटींग प्रेस सुरु करण्यामागे डॉ. पतंगरावांची भूमिका विशाल दृष्टिकोनाची होती. ते म्हणाले होते , की आमच्या मोरे विद्यालयातून बाहेर पडणारा विद्यार्थी नैतिकदृष्ट्या स्वावलंबी बनला पाहिजे व त्यासाठी बौद्धिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणही मुलांना देता यावे म्हणून आम्ही विद्यालयास संलग्न असा एक प्रिंटींग प्रेस सुरू करण्याचे ठरवले. विचार व कृती यामध्ये असणारे स्वाभाविक अंतर निरंतर न ठेवण्याच्या आमच्या प्रयत्नास यश येऊन दि. ८ मे, १९७२ - अक्षयतृतीयेच्या शुभदिनी महाराष्ट्र परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक पी.जी.साळवी यांच्या हस्ते प्रिन्टींग प्रेसचा शुभारंभ आम्ही केला आणि विचार भारती मासिक सुरू केले.

महाराष्ट्र मुद्रणालयाचे व्यवस्थापक मु. मा. जगताप यांच्या सहकार्याने ३० हजार रूपये किंमतीची छपाईची यंत्रसामुग्री घेऊन एका पत्र्याच्या शेडमध्ये भारती विद्यापीठाच्या शाखांचे छपाईकाम सुरू केले. भारती प्रेसच्या व्यवस्थापनाची जबाबदारी डॉ. पतंगरावांनी त्यांचे पूर्वीपासूनचे सहकारी बा.ग.पवार यांच्यावर सोपविली. ती जबाबदारी त्यांनी अनेक वर्षे पार पाडली. त्यानंतर १९८१ पासून सुरेश कवडे हे भारती प्रिन्टींग प्रेसचे व्यवस्थापक म्हणून काम पाहत होते. प्रेसची तीन मजली स्वतंत्र इमारत भारती विद्यापीठाच्या एरंडवणे परिसरात आहे. आधुनिक काळाची गरज ओळखून डॉ. पतंगरावांच्या मार्गदर्शनाखाली प्लेट मेकिंग, डी.टी.पी. कंपोझिंग व ऑफसेट प्रिन्टींग मशीन बसवून आज हा प्रेस अद्ययावत झाला आहे. अद्ययावत ऑफसेट प्रिन्टींग

मशीनवर छपाईकामाचा शुभारंभ डॉ. पतंगरावांच्या पत्नी विजयमाला कदम यांच्या शुभहस्ते झाला. सुरुवातीस तीस हजार रुपये भांडवल आणि तीन कामगारनिशी सुरु केलेल्या या प्रेसमध्ये व्यवस्थापकाशिवाय आज ४० कर्मचारी काम करीत आहेत. एकूण मशीनरी २.५ कोटी रुपयांची आहे. दरवर्षी भारती विद्यापीठाच्या सर्व शाखांचे २० लाख रुपयांचे छपाईकाम केले जाते. भारती प्रिंटींग प्रेसच्या उपक्रमातून डॉ. पतंगरावांनी ४० लोकांना रोजगार उपलब्ध करुन दिला. भारती विद्यापीठाची ही शाखा आदर्शवत संलग्न शाखा म्हणून समजली जाते.

भारती विद्यापीठाच्या प्रिंटींग प्रेसच्या सुरुवातीच्या काळात भारती विद्यापीठ, शंकरराव मोरे विद्यालय, भारती सहकारी बँक, भारती संगीत सभा, खानापूर तालुका दूध उत्पादक संघ, रयत शिक्षण संस्था यांनी छपाईची कामे देऊन या उपक्रमास हातभार लावला. साधना विद्यालय, हडपसरचे प्राचार्य शंकरराव डिंगणे यांनी रयत शिक्षण संस्थेचे छपाईकाम मिळवून देण्यास विशेष प्रयत्न केले होते. याच काळात मोरे विद्यालयातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना प्रिन्टींग, कंपोझिंग कामाचे शिक्षण भारती प्रेसमध्ये दिले जात होते.

### ३) 'विचारभारती' मासिक

भारती विद्यापीठाचा प्रिंटींग प्रेस सुरू झाल्याबरोबर डॉ. पतंगरावांनी विद्यापीठाचे मुखपत्र म्हणून 'विचार भारती' मासिक सुरु करण्याचे ठरवले. त्यामागील त्यांची भूमिका विशद करताना ते म्हणाले होते , की या 'विचारभारती' मासिकाद्वारा महाराष्ट्रातील तरूणांना एखाद्या विषयावर स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय लागावी व आपल्या देशातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी प्रश्नांचे आकलन त्यांना व्हावे अशी आमची मनीषा आहे. ही अपेक्षा पुरी होण्यासाठी 'विचारभारती'चे संपादन करण्याची जबाबदारी भारती विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आ. ब. पाटील यांनी स्वीकारली होती.

'विचारभारती' मासिकाच्या जन्माविषयी संपादकांनी पहिल्या अंकाच्या संपादकीयामध्ये म्हटले होते, की 'स्वातंत्र्यपूर्व काळात वर्तमानपत्राचे कार्य मुख्यत: स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी लोकजागृती या स्वरूपाचे होते.

आता स्वातंत्र्यकाळात वृत्तपत्राचे कार्य विधायक असणे हे अपरिहार्य आहे. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीचा मार्ग खुला होण्यासाठी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा सर्व आघाड्यांवर वृत्तपत्रांनी लढा दिला पाहिजे आणि या विचारधारणेतून १९७२ पासून 'विचारभारती'चा जन्म झाला आहे. 'विचारभारती' सातत्याने नव्या विचारांचा पाठपुरावा करीत राहील. त्याचबरोबर विविधता, गुणवत्ता आणि कलात्मकता याकरिताही 'विचारभारती' चा हव्यास राहील.'

आज भारती विद्यापीठाच्या १८४ संलग्न संस्थांच्या प्रगतीचा, नवीन उपक्रमांचा, संस्थेमधील विद्यार्थ्यांचा व प्राध्यापकांच्या विशेष कार्याचा अहवाल 'विचारभारती' मध्ये प्रसिद्ध होत असतो. त्यामुळे भारती विद्यापीठाच्या कार्याची माहिती इतरजनांना होत असते. 'विचारभारती' मध्ये भारती विद्यापीठाच्या वर्धापन दिनाचा विशेषांक आणि दीपावली विशेषांक याद्वारे विद्यापीठ परिवारांना व विद्यापीठाच्या हितचिंतकांना मराठी साहित्याचा एक आगळा-वेगळा आविष्कार पाहावयास मिळतो. 'विचारभारती' मध्ये महाराष्ट्रातील नामवंत विचारवंतांनी आपले लेख पाठवून मोलाचे सहकार्य दिले आहे-देत आहेत. तसेच आनंद यादवांसारख्या प्रख्यात लेखकांनी काही दिवस 'विचारभारती'चे संपादन केल्याने 'विचारभारती'ला एक साहित्यिक-सामाजिक प्रतिष्ठाही मिळाली आहे. सध्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष व भारती विद्यापीठाच्या इंजिनिअरींग कॉलेजचे प्रा. मिलिंद जोशी हे प्रमुख संपादक म्हणून काम पाहत आहेत. विचारभारतीला उत्तम दर्जा प्राप्त झाला आहे.

**४) प्रकाशन विभाग**

'विचारभारती' मासिकाचे प्रकाशन झाल्यावर डॉ. पतंगरावांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने भारती विद्यापीठाचा प्रकाशन विभाग सुरू केला. रयत सेवक, कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र, विद्यापीठाच्या इंग्रजी व गणित विषयाच्या परीक्षांसाठी दोन इंग्रजी विषयाची व गणित पूर्व, प्रथमा ही दोन पुस्तके आणि इंग्रजी विषयाचे तिसरे पुस्तक, यशवंतराव मोहिते यांचे पन्हाळा शिबिरातील भाषण, यशवंतराव मोहिते लिखित 'महाराष्ट्रातील ऊस उद्योग', जी.डी.लाड यांचे 'स्वातंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य' ही पुस्तके प्रकाशित

करून विद्यापीठाने प्रकाशन क्षेत्रात पदार्पण केले. यशवंतराव मोहिते यांच्या 'महाराष्ट्रातील ऊस उद्योग' या भाषांतरित पुस्तकाने तर मराठी पुस्तकांच्या प्रकाशन क्षेत्रात एक उच्चांक प्रस्थापित करून विद्यापीठास भरघोस आर्थिक मदत अगदी गरजेच्या वेळी मिळवून दिली.

**५) भारती संगीत सभा**

समाजामध्ये कुठल्याही क्षेत्रात कार्य करण्यासाठी लोकसंग्रह व लोकसहकार्य आवश्यक असते. जनशक्ती ही ध्येयपूर्तीचे साधन आहे हे ओळखून डॉ. पतंगराव आणि त्यांच्या समविचारी मित्रांनी एकत्र येऊन भारती संगीत सभा, डॉ. पतंगराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना केली. प्रत्येक माणूस कलाप्रेमी असतो. कलेतून ते कौटुंबिक जीवनात सुसंगती निर्माण करू इच्छितो व त्यातून आनंद मिळवू पाहत असतो. त्यासाठी विविध प्रकारे तो आपले मनोरंजन करवून घेतो आणि या मनोरंजनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रांतील व्यक्ती एकत्र आल्या. सुमारे २०० व्यक्ती १०१ रुपये भरून सभासद झाल्या. सुरुवातीला 'बैरीण झाली सखी' हे लोकनाट्य, 'सामना' चित्रपट आणि 'वेगळं व्हायचंय मला' या नाटकाचा प्रयोग करून मनोरंजनातून भारती विद्यापीठास मदत केली.

भारती विद्यापीठाच्या सुरुवातीच्या काळाकडे पाहता डॉ. पतंगरावांची अंगीकृत कार्याबद्दलची तळमळ, प्रचंड आत्मविश्वास, दुर्दम्य जिद्द आणि योजलेल्या कार्यास वाहून घेण्याची भूमिका दिसून येते. यामुळेच त्यांनी ज्या योजना हाती घेतल्या, त्यामध्ये त्यांना यश हे ठरलेले असते. हे समीकरण होऊन बसले होते. अल्पवयातील त्यांच्या कर्तबगारीमागे त्यांच्या निसर्गदत्त मोठेपणाचे तेजोवलय दिसते. भारती विद्यापीठातील त्यांचे नेतृत्व हे स्वयंभू नेतृत्व आहे. त्याचबरोबर ते एक स्वयंभू, स्वयंचलित शक्तिकेंद्रही आहे तसेच सद्या भारती विद्यापीठाचे स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस (SPA) ही स्वतंत्र संगीतमय शाखा सुरू केली आहे.

**६) भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार**

एखादा विचार डॉ. पतंगरावांना पटला, की त्याच्या कार्यवाहीसाठी ते झपाटल्यासारखे प्रयत्नशील राहतात. त्यामुळे पुणेकरांच्या दूध, अन्नधान्ये,

कापड वगैरे दैनंदिन जीवनावश्यक वस्तू रास्त भावाने पुरवण्यासाठी भारती कन्झुमर्स को ऑपरेटिव्ह सोसायटीची दिनांक २ ऑक्टोबर, १९७२ या विजयादशमीच्या व महात्मा गांधीच्या जन्मदिवशी समविचारी मित्रांच्या सहकार्याने ३५ हजार रूपये भांडवलावर स्थापना केली. योग्य उपक्रम असल्याने शासनाने ३ लाख रूपयांची गुंतवणूक करून भरीव सहकार्य केले होते. या सहकारी भांडाराचे पहिले चेअरमन डॉ. पतंगराव कदम हेच होते.

सुरूवातीला डॉ. पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली भारती भांडारामध्ये कस्टम खात्याने पकडलेला माल किफायतशीर भावाने विकण्यास सुरूवात केली होती. या सहकारी भांडाराने जपानी कापडविक्रीचे प्रसिद्ध ठिकाण म्हणून लोकप्रियता मिळवली. याचबरोबर गरिबांसाठी स्वस्त व नियंत्रित दराचे कापड, रेशनकार्डावर मिळणारी लेव्ही साखर कार्डधारकांना वाटण्यात या संस्थेने पुढाकार घेतला. नंतर जीवनावश्यक किराणा माल, अन्नधान्य वगैरेचीही मोठ्या प्रमाणात विक्री करून विक्रीचा उच्चांक मोडला आणि पहिल्या तीन वर्षात सर्वसामान्यांची सेवा करून नफा कमवणारी सहकारी संस्था म्हणून डॉ. पतंगरावांनी आणि सहकाऱ्यांनी भारती सहकारी भांडारास लोकमान्यता मिळवून दिली.

पस्तीस हजार रूपये भागभांडवलावर सुरू केलेली भारती कन्झुमर्स को ऑपरेटिव्ह सोसायटी आता भारती मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार या नावाने प्रगतीचा उच्चांक मोडीत आहे. स्वतःच्या नऊ शाखांद्वारे लाखो रूपयांच्या मालाची खरेदी व विक्री होत आहे. तसेच दरवर्षी होणाऱ्या नफ्यातून २० टक्के वाटा भारती विद्यापीठाच्या शिक्षणकार्यास भारती भांडार देत आहे.

भारती ग्राहक भांडाराचा विस्तार पुणे, सांगली, कडेगाव या ठिकाणी झाला असून गॅस एजन्सी, औषध विभाग, ठोक अन्नधान्य विक्री विभाग, स्टेशनरी विभाग, कृषी सेवा केंद्र, कडेगाव येथे चौफेर ग्राहक सेवा करून भारती ग्राहक भांडाराने ४० कोटी रूपयांची वार्षिक उलाढाल केली आहे व सभासद संख्या ५,३०० इतकी आहे.

भारती सहकारी ग्राहक भांडाराच्या कार्याचे कौतुक करताना माजी सहकारमंत्री बाळासाहेब भारदे म्हणतात, 'प्राज्ञपंच, तज्ज्ञ सेवक व कृतज्ञ सभासद' ही सहकाराची त्रिसूत्री आहे. त्याच्या जोडीला भारती बझारने 'अचूक वजन, योग्य दर व उत्तम प्रत' ही दुसरी त्रिसूत्री डोळ्यांसमोर ठेवल्याने संस्था प्रगतिपथावर वाटचाल करीत आहे. विशेष म्हणजे डॉ. पतंगरावांच्या मनात अशा संस्था चालवण्यास महिलांना पुढाकार घेण्यासाठी प्रयत्न केला आणि आज सर्व महिला संचालक असून सदरचे ग्राहक भांडार उत्तमरीत्या चालले आहे.

सध्या भारती सहकारी ग्राहक भांडाराच्या प्रगतीचा रथ विजयमाला डॉ. पतंगराव कदम या आणि संचालक श्री. व. भा. म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने धावतो आहे.

❊❊❊

## ७. गतिमान प्रगतीची धाडसी गरूडझेप – फार्मसी कॉलेजेस

लोक कल्याणकारी राज्यामध्ये खाजगी आणि सार्वजनिक आरोग्याला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यासाठी रोगनिदान करणारे वैद्यकीय तज्ज्ञ आणि रोग्यांच्या उपचारासाठी औषधे गरजेची असतात. स्वातंत्र्यानंतर औषधे तयार करणाऱ्या व औषधे विकणाऱ्या तज्ज्ञांची गरज मोठ्या प्रमाणावर भासू लागली आणि त्यांना शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापन झाल्या; कारण औषधे तयार करणारा किंवा विक्री करणारा कायद्यान्वये फार्मसी शाखेतील पदविकाधारक किंवा पदवीधर असणे बंधनकारक होते.

पुण्यात १९७९ मध्ये इंडियन फार्मास्युटिकल असोसिएशन पुणे शाखा डी.फार्मचे शिक्षण देणारे एकमेव पॉलिटेक्निक चालवीत होती. पुण्यातील भवानी पेठेत गुळआळीमध्ये भाड्याच्या छोट्या जागेत, अपुऱ्या साहित्यानिशी ते चालू होते. ही संस्था आर्थिक अडचणींना तोंड देता-देता बंद पडण्याच्या मार्गावर होती. डॉ.पतंगरावांनी पुण्यामध्ये शिक्षणक्षेत्रातील मिळवलेले यश लोकमान्यतेस पात्र ठरले होते. त्यामुळे पूना कॉलेज ऑफ फार्मसीचे संचालक प्रा. एल. जी. चितळे डॉ. पतंगरावांकडे संस्थेच्या आर्थिक अडचणीतून मार्ग काढण्यास मदत मागण्यासाठी आले होते. पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात फार्मसी पदविकाधारकांना खूप मागणी असताना अशा संस्था अडचणीत याव्यात याबद्दल डॉ.पतंगरावांना सखेदाश्चर्य वाटले. डॉ. पतंगरावांनी समक्ष जाऊन अडचणीतील ती संस्था पाहिल्यानंतर सुमारे दोन लाख रूपयांचा आर्थिक बोजा स्वीकारून, चर्चा करून ती संस्था भारती विद्यापीठाकडे घेतली. त्यास महाराष्ट्राच्या डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशनने २९ मे, १९७९ रोजीच्या पत्राने मंजुरी दिली आणि भारती विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रातील एका नव्या व वेगळ्या शाखेत प्रवेश केला. वास्तविक पाहता डॉ.पतंगरावांची ही गतिमान प्रगतीची धाडसी गरूडझेप होती.

फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या नियमांची पूर्तता केल्यानंतर समाजजीवनाशी अतिशय घनिष्ठ संबंध असलेल्या क्षेत्रातील फार्मसी पदविका शिक्षण देणारी शाखा जून, १९७९ पासून डॉ. पतंगरावांच्या पुढाकारामुळेच एरंडवणे परिसरात भारती विद्यापीठाने सुरू केली. तसे पाहिले तर हा उपक्रम

म्हणजे एक आव्हान होते; पण ते स्वीकारून या क्षेत्रातही भारती विद्यापीठाने उल्लेखनीय यश मिळवले.

याच सुमारास रजिस्टर्ड फार्मासिस्ट असल्याशिवाय औषध वितरण आणि विक्री व्यवसाय करता येणार नाही, असा कायदा अस्तित्वात आला. त्यामुळे अगोदरपासूनच या व्यवसायात असलेल्या हजारो सेवकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार होती. यावेळी हॉस्पिटल, डिस्पेन्सरी व मेडिकल स्टोअर्समधील दोन वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेल्या सेवकांच्यासाठी भारती विद्यापीठाने ५ सप्टेंबर, १९७९ पासून महाराष्ट्रात एक वर्षाचा कन्डेन्स्ड कोर्स सुरू केला. हा कोर्स सुरु करणारी भारती विद्यापीठ ही महाराष्ट्रातील पहिली संस्था आहे. हा कोर्स १९९४ पर्यंत चालवला. याचा लाभ शासकीय सेवेतील सुमारे ५० कर्मचाऱ्यांना झाला. ५०० फार्मासिस्ट रजिस्टर्ड झाले. त्यामुळेच दरमहा ३०० ते ४०० रुपयांवर काम करणाऱ्या सेवकांना १२०० ते १५०० रुपयांच्या शासकीय नोकऱ्या मिळाल्या. या अभ्यासक्रमामुळे फार्मसी व्यवसायातील व्यक्तींना धंदा सांभाळून रजिस्टर्ड फार्मासिस्ट होण्याची संधी मिळाली. काहींनी स्वतःचा औषधविक्री व्यवसाय सुरू केला. एक वर्षाच्या या कोर्समुळे अनेकांच्या जीवनात बदल घडून आला.

या महाविद्यालयाने जून, १९८३ पासून १२ वी सायन्स पास झालेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र डिव्हिजन सुरू करून डी.फार्म. हा कोर्स एक वर्षात पुरा करता येईल अशी सोय केली. प्रथम ६० विद्यार्थ्यांची सोय करण्यास अनुदान मिळाले, पण पुढे अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश मागितल्यामुळे बिनाअनुदान तत्त्वावर आणखी ६० विद्यार्थ्यांची सोय केली गेली. भारती विद्यापीठाच्या या शाखेची जबाबदारी सध्या या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. कदम पार पाडीत आहेत.

जेथे सामाजिक गरज असेल, जेथे सामाजिक शिक्षणाची उणीव असेल, तेथे डॉ.पतंगरावांनी लक्ष घातले आहे आणि भारती विद्यापीठाद्वारे सामाजिक बांधिलकीची कर्तव्ये धाडसाने पार पाडली आहेत असे दिसून येते.

औषध निर्मितीच्या क्षेत्रातील प्रगतीमुळे औषध निर्माणशास्त्राच्या पदवीधरांना या क्षेत्रात खूप मागणी वाढली. देशातील एकूण औषध

उत्पादनामध्ये महाराष्ट्र राज्याचा मोठा वाटा आहे. त्यामुळे फार्मसी पदवीधरांना रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध झाल्या परंतु ती गरज भागवण्यासाठी त्यावेळी पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात फार्मसी पदवीचे शिक्षण देणारी एकही कॉलेज नव्हते.

या सामाजिक गरजेची आणि उणिवेची दखल डॉ. पतंगरावांना घेतली आणि फार्मसी पॉलिटेक्निकबरोबरच आता पदवी अभ्यासक्रमाचे फार्मसी महाविद्यालय सुरू करण्याचे ठरवले. दि. २४ एप्रिल, १९८१ रोजी पुणे विद्यापीठाने भारती विद्यापीठास जून, १९८१ पासून फार्मसी डिग्री कॉलेज सुरू करण्याची परवानगी दिली. त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाची आणि फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचीही मान्यता मिळाली आणि प्रतिवर्षी ६० विद्यार्थ्यांना प्रवेश देणारे हे महाविद्यालय, जून, १९८१ सुरू करण्यात आले. डॉ. पतंगराव जो उपक्रम हाती घेतील तो यशस्वी होणारच, याचा प्रत्यय फार्मसी कॉलेजच्या बाबतीतही आला. या महाविद्यालयाचे औपचारिक उद्‌घाटन २७ एप्रिल,१९८२ रोजी महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री बॅ.बाबासाहेब भोसले यांच्या हस्ते झाले.

हे फार्मसी कॉलेज भारती विद्यापीठाने दि. २९ सप्टेंबर, १९८१ रोजी सुरू केले. सुमारे ६५ लाख रुपये खर्च करून फार्मसी कॉलेजसाठी तीन मजली इमारत उभी केली. त्या इमारतीमध्ये या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अकरा सुसज्ज प्रयोगशाळा उभारण्यात आल्या. शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाची शास्त्रीय उपकरणे, यंत्रसामुग्री, साहित्य व प्रयोगशाळांची उभारणी करण्यात प्रचंड गुंतवणूक विद्यापीठाने केली. औषधनिर्मिती कारखान्यांना अनुकरणीय आणि आदर्श वाटावी अशी असेप्टिक रूम महाविद्यालयाने उभारली आहे. डी.एस.सी.गॅस क्रोमाटोग्राफ, एच.पी.टी.एल.सी.,एच.पी.एल.सी. एफ.टी.आय.आर., ॲटॉमीक ॲब्सॉर्शन स्पेक्टोमीटर आणि यू.व्ही.(१६०) स्पेक्ट्रोफोटोमीटर सारखी उपकरणे खरेदी केली आहेत. महाराष्ट्रातील इतर फार्मसी कॉलेजांना आदर्श वाटावे अशाप्रकारे दूरदृष्टीने कॉलेजची जडणघडण केली आहे.

डॉ.पतंगरावांचा महाविद्यालयाच्या सुसज्ज-समृद्ध ग्रंथालयाबद्दल कटाक्ष असायचा. त्या सूत्रानुसार या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात हजारो पुस्तके, मासिके, संदर्भग्रंथ ठेवले आहेत. पुण्याच्या ब्रिटीश लायब्ररीनेही ग्रंथालयास उपयुक्त अशा पुस्तकांची देणगी दिली आहे.

माहितीपूर्ण म्युझियम, उत्तम प्राणिसंग्रहालय, आधुनिक उपकरणे, स्वतंत्र ड्रगप्लँट गार्डन, स्वतंत्र संशोधन विभाग, पब्लिक टेस्टिंग लॅबोरेटरी, कॉम्प्युटर प्रयोगशाळा ही या महाविद्यालयाची खास वैशिष्ट्ये आहेत.

बी.फार्म. पदवी अभ्यासक्रम, एम.फार्म. पदव्युत्तर अभ्यासक्रम, ॲडव्हान्स डिप्लोमा इन टेक्निकल केमिस्ट्री, बी.एस्सी.(अप्लाइड) व पीएच.डी. हे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. पुणे विद्यापीठाच्या कक्षेतील हे एकमेव वैशिष्ट्यपूर्ण फार्मसी शिक्षण देणारे महाविद्यालय आहे. प्राचार्य डॉ. शिवाजीराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अनेकांनी फार्मसी विषयात संशोधन केले आहे. तसेच भारती विद्यापीठाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागामध्ये पॉलिमर संशोधनाचे काम या महाविद्यालयात चालू आहे आणि नुकतीच औषधनिर्मितीही सुरू झाली आहे.

आजपर्यंत या महाविद्यालयातील विद्यार्थी उच्च गुणवत्तेने यशस्वीही झाले आहेत. तसेच या महाविद्यालयातील प्राध्यापकांनीही देशातील व परदेशातील कार्यशाळा, शिबिरे संशोधन चर्चासत्रे यामध्ये भाग घेऊन आपले शोधनिबंध सादर केले आहेत.

भारती विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाच्या प्रगतीत, विकासात डॉ. पतंगरावांच्या दूरदृष्टीची, कर्तव्यभावनेची आणि विज्ञानाचे महागडे ज्ञान गरीब, हुशार विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांबरोबर उपलब्ध व्हावे ही त्यांची तळमळ फार्मसी कॉलेजमधील उपक्रमांतूनही दिसते, म्हणून ग्रामीण भागातून आलेले व या महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण घेतलेले व डॉक्टरेट मिळवलेले विद्यार्थी आज ठिकठिकाणी दिसत आहेत. त्याचे श्रेय डॉ. पतंगरावांच्या कार्य-कुशलतेस द्यावे लागेल.

नामदार बाळासाहेब देसाई यांनी भारती विद्यापीठाला तीन एकर पस्तीस गुंठे जागा मोरे विद्यालयासाठी दिली. या विद्यालयाचे आणि कॉलेजचे निकाल एकाही वर्षी ऐंशी टक्क्याच्या खाली आलेले नाहीत. भारती विद्यापीठाच्या फार्मसीचे, मॅनेजमेंटचे विद्यार्थी महाराष्ट्रात पहिले, दुसरे, तिसरे आलेले आहेत. भांडी घासणाऱ्या एका बाईची मुलगी एस.एस.सी.ला. सत्त्याऐंशी टक्के गुण मिळवून विद्यालयात पहिली आलेली आहे. विद्यालयातील पाचवी ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके मोफत दिली जातात. मुलींसाठी पाचवी ते बारावीपर्यंत सर्व पुस्तके विनामूल्य देण्याची व्यवस्था केली आहे. ज्यांची शिकण्याची तयारी आहे; पण जो आर्थिकदृष्ट्या कमी पडतो, अशा एकाही विद्यार्थ्याला शिक्षणापासून वंचित राहण्याचे कारण नाही, अशी भूमिका संस्थेने घेतली आहे. त्यानंतर आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेज काढले. भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रचूडसाहेब यांच्याहस्ते लॉ कॉलेज सुरू केले. मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट सुरू केली. खेड्यापाड्यातून आलेला विद्यार्थी तथाकथित मॅनर्समध्ये कमी पडतो. बुद्धिमत्तेला तो कमी नाही, परंतु त्याचे सिलेक्शन मौखिकमध्ये व ग्रुप डिस्कशनमध्ये होत नाही.

'या फार्मसीची महाराष्ट्रात काय अवस्था आहे रजिस्टर झालेले पन्नास हजार फार्मासिस्ट महाराष्ट्राला लागणार आहेत, परंतु आत्तापर्यंत केवळ पंधरा हजारच उपलब्ध झाले आहेत. गेल्या दोन वर्षांत फार्मसीचा संबंध ऑल इंडिया टेक्निकल एज्युकेशनशी जोडलेला आहे. एकटे राज्य शासन काही करू शकणार नाही. ऑल इंडिया टेक्निकल असोसिएशनची मान्यता लागते. आता आपण डिप्लोमा घेतलेले वर्षाला शंभर विद्यार्थी देऊ शकतो. आपण पस्तीस वर्षे जरी या पद्धतीने काम केले, तरी राज्याच्या गरजेची पूर्तता होऊ शकणार नाही. त्यासाठी फार्मसी डिप्लोमा आणि डिग्री कॉलेज सुरू केले आहे'.

'पुणे शहराने आणि महानगरपालिकेने भारती विद्यापीठावर अतिशय प्रेम केले आहे. त्यांचा आम्ही खास उल्लेख केला पाहिजे. महानगरपालिकेने आजपर्यंत या संस्थेला पाच लाख रूपये देणगी दिलेली आहे. नुसती देणगीच नाही तर डॉ. पतंगराव कदम आणि भारती विद्यापीठ यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमताने पास केला आहे. अशा तऱ्हेने पुणेकरांनी या संस्थेचे स्वागत केले आहे, आम्हाला प्रेम दिले आहे, आम्हाला मदत केली आहे'.

भारती विद्यापीठाचे सूत्रधार कार्यवाह म्हणून डॉ. पतंगरावांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन समाजाने तर केलेच; पण महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्र्यांनीही केले, त्यामुळे भारती विद्यापीठाच्या यशोमंदिरावर धवल यशाची व कौतुकाची पताका फडकू लागली. व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या जीवनामध्ये केलेल्या कामाचे कौतुक झाले तर आयोजिलेल्या नव्या-नव्या संकल्पना, योजना पुऱ्या करण्यास प्रोत्साहन मिळते. फार्मसी कॉलेजच्या उद्घाटनानिमित्त झालेल्या समारंभात मुख्यमंत्र्यांनी भारती विद्यापीठाबाबत व डॉ. पतंगरावांबाबत व्यक्त केलेल्या भावना अणि शुभेच्छा पुढील उपक्रम गतिमान करण्यासाठी पुरेशा होत्या. सद्या पुणे, मुंबई, कोल्हापूर येथे प्रत्येकी डिग्री फार्मसी व डिप्लोमा फार्मसी कॉलेजेस कार्यरत आहेत.


❊❊❊

## ८. भारती विद्यापीठ भवन

डॉ. पतंगरावांनी शून्यातून भारती विद्यापीठ उभे केले आहेत. संस्थेसाठी शासनाकडून जागा मिळवल्या व काही खाजगी जागा विकत घेतल्या. त्या मिळवताना त्यांच्या दूरदृष्टीचा आणि भविष्यकाळाचा वेध घेण्याचा दृष्टिकोन दिसून येतो. भारती विद्यापीठाला एरंडवणे परिसरात शासनाकडून जागा मिळवून त्यावर बालक मंदिर, प्राथमिक शाळा, विद्यालय, महाविद्यालयाच्या आलिशान व भव्य इमारती बांधल्यावर विद्यापीठाच्या मध्यवर्ती कार्यालयासाठी पुण्यामध्ये मध्यवर्ती ठिकाणी भव्य इमारत उभी करण्याचा विचार डॉ. पतंगरावांनी केला आणि त्यांच्या प्रयत्नवादी धडपडीस यशही आले. अलका टॉकीजशेजारी असलेल्या नदीकाठावरील झोपडपट्टी असलेला प्लॉट डॉ. पतंगरावांनी खरेदी केला व त्यावर पुण्यातील प्रथम दहा मजली टोलेजंग इमारत बांधण्याचे ठरवले.

भारती विद्यापीठाच्या इतिहासातील 'सोनेरी पान' असा ज्याचा उल्लेख करता येईल अशा 'भारती विद्यापीठ भवन' च्या इमारतीचा शिलान्यास समारंभ दिनांक ११ ऑक्टोबर,१९८१ रोजी महाराष्ट्राचे त्यावेळचे नगरविकास व अर्थमंत्री रामराव आदिक यांच्या हस्ते व ऊर्जामंत्री जयवंतराव टिळक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्याप्रसंगी डॉ. पतंगराव कदम म्हणाले होते, की ही पुण्यातील पहिला दहा मजली इमारत बांधण्याचा मान भारती विद्यापीठाला मिळाला आहे. पूर्वी शिक्षण संस्था राजाश्रयाखाली चालत असत. आता शासनाच्या व दानशूर व्यक्तींच्या, उद्योगपतींच्या, लोकाश्रयाखाली शिक्षण संस्थांना कार्य करावे लागते, परंतु, शिक्षण दान करणाऱ्या या शिक्षणसंस्था आश्रित असता कामा नयेत. त्या स्वावलंबी झाल्या पहिजेत, हा दृष्टिकोन भारती विद्यापीठाचा आहे. त्यासाठी ह्या इमारतीतून व इतर सहकारी संस्थांतून भारती विद्यापीठाला मदत होणार आहे. त्या प्रसंगी भारती विद्यापीठास शुभेच्छा व्यक्त करताना नामदार श्री. रामराव आदिक म्हणाले, की 'भारती विद्यापीठाच्या कार्याने मी प्रभावित झालो आहे. कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर हिरे, पंजाबराव देशमुख इत्यादिकांच्या पावलावर पाऊल टाकून डॉ.पतंगराव कदम सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानीत शिक्षणाचे कार्य करीत

१९८२ मध्ये पुण्यातील प्रथम उंच (दहा मजली) इमारत – भारती विद्यापीठ भवन




भारती विद्यापीठ भवन, पुणे.



मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव

आहेत. सामान्य माणसाला शिक्षणाची सर्व दालने खुली करण्याचे महत्त्वाचे काम भारती विद्यापीठ करीत आहे.' या समारंभाचे अध्यक्ष जयवंतराव टिळक म्हणाले, की 'पुण्याचा गुण म्हणजे संस्था काढण्याचा. डॉ. पतंगरावांनी तो बरोबर उचलला. संस्था काढणे सोपे आहे, परंतु चालवणे कठीण असते. संस्था कशी चालवावी व त्याची नेत्रदीपक प्रगती कशी करावी हे डॉ. पतंगरावांपासून जरूर शिकावे; कारण ध्येयवादी डॉ. पतंगरावांच्या व्यापक कार्याला व्यावहारिक बैठक आहे,' अशा शब्दांत मिळालेल्या शुभेच्छा घेऊन 'भारती विद्यापीठ भवन' च्या टोलेजंग इमारतीचे बांधकाम सुरू करण्यात आले.

प्राचार्य बाळ गाडगीळ डॉ. पतंगरावांच्या अचूक योजकतेबद्दल म्हणतात, की 'कामाच्या योजनेचा पूर्ण आराखडा तयार करून त्यानुसार निदिध्यासाने सर्वस्व झोकून देऊन काम तडीस लागेपर्यंत काम करण्याची जिद्द या तरूणाने जोपासली. नवलाची गोष्ट म्हणजे फक्त चाळीस-पन्नास रूपयांचे तुटपुंजे भांडवलच काय ते हाताशी होते. ही डॉ. पतंगरावांना कधीच अडचण वाटली नाही. नाहीतर माझ्यासारख्या मराठी माणसाजवळ कल्पना खूप असतात; पण पैशाच्या अभावी त्या प्रत्यक्षपणे अमलात आणणे जमले नाही, म्हणजे आम्ही चुळबुळत बसतो आणि गिबनच्या एका सुप्रसिद्ध वचनाच्या आड लपतो. इट इज बेटर टु बिल्ड कॅसल्स इन् द एअर दॅन ऑन द ग्राऊंड- जमिनीवर किल्ले बांधण्याऐवजी हवेत किल्ले बांधणे हे अधिक चांगले, कारण उघड आहे. हवेत किल्ले बांधायला काही खर्च करावा लागत नाही हे एक; आणि हवेत काय वाट्टेल तितके किल्ले बांधता येतात. नाही आवडला एखादा तर तो पाडून दुसरा अधिक भव्य, अधिक देखणा बांधता येतो. आहे काय आणि नाही काय !'

श्री. विठ्ठलराव गाडगीळ यांनी डॉ. पतंगरावांना 'कृतीशील शिक्षणतज्ज्ञ' असे म्हटले आहे. एका पाठोपाठ धडाक्याने अनेक मोठमोठ्या संस्था त्यांनी उभ्या केल्या, नावारूपाला आणल्या म्हणून ही पदवी त्यांना शोभूनच दिसते, पण मी म्हणतो त्याप्रमाणे डॉ. पतंगराव हे एक किल्लेदारही आहेत. भारती विद्यापीठ भवन हा प्रचंड दहा मजली किल्ला त्यांनी बांधला आणि अनेकांना केवळ अशक्य वाटत असलेले स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात उतरवले.

प्रा. बाळ गाडगीळ व श्री. विठ्ठलराव गाडगीळ यांच्या वरील शब्दांमध्ये डॉ. पतंगरावांची धडाडी आणि कार्यकौशल्याची तडफ दिसून येते. परंतु, भारती विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयासाठी दहा मजली इमारत बांधण्यामागे त्यांचा हेतू उच्च सामाजिक विचारसरणीचा होता. तरी त्या उद्देशास पाठबळ देण्याऐवजी नागरिकांच्या तथाकथित हितकर्त्या बांधवांनी विरोध केला होता. अगदी हायकोर्ट, सुप्रीम कोर्टापर्यंत विरोध केला होता, पण नियतीचाच पाठिंबा असल्यामुळे डॉ. पतंगरावांनी सर्व अडथळे दूर करून कोर्टकचेऱ्यांतही यश मिळवले.

पुण्यातील सर्वात उंच इमारत बांधण्यामागचा डॉ. पतंगरावांचा हेतूही त्या इमारतीइतकाच उच्च होता. कोणतीही शिक्षणसंस्था म्हटली, की ती स्वावलंबी असली पाहिजे. आर्थिकदृष्ट्या तर पूर्णपणे स्वतःच्या आधारावर उभी असली पाहिजे असे ते नेहमी म्हणत असत. ही डॉ. पतंगरावांची आर्थिक स्वयंपूर्णतेची कल्पना फारच अर्थपूर्ण अशी आहे. बाहेरच्या आधारावर किंवा मदतीवर अवलंबून न राहता संस्थेसाठी लागणाऱ्या निधीचा सतत मोठा असा ओघ निर्माण करावयाला हवा ही त्यांची भूमिका आहे. अशा कार्याकडे कौतुकाने पाहण्याऐवजी, तसेच हे कार्य उभे करण्यास किती कष्ट पडले असतील हे पाहण्याऐवजी त्या कार्याकडे क्षुद्र मनोवृत्तीची माणसे काकदृष्टिने पाहत असतात व टीका करतात, पण डॉ. पतंगरावांनी अशा टीकात्मक विचाराकडे पहिल्यापासून दुर्लक्ष करून आपल्या लोकोपयोगी योजना साकार करून दाखवल्या आहेत. त्याबद्दल डॉ. पतंगराव नेहमी म्हणत, 'लोकांनी बोलत राहावं. आपण मात्र स्वतःला जे पटतं ते करीत राहावं'.

भारती विद्यापीठाच्या आर्थिक स्वावलंबनाच्या भूमिकेचे मर्म सांगताना प्रा. बाळ गाडगीळ म्हणतात, 'भारती विद्यापीठ भवन हा किल्ला डॉ. पतंगरावांनी उभा केला त्यामागे आर्थिक स्वयंपूर्णता निर्माण करण्याची त्यांची ईर्षा होती, आणि ती पूर्ण करण्यात त्यांनी यश मिळवले आहे. आर्थिक स्वयंपूर्णता असली म्हणजे नव्या-नव्या योजना पूर्ण करण्याचे स्वातंत्र्य संस्थेला राहते, हा विचार पतंगरावांनी मनाशी बाळगला असणारच. शिक्षण संस्थांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करून डॉ. पतंगरावांनी आपला पीएच.डी.चा संशोधनात्मक

प्रबंध लिहिला आहे. त्यामुळे त्यांना या संस्थांच्या दुबळ्या आर्थिक स्थितीची पूर्ण कल्पना आलेली होती. दहा मजली अभूतपूर्व अशी टोलेजंग इमारत पुण्यात डॉ. पतंगरावांनी बांधली. त्यांनी एवढे मोठे बांधकाम केले म्हणून मला कौतुक आहेच पण संस्थेला आर्थिक स्थैर्य देण्याचा जो विचार त्यामागे आहे, त्याबद्दल मला नुसते कौतुकच वाटत नाही तर आदरसुद्धा वाटतो. दारोदार हिंडून लहानलहान रकमा जोडून प्रचंड निधी उभारण्याचे दिवस आता संपले आहेत. स्वतःची अस्मिता कायम टिकवून, शैक्षणिक नियोजनाचे स्वातंत्र्य सांभाळून जर काही करावयाचे असेल तर भक्कम आर्थिक पाया, पुरेसा आर्थिक निधी जवळ असल्याशिवाय तरणोपाय नाही हे डॉ. पतंगरावांनी नुसते ओळखले नाही तर भारती विद्यापीठ नावाची कल्पना साकार करून ती कल्पना प्रत्यक्षात आणली. भारती विद्यापीठ असे वरवर वाटणारे नाव डॉ. पतंगरावांनी आपल्या संस्थेला का दिले अशी शंका वाटेल; पण त्यांनी या विद्यापीठाच्या कक्षेत इतक्या संस्था उभ्या केल्या आहेत, की विद्यापीठ हे नाव त्यांनी थोडे आधी दिले, एवढेच फार तर म्हणता येईल. मात्र 'विद्यापीठ' हे बिरुद एकदा धारण केल्यावर त्याला साजेसे प्रचंड कामही त्यांनी केले आहे.'

भारती विद्यापीठाच्या व डॉ.पतंगरावांच्या जीवनातील १९९६ हे वर्ष सोनेरी अक्षरात लिहिण्यासारखे आहे. कारण ते वर्ष डॉ. पतंगरावांच्या इच्छापूर्तीचे-ध्येयपूर्तीचे वर्ष होते. यावर्षी भारती विद्यापीठास 'अभिमत विश्वविद्यालय' म्हणून भारत सरकारने मान्यता दिली आणि 'भारती विद्यापीठ भवन'च्या चौथ्या मजल्यावर भारती अभिमत विश्वविद्यालयात केंद्रीय कार्यालय, कुलगुरूंचे कार्यालय मे, १९९६ पासून सुरू झाले. आठव्या मजल्यावर भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ.पतंगराव कदम यांचे कार्यालय थाटले. तळमजल्यावर भारती बझारचे डिपार्टमेंटल स्टोअर आहे. पहिल्या मजल्यावर भारती सहकारी बँकेचे मुख्य कार्यालय आहे. इतर पाच मजले विविध संस्थांना आणि शासकीय कार्यालयांसाठी भाड्याने दिले आहेत. त्यातून भाड्याच्या उत्पन्नातून भारती विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक संस्थांच्या योजना पुऱ्या करण्यासाठी उपलब्ध झाले आहे. १९६४ साली भारती विद्यापीठ कसबा पेठेतील एका बोळातील माडीवरील १०'X१०' च्या भाड्याच्या खोलीत डॉ. पतंगरावांनी सुरू केले होते; त्याच विद्यापीठाला

१९९८ साली शासकीय मान्यतेने भारती अभिमत विश्वविद्यालय म्हणून मान्यता मिळवण्यातही डॉ. पतंगराव यशस्वी झाले आहेत. शासनाने दिलेल्या इमारतीमध्ये किंवा शासनाच्या अनुदानातून उभारलेल्या इमारतीमध्ये विद्यापीठे सुरु झाल्याच्या पार्श्वभूमीवर डॉ. पतंगरावांनी स्वकर्तृत्वावर बांधलेली भारती अभिमत विश्वविद्यालयाची दहा मजली इमारत ताजमहालाइतकीच उल्लेखनीय अशी आहे.

भारती भवनसारखी टोलेजंग दहा मजली इमारत बांधून आत्मनिर्भरतेचे, आत्मविश्वासाचे स्वयंभू तेज त्यांनी शिक्षणक्षेत्रात आणले आहे. ही महत्त्वाची आणि मोलाची कामगिरी ज्या माणसाने एकट्याने केली त्या माणसास प्राचार्य बाळ गाडगीळ यांनी 'दहामजली माणूस' म्हटले आहे. मी त्यांना दहा मजली महापुरुष म्हटले तर ते वावगे होणार नाही, कारण ही वस्तुस्थिती आहे आणि राजमान्य व लोकमान्य गोष्ट आहे.

***

# ९. वस्त्रोद्योगाच्या पंढरीत आणि शाहूनगरीत मुहूर्तमेढ

१९८०-८१ मध्ये सोलापूर येथे भारती विद्यापीठाने मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ही शाखा रयत शिक्षण संस्थेच्या रावजी सखाराम कॉमर्स हायस्कूलमध्ये सुरू केली. भारती विद्यापीठाची कोणतीही संस्था स्वतःच्या सुसज्ज इमारतीत असली पाहिजे असा कटाक्ष बाळगणारे डॉ.पतंगराव असल्यामुळे शासकीय मोकळी जागा शोधून काढली. त्या जागेसाठी भारती विद्यापीठाने अर्ज केला. ती जागा मिळवण्यात काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या! पण त्यावेळचे सोलापूरचे कलेक्टर मोहनराव पाटील यांनी सर्व अडचणी दूर करून जागा भारती विद्यापीठास मिळण्याची शिफारस केली आणि शासनाने विद्यापीठाचे कार्य पाहून वाजवी किंमतीला म्हणजे साडेचार हजार रुपयांस तीन एकर प्रमाणे जागा मंजूर केली. १९८४ साली जागेचा कब्जा घेतला व बांधकाम सुरू केले. १९८५ साली विजापूर रोडवर प्राथमिक विद्यामंदिर व इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्वतःच्या इमारतीत सुरू झाली. आज बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक यासाठी सर्व सोयींनी युक्त अशा ६० खोल्यांची ही तीन मजली इमारत ८७ लाख रुपये खर्च करून बांधण्यात आली. याच काळात इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटसाठी स्वतंत्र इमारत असावी असा विचार डॉ. पतंगराव कदम यांच्या मनात आला आणि त्याप्रमाणे स्वतंत्र तीन मजली इमारत ७० लाख रुपये खर्च करून बांधण्यात आली. भारती विद्यापीठाच्या सोलापूर शाखेला भेट देणाऱ्या सन्माननीय पाहुण्यांची सोय व्हावी म्हणून १५ लाख रुपये खर्च करून गेस्ट हाऊसही बांधण्यात आले आहे.

डॉ. पतंगराव कदम यांनी उच्च शिक्षण विभाग सुरू करताना, प्राचार्यांची निवड करताना कधीही तडजोड केली नाही. योग्य ठिकाणी योग्य प्राचार्य मिळवण्यात ते नेहमीच यशस्वी ठरले आहेत.

सोलापूर शहर हे हातमाग, यंत्रमाग आणि कापडगिरण्यांचे महत्त्वाचे केंद्र. तेथे औद्योगिक आणि व्यापारविषयक विकासासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक संस्था मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट सुरू करून भारती विद्यापीठाने महत्त्वाचे सामाजिक कार्य केले आहे. या मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये एम.बी.ए., डी.बी.एम. सारखे कोर्स सुरू करून या संस्थेने चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीयल

को-ऑपरेटीव्ह बँक नागरी सहकारी बँका, टेक्सटाईल इंडस्ट्री या संस्थांशी शैक्षणिक सहकार्य साधून भारती विद्यापीठाची प्रतिमा उंचावली आहे.

सोलापूरच्या 'नरसिंगजी गिरजी' मिलमधील कामगारांच्या गैरहजेरीच्या विषयावरील संशोधन प्रकल्प याच संस्थेने पूर्ण केला. चेंबर ऑफ कॉमर्सच्या सहकार्याने उद्योगविषयक चर्चासत्रे, व्याख्यानमाला आयोजित केल्या. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी मानव संशोधन विकास प्रशिक्षणाचे अनेक उपक्रम राबवले. १५० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम राबवला. सोलापूर हे गिरणी कामगारांचे शहर असल्याने तेथे ई.एस.आय. योजना मोठ्या प्रमाणावर राबवली जाते. त्याचकरता राज्यस्तरीय कार्यशाळा इन्स्टिट्यूटच्या वतीने भरवली होती. इन्स्टिट्यूटमध्ये 'एम.एस.डब्ल्यू' चा कोर्स सुरुवातीपासून सुरू केला होता. व्यावसायिक समाजकार्याची एक चळवळच सोलापूर शहर व जिल्ह्यामध्ये सुरू केली. अनेक सार्वजनिक संस्था, जिल्हा परिषदा, महानगरपालिका यांच्या ग्रामीण व शहरी समुदाय विकासाबाबतचे अनेक प्रकल्प इन्स्टिट्यूटने राबवले.

युनिसेफ व सोलापूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने इन्स्टिट्यूटने सोलापूर झोपडपट्टीवासीयांच्या मूलभूत गरजांचा सर्वेक्षण प्रकल्प राबवला. होनसळ या उत्तर सोलापूर तालुक्यातील गावामध्ये राष्ट्रीय सेवा योजना राबवली. सोलापूर हे औद्योगिकदृष्ट्या जरी मागासलेले समजले जात असले, तरी तेथील आर्थिक व सामाजिक प्रश्न सोडवण्यास भारती विद्यापीठाच्या मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटने मोलाचे सहकार्य केले आहे. त्याकरता डॉ.पतंगराव कदम यांची दूरदृष्टि व मार्गदर्शन कारणीभूत आहे.

जून, १९८५ पासून सोलापूर येथे डॉ.पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनामुळे भारती बालविकास मंदिर व भारती विद्यापीठ प्राथमिक विद्यालय सुरू केले. त्याकरता प्रशिक्षित व अनुभवी शिक्षकवर्ग, उत्तम फर्निचर, भरपूर शैक्षणिक साधने, भव्य इमारत उपलब्ध केल्यामुळे मुलांच्या दर्जेदार शिक्षणाबरोबरच मुलांचा सर्वांगीण विकासही केल्यामुळे शहरामध्ये भारती विद्यापीठाने नाव मिळवले आहे.

प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक शिक्षणाची सोय करण्याकरता सोलापूर येथे भारती विद्यापीठ माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज

जून, १९८५ मध्ये सुरु करून जुळ्या सोलापूरमधील मुलांची शैक्षणिक सोय भारती विद्यापीठाने केली. नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या विद्यलायातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांत अनेक पारितोषिके मिळवली आहेत. अशाप्रकारे सोलापूर शहरातील शैक्षणिक क्षेत्रात भारती विद्यापीठाने अग्रक्रम मिळवून नावलौकिक मिळवला आहे. पुणे शहरानंतर डॉ. पतंगराव कदम यांनी सोलापूर शहरामधील मिळवलेले यश कौतुकास्पद आहे.

भारती विद्यापीठाने सोलापूरसारख्या ठिकाणी निरनिराळ्या विभागांतून उच्च दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याचा उपक्रम केला. त्यामुळे सोलापूर शहरातील लोकांना आकर्षण वाटावे असे शैक्षणिक कार्य प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक करीत आहेत.

**शाहूनगरीत मुहूर्तमेढ :**

छत्रपतींची राजधानी, कलावंतांची कलानगरी, आणि उद्योजकांची उद्यमनगरी म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूर शहरात भारती विद्यापीठाची शाखा सुरु करावी अशी मागणी डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे होत होती. त्यास प्रतिसाद देण्याच्या हेतूने शैक्षणिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक क्षेत्रामध्ये वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेल्या कोल्हापूर येथे भारती विद्यापीठाने दि. २५ जून, १९८२ रोजी न्यू लॉ कॉलेज सुरू केले. नोकरी-व्यवसाय करणाऱ्या पदवीधरांच्या सोयीसाठी या महाविद्यालयाचे वर्ग सायंकाळी भरवण्यात येतात. एल्एल्.बी., डिप्लोमा इन इन्कमटॅक्स ॲण्ड सेल्स टॅक्स, लेबर लॉ हे अभ्यासक्रम तेथे शिकवले जातात. शिवाजी विद्यापीठास हे महाविद्यालय संलग्न आहे.

नोकरी करून कायद्याची पदवी घेऊ इच्छिणाऱ्या करवीरमधील गरजू तरूणांना सायंकाळच्या विधी महाविद्यालयाची सोय त्या वेळी नव्हती, पण आता कोल्हापूर शहर व परिसरातील नोकरी करणाऱ्या अनेक होतकरूंना या महाविद्यालयाचा फायदा होत आहे. या महाविद्यालयास शासनाचे अनुदान मिळत आहे.

भारताचे माजी सर न्यायाधीश न्यायमूर्ती यशवंतराव चंद्रचूड यांनी दि. १ ऑगस्ट, १९९४ रोजी या महाविद्यालयास भेट देऊन समाधान व्यक्त केले. विधी महाविद्यालयाच्या वतीने कायदा सल्ला, कोर्ट व्हिजिटस्, मूट कोर्ट यासारखे उपक्रम राबवले जातात. या महाविद्यालयास तीन ठिकाणी स्थलांतर करावे लागले होते. आता हे महाविद्यालय रत्नाप्पा कुंभार नगरशेजारील प्रशस्त इमारतीमध्ये सुरू आहे.

छत्रपती शाहू महाराज व छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुरोगामी धोरणामुळे कोल्हापूर शहरातील उद्योजकांना प्रोत्साहन मिळाले व अनेकांनी आपले लहान-मोठे उद्योग सुरू केले. त्यामुळे कोल्हापूरची उद्यमनगरी उभी राहिली. तसेच अलीकडे महाराष्ट्र शासनाच्या एम्.आय्.डी.सी.प्रकल्पामुळे कोल्हापूर शहराच्या परिसरात शिरोली व गोकुळ शिरगाव येथे अनेक मोठे कारखाने सुरू झाले. या कारखान्यातील प्रशिक्षित व्यवस्थापकांची गरज डॉ.पतंगराव कदम यांनी लक्षात घेऊन भारती विद्यापीठाचे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट जून १९९४ पासून कदमवाडीत संस्थेच्या भव्य इमारतीमध्ये सुरू केले आहे. येथे एम्.बी.ए., एम्.सी.ए., बी.सी.ए., बी.बी.ए. हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

औषधी कारखान्यात आणि औषधांच्या दुकानात फार्मसी पदवीधरांची आणि पदविकाधारकांची गरज असते. कोल्हापूर विद्यापीठाच्या क्षेत्रात फार्मसी महाविद्यालय नव्हते. जेथे-जेथे ज्या शिक्षणाची उणीव आहे, गरज आहे, तिकडे डॉ.पतंगराव कदम यांचे लक्ष असते. त्यानुसार कोल्हापूरला पाचगाव येथे भव्य इमारतीमध्ये भारती विद्यापीठाचे फार्मसी महाविद्यालय लोकांची गरज भागवत आहे. पूर्वी हे महाविद्यालय कदमवाडी येथे होते. फार्मसी शिक्षणशास्त्राच्या सर्व शाखांचे शिक्षण येथे उपलब्ध झाले आहे. सुसज्ज प्रयोगशाळा, संदर्भ ग्रंथालय, सभागृह अशा सुविधा येथे आहेत. थोड्या अवधीत या महाविद्यालयाने चांगली प्रगती केली आहे. $A^+$ मानांकन मिळाले आहे.

वरील विद्यालयाबरोबरच या परिसरातील मुलांच्या इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणासाठी भारती विद्यापीठाने कदमवाडी येथे इंग्रजी मिडियम स्कूल

दि. २६ ऑगस्ट, १९९२ पासून सुरु केले आहे. ज्युनिअर के.जी. व सिनियर के.जी. चे वर्ग येथे सुरू केले आहेत. आवश्यक त्या शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशा या शाखेत उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाते.

कदमवाडी ही कोल्हापूरच्या पूर्वेस विस्तारीत वसाहत आहे. अशा ठिकाणच्या मुलांना प्री-प्रायमरी, प्रायमरी व विद्यालयीन शिक्षणाची सोय नव्हती. डॉ.पतंगराव कदम यांच्या दूरदर्शी विचारामुळे भारती विद्यापीठाने स्वत:च्या इमारतीमध्ये प्री-प्रायमरी व माध्यमिक विद्यालय सुरू करून त्या भागातील मुलांची सोय केली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कागल तालुक्यातील चिकोत्रा खोऱ्यामध्ये अनेक दुर्गम गावातील मुलांची शैक्षणिक सोय करण्याच्या उद्देशाने भारती विद्यापीठाने दि. १४ नोव्हेंबर १९९१ रोजी बेलेवाडी-काळम्मा येथे 'आनंदराव पाटील माध्यमिक विद्यालय' सुरू केले आहे. अगदी सुरुवातीपासूनच या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अनेक स्थानिक व बाहेरच्या स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळवून कौतुकास्पद यश मिळविले आहे.

कोल्हापूर व आसपासच्या परिसरामध्ये सुरू केलेल्या भारती विद्यापीठाच्या विविध शाखांतून शिक्षण उपलब्ध करण्यामागे ग्रामीण भागातील मुलांची सोय व्हावी, हाच उद्देश डॉ.पतंगराव कदम यांचा होता आणि तो उद्देश सफल होत आहे.

**क्रांतिवीरांच्या जिल्ह्यात ज्ञानगंगा :**

विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना गती गेली ।।

गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

दारिद्र्याचे मूळ अज्ञानात आहे, असे आपल्या विचारवंतांनी सांगितले. जोवर बहुजन समाजातील मुले शिकून पुढे येत नाहीत तोवर त्यांना चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार नाहीत, म्हणून ज्ञानगंगा सर्वसामान्यांच्या दारी पोहोचवण्याचे सामाजिक व शैक्षणिक कार्य भारती विद्यापीठाद्वारे डॉ.पतंगराव कदम यांनी केले आहे.

सातारा जिल्ह्यात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाच्या सोयी ग्रामीण भागात सर्वसामान्यांच्या मुलांना उपलब्ध करून दिल्या. औद्योगिक विकासामुळे व सहकाराच्या माध्यमातून कृषिउद्योगामुळे व्यवस्थापनाचे शिक्षण घेतलेल्या पदवीधरांची गरज भासू लागली होती. ती उणीव भरून काढण्यासाठी डॉ.पतंगराव कदम यांनी कोकण व देश यांच्यातील दुवा साधणाऱ्या कऱ्हाड ह्या केंद्रस्थानी असलेल्या शहरात मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट सुरू केले. कऱ्हाडच्या आसपास किर्लोस्कर उद्योगसमूहाचा कारखाना आहे. महाराष्ट्रात अग्रगण्य असलेला कृष्णा सहकारी साखर कारखाना, सह्याद्री सहकारी साखर कारखाना असे उद्योग आहेत. हे लक्षात घेऊन भारती विद्यापीठाचे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट १ ऑगस्ट, १९९४ पासून सुरु करण्यात आले.

प्रशस्त बांधण्यात आलेल्या अद्ययावत अशा या इमारतीमध्ये बिझनेस मॅनेजमेंट व कॉम्प्युटर मॅनेजमेंट असे व्यावसायिक व्यवस्थापनाचे पदवी शिक्षण देणारा दोन वर्षांचा कोर्स व पदविका शिक्षणाचा एक वर्षाचा कोर्स कऱ्हाड परिसरातील विद्यार्थ्यांकरिता सुरू करण्यामागे शहराबरोबर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही व्यवस्थापनाचे उच्च शिक्षण मिळावे, ही डॉ.पतंगराव कदम यांची इच्छा फलद्रूप झाली आहे.

७ नोव्हेंबर, १९९५ रोजी यशवंतराव मोहिते यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवशी या संस्थेचे नामकरण 'यशवंतराव मोहिते इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, कऱ्हाड असे केले.

भारती विद्यापीठाची स्थापना करण्यामागील हेतू विशद करताना डॉ. पतंगराव कदम म्हणत, की महाराष्ट्रात नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी आहे, परंतु ॲकॅडमीत महाराष्ट्रीय नाही. त्याकरता विद्यार्थ्यांनी इंग्रजी व गणित विषयात प्रावीण्य मिळवून ॲकॅडमीत प्रवेश मिळवावा. हे सांगत असताना जसे इंग्रजी व गणित विषयाच्या तयारीकरता भारती विद्यापीठ सुरू करून कालांतराने (१९९६) पदवी देणारे भारती विद्यापीठ अभिमत विद्यालय शासनाकडून मंजूर करून घेतले, तसे भारती विद्यापीठाची ॲकॅडमी सुरू करण्याचे विचार डॉ.पतंगराव कदम यांच्या मनात असणारच ! त्याच उद्देशाने ज्या ठिकाणी इंग्रजी

माध्यमाची निवासी विद्यालये आहेत, अशा सातारा जिल्ह्यातील पांचगणी या थंड हवेच्या ठिकाणी भारती विद्यापीठाची इंग्रजी माध्यमाची निवासी ॲकॅडमी डॉ. पतंगराव कदम यांनी प्रशस्त अशा पांचगणीच्या पूर्वेस टेबललँडच्या उतारावर ७२ एकरात ३० ऑक्टोबर, १९८७ रोजी सुरू केली आहे.

पांचगणी येथे इतर शिक्षणसंस्थाही शैक्षणिक कार्य करीत आहेत. पण त्या संस्थांमध्ये इतर प्रांतांतील विद्यार्थी जास्त व स्थानिक कमी, असे चित्र होते. भारती विद्यापीठाने मात्र पांचगणीच्या परिसरातील दुर्गम, डोंगराळ भागातील खेड्यापाड्यातील मुलामुलींना शिक्षणाची संधी मिळावी म्हणून पांचगणीचे शैक्षणिक केंद्र सुरू केले आहे. परिसरातील गोडवली, खिंगर, आंब्राळे, राजपुरी या गावच्या शेतकऱ्यांच्या व मोलमजुरी करणाऱ्यांच्या मुलांसाठी मराठी माध्यमाचे विद्यालय ३० ऑक्टोबर, १९८७ रोजी सुरू केले.

❊❊❊

# १०. स्त्रीशिक्षणाचा आदर्श उपक्रम

'केवळ प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क आहे म्हणून नव्हे; तर मानवी जीवनाच्या भविष्यकालीन कल्याणासाठी स्त्री ही अधिक प्रभावी घटक असल्याने समाजाच्या सर्व थरांतील स्त्रियांची त्यांच्या प्रौढ जीवनाची तयारी जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे होणे आवश्यक आहे'. असे पाश्चात्य तत्त्वज्ञ जॉन न्यसम यांनी म्हटले आहे. कारण माता, पत्नी आणि शिक्षिका या भूमिकेद्वारे शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक दृष्ट्या स्त्रिया, पुरुष व स्त्री घडवतात. भविष्याच्या खऱ्या शिल्पकार स्त्रिया होत. स्त्रिया पुरुषांना सुसंस्कृत करतात आणि अशा रीतीने संस्कृतीची जोपासना करतात.

स्त्री शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन करताना कोठारी शिक्षण आयोगाने आपल्या अहवालात पान १३५ वर म्हटले आहे, की 'आपल्या मानवी साधनसंपत्तीच्या संपूर्ण विकासासाठी, गृहसुधारणेसाठी आणि बाल्यावस्थेच्या अत्यंत संस्कारक्षम वयात मुलांच्या चारित्र्याची योग्य घडण करण्यासाठी स्त्रीला दिले जाणारे शिक्षण हे पुरुषाला दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षाही अधिक महत्त्वाचे आहे'.

वरील विचारांसारखे विचार जाणून शंभर वर्षांपूर्वी महात्मा जोतिबा फुले यांनी पुण्यामध्ये स्त्री-शिक्षणाचा पाया घातला होता. आपल्या अशिक्षित पत्नीला सावित्रीबाईंना, सुशिक्षित करून मुलींची पहिली शाळा पुण्यामध्ये काढली. स्त्री-शिक्षणाचे महत्त्व डॉ.पतंगराव कदम यांनीही ओळखले. त्यासाठीच शहरापेक्षा ग्रामीण भागातील शिक्षणासाठी हेतुपुरस्कर अनेक उपक्रम राबवले.

पुण्यापासून १५ किलोमीटर अंतरावर सातारा महामार्गावर शिंदेवाडी-वेळू ही गावे आहेत. जरी पुणे शहर भारतामध्ये विद्येचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध असले, तरीसुद्धा पुणे शहराच्या अगदी जवळ असलेली खेडी शिक्षणापासून वंचित राहिली होती. सधन कुटुंबातील मुले पुण्यात येऊन शिक्षण घेऊ शकत होती; परंतु मुलींना मात्र ते शक्य नव्हते. त्या गावातील लोकांची अज्ञान व अंधश्रद्धेची रात्र संपलेली नव्हती. मुलींच्या ज्ञानार्जनाची चिन्हे दिसत नव्हती. अशा परिस्थितीत महात्मा जोतिबा फुले यांच्या विचाराने प्रेरित झालेल्या

बहुजन समाजाचे कैवारी डॉ.पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाची महात्मा जोतिबा फुले प्रशाला ही प्रशाला १९८२ साली मुलींच्या शिक्षणासाठी सुरू केली. विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या आणि ग्रामस्थांच्या मदतीने दीड लाख रूपयांचा विकास फंड जमवला. त्यात भारती विद्यापीठाने एक लाख रूपयांची भर घालून अद्ययावत अशी सहा खोल्यांची देखणी इमारत बांधली व विद्यार्थ्यांकरिता, विद्यार्थ्यांनी बांधलेल्या विद्यालयात विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेऊ लागल्या. त्याचबरोबर सर्वांच्या सहकार्याने विद्यालयाच्या परिसरात वृक्षांची मोठ्या प्रमाणात लागवड व संवर्धन केले. प्रत्येक वर्षी विद्यालयाची प्रगती झाल्याचे पाहून भारती विद्यापीठाचे हे विद्यालय चर्चेचा विषय झाले होते. थोड्याच अवधीत शिंदेवाडीचे विद्यालय भोर तालुक्यातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र झाले. २२ महिन्यांत शासनाकडून पूर्ण अनुदान मंजूर झाले. भोर पंचायत समितीने बोअर घेऊन मुलांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली, वीज मंडळाने मोफत वीज लाईन ओढून दिली, ग्रामीण विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून शासनाने रंगीत टी.व्ही. संच दिला आणि या सर्वांचा कळस म्हणजे शासनाने उत्तम प्रशासन असलेली शाळा म्हणून दहा हजार रूपयांचे रोख पारितोषिक देऊन या आदर्श उपक्रमाचा गौरव केला.

शिंदेवाडी-वेळू परिसरातील मुलींना दूरच्या अंतरावरील शाळेत पालक पाठवू शकत नव्हते. त्यामुळे या पंचक्रोशीतील गेल्या अनेक पिढ्यांमध्ये मुली शिक्षणापासून वंचित राहिल्या होत्या. ती उणीव डॉ.पतंगराव कदम यांच्या दूरदृष्टिने व जनसामान्यांची जाण असल्यामुळे भरून निघाली. आज या विद्यालयात मुलींच्या शिक्षणाच्या अपेक्षा व आकांक्षा पुऱ्या होत आहेत.

त्यानंतर डॉ.पतंगराव कदम यांनी आपल्या खानापूर तालुक्यातील कडेगाव व पलूस येथे मुलींच्या शिक्षणाची आदर्श केंद्रे १९८५ साली सुरू केली. या केंद्रांमध्ये दरवर्षी शिक्षणाची नवनवीन दालने उघडून मुलींच्या जीवनोपयोगी शिक्षणाद्वारे स्वावलंबी जीवन घडवण्याचे उपयुक्त शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला. कडेगाव व पलूस याठिकाणी संस्थेने मुलींच्या प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाची सोय असलेल्या बहुउद्देशीय कन्या प्रशाला सुरू केल्या. कडेगाव येथे भारती विद्यापीठाने सप्टेंबर, १९८९ पासून

मुलींसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू केली. महाराष्ट्र राज्यामध्ये खाजगी शिक्षण संस्थेने मुलींसाठी सुरू केलेली ही पहिलीच औद्योगिक प्रशिक्षण संस्था होय. या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये मुलींना मेकॅनिक, रेडिओ आणि टी. व्ही. घरगुती वायरिंग, इस्त्री, गिझर, मिक्सरसारखी उपकरणे दुरुस्त करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच स्त्रियांच्या व पुरुषांच्या कपड्यांचे शिलाईकाम करण्याचेही प्रशिक्षण दिले जाते. महिलांना करता येण्यासारख्या भरतकाम व विणकामाच्या प्रशिक्षणाचीही सोय तेथे आहे. आधुनिक काळात ग्रामीण मुली व महिलांना नोकऱ्या मिळवण्यास उपयोगी पडावे म्हणून त्यांना मराठी टंकलेखन शिकवण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक मुलींचे भावी आयुष्य सुखावह होणार आहे.

याच महिला औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ड्रेस मेकिंगचे शिक्षण घेतलेली कडेगावची माजी विद्यार्थिनी चंदना नारायण शिंदे म्हणतात, ''डॉ.पतंगराव कदम यांनी कडेगावला मुलींसाठी खूप चांगली अशी मोफत व्यवसाय शिक्षणाची सोय केली आहे. ही सोय उपलब्ध नसती तर या जगात मी ताठ मानेने जगू शकले नसते. एका दृष्टिने साहेबांनी गोरगरिबांच्या घराघरांतून ज्ञानाचा दिवा लावला आहे. त्यामुळे आज या केंद्रामध्ये कितीतरी गरिबांच्या मुली शिक्षण घेत आहेत व साहेबांना दुवा देत आहेत''.

डॉ.पतंगरावांच्या धाडसी निर्णयानुसार भारती विद्यापीठाने कडेगाव येथे शिवाजी विद्यापीठास संलग्न असलेले श्रीमती बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय जून, १९९० पासून सुरू केले. कडेगाव येथील सर्व शाखांमध्ये शिक्षण घेणाऱ्या दूरच्या मुलींसाठी येथे वसतिगृह सुरू केले आहे. १९९३ पासून कडेगावसारख्या ग्रामीण भागातील ठिकाणी मुलींना महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाल्यामुळे अनेक मुली पदवीधर झाल्या. हे महाविद्यालय नसते तर ह्या मुली पदवीधर झाल्या नसत्या. मुलींच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास डॉ.पतंगरावांचा असतो, तो येथे साध्य झाला आहे. मुलींसाठी व्यायामशाळा, क्रीडांगण व पळण्यासाठी ४०० मीटरचा ट्रॅक आहे. बारावीपर्यंत ज्या मुली खेळ शिकल्या नव्हत्या, त्या पुढील तीन वर्षांत खेळाच्या सोयी असल्यामुळे आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रावीण्य मिळवू शकल्या. तसेच अखिल भारतीय

स्तरावरही जाऊ शकल्या. दरवर्षी शिवाजी विद्यापीठात या महाविद्यालयाची विद्यार्थिनी पहिली किंवा दुसरी आली आहे. कडेगाव हा तालुका झाला आहे. नामदार डॉ.पतंगरावांमुळेच सांस्कृतिक केंद्र म्हणूनही विकसित झाले आहे. या केंद्राचा विकास होण्यासाठी समाजसेवेच्या दृष्टिकोनातून ग्रामस्थांशी सतत संपर्क ठेवला जातो. या महाविद्यालयात पदवीधर झालेल्या मुलींना पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रोत्साहन व आर्थिक मदत भारती विद्यापीठाच्या वतीने दिली जाते. अशा ३००० हून अधिक मुलींना त्याचा लाभ झाला आहे.

अशा अनेक मुलींनी भारती विद्यापीठात शिक्षण घेऊन आपला उत्कर्ष करून घेतला आहे.

मुलींकरता सुरू केलेल्या या शिक्षण शाखांमध्ये भारती विद्यापीठाने शिक्षणाची संपूर्ण मोफत सोय केलेली आहे. शिक्षण, निवास, भोजन इत्यादीसाठी कोणतीही फी घेण्यात येत नाही. याशिवाय आसपासच्या गावांमधून एस.टी. बसने येणाऱ्या मुलींना बसचे पास भारती विद्यापीठाच्या वतीने देण्यात येतात. मुलींच्या शिक्षणाची एवढी मोठी आर्थिक जबाबदारी सामाजिक जाणिवेतून स्वीकारणारी महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतामधील ही पहिलीच शिक्षणसंस्था आहे आणि हे भारती विद्यापीठाचे एक भूषण झाले आहे.

पुणे येथे भारती विद्यापीठाने जून, १९८७ मध्ये एरंडवणे परिसरात व जून, १९९२ मध्ये धनकवडी परिसरात स्वतंत्र कन्या प्रशाला सुरू करून मुलींच्या शिक्षणाला अधिक उत्तेजन दिले आहे. याशिवाय भारत सरकारच्या महिला व बालकल्याण खात्याच्या अनुदानातून एरंडवणे व धनकवडी या दोन्ही शैक्षणिक परिसरात साठ लाख रुपये खर्च करून श्रमिक महिला वसतिगृहे बांधली आहेत. त्याचा उपयोग मुली व महिला करून घेत आहेत. तसेच महिलांच्या उच्च शिक्षणासाठी भारती विद्यापीठाने धनकवडी, पुणे येथे केवळ महिलांसाठीचे अभियांत्रिकी महाविद्यालय सन २००० साली सुरू केले आणि त्यांच्या संधीचे नवे दालन स्त्रियांसाठी खुले केले.

समाजामध्ये स्त्रिया सुविद्य, स्वावलंबी व आत्मनिर्भर बनल्याशिवाय समाजजीवन संपन्न व सुसंस्कृत होणार नाही. राष्ट्र उभारणीसाठीसुद्धा स्त्री शिक्षणाच्या कार्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यादृष्टिने नवीन पिढीतील महिला अबला न राहता, सबला व स्वावलंबी झाल्या पाहिजेत. यादृष्टिने डॉ. पतंगरावांचे आणि भारती विद्यापीठाचे कार्य वैशिष्ट्यपूर्ण आणि अपूर्व योगदानाचे आहे.

***

## ११. सहकाराची गंगा सोनहिरा खोऱ्यात

सांगली जिल्ह्यातील पूर्वीचा खानापूर सध्याचा कडेगाव तालुका हा कोरडवाहू शेतीवर अवलंबून असलेला भाग. बेभरवशाच्या पावसामुळे शेतकऱ्यांना खात्रीचे उत्पन्न कधीच मिळत नव्हते. पश्चिम महाराष्ट्रात इतर भागात सहकाराच्या माध्यमातून कृषिउद्योगाचे अनेक प्रकल्प उभे राहिले होते; पण सहकारी प्रकल्पापासून कडेगाव तालुक्यातील शेतकरी खूप दूर राहिले होते. अशावेळी आपल्या भागातील शेतकऱ्यांची दैन्यावस्था पाहणारे डॉ.पतंगराव कदम यांनी आपल्या शेतकरी बांधवांसाठी शेतीपूरक ग्रामीण व्यवसायाचा श्रीगणेशा केला. एस.टी. बोर्ड मेंबर म्हणून काम करीत असताना इतर ठिकाणी चालू असलेले सहकारी प्रकल्प पाहिल्यानंतर डॉ. पतंगराव कदम यांनी समविचारी शेतकऱ्यांना एकत्र आणून कडेगाव येथे १० जून, १९७१ रोजी खानापूर तालुका दूध उत्पादक कृषिपूरक उद्योग सहकारी संघ स्थापन केला.

आर्थिक व औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या कडेगाव तालुक्याची गरिबी दूर करून तालुक्याचा कायापालट करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून संघाचे कार्य सुरू झाले. सुरुवातीला संघाचे चेअरमन डॉ.पतंगराव कदम व मॅनेजर वसंतराव माने होते.

पाचशे लिटर दूध संकलन करण्यापासून सुरुवात झालेल्या या दूध संघास चांगला प्रतिसाद मिळाला व दुधाचे संकलन वाढत गेले. या प्रगतीचे वैशिष्ट्य असे होते, की संघास सरकारी दूध योजनेकडून मिळणारा दुधाचा भाव संघाकडून प्राथमिक सहकारी सोसायट्यांना देण्यात येत होता. प्राथमिक सोसायट्याही आपल्या सभासदांना सरकारी भाव देत.

दूध संघाचे काम दरवर्षी वाढत गेल्यामुळे दूध संकलनासाठी एक जीप व शासकीय केंद्रात दूध पोहोचवण्यासाठी तीन ट्रक घेण्यात आले. तसेच स्वतःचा चिलिंग प्लँटही उभारण्यात आला. संघाने ४५ एकर जागेत तो चिलिंग प्लँट व कार्यालयाची इमारत बांधली आहे. दुष्काळी परिस्थितीशी टक्कर देताना शेतकऱ्याच्या जीवनात 'संजीवनी' सारखे स्थान या दूध संघाने मिळवले. दुधासारखा कृषिपूरक व्यवसाय सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. या नवीन सहकारी वाटेचे मार्गदर्शक होते डॉ.पतंगराव कदम.

तासगाव तालुक्यात साखर कारखाना व्हावा असे प्रयत्न व मागणी शेतकरी करीत होते; पण त्यास यश आले नव्हते. भिलवडी-वांगी मतदार संघातील मतदारांना १९८५ सालच्या निवडणुकीच्यावेळी डॉ.पतंगराव कदम यांनी तासगाव सहकारी साखर कारखान्याचे स्वप्न साकार करून देण्याचे वचन दिले होते, व त्याप्रमाणे अनेक अडथळे पार करून देण्याचे वचन दिले होते, व त्याप्रमाणे अनेक अडथळे पार करुन तुरची फाटा येथे तासगाव तालुका सहकारी साखर कारखाना उभा करून देण्यात डॉ.पतंगराव कदम यांचा सिंहाचा वाटा आहे.

खानापूर तालुक्याच्या दुष्काळी पश्चिम भागाला वरदान ठरावा, शेतकऱ्यांना आर्थिक लाभ व्हावा या हेतूने डॉ. पतंगराव कदम यांनी दिनांक २६ जुलै, १९८७ रोजी समविचारी शेतकऱ्यांच्या सहभागाने कडेगाव येथे खानापूर तालुका सहकारी कुक्कुटपालन संस्था सुरू केली. १३ एकर क्षेत्रावर ही संस्था उभी आहे, शेतीला पूरक उद्योग लाभावा. स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात, विकासाच्या कार्यात ग्रामीण भागातील स्त्रियांचा सहभाग असावा, या हेतूने हा ५० लाख रूपये खर्चाचा प्रकल्प डॉ.पतंगराव कदम यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली सुरू झाला. दिल्लीच्या पोल्ट्री व्यवसायाच्या एन.सी.डी.सी. या वित्त संस्थेकडून ३७.६० लाख रूपये कर्ज घेतले व महाराष्ट्र शासनाने ७.०५ लाख रूपयांचे भागभांडवल दिले आहे. ५१७ सदस्यांचे एकूण ९ लाख ४५ हजार २०० रूपये भागभांडवल आहे.

एकूण ८ शेडमध्ये आज ३८ हजार ६४६ पक्षी असून रोजचे अंडी उत्पादन २७ हजार आहे. पक्ष्यांना लागणारे खाद्य संस्थेतच तयार केले जाते. या संस्थेत १५ कर्मचारी आणि ३५ मजूर काम करीत आहेत. विशेष म्हणजे १२ वर्षांपूर्वी सुरू झालेली ही संस्था सभासदांना डिव्हीडंड देत आहे. सहकार क्षेत्रात डॉ.पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था प्रगतिपथावर वाटचाल करीत आहे.

सहकारी दूध उत्पादन संघ आणि सहकारी कुक्कुटपालन संघ सुरू करण्यामागे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा आर्थिक विकास व्हावा अशी डॉ.पतंगराव कदम यांची भूमिका होती व ती साकारही झाली आहे.

दूधसंघ, कुक्कुटपालन संघ असे लाखो रुपये भांडवलाचे प्रकल्प उभे केल्यानंतर डॉ.पतंगराव कदम यांच्या खानापूर तालुक्यात कोट्यावधी रुपयांची भांडवल गुंतवणूक असणारे प्रकल्प उभे करण्याचा विचार सुरू झाला. त्या विचारातून कडेगाव येथे सागरेश्वर सहकारी सूतगिरणी उभी करण्यास आवश्यक ते भागभांडवल जमवले. नंतर शासनाकडे दिनांक १८ डिसेंबर, १९९० रोजी सूतगिरणीची नोंदणी झाली. आठव्या पंचवार्षिक योजनेखाली येणारी ही सूतगिरणी २५ हजार चात्यांची असून प्रकल्पखर्च ४० कोटी रुपये आहे. कडेगावच्या दक्षिणेस सागरेश्वर डोंगराच्या पायथ्याशी ४० एकर जमिनीवर या प्रकल्पाची उभारणी मोठ्या चिकाटीने व जिद्दीने डॉ.पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली झाली आहे.

या सहकारी सूतगिरणीचे संस्थापक डॉ.पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनामुळे इमारतीच्या संकल्पित खर्चापेक्षा १.५ कोटी रुपये इतक्या कमी खर्चात सूतगिरणीची भव्य देखणी इमारत उभी राहिली आहे. गिरणीसाठी लागणारी मशिनरी नामवंत कंपनीकडून घेतली आहे.

सहकारी सूतगिरणीतील मशीनरी चाचणीच्या शुभारंभप्रसंगी बोलताना डॉ.पतंगराव कदम म्हणाले, ''सागरेश्वर सहकारी सूतगिरणी उत्कृष्ट सूतगिरणी करून राज्यात एक आदर्श निर्माण करेल. सहकारी संस्थेतला भोगवाद मोडीत काढला पाहिजे. सहकारी संस्थांचा राजकारणासाठी वापर करण्याची प्रवृत्ती मोडीत काढली पाहिजे. युतीच्या सरकारने सहकारी संस्थांना सापत्नभावाची वागणूक देऊ नये.'' त्यानंतर मशिनरीचे बटन दाबून डॉ.पतंगराव कदम यांनी चाचणीचा प्रारंभ केला. या प्रसंगानंतर ते म्हणाले, '' मी गुणवत्तेशी कधीच तडजोड केली नाही. राज्यात अगदी कमी खर्चात उभारलेली सागरेश्वर ही पहिली सूतगिरणी आहे. या गिरणीला आजअखेर एका पैशाचेही कर्ज नाही. माझ्या कामाची कसल्याही प्रकारची चौकशी केल्यास त्यात कोणाला कसलाही दोष अगर गैरकृत्य दिसणार नाही याची मला खात्री आहे. ''

''भारती विद्यापीठ, भारती बँक, सागरेश्वर सूतगिरणी आणि सोनहिरा साखर कारखाना या सर्वांचेच काम गुणवत्तेच्या निकषावर सुरू आहे. मी माझ्या राजकारणासाठी या संस्थांचा वापर करत नाही. असेही डॉ.पतंगराव कदम यांनी सांगितले.

मध्यंतरीच्या काळात शासनाकडून मिळणाऱ्या भागभांडवलाची पूर्तता न झाल्यामुळे उच्च न्यायालयात जाऊन दाद मागावी लागली. त्यामध्ये डॉ.पतंगराव कदम यांनी याचिकेद्वारे यश मिळवले आणि शासनाकडून भागभांडवलाचा पहिला, दुसरा व तिसरा हप्ता मिळवून ११.८४ कोटी रूपये ३१ मार्च, १९९८ पर्यंत भांडून, झगडून मिळवले. त्यामुळेच दिनांक ०७ नोव्हेंबर, १९९७ रोजी सहा हजार चात्यांवर सूत-उत्पादन सुरु झाले.

सध्या उभारलेल्या १२ हजार ९६ चात्यांवर या सूतगिरणीच्या कार्यक्षेत्रातील ३१८ गरजू आणि होतकरू तरूण कामगार तीन पाळ्यांत काम करीत आहेत. १९९८-९९ साली ४५ हजार ९६० किलो सुताची निर्मिती झाली असून ४ लाख ३९ हजार ६०४ किलो सुताची विक्री होऊन २ कोटी ७४ लाख ४५ हजार ७९४ रूपये मिळाले आहेत. कडेगाव तालुका आणि तासगाव तालुक्यातील बेरोजगारांना रोजगार देणारी सहकारी संस्था म्हणून सागरेश्वर सहकारी सूतगिरणी या संस्थेचा उल्लेख केला जात आहे.

इतर ठिकाणच्या सहकारी सूतगिरण्या अडचणीत असताना, वस्त्रोद्योग क्षेत्रात केवळ पश्चिम महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण राज्यात असा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प अत्यंत नियोजनबद्ध रीतीने व काटकसरीने उभा राहिला आहे. याचे सर्व श्रेय डॉ.पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनालाच द्यावे लागेल.

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन योजनेचे शिल्पकार मुख्यमंत्री ना. वसंतदादा पाटील यांनी सांगली जिल्ह्याच्या पूर्वेकडील दुष्काळग्रस्त भागासाठी वरदान ठरणारी योजना नागेवाडी येथे ३ एप्रिल, १९८४ रोजी जाहीर केली. ताकारी उपसा जलसिंचन योजना मंजूर व्हावी यासाठी डॉ.पतंगराव कदम प्रथमपासूनच प्रयत्नशील होते. पुढे ना. डॉ. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना ही योजना बंद पाडण्याचे वाटत होते; पण डॉ.पतंगराव कदम यांनी कडेगाव येथे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांची परिषद ना. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या उपस्थितीत कडेगाव येथे आयोजित केली. हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीत डॉ. पतंगराव कदम यांनी ताकारी योजनेचे महत्त्वपटवून देऊन ही योजना रद्द होता कामा नये अशी आग्रही भूमिका घेतली. त्यावर ना. डॉ. शंकरराव चव्हाण यांनी ताकारी योजना खरोखरीच दुष्काळी भागास वरदान ठरत असेल तर ती रद्द केली जाणार नाही, असे स्पष्ट आश्वासन जाहीररीत्या दिले.

पुढे १९८५ च्या निवडणुकीत डॉ.पतंगराव कदम आमदार म्हणून निवडून आल्यावर विधानसभेत त्यांनी ताकारी योजनेच्या प्रश्नावर आग्रही भूमिका घेतली. तात्कालीन मुख्यमंत्री श्री. सुधाकर नाईक यांच्या मंत्रीमंडळात कदम जलसंधारण खात्याचे राज्यमंत्री झाल्यावर त्यांनी ताकारी योजनेची आर्थिक तरतूद ५ कोटीवरून ३९ कोटी रूपयांपर्यंत वाढवण्यास शासनाकडून मान्यता मिळवली. त्यानुसार ताकारी योजना गतिशील होऊन २६ कोटीची यंत्रसामुग्री खरेदी केली गेली व पाईपलाईनचे कामही पूर्ण झाले. १९९९ च्या निवडणुकीत डॉ.पतंगराव कदम जलसंधारण खात्याचे मंत्री झाल्यामुळे ताकारी योजना पूर्णपणे कार्यान्वित होऊन डॉ.पतंगराव कदम यांनी सामान्य शेतकऱ्यांच्या भल्यासाठी पाहिलेले हरितक्रांतीचे स्वप्न पुरे होणार आहे.

ताकारी योजनेमुळे ओलिताखाली येणाऱ्या कडेगाव तालुक्यातील २४ गावांच्या शेतामध्ये जो ऊस तयार होईल, त्याच्यावर आधारलेला कृषिउद्योग सहकारी साखर कारखाना सुरू करण्याचे स्वप्न दूरदृष्टिच्या डॉ.पतंगरावांनी पाहिले होते. यादृष्टिने तत्कालीन पलूस तालुक्यातील १४ गावे आणि खानापूर तालुक्यातील ४६ गावे या कार्यक्षेत्रासाठी सोनहिरा सहकारी साखर कारखाना उभारण्याचे योजले. त्याचबरोबर कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील २४ गावांचाही समावेश करण्यास मान्यता घेतली. जरूर ते भागभांडवल शेतकऱ्यांनी डॉ.पतंगराव कदम यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन उभे केल्यानंतर केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठवला.

हा सोनहिरा सहकारी साखर कारखाना आठव्या पंचवार्षिक योजनेतील १७ साखर कारखान्यांना केंद्र शासनाने मंजुरी दिल्यापैकी एक होता. केंद्र शासनाने सोनहिरा साखर कारखान्यास मंजुरी दिल्यास भागभांडवल व बँकेची हमी देण्यास तयार असल्याचे त्यावेळच्या महाराष्ट्र शासनाने कळवले होते. त्यामुळे केंद्र शासनाकडून दिनांक २२ मार्च, १९९४ रोजी सोनहिरा साखर कारखान्यास औद्योगिक परवाना मिळाला आणि साखर आयुक्त, पुणे यांच्याकडे या सहकारी साखर कारखान्याची दिनांक २५ मार्च, १९९४ रोजी नोंदणी झाली. नोंदणीपत्र मिळाल्यामुळे कडेगाव तालुक्यातील सभासद भागधारकांनी आनंदोत्सव साजरा केला. दुष्काळाची छाया हटवून खानापूर

तालुक्याच्या पश्चिम भागासाठी विकास, समृद्धी घडवून आणणारा सोनहिरा सहकारी कारखाना डॉ.पतंगराव कदम यांच्या परिश्रमामुळे उभा राहण्याचे त्यांचे स्वप्न साकार होत होते.

चाळीस कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे कडेगाव व पलूस तालुक्यातील ६० गावांतील सभासदांना आर्थिक विकासाचा लाभ होणार हे निश्चित झाले. कडेगाव तालुक्यावरचा 'दुष्काळी' हा शिक्का पुसून विकासाची नवी पहाट या प्रकल्पाद्वारे डॉ.पतंगराव कदम यांच्या प्रयत्नांमुळे उगवली.

सोनहिरा साखर कारखान्यास मंजुरी मिळवल्याबद्दल कारखाना परिसराच्या वांगी, कडेगाव, तडसर, चिंचणी, कुंभारगाव, मोहिते वडगाव इत्यादी ठिकाणी दि. २७ मार्च, १९९४ रोजी डॉ.पतंगराव कदम यांचा सत्कार आयोजित केला होता. कारखाना मंजूर झाल्यामुळे या परिसरात अनेक ठिकाणी शोभिवंत कमानी, विजेची रोषणाई, बँड पथके, लेझीम पथके इत्यादी प्रकारांनी प्रत्येक गाव चैतन्याने व उत्साहाने दुमदुमून गेले होते.

''आज देशात बेकारीची समस्या राक्षसासारखी सर्वांच्या पुढे उभी आहे. कोणी कितीही मोठ्या पदावर गेला तरी तो ही समस्या सोडवू शकणार नाही. यासाठी सर्वत्र छोट्यामोठ्या उद्योगांचे जाळे निर्माण केले पाहिजे. एका साखर कारखान्यातून अनेक उद्योग निर्माण होतात, हे आपणाला दाखवून द्यावयाचे आहे. यशवंत सहकारी साखर कारखाना, आपला सोनहिरा साखर कारखाना, कृष्णा सहकारी कारखाना, सह्याद्री सहकारी साखर कारखाना या कारखान्यांच्या परस्पर सहकार्यामुळे आपणाला उद्योग निर्माण करता येतील''.

सांगली येथील पत्रकार परिषदेत डॉ.पतंगराव कदम यांनी सांगितले, की राज्य शासनाने एकास चार या प्रमाणात भागभांडवल द्यावे. तसेच बँक हमी द्यावी असा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक २९ ऑगस्ट, १९९६ रोजी दिला व त्याची दिनांक ३१ डिसेंबर, १९९६ पूर्वी कार्यवाही करावी असे बजावले. या निकालान्वये शासनाकडून १२ कोटी रुपये मिळावयास पाहिजे होते. कारखान्याने २ कोटी रुपये जमवले होते. शासन भागभांडवल देण्यास टाळाटाळ करीत होते. त्यामुळे न्यायालयात जावे लागले; परंतु वरील निकालामुळे राज्यातील सर्व नियोजित कारखान्यांना लाभ झाला, न्याय मिळाला.

शासनाच्या मंजुरीने वालचंदनगर इंडस्ट्रीज पुणे यांच्याबरोबर साखर कारखान्यास मशीनरी पुरवण्याबाबत करार केल्यानंतर ॲडव्हान्स म्हणून १ कोटी १६ लाख रूपयांचा पहिला हप्ता दिल्यावर मशीनरी उभारण्याचे काम वेगाने सुरू केले.

अनेक अडथळे पार करून दिनांक ३१ मार्च, १९९६ रोजी-गुढीपाडव्याच्या दिवशी कारखान्याच्या कार्यालयाचे उद्‌घाटन झाले. गोडाऊनचे भमिपूजन झाले. वीज मंडळाकडून वीज मिळाली. चिंचणी तलावातून पाणी घेण्यास मंजुरी मिळाली. कारखान्याच्या जवळच असलेल्या एका विहीरीमुळे पाण्याची तात्पुरती सोय झाली. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आणि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने अर्थसाहाय्याचे आश्वासन दिल्यामुळे कारखान्याच्या उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आले.

तेवढ्यात सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या. डॉ.पतंगराव कदम भिलवडी-वांगी मतदार संघातून विक्रमी मतांनी विजयी झाले. आमदार आणि सोनहिरा साखर कारखान्याचे अध्यक्ष म्हणून सोनहिरा साखर कारखान्याच्या चौथ्या वार्षिक सभेत डॉ.पतंगराव कदम यांनी आपले स्पष्ट आणि परखड विचार मांडले. सहकार क्षेत्रातील व मतदार संघातील कार्यकर्त्यांना प्रबोधनात्मक विचार सुनावले. ते म्हणाले, की 'नेते आणि जनता यांच्यात कार्यकर्त्यांनी दलाली सुरु केल्यामुळे आम्ही जनतेपासून दूर जाऊ लागलो आहोत. अशा कर्तृत्वहीन, परावलंबी व अकार्यक्षम कार्यकर्त्यांना सुधारण्याची वेळ आली आहे. कार्यकर्त्यांना खूश ठेवण्यासाठी संस्थांचा पांजरपोळ बनवण्याऐवजी हुशार आणि होतकरू तरूणांना संधी देणे योग्य आहे. लाळघोटे, अप्रामाणिक आणि सतत स्वार्थाने पछाडलेले कार्यकर्ते कोणाही नेत्याला मोठे करू शकत नाहीत. कार्यक्षम आणि स्वतःला निरपेक्षपणे समाजकार्यात झोकून देणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी निर्माण होणे आवश्यक आहे. सामान्य जनता खूप चांगली असते; पण मधले दलाल नेत्यापर्यंत त्यांना पोहोचू देत नाहीत. येथून पुढे असे होऊ दिले जाणार नाही'.

''नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांत प्रवेश यासाठी पुण्याला सतत वाऱ्या करण्यापेक्षा आपआपल्या गावात काही चांगले काम करा. लोकांच्या अडचणी

समजून घ्या. त्या सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करा. फुकट मिळवण्याची प्रवृत्ती सोडून द्या. यापुढच्या काळात अशा गोष्टी खपवून घेतल्या जाणार नाहीत. लोकांना चांगले काय आणि वाईट काय, वाईट कार्य कोणते आणि चांगले कार्य कोणते हे कार्यकर्त्यांनी समजावून सांगितले पाहिजे. अफवा, खोटा प्रचार यापासून जनतेला सावध राहायला शिकवले पाहिजे. हे होत नाही याची मला खंत वाटते. राज्य परिवहन महामंडळाचा सदस्य असताना मी आठ हजाराहून अधिक तरूणांना एक पैसाही न घेता नोकऱ्या दिल्या. भारती विद्यापीठात दहा हजाराहून अधिक तरूणांना नोकरीस लावले. त्यांच्याकडूनही मी कधी एक पैसा किंवा चहाचा कप मागितला नाही; पण माझ्या या कामाचे चीज होत नाही; कारण माझे हे निरपेक्ष वृत्तीने केलेले काम कार्यकर्ते नव्या पिढीपर्यंत पोहोचवीत नाहीत''.

समाजसेवेच्या कोणत्याही क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उपयोगी पडतील असे विचार मार्गदर्शक डॉ.पतंगराव कदम यांनी स्पष्ट दिले होते. पुढे नोव्हेंबर, १९९९ मध्ये आमदार डॉ.पतंगराव कदम यांची महाराष्ट्र शासनात उद्योग व जलसंधारण मंत्री म्हणून नियुक्ती झाल्यावर त्यांनी सोनहिरा सहकारी साखर कारखान्याची अध्यक्षपदाची जबाबदारी सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मोहनराव कदम यांच्याकडे सोपवली.

डॉ.पतंगराव कदम यांच्या कार्यपद्धतीबद्दल विश्वास असल्यामुळेच कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ६० गावांतील १६ हजार ०५८ सभासदांनी ४ कोटी ३२ लाख ९९ हजार भागभांडवल जमा केले. तसेच कारखान्याच्या हितचिंतकांनी ५ कोटी ५४ लाख रूपयांच्या ठेवी जमा केल्या आहेत. सहकार क्षेत्रातील प्रकल्पास अशा तऱ्हेचा अपूर्व प्रतिसाद डॉ.पतंगराव कदम यांनी आपल्या कर्तृत्वावर मिळवला आहे.

दैनंदिन २५ हजार टन गाळप क्षमता असलेल्या कारखान्यास शासनाने निश्चित केलेल्या स्टाफ पॅटर्नपेक्षा कमी कर्मचारी आणि अधिकारी घेऊन कारखाना काटकसरीने सुरू केला. पहिला चाचणी गळीत हंगाम ३१ डिसेंबर, १९९९ रोजी सुरू झाला आणि दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी प्रत्यक्ष साखर उत्पादनाला सुरूवात झाली. डॉ.पतंगराव कदम यांनी अनेक वर्षांपूर्वी पाहिलेले स्वप्न अखेर साकार झाले.

सोनहिरा साखर कारखान्यात तयार झालेली साखर कार्यक्षेत्रातील सर्व गावांच्या ग्रामदेवतांना व ग्रामस्थांना वाटण्यात आली आणि परिसरातील सर्वांची तोंडे गोड झाली. दीर्घ परिश्रमानंतर मिळालेले समाधान डॉ.पतंगराव कदम, साखर कारखान्याचे अध्यक्ष, संचालक व सभासदांना मिळाल्याचा आनंद पाहावयास मिळाला.

याशिवाय सामान्य शेतकऱ्याची असणारी आर्थिक नड लक्षात घेऊन डॉ. पतंगराव कदम यांनी गावोगावी सहकारी पतसंस्थांचे जाळे उभारले. एकेकाळी सावकारी कर्जात भूमिहीन होणारा कडेगाव व पलूस तालुक्यातील शेतकरी आज या पतसंस्थेच्या आधारावर आर्थिक विकासाची वाटचाल करीत आहे. घोगाव, पलूस, वांगी, शिवणी, नेर्ली, सोहोली, चिंचणी, भिलवडी, कडेगाव, येडे या गावांच्या पतपेढ्या उदाहरणादाखल पुरेशा आहेत.

डॉ.पतंगरावांच्या अकाली निधनानंतर २०१८ मध्ये सोनहिरा कारखान्याचे 'डॉ.पतंगराव कदम सोनहिरा साखर कारखाना' असे नामकरण केले आहे. सदर कारखाना भारतातील उत्कृष्ट साखर कारखाना म्हणून अनेक राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार प्राप्त झाले आहेत. हेच डॉ. पतंगरावांचे स्वप्न साकार झाले आहे.

❊❊❊



डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखाना, लि.
मोहनराव कदमनगर, वांगी.




डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली

## १२. सहकारमहर्षीच्या सांगली जिल्ह्यात शिक्षणमहर्षी

पुण्याहून सांगलीस जाताना सांगली शहराच्या अलीकडे, कृष्णा नदीच्या काठावरील सांगलवाडीत हमरस्त्याच्या उजवीकरडे एक चार मजली देखणी इमारत आपले लक्ष वेधून घेते. अमेरिकेच्या अध्यक्षांचे निवासस्थान 'व्हाईट हाऊस'ची आठवण करून देणारी ही भव्य वास्तू म्हणजे भारती विद्यापीठाचे 'डॉ.पतंगराव कदम कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, सांगली' होय.

डॉ.पतंगराव कदम यांनी आपल्या शैक्षणिक संकुलातील विद्याशाखांचा विस्तार महाराष्ट्रात जेथे जेथे केला, तेथील शहरामध्ये भव्य वास्तू उभारून त्या शहराचे वैभव वाढवले. या त्यांच्या भूमिकेतून या महाविद्यालयाची उभारणी करण्यामागील या महाविद्यालयाचा इतिहास रोमहर्षक असाच आहे.

डॉ.पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यात सोनसळ येथे झाला. भारती विद्यापीठाच्या शाखा पुणे शहरात सुरू केल्यानंतर सांगली शहरातही शैक्षणिक कार्य करण्याची तळमळ स्वस्थ बसू देत नव्हती. अशा काळात सांगली शहरात माधवनगर येथे नवभारत शिक्षणसंस्थेच्या वतीने १९६८ पासून शांतिनिकेतन सांगली कॉलेज सुरू होते. या शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष सहकारमहर्षी वसंतदादा पाटील होते. प्राचार्य पी.बी.पाटील प्रत्यक्ष कामकाज पाहत होते. वसंतदादांनी पी.बी.पाटील यांना राजकारणात संधी दिल्यामुळे नाराज झालेल्या हितशत्रूंनी सार्वजनिक भांडण विकोपास नेले आणि शेवटी शांतिनिकेतन कॉलेज बंद पडले. कॉलेज बंद करताना शासनाची परवानगी घेतली नव्हती. या आधारावर सेवकांनी हायकोर्टात दाद मागितली व हायकोर्टाचा निकाल सेवकांच्या बाजूने लागला. अशा बिकट परिस्थितीत डॉ.पतंगराव कदम यांच्या शिक्षणक्षेत्रातील कार्याची शासनाने दखल घेतली आणि महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री शिवाजीराव निलंगेकर यांच्या सूचनेवरून भारती विद्यापीठाला १९८५ साली शासनाच्या आदेशानुसार अनुदान तत्त्वावर चालविण्यास परवानगी मिळाली. डॉ.पतंगराव कदम यांच्या प्रयत्नामुळे स्पेशल केस म्हणून शासनाकडून अनुदान मिळाले व मूळच्या सर्व टिचिंग-नॉन टिचिंग स्टाफला सामावून घेऊन शिवाजी विद्यापीठाचे नवीन संलग्नीकरण करून व बंद पडलेल्या कॉलेजचे सर्व साहित्य व इमारत शिवाय भारती विद्यापीठाचे

सिनिअर कॉलेज (आर्टस, सायन्स, कॉमर्स) सांगलीतील स्वरूप थिएटरच्या जवळील सर्वोदय हायस्कूलच्या इमारतीमध्ये सप्टेंबर १९८५ पासून हे सिनिअर कॉलेज सुरू करण्यात आले. अनुभवी प्राचार्य एम्.एस्.सगरे यांची पुणे येथून सांगली येथे बदली केली. नंतर मार्केटयार्डात सिनिअर कॉलेज १९८७ पासून स्थलांतरित केले. बंद झालेल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना अन्य कॉलेजकडून बोलावून प्रवेश दिला. आर्टस्, सायन्स, कॉमर्सचे एफ्. वाय्., एस्.वाय्., टी. वाय् वर्ग सुरू केले.

सुरुवातीला विघ्नसंतोषी लोकांनी शासनाकडे तक्रारी पाठवल्या होत्या. त्यामुळे सुरुवातीचा कालखंड त्रासाचा होता. मुंबईचे डायरेक्टर ऑफ हायर एज्युकेशन, श्री. दुबे साहेब सांगलीस येऊन त्यांनी कॉलेजच्या व्यवस्थापनाबद्दल चौकशी केली. सर्व शिक्षकेत्तर सेवकांना सामावून घेता येत नव्हते असा अहवाल केला. त्यानंतर डॉ.पतंगराव कदम व प्राचार्य सगरे मुंबईस जाऊन त्यांनी पूर्वीच्या सर्व सेवकांना सेवेत घेण्यास मंजुरी मिळवली. नोकरीची शाश्वती मिळाल्याने कर्मचारी-सेवक उत्साहाने काम करू लागले. पूर्वीच्या कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, या भूमिकेतून डॉ. पतंगराव कदम यांनी हे धाडसाचे काम केले.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य के. भोगीशयन (कॉलेजच्या स्नेहसंम्मेलन प्रसंगी) डॉ. पतंगरावांच्या सत्कार्याबद्दल म्हणतात, ''सर्वनाशातून, राखेतून नवीन जन्म घेणारा फिनिक्स हा एकच पक्षी, एकच सजीव या पृथ्वीच्या पाठीवर आहे. सांगलीचे हे भारती विद्यापीठाचे महाविद्यालय या फिनिक्स पक्ष्यासारखे आहे. जुन्या महाविद्यालयाच्या भग्नावस्थेतून हे नवीन महाविद्यालय उभे राहिले आहे. दैवी शक्ती, चैतन्याचा स्पर्श लाभला, तरच हा चमत्कार घडू शकतो. एक आश्चर्यजनक सत्य, अघटित आपण आज पाहत आहोत, आणि त्याचे शिल्पकार आहेत डॉ.पतंगराव कदम, अशक्य ते शक्य करुन दाखवणारे, साक्षात चैतन्यमूर्ती असणाऱ्या डॉ.पतंगराव कदम यांचे मी मनापासून आभार मानतो.'' ही संस्था टिकून राहावी यासाठी काय करावे, या संस्थेची जबाबदारी पेलणारे नेतृत्व लाभेल का, समर्थ नेतृत्वाच्या अभावी शेकडो विद्यार्थी पोरके तर होणार नाहीत ना, या प्रश्नांनी मी बैचेन होत होतो, अशा वेळी परिस्थितीचे हे आव्हान डॉ.पतंगराव कदम यांनी स्वीकारले. मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.''

आव्हानात्मक कार्य करणे हे डॉ.पतंगराव कदम यांचे वैशिष्ट्य. भारती विद्यापीठाच्या छत्राखाली सांगली कॉलेजची धीम्या गतीने, पण दमदारपणे वाटचाल सुरू झाली. या कॉलेजसाठी मार्केटयार्डमध्ये स्वातंत्र्यसैनिक जाधव यांची मोठी जागा जुलै १९८७ मध्ये काही काळासाठी भाड्याने घेतली. त्यासाठी दरमहा १४ हजार ४०० रूपये भाडे ठरले. त्याकरिता शासनाने ७५ टक्के अनुदान मंजूर केले. या कॉलेजला १९८८ साली माननीय वसंतदादा पाटील यांनी भेट दिली होती व मुलांच्या सोयी-गैरसोयीची चौकशी केली होती. मार्केटयार्डमधील भाड्याच्या जागेत सांगली कॉलेज १९८७ ते १९९७ पर्यंत होते.

या कॉलेजचे वैशिष्ट्य म्हणजे येथे कमी गुणवत्ता असलेल्या मुलांना प्रवेश देऊन त्यांची गुणवत्ता वाढवण्याचे प्रयत्न केले जातात. प्राध्यापक मंडळींनी पैसे जमवून गरीब मुलांना बसचे पास देणे यासारखी आर्थिक मदतही केली आहे.

सांगलवाडीच्या पेट्रोलपंपाचे मालक श्री. पवार यांची पाच एकर जागा चार लाख रूपये एकर दराने घेण्याचे ठरले. दोन लाख रूपये ॲडव्हान्स दिले, परंतु अर्बन लँड सिलिंगमध्ये जागा गेल्याने पाच एकरापैकी दोन एकर जागा शासनाकडून मिळाली. १९९७ मार्चपर्यंत सांगलवाडीतील जागेवर १ कोटी ३४ लाख रूपये खर्च करून प्रशस्त तीन मजले बांधले व कॉलेज एप्रिल १९९७ मध्ये नव्या जागेत स्थलांतरित झाले. सन १९९८-९९ साली या महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान मंडळाकडून कायमस्वरूपी संलग्नीकरण प्राप्त झाले आहे. प्राचार्य डॉ. म. शि. सगरे यांच्या मार्गदर्शनाखाली कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील मुलांना उच्च प्रतीचे शिक्षण मिळू लागले. तर काही विद्यार्थ्यांनी प्राविण्यही मिळवले आहे.

स्वामी विवेकानंद संस्थेने त्यांच्या पेण (कुलाबा जिल्हा) येथील महाविद्यालयाला डॉ.पतंगराव कदम यांचे नाव दिले होते. त्यामुळे भारती विद्यापीठाच्या कार्यकारिणीने डॉ.पतंगराव कदम यांचे नाव सांगलीच्या कॉलेजला देण्याचा ठराव पास केला होता. त्यास डॉ. पतंगराव कदम यांनी विरोध केला, पण प्राचार्य सगरेसरांच्या आग्रहामुळे डिसेंबर १९९८ मध्ये

त्यांनी संमती दिली. त्याकरता सांगली कॉलेजच्या सर्व सेवकांनी ७५ हजार रूपये जमा केले होते. त्यापैकी डॉ. पतंगराव कदम यांना, त्यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त ५४ हजार रूपयांची थैली व चांदीची समई देण्याचे ठरले. डॉ.पतंगराव कदम यांनी ५४ व्या वाढदिवसाच्या निमित्ताने कॉलेजला भेट देऊन सेवकांनी जमवलेल्या रकमेत ५४ हजार रूपयांची भर घालून १ लाख ०८ हजार रूपयांची कायम ठेव ठेवून येणाऱ्या व्याजातून गरजू व गरीब विद्यार्थ्यांकरिता स्कॉलरशीप सुरू केली.

थोर पुरूषांचा आदर करणारी, त्यांचा आदर्श जपणारी आपली संस्कृती आहे. महापुरूषांच्या नावात जादू असते, शक्ती असते. अशी नावे प्रतीकात्मक ठरतात. स्फूर्तिदायी वाटतात. डॉ.पतंगराव कदम यांच्या नावातच अशी किमया आहे; म्हणून दि. ८ जानेवारी १९९९ रोजी एका भव्य समारंभात थोर विचारवंत यशवंतराव मोहिते, प्राचार्य शिवाजीराव भोसले, डॉ. उत्तमराव भोईटे, डॉ. शंकरराव खरात यांच्या उपस्थितीत सांगली येथील कॉलेजचे 'डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय' असे नामकरण झाले. या कॉलेजचे निकाल ९० ते १०० टक्के लागतात.

सांगली शहरात प्रवेश केल्यानंतर मध्यवर्ती चौकात भारती विद्यापीठाची सात मजली भव्य वास्तू डॉ.पतंगराव कदम यांच्या अथक परिश्रमांतून व प्रयत्नांमधून उभी राहिली असल्याचे दिसते. भव्यदिव्य स्वप्ने साकार करण्याचा त्यांच्यावर असलेल्या नियतीच्या वरदहस्तामुळेच शक्य झाले आहे असे वाटते.

सांगली येथील स.नं.९७० ही चावडीची जागा १९८३ साली शासनाने शैक्षणिक उपक्रमासाठी दिली, पण शासनाच्या या आदेशाविरूद्ध काही मंडळींनी सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रंगनाथ मिश्र व न्यायमूर्ती एम्.एस्. धरू यांच्या खंडपीठाने १४ डिसेंबर, १९८७ रोजी हा दावा फेटाळला, व शासनाने भारती विद्यापीठास दिलेली चावडीची जागा कायम केली. सामान्य जनतेसाठी शैक्षणिक कार्य करणाऱ्या भारती विद्यापीठ या विश्वस्त संस्थेस ही जागा देणे उचित असल्याचे न्यायमूर्तींनी आपल्या निकालपत्रात म्हटले होते.

विघ्नसंतोषींनी निर्माण केलेला हा अडसर दूर झाल्यावर डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठास मिळालेल्या २८ हजार चौरस फूट जागेवर सांगली शहरात सर्वांत उंच अशी भव्य सात मजली वास्तू दोन कोटी रुपयांच्यावर खर्च करून उभी केली आहे. या इमारतीचे भूमिपूजन व पायाभरणी समारंभ दि. २७ मार्च, १९९० रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर, भारती विद्यापीठाचे अध्यक्ष यशवंतराव मोहिते यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते म्हणाले, की ''भारती विद्यापीठ ही एक जनकल्याणकारी व सामान्य माणसांसाठी कार्यरत असणारी संस्था आहे. सांगली, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्याच्या खेड्यांतील मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या गुणवत्तेला पैलू पाडणारी व त्यांना एक सुजाण नागरीक बनवणारी सार्वजनिक संस्था आहे.'' त्या प्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना आमदार डॉ. पतंगराव कदम म्हणाले, ''गेल्या पंचवीस वर्षांत सर्वांच्या सदिच्छेने, सहकार्याने भारती विद्यापीठासारखी आधुनिक व उत्तुंग शिक्षणसंस्था मी उभारली आहे. सांगलीत उभी होत असलेली ही इमारत सांगली, सातारा, कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतील सर्वांत उंच इमारत असेल. ही इमारत सांगली जिल्ह्याच्या विकासाचे केंद्र असेल. सांगलीची ही चावडी सर्वांसाठी विकास केंद्र होत आहे.''

यावेळी महाराष्ट्र शासनाचे उपसचिव आणि सांगली जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी रत्नाकर बाघ यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. त्यावेळी रत्नाकर बाघ म्हणाले,''चावडीची मध्यवर्ती जागा भारती विद्यापीठास देत असताना शैक्षणिक उद्देश हे प्रमुख कारण मानले गेले आहे. कोट्यावधी रूपयांच्या इमारतींपेक्षा या इमारतीतून बाहेर पडणारे उच्चशिक्षित तरुण हे अधिक मौल्यवान आहेत.'' या इमारतीचा बांधकामाचा आराखडा कोल्हापूरचे आर्किटेक्ट बेरी यांनी केला होता. त्या इमारतीत भारती बझार, भारती सहकारी बँक, भारती विद्यापीठाचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रूरल डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन व न्यू लॉ कॉलेज अशा शाखा कार्यरत आहेत.

वसंतदादा पाटील यांच्या पुढाकाराने सांगली जिल्ह्यात व सांगली, मिरज माधवनगरच्या परिसरात सहकारी साखर कारखाने, औद्योगिक उत्पादन संस्था, सहकारी बँका, मार्केटयार्ड यासारख्या संस्था उभारल्या गेल्या. अशा संस्थांना भासणारी कुशल व तज्ज्ञ व्यवस्थापकांची गरज पूर्ण करण्याच्या उद्देशाने

आणि या भागातील पदवीधर तरूणांना व्यवस्थापनशास्त्र या विषयाच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याच्या सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाची इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रूरल डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशनची शाखा सांगलीमध्ये १९९४-९५ साली सुरु केली.

सांगली शहरातील व आसपासच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची कायदे शिक्षणाची सोय व्हावी; म्हणून न्यू लॉ कॉलेज, सांगली ही भारती विद्यापीठाची शाखा १९९७ साली सुरु करण्यात आली आहे व तिला कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाची मान्यता आहे. त्यापूर्वी या विधी महाविद्यालयाच्या संलग्नीकरणाबाबत मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल भारती विद्यापीठाच्या बाजूने लागला होता. तसेच सांगली मिरज रोडवर मेडीकल कॉलेज, डेन्टल कॉलेज, नर्सिंग कॉलेज व फिजीओथेरपी कॉलेज या वैद्यकीय शाखा ४० एकर परिसरात गुणवत्तेनुसार कार्यरत आहेत.

डॉ.पतंगराव कदम यांनी सांगली शहरात भारती विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक शाखा सुरु करून सांगली शहराच्या शैक्षणिक क्षेत्रात एक वेगळे प्रतिष्ठेचे स्थान मिळवले आहे; पण सांगली जिल्ह्याच्या ग्रामीण; भागातील विद्यार्थ्यांना ते विसरले नाहीत. खानापूर तालुक्यात कडेगाव येथे बहुउद्देशीय कन्या महाविद्यालय, मुलींचे आय्.टी.आय्. आणि पलूस तालुक्यात पलूस येथे कन्या प्रशाला सुरु केली आहे. या महिला शिक्षण शाखांच्या कार्याची माहिती एका वेगळ्या प्रकरणात (प्रकरण १४) दिली आहे.

तसेच ग्रामीण भागात माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून डॉ. पतंगराव कदम यांनी २२ जून, १९९२ रोजी अंबक येथे प्रशाला सुरु केली. त्याकरता भारती विद्यापीठाने उत्तम फर्निचर, शालेय साहित्य पुरवले आहे. या प्रशालेस डॉ. पतंगराव कदम यांच्या वडिलांचे नाव दिले आहे. 'श्रीपतराव (तात्या) कदम प्रशाला' असे नामकरण करण्यात आले आहे.

तासगाव तालुका सहकारी साखर कारखाना, तुरची फाटा येथे सुरु झाल्यावर कारखाना वसाहतीमधील व परिसरातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून तासगाव सहकारी साखर कारखान्याने शाळेकरिता बांधलेल्या

इमारतीमध्ये भारती विद्यापीठाने प्रशाला सुरू केली होती; पण परिसरातील विद्यार्थ्यांना भारती विद्यापीठाच्या स्वत:च्या इमारतीमध्ये तुरची फाटा प्रशाला व प्राथमिक शाळा दर्जेदार शिक्षण देत आहे.

खानापूर तालुक्यातील पश्चिम भागातील शिवाजीनगर, विहापूर, रेणुसेवाडी व परिसरातील, वाड्यांमधील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने १७ सप्टेंबर, १९९२ रोजी विहापूर येथे माध्यमिक प्रशाला सुरू केली. कसदार शिक्षणाचे केंद्र म्हणून प्रतिष्ठा मिळवण्याच्या दृष्टिने येथे अनेक विधायक शैक्षणिक उपक्रम पार पाडले आहेत.

खानापूर तालुक्यातील अमरापूर, चिखली परिसरातील मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून भारती विद्यापीठाने अमरापूर, सोहोली व कोतीज ही माध्यमिक विद्यालये २४ फेब्रुवारी, १९९३ पासून सुरू केली.

सांगली जिल्ह्याचे दिवंगत नेते पद्मभूषण वसंतदादा पाटील यांच्या नावाचे माध्यमिक विद्यालय, खंडोबाची वाडी येथे भारती विद्यापीठाने सुरू करून भारती विद्यापीठाच्या वतीने डॉ. पतंगराव कदम यांनी जिल्ह्याच्या नेत्याबद्दल आदर प्रकट केला आहे.

डॉ.पतंगराव कदम यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भोगीशयन म्हणाले,''सध्या उत्तम निकालाचे प्रस्थ सर्वत्र माजले आहे; पण सर्वसामान्य मुलांचे काय ! ऐंशी टक्के अथवा अधिक गुण मिळालेल्या मुलांना प्रवेश देऊन उत्तम निकाल दाखवण्याचेही प्रस्थ आजकाल फार वाढले आहे. ही गोष्ट विशेष कौतुकाची नाही. ग्रामीण भागातून येणाऱ्या सर्वसामान्य कुवतीच्या विद्यार्थ्यांना अशा संस्थेत प्रवेश मिळत नाही. सर्वत्र विद्यार्थी इतकी हुशारी दाखवू शकतील का? पन्नास टक्क्यांच्या आसपासच्या विद्यार्थ्यांनी कुठे शिक्षण घ्यायचे ? ज्या समाजाला, कुटुंबाला यापूर्वी शिक्षणाचा वाराही लागला नाही, तेथील विद्यार्थ्यांना मग शिक्षणच मिळणार नाही. अशा कुटुंबातील मुलांकडून आपण ऐंशी टक्के गुणाची अपेक्षा करू शकतो का? काळाची गरज ओळखून सर्वसामान्यांकरिता शिक्षणाचे दरवाजे उघडे केले पाहिजेत. हे कार्य डॉ.पतंगराव कदम यांनी केले आहे. उच्च शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, तंत्रशिक्षण, वकील व्यवसाय शिक्षण, अभियांत्रिकी शिक्षण व मेडीकल शिक्षण अशा अनेक प्रकारच्या शिक्षणाचा लाभ डॉ.पतंगराव कदम यांनीच सर्वसामान्य जनतेला करून दिला.''

***

# १३. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती

भारती विद्यापीठ स्थापन करताना १९६४ साली डॉ. पतंगराव कदम यांनी 'आम्हाला आमचे विद्यापीठ (युनिव्हर्सिटी) निर्माण करावयाचे आहे व आमच्या पदव्या द्यावयाच्या आहेत' हे स्वप्न पाहिले होते - हा संकल्प सोडला होता. त्याची परिपूर्ती करण्यासाठी अविरत कष्ट घेतल्यामुळे जिद्दीच्या व चिकाटीच्या प्रयत्नामुळे १९९६ साली डॉ. पतंगरावांचे स्वप्न साकार झाले. ३२ वर्षांच्या अखंड परिश्रमामुळे व आपल्या सहकारी कार्यकर्त्यांमुळे भारती विद्यापीठाचा डॉ. पतंगरावांनी गतिमान विकास केला. विविध शाखांमध्ये दर्जेदार शैक्षणिक उपक्रम, संशोधन, समृद्ध पायाभूत सुविधांचे संयोजन व सामाजिक बांधिलकीचे ध्येयधोरण यांना समाजाच्या आणि देशाच्या सर्व थरांमध्ये लोकमान्यता व राजमान्यता मिळवली. ही उत्तम गुणवत्तेची पार्श्वभूमी लक्षात घेऊन भारती विद्यापीठास 'अभिमत विद्यापीठ' म्हणून दर्जा प्राप्त करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, भारत सरकार व महाराष्ट्र सरकार यांच्याकडे डॉ.पतंगराव कदम व संस्थेचे पदाधिकारी यांच्या समवेत या समितीने चर्चा केली आणि आपला अहवाल विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविला.

समितीच्या अहवालावर विचार करून विद्यापीठ अनुदान आयोगाने संस्थेच्या प्रस्तावासंबंधी आपला अभिप्राय भारत सरकारकडे पाठवला. त्यानुसार भारत सरकारच्या मानव संसाधन संपत्ती विकास मंत्रालयाने भारती विद्यापीठास 'अभिमत विद्यापीठ' म्हणून दर्जा दिल्याचे सूचनापत्र क्र. एफ-९-९५ यू.ई. अन्वये दि.२६ एप्रिल १९९६ रोजी प्रसृत केले. भारती विद्यापीठास अभिमत विद्यापीठ म्हणून भारत सरकारची मिळालेली ही मान्यता म्हणजे संस्थेच्या ३२ वर्षांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा ऐतिहासिक टप्पा म्हणावयास हरकत नाही.

डॉ.पतंगराव कदम यांच्या यशस्वी जीवनातील वैशिष्ट्यांबद्दल बोलताना ज्येष्ठ पत्रकार माधव गडकरी म्हणाले होते, की 'डॉ. पतंगरावांच्यासारखा माणूस जेव्हा शिक्षणाच्या क्षेत्रात उतरलेला दिसतो, तेव्हा त्यांच्या हातात मला भाऊराव पाटलांचा झेंडा दिसतो. सर्व समाजातल्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची डॉ. पतंगराव प्रतिज्ञा करतात, तेव्हा मला ते शाहूमहाराजांचे वारसदार वाटतात.'

## भारती विद्यापीठ – सुवर्ण महोत्सव (२०१५)




कुलपती डॉ. पतंगराव कदम यांचा राष्ट्रपती प्रणव मुखर्जी हस्ते सत्कार.
सोबत तत्कालीन मा. राज्यपाल श्री. विद्यासागर राव व मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस.

## सोनहिरा सहकारी साखर कारखान्यास भेट.



श्रीमती सोनिया गांधी समवेत डॉ. पतंगराव कदम

मला वाटते, माधव गडकरी यांनी डॉ. पतंगरावांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे मूल्यमापन अगदी योग्य असेच केले आहे, म्हणूनच कर्मवीर भाऊराव पाटील आणि छत्रपती शाहूमहाराज यांच्या बहुजन समाजाच्या शैक्षणिक विकासाच्या कार्याचे 'डॉ. पतंगराव कदम खरे वारसदार समजले जातात. भारती विद्यापीठास 'अभिमत विश्वविद्यालय' म्हणून जो दर्जा मिळाला, त्या श्रेयाचे मानकरी डॉ. पतंगराव कदम हेच आहेत.

भारत सरकारने व विद्यापीठ अनुदान आयोगाने भारती विद्यापीठाच्या दर्जेदार शैक्षणिक कार्याचे केलेल्या सार्थ मूल्यमापनामुळे व संस्थापक डॉ. पतंगराव कदम यांनी जिद्दीने, सातत्याने व अविश्रांत केलेल्या पाठपुराव्यामुळे भारती विद्यापीठाला 'अभिमत विश्वविद्यालय' म्हणून प्राप्त होण्याचे त्यांचे स्वप्न साकार झाले. त्याचबरोबर या भारती विद्यापीठास, अभिमत विश्वविद्यालयाचे तहहयात कुलपती म्हणून डॉ.पतंगराव कदम यांची नेमणूकही झाली. सोनसळसारख्या एका छोट्या गावातील शेतकऱ्याचा मुलगा स्वावलंबनाने पदव्युत्तर शिक्षण घेतो, शिक्षणक्षेत्रातील विषयावर प्रबंध लिहून पीएच.डी. मिळवतो आणि स्वत: स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थेस पुण्यासारख्या ठिकाणी राज्यमान्यता मिळवून एका अभिमत विश्वविद्यालयाचा तहहयात कुलपती होतो, ही महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासातील वैशिष्ट्यपूर्ण अशी घटना म्हणावी लागेल.

यापूर्वी अभिमत विश्वविद्यालयाचे तहहयात कुलपती झालेले कै.मोरारजी देसाई महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्र सरकारचे मंत्री व भारताचे पंतप्रधान झाले होते. त्यानंतर दिल्लीच्या एका अभिमत विद्यापीठाचे तहहयात कुलपती झालेले कै.डॉ.झाकिर हुसेन केंद्र सरकारचे मंत्री, भारत सरकारचे उपराष्ट्रपती व राष्ट्रपती झाले होते. असे म्हणतात, इतिहासाची अनेक वेळा पुनरावृत्ती होत असते. त्याप्रमाणे डॉ.पतंगराव कदम महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री, सहकार मंत्री, भारती विद्यापीठाचे तहहयात कुलपती झाले. महाराष्ट्र राज्याची व भारत सरकारची उच्चपदस्थ स्थाने त्यांना का नाही मिळणार? मिळणारच, कारण त्यांचे कार्यच तसे आहे.

आपल्या देशात २२६ निरनिराळ्या प्रकारची विद्यापीठे आहेत. त्यातील काही विद्यापीठे केंद्र सरकाच्या कायद्यानुसार निर्माण झालेली आहेत. उदा. दिल्लीचे जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, तसेच बरीचशी विद्यापीठे ही त्या त्या राज्याच्या शसनाने कायदे करून स्थापन केलेली आहेत. उदा., पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ वगैरे, त्याचप्रमाणे ज्या शैक्षणिक संस्था अगोदरच स्थापन झालेल्या आहेत व कार्यरत आहेत, ज्यांनी विशिष्ट असा शैक्षणिक दर्जा प्राप्त केलेला आहे व भविष्यामध्ये विद्यापीठ म्हणून अधिक विकसित होण्याची क्षमता ज्यांच्यामध्ये आहे अशा संस्थांना सरकार विद्यापीठ अनुदान मंडळाच्या शिफारशीवरून विद्यापीठ अनुदान मंडळाच्या कायद्यातील कलम (३) प्रमाणे अभिमत विद्यापीठाचा दर्जा देते. अशा प्रकारची सुमारे ८२ अभिमत विद्यापीठे भारतात आहेत, आणि महाराष्ट्रामध्ये भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाखेरीज इतर सहा अभिमत विद्यापीठे ओहत. अभिमत विद्यापीठाचा दर्जा सरकारने व राज्य सरकारने निर्माण केलेल्या विद्यापीठाच्या दर्जाप्रमाणेच असतो. त्यामुळे भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाचा दर्जा इतर विद्यापीठांप्रमाणेच कायदेशीर असा आहे व या विद्यापीठाने दिलेल्या पदव्यांना विद्यापीठ अनुदान मंडळाची म्हणजे पर्यायाने शासनाची मान्यता आहे, म्हणूनच इतर विद्यापीठांच्या पदव्यांप्रमाणे या विद्यापीठाच्या पदव्यांनाही समकक्ष मान्यता आहे. तसेच भारतातील सर्व विद्यापीठांची 'अखिल भारतीय मंडळ' नावाची संस्था आहे. त्या संस्थेचे सदस्यत्व भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठास मिळाले आहे. इतर विद्यापीठांप्रमाणेच राष्ट्रीय पातळीवर कार्यकारी ही एक संस्था आहे व या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र सबंध देशभर पसरेलेले आहे. देशाच्या निरनिराळ्या भागांतून व २५ वेगवेगळ्या देशांतील विद्यार्थी भारती विद्यापीठाच्या शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेत आहेत.

कुलपती डॉ.पतंगराव कदम यांच्या नियंत्रणाखाली व मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ अभिमत विद्यापीठाचे कार्य सुरू झाले असून डॉ.उत्तमराव भोईटे हे पहिले कुलगुरू आहेत. डॉ.शिवाजीराव कदम यांची मानद प्र. कुलगुरू म्हणून कुलपतींनी नेमणूक केली आहे आणि प्रा.बी.आर.आरबाड यांच्यानंतर श्री.जयकुमार हे सध्या कुलसचिव आहेत. त्यानंतर द्वितीय कुलगुरू

प्रा.डॉ.एस.एफ.पाटील झाले आणि तृतीय कुलगुरू डॉ.शिवाजीराव कदम झाले चौथे कुलगुरू डॉ.माणिकराव साळुंखे यांच्या नंतर पाचवे कुलगुरू डॉ. विवेक सावजी हे आहेत.

भारती विद्यापीठाच्या ज्या ३६ शाखांना भारत सरकारने विद्यापीठ अनुदान मंडळाच्या शिफारशीवरून अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला त्या (१) मेडिकल कॉलेज, (२) डेंटल कॉलेज, (३) कॉलेज ऑफ आयुर्वेद, (४) होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, (५) कॉलेज ऑफ नर्सिंग, (६) यशवंतराव मोहिते कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्स, (७) न्यू लॉ कॉलेज, (८) सोशल सायन्स सेंटर, (९) यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स स्टडीज ॲन्ड रिसर्च, (१०) रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट सेंटर इन ॲप्लाईड केमिस्ट्री (पॉलिमर), (११) कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन आणि (१२) इन्स्टिट्यूट ऑफ एन्व्हायरनमेंट रिसर्च ॲन्ड एज्युकेशन. आजपर्यंत एकूण ३२ शाखांत अभिमत विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला आहे. ३२ शाखांद्वारे आत्तापर्यंत वैद्यकीय, इंजिनिअरींग, वास्तुशास्त्र, पर्यावरण, व्यवस्थापनशास्त्र, फार्मसी, पदव्युत्तर, संशोधन, कला, शास्त्र, वाणिज्य, विधी, समाजकार्य इत्यादी वर्गांच्या अभ्यासक्रमामध्ये परिवर्तन घडवले आहे आणि आता अभ्यासक्रमाची नव्याने आखणी करताना जीवनाशी संदर्भ असलेले उपयुक्त, अद्ययावत असे शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. विविध उपक्रमांद्वारे सर्वसामान्य जनता व भारती विद्यापीठ यामध्ये संबंध प्रस्थापित करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

विशेष म्हणजे भारती विद्यापीठ विश्वविद्यालय पीएच.डी. सह इतर २६ अभ्यासक्रमही राबवीत आहे. सामाजिक शास्त्रे, मराठी, रसायनशास्त्र, विधी, शिक्षणशास्त्र, पर्यावरणशास्त्र यासारख्या अनेक विषयांमध्ये पीएच.डी. करण्याची सोय या विद्यापीठामध्ये केली आहे. काही तांत्रिक अडचणींमुळे ज्यांना इतरत्र पीएच.डी.चा अभ्यासक्रम पूर्ण करता येत नाही, त्यांनाही या विद्यापीठात पीएच.डी. करणे शक्य आहे. जे पदवीधर आहेत; परंतु जबाबदारीच्या जागेवर दहा वर्षांपेक्षा जास्त काळ काम करीत आहेत, अशा अनुभवी अधिकाऱ्यांना या विद्यापीठात पीएच.डी. करता येते.

अगदी अल्पकाळात भारती अभिमत विद्यापीठाला जी प्रगती करता आली, त्याचे श्रेय प्रामुख्याने भारती विद्यापीठाचे संस्थापक व विश्वविद्यालयाचे कुलपती डॉ. पतंगराव कदम यांना जाते. विद्यापीठाची सर्वांगीण प्रगती हा त्यांचा ध्यास आहे.

भारती अभिमत विद्यापीठाची तीन वर्षांची यशस्वी वाटचाल झाली होती. दि.२६ एप्रिल, १९९९ रोजी तिसरा वर्धापनदिन भारती विद्यापीठ भवनच्या दहाव्या मजल्यावरील गच्चीवर सकाळी विद्यापीठाचे कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते उगवत्या सूर्यांच्या साक्षीने ध्वजवंदन होऊन सुरू झाला. त्यावेळी अस्तित्वात असलेल्या ध्वजाच्या आकारात आणि स्वरूपात अर्थपूर्ण सुधारणा सुचवण्याचे कुउपतींनी विद्यापीठाच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांना, प्राचार्यांना व प्राध्यापकांना आवाहन केले. त्यानंतर खालच्या मजल्यावरील सभागृहामध्ये वर्धापन दिनाचा समारंभ कुलपतींच्या अध्यक्षतेखाली आयोजित केला होता.

कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरूवातीच्या दोन वर्षांत अभिमत विद्यापीठाने बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., समाजकार्य, विधी इत्यादी वर्गाच्या अभ्यासक्रमामध्ये परिवर्तन घडवून आणले आहे. नवीन अभ्यासक्रमाची आखणी करताना जीवनाशी संदर्भ असलेले उपयुक्त अद्ययावत असे शिक्षण देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. याशिवाय पहिल्या दोन वर्षांत कॉमर्स विषयाचे दोन पदविका अभ्यासक्रम, बॅचर ऑफ कॉम्प्युटरचा अभ्यासक्रम, ग्रंथपालन शास्त्राचा पदवी अभ्यासक्रम हे अभ्यासक्रम नव्याने सुरु करण्यात आले. तसेच 'ऑप्टिमिस्टीक' विषयाचा भारतातील पहिला पदवी अभ्यासक्रम सुरू केला. उपक्रमशीलता व नावीण्यपूर्णता हा भारती अभिमत विद्यापीठाचा स्थायीभाव आहे. त्या दृष्टिने विद्यापीठाची वाटचाल चालू आहे.

भारती विद्यापीठाची स्थापना करताना १९६४ साली डॉ. पतंगराव कदम यांना पाहिलेले 'आम्हाला आमचे विद्यापीठ निर्माण करावयाचे आहे.' हे अर्धे स्वप्न १९९६ साली भारती अभिमत विद्यापीठास मान्यता मिळाल्याने साकार झाले. 'आम्हाला आमच्या पदव्या द्यावयाच्या आहेत'. हे राहिलेले अर्धे स्वप्न दि.५ मे १९९९ रोजी अभिमत विद्यापीठाच्या पहिल्या पदवीदान समारंभाने ते साकार झाले.

भारती विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ हा डॉ. पतंगराव कदम यांच्या जीवनातील एक अत्युच्च आनंदाचा प्रसंग होता.

भारती अभिमत विद्यापीठाच्या प्रथम पदवीदान समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.हरी प्रताप गौतम यांना निमंत्रित केले होते व त्याप्रमाणे ते पुण्यामध्ये आले होते.

पदवीदान समारंभाचे प्रमुख पाहुणे माननीय डॉ.हरी प्रताप गौतम आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले, ''परिणामकारक शिक्षणपद्धती राबवण्यासाठी सध्याच्या उच्च शिक्षण व्यवस्थेत मुलभूत स्वरूपाचे बदल करणे अनिवार्य आहे. खासगी शिक्षणसंस्थांना प्रोत्साहन देतानाच, त्यांच्या कामगिरीचे वेळोवेळी मूल्यमापन करणे गरजेचे आहे. शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. केवळ पदवी घेतल्याने व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास होणार नाही. भावी आयुष्यात आव्हाने पेलताना ते फुलत जाईल. त्याकरता विद्यार्थ्यांनी प्रथम ध्येय निश्चित केले पाहिजे. कठोर परिश्रम आणि योग्य दिशेने प्रयत्न केल्यास फळ मिळतेच. मात्र आपली सद्सद्विवेकबुद्धी ढळू देता कामा नये. उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक ज्ञान अवगत केलेले मोठे मनुष्यबळ आपल्याकडे आहे. संशोधन करणाऱ्यांची संख्या बरोबर वाढत आहे. दरवर्षी हजारो जणांना पीएच.डी. देऊन सन्मानित केले जाते, पण ही केवळ एक बाजू झाली. दुसऱ्या बाजूने नुसतीच पदव्या घेणाऱ्यांची संख्या फुगत चालली आहे. कमी दर्जाच्या संस्थांचे बारेमाप पीक आले आहे. हे प्रमाण नियंत्रणात आणणे आवश्यक आहे. गुणवत्तेची अत्युच्च मूल्ये राखणाऱ्या आय.आय.टी. आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थांच्या धर्तीवर किमान वीस आदर्श विद्यापीठे देशात स्थापन व्हावीत. वैद्यकीय महाविद्यालयात दर्जेदार अध्यापकवर्ग उपलब्ध होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याकरता पूर्ण वेळ काम करणाऱ्या वैद्यकीय प्राध्यापकांबरोबच खासगी व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांचीही नेमणूक झाली पाहिजे. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल. वैद्यकीय महाविद्यालयाच्या अनियोजित संख्यावाढीमुळे घसरणारा दर्जा चिंता वाटणारी बाब आहे. वैद्यकीय प्राध्यापकांच्या अनेक जागा रिकाम्या असल्यामुळे विद्यार्थ्यांना कसेबसे शिक्षण पूर्ण करावे लागत आहे; म्हणून एकूणच शैक्षणिक आकृतिबंध बदलून विद्यार्थी, शिक्षक आणि प्रशासकांना प्रेरित केले पाहिजे.''

***

## १४. ग्रामीण विकास प्रतिष्ठान

सन १९६१ साली महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले व सांगली, सातारा जिल्ह्याचे सुपुत्र यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झाले. राजकारण, समाजकारण, सहकार, शेती, उद्योग, कला, साहित्य अशा जीवनाच्या विविध क्षेत्रांतील माणसे जोडण्याचा, गुणी माणसांना संधी देण्याचा उद्योग त्यांनी संपूर्ण सत्ताकाळात केला. तसेच सत्ता नसतानाही केला. विशेष म्हणजे शिक्षणक्षेत्रात धाडसी निर्णय घेतले. दरसाल १२०० रूपये उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलांची फी माफ केली. त्यामुळे खेड्यात शिक्षणप्रसार झपाट्याने झाला. खूप मुले शिकू लागली. शिकलेल्यांना नोकऱ्या मिळाल्या, त्यामुळे शिक्षणक्षेत्रातील कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला. शाळा-कॉलेजांमधून आनंद यादव, चंद्रकांत नलगे, रा.रं. बोराडे, महादेव मोरे वगैरे तरुण लेखक ग्रामीण भागातून उदयास आले. ही सर्व लेखक मंडळी चेपलेल्या बहुजन समाजातील होती. त्यांनी ग्रामीण भागातील कष्टकऱ्यांची, शेतकऱ्यांची, बलुतेदारांची दुःखे समक्ष पाहिली होती. अनुभवली होती. या ग्रामीण भागातील दुःखाला वाचा फोडण्यास ग्रामीण भागात वृत्तपत्रे किंवा मासिकेही पुरेशी नव्हती. या व्यथा मांडण्यासाठी व्यासपीठही नव्हते.

अशा प्रसंगी डॉ.पतंगराव कदम, आनंदराव पाटील आणि ग्रामीण भागातील लेखक आनंद यादव यांनी विचार करून ग्रामीण साहित्य संमेलन भारती विद्यापीठाच्या शंकरराव मोरे विद्यालयात नोव्हेंबर १९७७ मध्ये आयोजित केले. महाराष्ट्रातील अनेक मान्यवर या संमेलनास उपस्थित होते. पुढच्या वर्षी १९७८ साली डॉ. पतंगरावांनी जाहीर केले, की पुढील दहा वर्षे ग्रामीण साहित्य संमेलन घ्यावयाचे आणि त्यासाठी मदत करण्याचे आश्वासनही दिले.

ग्रामीण साहित्य संमेलनातून ग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक परिस्थितीचा विचार साहित्यातून होत असे. एवढ्यावरच न थांबता ग्रामीण भागातील सर्वांगीण सामाजिक विकास होण्यासाठी भारती विद्यापीठात 'ग्रामीण विकास प्रतिष्ठान' असा वेगळा विभाग सुरु करण्याचे डॉ. पतंगरावांनी ठरवले व १९७९ साली तत्कालीन वनमंत्री नामदार डी. डी. चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ झाला.

भारती विद्यापीठाच्या ग्रामीण विकास प्रतिष्ठान प्रकल्पाच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रास्ताविक भाषणात डॉ.पतंगराव कदम म्हणाले होते, की 'शाळा-कॉलेजांनी आणि विद्यापीठांनी केवळ पुस्तकी शिक्षण देऊन ग्रॅज्युएटस निर्माण करावेत व कारखाने चालवण्यासारखे काम करावे ही भूमिका भारती विद्यापीठाला मान्य नाही आणि म्हणून ग्रामीण विकास प्रतिष्ठानचा प्रकल्प संस्थेच्या वतीने घेतला आहे. या मुळा-मुठा नदीपलीकडच्या झोपडपट्ट्या, मुळशी तालुक्यातील भूगाव, बावधन वगैरे सहा खेडी आणि ज्या दुष्काळी भागातून म्हणजे खानापूर तालुक्यातून मी आलो आहे. तिथली चौदा गावे आम्ही दत्तक घेतलेली आहेत. श्रीयुत बि. स. पागे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने समिती नेमली होती. छोट्या गावासाठी ज्या योजना आखल्या होत्या, त्या योजना खरे म्हणजे लोकांपर्यंत पोचतच नाहीत. योजना किती आहेत असे विचारले तर एकाही अधिकाऱ्याला सर्वच्या सर्व योजना सांगता येत नाहीत. ग्रामीण विकासासाठी आखलेल्या सर्व योजना लोकांपर्यंत नेण्यासाठी भारती विद्यापीठाने ग्रामीण विकास प्रकल्प हाती घेतले आहेत.

भारती विद्यापीठाची जी ध्येयधोरणे आहेत, त्यात ग्रामीण जनतेच्या, तसेच समाजातील दुर्बल घटकांच्या विकासाच्या कार्याचा समावेश होतोच. त्या अनुरोधाने भारती विद्यापीठाच्या ग्रामीण विकास प्रतिष्ठानची प्रमुख उद्दिष्टे डॉ. पतंगरावांच्या मार्गदर्शनाखाली ठरवण्यात आली होती, ती अशी :-

(१) ग्रामीण जनतेमध्ये विकासाची जाणीव व स्वावलंबनाची भावना जोपासणे आणि वृद्धिंगत करणे,

(२) ग्रामीण विकासाच्या विविध शासकीय योजनांचा लाभ ग्रामीण जनतेस मिळवून देणे. (३) आर्थिक आणि मानवी साधनांचे संचालन करणे, (४) पिण्याच्या पाण्याच्या योजना, शेतीसाठी पाणी, वीज, गावातील रस्ते, आरोग्य व शिक्षण इत्यादीबाबतच्या योजना शासनाच्या व स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने कार्यान्वित करणे, (५) ग्रामीण विकासाचे नवीन प्रकल्प तयार करून राबविणे, (६) जनसंपर्कातून सामूहिक कृती करणे व त्यासाठी समाजात जागृती निर्माण करणे.

ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे काम सुरुवातीला वसंतराव माने पाहत होते. नंतर १९७९ पासून प्राचार्य डॉ. म. शि. सगरे पाहू लागले. प्रतिष्ठानच्या वतीने ग्रामीण विकासाचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविल्यानंतर डॉ.पतंगराव कदम यांच्याबरोबर प्रा. डॉ. म. शि. सगरे यांनी दिल्लीस जाऊन केंद्र शासनाच्या रूरल डेव्हलपमेंट खात्याच्या अधिकाऱ्यांशी प्रतिष्ठानने पाठवलेल्या प्रस्तावाबद्दल चर्चा केली आणि निवडलेल्या २२ खेड्यांतील जुन्या, पडक्या बिहिरी, सामुदायिक विहिरी अशा १२० विहिरी सर्व्हे करून त्यासाठी कॅथॉलिक रिलिफ सर्व्हीसेस (अमेरिका) ची मदत मिळवली. त्या मदतीने जुन्या विहिरींची दुरुस्ती व नव्या विहिरींची खुदाई यासाठी दरमाणसी आठवड्यास ५ किलो गहू व गोडेतेल मजुरी म्हणून दिली जात असे. या योजनेअंतर्गत खानापूर तालुक्यातील ९० विहिरींची कामे पुरी झाली आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व बेरोजगारांना रोजगार मिळाला. या कार्यवाहीसाठी रोजगार हमी योजनेचे प्रणेते श्री. वि. स. पागे यांचा मोलाचा सल्ला मिळाला होता.

याशिवाय प्रतिष्ठानच्या वतीने गरिबांना औषधोपचारासाठी मदत केली आहे. तसेच महिला मंडळे स्थापन करण्यास प्रोत्साहन व सहकार्य केले आहे. ग्रामीण भागातच क्रीडा मंडळे, भजनी मंडळे, सांस्कृतिक मंडळे यांना उपयोगी साहित्य पुरवले. भजनी मंडळांना तबला, हॉर्मोनियम, भांडी वगैरे वस्तुरूपाने खानापूर तालुक्याच्या पश्चिम भागातील व पलूस भागातील ३०-३५ खेड्यांतील लोकांना मदत केली आहे. ग्रामदैवतांची पूजा करणारे गुरव यांना गावातील समारंभाच्या वेळी वाजवण्यास नवीन पितळी तुताऱ्या (शिंगे) दिल्या आहेत.

खेड्यापाड्यातून टेलिफोन सेवा (चिंचणी, अंबक, शिवणी, तोंडोली, नेर्ली) शासनाकडून मंजूर करून घेतल्यामुळे शहराशी खेड्यांचा संपर्क वाढला. ग्रामीण भागातील लोकांचे प्रबोधन करण्यासाठी कीर्तन, भजनाचे कार्यक्रम आयोजित केले. सोनसळ, तोंडोली, घोटी येथे तरुणांची संघटना तयार करून आदर्श खेडे योजना राबवली. पुढे १९९१-९२ साली सोहोली, तडसर, कडेगाव, शिवणी, खेराडी या पाच गावात पाणलोट क्षेत्र विकास कार्य सुरु केले. ग्रामीण भागातील नळ-पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य शिक्षण यासाठी

शासनाने योजना मंजूर केली व ती तासगाव तालुक्यातील मणेराजुरी, चिंचणी, सावर्डे, पुणंदी या गावांमध्ये राबवली. त्याचबरोबर खानापूर पंचायतीमार्फत संडास बांधण्यास आर्थिक मदत देऊन १४० संडास बांधण्यात आले. या कामासाठी शासनाकडून १ सुपरवायझर, १ क्लार्क, १ शिपाई असा स्टाफ होता व त्याचे कार्यालय सांगलीत होते.

डॉ. पतंगराव हे हाडाचे कार्यकर्ते असल्याने त्यांनी १९८१ साली बदलून आलेले सांगली जिल्ह्याचे कलेक्टर रत्नाकर वाघ यांचा परिचय करून घेतला. त्यांच्या सहकार्याने खानापूर, आटपाडी, तासगाव तालुक्यातील अनेक सार्वजनिक प्रश्न सोडवले. त्यावेळी डॉ. पतंगराव महसूल खात्याशी संबंधित व इतर खात्यांशी संबंधित प्रश्न हिरिरीने व अत्यंत पोटतिडकीने ग्रामीण कार्यकर्त्यांसह कलेक्टर श्री.वाघ यांच्यापुढे मांडीत आणि कलेक्टरांच्या चेंबरमध्येच इतर अधिकाऱ्यांना बोलावून सार्वजनिक प्रश्न धसास लावीत असत.

डॉ. पतंगराव यांना सार्वजनिक जीवनात जनतेचा आदर करण्याची हातोटी अवगत होती. असे नव्हे तर शासकीय अधिकाऱ्यांबरोबर वैयक्तिक पातळीवर स्नेहाचे संबंध राखणे या गोष्टीचे चांगलेच भान होते. ते शब्दाचे पक्के असल्याने व कोणतेही सार्वजनिक काम नि:स्वार्थ बुद्धिने करण्याची वृत्ती असल्यामुळे हाती घेतलेले काम जिद्दीने तडीस नेण्याची तडफ असल्याने अनेक अधिकारी डॉ. पतंगरावांनी आणलेली कामे करण्यास तत्पर असत.

सांगली जिल्ह्यात १९८२ साली दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी आमदार, खासदार, मंत्री किंवा जिल्हा परिषदेचा पदाधिकारी नसताना डॉ. पतंगराव यांनी एक कार्यकर्ता म्हणून, कलेक्टर श्री. वाघ यांना विनंती केली, की 'दुष्काळी भागातच आपण सर्व अधिकारी ठराविक दिवशी आलात तर १००-१२५ खेड्यातील ग्रामस्थ त्यांचे प्रश्न घेऊन उपस्थित राहतील व त्यातूनच त्यांच्या होरपळलेल्या जीवनातील रोजगार, पिण्याचे पाणी, जनावरास चारापाणी व अन्य प्रश्न मार्गी लागतील.' श्री. वाघ यांनी ही सूचना मान्य केली आणि सर्व खात्यांच्या प्रमुखांना एकत्र बोलावून कडेगावसारख्या मध्यवर्ती ठिकाणी दुष्काळी परिषद आयोजित केली. या दुष्काळी परिषदेस

५५ गावचे सरपंच, पंचायत समितीचे सभापती, दुष्काळी परिषदेचे निमंत्रक मोहनराव कदम, दुष्काळी परिषदेचे अध्यक्ष डॉ.पतंगराव कदम व प्रमुख पाहुणे सांगली जिल्ह्याचे कलेक्टर रत्नाकर वाघ तसेच ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे कार्यवाह प्रा. म. शि. सगरे उपस्थित होते.

त्याप्रसंगी डॉ. पतंगराव कदम म्हणाले, की 'कृष्णा नदी, धोम धरण आणि आरफळ योजना यांतून शासनाने, शासकीय खर्चाने या भागास पाणी दिले पाहिजे. या योजनेमुळे या भागास सतत भेडसावणाऱ्या दुष्काळाच्या शापातून येथील जनता एकदाच मुक्त होईल. नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरीसारखी प्रचंड योजना शासन स्वखर्चाने पूर्ण करते. मग या भागातील पाणी योजना पूर्ण करण्यात त्यांना अडचण का वाटते? पाण्याच्या योजना अग्रक्रमाने हाती घेऊन शासनाने त्या पूर्ण कराव्यात. आता तर दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. आताही शासकीय यंत्रणेने युद्धपातळीवर येथील प्रश्नांची सोडवणूक केली पाहिजे. याचबरोबर सर्व नागरिकांनी, विशेषत: कार्यकर्त्यांनी ही कठीण परिस्थिती म्हणजे काम करण्याची एक संधी आहे असे समजून पुढाकार घेतला पाहिजे. शासनाला सर्वतोपरी सहकार्य करून या सर्व प्रश्नांची सोडवणूक करून घेण्याची मोठी गरज आहे. कठीण प्रसंगात न डगमगता, आपत्तीवर मात करून यशस्वी होऊ, हे निश्चित.

या दुष्काळी परिषदेस उपस्थित असलेल्या सर्व खातेप्रमुखांना जबाबदारीची जाणीव झाली व अनेक तात्कालिक प्रश्न मार्गी लागले. अशाच उद्देशाने ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने दुष्काळग्रस्त शेतकरी व शेतमजूर यांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन व दिलासा मिळावा म्हणून कडेगाव येथे दिनांक १३ जानेवारी १९८७ रोजी महाराष्ट्र राज्याचे त्यावेळचे आरोग्यमंत्री भाई सावंत, यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. पतंगराव कदम यांनी शेतकरी परिषद आयोजित केली होती.

डॉ. पतंगरावांची कामावरील निष्ठा, तळमळ,ग्रामीण भागातील लोकांबद्दल आस्था व प्रेम असलेल्या ह्या हाडाच्या कार्यकर्त्याला सहकार्य केल्याचा मनापासून सात्विक आनंद व समाधान अधिकाऱ्यांना वाटले होते

व तशी त्यांनी इतर कार्यकर्त्यांजवळ आपली प्रतिक्रिया व्यक्तकेली होती. त्यामुळेच ग्रामीण विकास प्रतिष्ठानद्वारा अनेक विकासकामे चोखपणे पूर्ण झाली.

शासनाने ग्रामीण भागातील कुशल कारागिरांना प्रत्येकी ५ हजार रूपयांचे भांडवल बिनव्याजी, परंतु परतफेडीच्या अटीवर दिले होते. तसेच पाणलोट क्षेत्र विकास कामासाठी दरवर्षी ५ लाख रूपये याप्रमाणे चार वर्षात २० लाख रूपये दिले होते. त्यातून फिल्ड वर्कर्स, इंजिनिअर, व्हेटर्नरी डॉक्टर, सोशल वर्कर, कृषी तज्ज्ञांना प्रतिष्ठानच्या कार्यात मदतनीस म्हणून घेतलेल्या, तसेच सोहोली व शिवणी गावासाठी प्रत्येकी ५० हजार रूपयांचे अनुदान विकासकामासाठी दिले होते. सांगली जिल्ह्यातील मणेराजुरी परिसरातील पाच गावांमध्ये पर्यावरण स्वच्छता व आरोग्य शिक्षण यासंबंधी जागतिक बँक प्रकल्पातंर्गत काम गेली दोन वर्षे चालू आहे. ग्रामीण विकास प्रतिष्ठानअंतर्गत दिल्लीहून नॅशनल ॲग्रीकल्चर टेक्नॉलॉजी प्रोजेक्ट रूपये ३८ लाखाचा चार वर्षासाठी(२०००-२००३)मंजूर झाला. ८० शेतकऱ्यांना बी-बियाणे व मजुरी देऊन प्रकल्प यशस्वी झाला. भारतात २२ जिल्ह्यातून सदर प्रकल्प मंजुरी होती. त्यामध्ये ग्रामीण विकास प्रतिष्ठानला प्रकल्प यशस्वी राबविल्याबद्दल दुसरा क्रमांक मिळाला.

ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या कार्यास डॉ. पतंगरावांचे मार्गदर्शन लाभल्यामुळे प्रतिष्ठानचे उद्दिष्ट काही प्रमाणात साध्य झाले. डॉ. पतंगरावांच्या भगीरथ प्रयत्नांमुळे ग्रामीण विकासाची गंगा ग्रामीण भागातील अनेक गावांपर्यंत पोहोचली आहे आणि अनेक समाजबांधवांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष फायदाही झाला आहे. सध्या प्रा. एस्.एन्. मोहिते ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे काम पाहत आहेत.

***

## १५. निवडणुका, आमदार, नामदार लोकसेवा

डॉ.पतंगराव कदम बालपणीच एक धडपड्या मुलगा म्हणून जन्मगावी सोनसळला माहीत होते. पुढे कुंडलच्या प्रतिनिधी हायस्कूलमध्ये शिक्षणास गेल्यावर त्यांच्या उपजत नेतृत्वगुणांची ओळख आपल्या मित्रांना व शिक्षकांना त्यांनी करून दिली होती. डॉ. पतंगराव आठवीत असताना दहावीत असलेल्या प्रतिस्पर्धी विद्यार्थ्यांचा पराभव करून हायस्कूलमध्ये सेक्रेटरी म्हणून निवडून आले होते. पुढे हायस्कूलमध्ये असताना नामदार बाळासाहेब देसाईंनी त्यांना मोठा झाल्यावर कोण होणार, हे विचारल्यावर त्यांनी बाणेदारपणे उत्तर दिले होते, की 'मोठा झाल्यावर मी एल.एल.बी. करून आमदार होणार'. अशा महत्त्वाकांक्षेचे उच्च ध्येय मनात बाळगून स्वत:ची प्रगती करणाऱ्यास नक्कीच यश मिळते. याचा प्रत्यय डॉ. पतंगरावांच्या राजकीय जीवनात पाहावयास मिळतो.

पुढे कॉलेज शिक्षणासाठी साताऱ्याच्या शिवाजी कॉलेजमध्ये आल्यावर पहिल्याच वर्षी सेक्रेटरी म्हणून डॉ.पतंगराव निवडून आले होते. वक्तृत्व सभेत भाग घेऊन त्यांनी आपल्या अंगी असलेला सभाधीटपणा सिद्ध केला होता. 'मी आमदार होऊन माझ्या दुष्काळी भागातील जनतेचे प्रश्न सोडवणार' असे उद्गार डॉ. पतंगराव आपल्या मित्रांसमोर काढत असत.

डॉ. पतंगरावांना दिलासा देणारे यशवंतराव मोहिते यांच्यासारखे ज्येष्ठ सहकारी होते, तसेच काही शासकीय अधिकारीही होते. सांगली जिल्ह्यात १९८१ साली बदलून आलेले जिल्हाधिकारी रत्नाकर बाघ सांगतात, की 'शैक्षणिक विभागातील कार्यकर्ता व भारती विद्यापीठाचे संस्थापक म्हणून लोकांना माहिती होती. पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे आणि महाविद्यालयीन शैक्षणिक प्रश्न सोडवण्यात पुढाकार घेतल्याचे मलाही माहीत होते. कर्मधर्मसंयोगाने सांगलीस कलेक्टर म्हणून आलो, त्यावेळी ते विधानसभेची निवडणूक हरले होते. अपयशामुळे नाराज झाले होते. काही कामानिमित्त भेटीस आले होते. त्यावेळी मी त्यांना त्यांच्या पुण्यातील कार्याची प्रशंसा करून सांगलीतसुद्धा काही उपक्रम किंवा काही काम करू इच्छित असतील तर शासकीय स्तरावर संपूर्ण सहकार्याची खात्री दिली होती. एवढेच नव्हे तर

सार्वजनिक जीवनात यश–अपयशाकडे न पाहता तुमच्यासारखा माणूस जिद्दीने उभा राहिला, तर हा बॅड पॅच सहज पार पाडून जाल, असा माझा विश्वास असल्याचे सांगितले. डॉ. पतंगराव हे दादांचे कार्यकर्ते असल्याने त्यांनी या सल्ल्याचा योग्य तो आदर केला आणि आपल्या समाजकार्याला व भारती विद्यापीठाच्या प्रगतीला जुंपून घेतले.''

सन १९८० ते १९८५ या कालखंडात महाराष्ट्रात राजकीय घडामोडी झपाट्याने घडत होत्या.१९८० च्या विधानसभेच्या निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळाले व बॅ. ए. आर. अंतुले मुख्यमंत्री झाले; पण सिमेंट परवान्याच्या संबंधात त्यांच्यावर कोर्टाने ठपका ठेवल्यामुळे त्यांनी दिनांक १२ जानेवारी, १९८२ रोजी राजीनामा दिला. त्याच सुमारास महाराष्ट्राच्या दृष्टिने व सांगली जिल्ह्याच्या दृष्टिने महत्त्वाची घटना दि. २४ मे, १९८२ रोजी घडली. यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांच्यातील मतभेद मिटून अंकलखोप येथे दोघांचे मनोमीलन झाले. त्यामुळे विरोधी पक्षांना जी काँग्रेस पक्षावर टीका करण्यास संधी मिळत होती ती बंद झाली. अशा परिस्थितीमध्येच दिनांक ३१ जानेवारी, १९८३ रोजी बॅ. बाबासाहेब भोसले यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाली. डॉ.पतंगरावांसारखेच बॅ.बाबासाहेब भोसले यांना महाराष्ट्राच्या राजकारणात स्थान मिळाले नव्हते. ते मिळाले. ते प्रथम इंदिरा काँग्रेस पक्षाचे आमदार झाले व मुख्यमंत्रीही झाले, परंतु त्यांची कारकीर्द अल्पजीवी ठरली आणि त्यांना काही महिन्यांतच राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर दि.२ फेब्रुवारी, १९८३ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून वसंतदादा पाटील यांची निवड झाली. त्यांच्या कार्यकालातच दिनांक ३ एप्रिल, १९८४ रोजी त्यांनी ताकारी योजनेस नागेवाडीच्या सभेत शासनाने मान्यता दिल्याचे जाहीर केले. डॉ. पतंगरावांच्या व खानापूर तालुक्यातील पश्चिम भागातील जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नास शासनाची मान्यता मिळाली. या योजनेमुळे सुमारे ८० हजार एकर जमीन ओलिताखाली येणार होती. सांगली जिल्ह्यातील हा सर्वांत मोठा जलसिंचन प्रकल्प मार्गी लागणारा होता. याच वर्षी वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदान तत्त्वावर वैद्यकीय महाविद्यालयांना परवानगी दिली. पुढे अभियांत्रिकी महाविद्यालयांनाही विनाअनुदान तत्त्वावर परवानगी

देण्याचे धाडसी व ऐतिहासिक निर्णय वसंतदादा पाटील यांनी घेतल्यामुळे डॉ.पतंगराव कदम यांच्या भारती विद्यापीठाने पुणे येथे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालये सुरू केली. अनेक वर्षे अभियांत्रिकी व वैद्यकीय शिक्षणापासून वंचित राहिलेल्या सर्वसामान्यांना आता ते शिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रात इतरही अनेक शिक्षणसंस्थांनी पुढाकार घेतला. त्यात भारती विद्यापीठ ही एक होती.

देशपातळीवरील राजकारणातसुद्धा गंभीर स्वरूपाच्या घटना घडल्या. ३१ ऑक्टोंबर, १९८४ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधींची दिल्लीत हत्या झाली आणि काही काळानंतर म्हणजे दि. २५ नोव्हेंबर, १९८४ रोजी महाराष्ट्राचे सुपुत्र यशवंतराव चव्हाण यांचे दिल्लीत निधन झाले. नवीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी डिसेंबर १९८४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला ५०८ पैकी ४०१ जागा मिळवून दिल्या.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील १९८५ च्या विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. डॉ. पतंगरावांनी याही वेळेस इंदिरा काँग्रेसचे तिकीट मागितले होते. त्यासाठी प्रांतिक काँग्रेस पक्षाकडे त्यांच्या मतदार संघातील कार्यकर्त्यांनी निवेदने देऊन डॉ. पतंगरावांनाच तिकीट देण्याची आग्रहाची मागणी केली होती. त्याप्रमाणे त्यांच्या नावाची शिफारस अखिल भारतीय काँग्रेसकडे प्रांतिक काँग्रेसने केली होती. त्याचबरोबर दिल्लीतील ज्येष्ठ नेत्यांना भेटून डॉ. पतंगरावांनी आपल्या कार्याची माहिती पटवून दिल्यामुळे त्यांना पक्षाचे तिकीट नक्की मिळणार, असा निर्णय झाला असल्याचे कळले होते. यशवंतराव मोहिते यांनीही त्यांच्यासाठी प्रयत्न केले होते, आता तिकीटाचे नक्की झाले आहे, तर दिल्लीत न थांबता निवडणुकीच्या पुढच्या तयारीसाठी मतदारसंघात जाण्याचा सल्ला डॉ. पतंगरावांना वसंतदादा आणि यशवंतराव मोहिते यांनी दिला.

त्यापूर्वीच दि. ५ फेब्रुवारी, १९८५ रोजी डॉ.पतंगरावांनी विटा तहसीलदार कार्यालयात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आपल्या सहकारी कार्यकर्त्यांसह मिरवणुकीने जाऊन अर्ज दाखल केला होता. त्यावेळी डॉ. पतंगराव उघड्या जीपमध्ये उभे होते. आनंदाच्या आणि विजयाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. मिरवणूक जागोजागी थांबत होती. डॉ. पतंगरावांच्यावर गुलाल

उधळला जात होता. विटे तहसीलदार कचेरीचे आवार माणसांनी गच्च भरून गेले होते. जयघोषात डॉ.पतंगरावांनी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर माणसे आपल्या घरी निघून गेली आणि डॉ. पतंगराव व प्रा.सगरे सांगलीच्या एस्. टी.च्या गेस्ट हाऊसवर मुक्कामास आले.

रात्री पलूसच्या एका कार्यकर्त्याचा फोन आला. तो प्रा. सगरे यांनी घेतला. त्याने सांगितले, की संपतराव चव्हाण यांना तिकीट मिळाले आहे. त्यानंतर थोड्या वेळाने सोनसळवरून डॉ. पतंगरावांचे धाकटे बंधू जयसिंगराव यांनीही फोनवरून हीच बातमी सांगितली. ती बातमी डॉ. पतंगरावांना सांगितली, तेव्हा पहाटे पाच वाजले होते. डॉ. पतंगराव कदम आणि प्रा. सगरे लगेच माधवनगरच्या साखर कारखान्याच्या गेस्ट हाऊसवर वसंतदादा पाटील यांना भेटण्यास गेले. डॉ. पतंगरावांना पाहताच दादा म्हणाले, की 'लोकसभेतील ज्या क्षेत्रात कॉंग्रेसला आघाडी मिळाली आहे तेथील सिटींग एम्.एल्.ए. ला तिकीट देण्याचे ठरले आहे. तुझ्यासाठी मी प्रयत्न केले व माझी इच्छाही होती तुला तिकीट मिळावे, पण सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाच्या निर्णयामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. डॉ. पतंगराव, माझा नाईलाज झाला. तुला काय मागायचे ते माग, ते तुला देतो.' हे ऐकून स्वाभिमानी डॉ. पतंगराव तेथून इठले व दादांना म्हणाले, ''तुमच्याकडून मला काही नको, लोक जे देतील ते मी घेईन.''

राजकारणामध्ये स्वयंभू नेतृत्व नको असते. डॉ.पतंगराव यांचे नेतृत्व स्वयंभू होते. स्वत:च्या कर्तृत्वाने ते त्यांनी निर्माण केलेले होते. त्यांना वरिष्ठांच्या पुढे पुढे, हांजी हांजी करण्याची सवय नव्हती. कोणाच्या दबावाखाली राहण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. दुसऱ्यांच्या आशीर्वादाने मोठे झालेल्यांना डॉ. पतंगरावांचे नेतृत्व; नको होते म्हणूनच १९६७ पासून त्यांना डावलले गेले होते व १९८५ साली त्याची पुनरावृत्ती झाली होती.

डॉ. पतंगराव यांना तिकीट नाकारल्यामुळे पुढे काय करावयाचे याचा विचार करण्यासाठी चिंचणी येथे कार्यकर्त्यांची मिटींग घेतली होती. तेथे सर्व कार्यकर्त्यांचा एकमताने विचार झाला, की डॉ. पतंगरावांनी स्वतंत्र उमेदवार म्हणून ही निवडणूक लढवावी. नंतर सर्व कार्यकर्ते चिंचणी (अंबक) येथे अंतिम निर्णय घेण्यासाठी जमले. सर्व आवार मोटारसायकली, ट्रक, टेम्पो,

मोटारी यांनी भरून गेले होते. तसेच रस्त्यावरही गाड्यांची गर्दी झाली होती. तिकीट न मिळाल्याचे दु:ख सर्वांच्या चेहऱ्यांवर होते. आंतरिक चीड होती. तलम नेहरू शर्ट आणि शेरवानी घातलेले डॉ. पतंगराव खुर्चीवर बसले होते व हजारो कार्यकर्ते दाटीवाटीने बसलेले होते.

'निवडणुकीने वाजतगाजत आपण उमेदवारी अर्ज भरलेला आहे. कॉंग्रेसने तर तिकीट नाकारलेले आहे. आता पुढे काय करायचे, असा प्रश्न एका कार्यकर्त्याने डॉ. पतंगरावांना विचारला. 'काय करायचे ते तुम्हीच ठरवायचे आणि त्यासाठीच आपण सर्वजण येथे जमलो आहोत' असे डॉ. पतंगराव म्हणाले,'यावर बरीच चर्चा झाली. गेल्या काही वर्षांत डॉ. पतंगरावांनी खूप सामाजिक कार्य केले होते. त्यांचा कामाचा फायदा घरोघरी झाला होता. यापूर्वी असे काम कोणी केले नव्हते. असे असूनही तिकीट न मिळाल्यामुळे सर्वांच्या मनामध्ये कमालीची चीड निर्माण झाली होती. आता निर्णय एकच, - स्वतंत्र उमेदवार म्हणून तुम्ही निवडणूक लढवायची आहे, आम्ही सांगू ते तुम्ही ऐकायचे' कार्यकर्त्यांनी निर्वाणीच्या शब्दांत डॉ. पतंगरावांना सांगितले.

त्यावर डॉ. पतंगराव म्हणाले,''जनता जनार्दन तुम्ही आहत! तुम्ही जो निर्णय घ्याल तो मला मान्य आहे,'' हे शब्द ऐकताच टाळ्यांचा कडकडाट झाला आणि सर्वत्र आनंदाचा जल्लोष झाला. अनिश्चिततेचे वातावरण होते, ते संपले.

भारती विद्यापीठाच्या पुण्यातील काही कार्यकर्त्यांचे असे मत होते, की कॉंग्रेस पक्षाने तिकीट दिले नाही तर नाही. भारती विद्यापीठाचाच व्याप दिवसेंदिव प्रचंड वेगाने वाढत आहे. अशा परिस्थितीत डॉ. पतंगरावांनी आपला अमूल्य वेळ आणि प्रतिष्ठा राजकारणाच्या धकाधकीत खर्च न करता संस्थेच्या कार्यास संपूर्ण वेळ द्यावा, पण खानापूर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी त्यास विरोध केला आणि सांगितले, ''तुम्हांला येथील राजकारणातले काही कळायचे नाही. तुम्ही डॉ. पतंगराव साहेबांना पुण्याला घेऊन जावा. निवडणूक होईपर्यंत इकडे फिरकू नका, साहेबांच्या नावावर आम्ही निवडणूक लढवतो. निवडणुकीचा निकाल लागला, की मग तुम्ही साहेबांना घेऊन इकडे या'' त्यांचे म्हणणे किती बरोबर होते हे निवडणुकीच्या निकालानंतर सर्वांच्या लक्षात आले.

राजकारणावर आपले मत मांडताना डॉ.पतंगराव म्हणतात, 'राजकारणाचा मुख्य उद्देश समाजकल्याण हाच आहे. सत्तेमध्ये सहभाग असेल तर आपल्या विधायक कार्याच्या पूर्तीसाठी त्याचा उपयोग करून घेता येतो. विधायक कार्याला पाठिंबा आणि विध्वंसक शक्तीपासून संरक्षण अशा दुहेरी हेतूसाठी मी राजकारणात प्रवेश करीत आहे. मला मंत्रिपदाची हौस नाही. तसेच राजकीय खेळ्या-डाव-प्रतिडाव यातही मला रस नाही. लोकांची कामे नि:स्वार्थी हेतूने केली, तर त्यांचा भरघोस पाठिंबा मिळतो. मी सतत लोकांबरोबर असतो; म्हणून लोक माझ्याबरोबर असतात.' मला वाटते. हाच त्यांच्या आगामी निवडणुकीचा जाहीरनामा होता.

लोकांच्या आग्रहाखातर डॉ. पतंगरावांनी आपली स्वतंत्र उमेदवारी जाहीर केली. त्यांच्या प्रचाराचा नारळ श्री औदुंबर या तीर्थक्षेत्री वाढवण्याचे ठरले. हजारोंच्या संख्येने लोक औदुंबर येथे जमा होऊ लागले. बैलगाड्या जुंपून, भाकरी बांधून, मिळेल त्या वाहनांनी माणसांचा लोंढा औदुंबरला येत होता. तेथे कार्यकर्त्यांबरोबर जनसामान्यांचाही उत्साह दांडगा असल्याचे दिसत होते. श्री. दत्त दिगंबरांना साक्षी ठेवून कविवर्य सुधांशू यांच्यासमवेत डॉ. पतंगराव यांच्या निवडणूक प्रचाराचा नारळ वाढवण्यात आला आणि डॉ. पतंगरावांच्या नावाचा जयघोष निनादला. त्या प्रसंगीच्या प्रचारसभेत कार्यकर्त्यांची जोरदार भाषणे झाली. प्रचंड बहुमताने डॉ. पतंगरावांना निवडून देण्याकरता सर्वजण वचनबद्ध झाले. जनताजर्नादनरूपी विराट सागराला त्यावेळी अभिवादन करून डॉ. पतंगराव यांनी प्रचाराचा शुभमुहूर्त केला होता. डॉ. पतंगरावांनी आपले निवडणूक चिन्ह म्हणून सिंहाची निवड केली होती. सिंह म्हणजे प्राण्यांचा राजा. तो गर्जना करीत माणसांच्या राजाकरता जनमानसात-लोकांना जागा करण्यासाठी सज्ज झाला.

गावोगावी निवडणूक-प्रचारदौरा सुरू झाला. डॉ. पतंगरावांची निवडणूक प्रचारयंत्रणा शिस्तबद्ध काम करीत होती. निवडणुकीपूर्वीच प्रचाराला उपयुक्त होईल असा गाववार कार्यक्रमांचा आढावा घेतलेला होता. गावागावातील आपले कार्यकर्ते त्यांच्या मोटरसायकली, प्रत्येक गावात लागणारे प्रचारसाहित्य, घ्यावयाच्या सभा प्रचाराची पद्धती यांचे व्यवस्थित नियोजन

केलेले होते. प्रचार साहित्यामध्ये बॅनर्स, स्टीकर्स, पोस्टर्स, ध्वज ही साधने होती. त्याचबरोबर डॉ. पतंगराव यांनी यापूर्वी केलेल्या कामांची सचित्र माहिती पुस्तिका प्रकाशित केलेली होती. ही माहितीपुस्तिका मतदारसंघात घरोघरी पोहोचवण्याची व्यवस्था केलेली होती जी पुढे प्रचाराच्या दृष्टिने अत्यंत प्रभावी ठरली. ध्वनीफितीही तयार केलेल्या होत्या. घरोघर स्टीकर्स लावले. गावोगावी बॅनर्स लागले. पोस्टर्स लागले. घरांच्या भिंती रंगल्या. मुलांच्या, स्त्रियांच्या प्रचारफेऱ्या निघू लागल्या. सगळीकडे 'सिंहाच्या' गर्जना ऐकू येऊ लागल्या. सर्व वातावरण डॉ. पतंगरावमय झाले.

शासनाने पूर्वीचा भिलवडी मतदारसंघ फोडून आता भिलवडी-वांगी मतदारसंघ निर्माण केला होता. या मतदारसंघात मोठी विसंगती निर्माण झाली होती. खानापूर तालुका हा दुष्काळी भाग आहे तर तासगाव तालुका सधन आहे. खानापूर तालुक्यातील कडेगाव-पलूस परिसरातील काही गावे यांचा मिळून हा मतदारसंघ झाला होता. त्या मतदारसंघातून डॉ. पतंगराव निवडणूक लढवीत होते.

गावोगावी प्रचारसभा सुरू झाल्या. उमेदवार डॉ. पतंगरावांची प्रत्येक गावातून वाजतगाजत मोठी मिरवणूक काढली जाई. त्या मिरवणुकीत हलगी, लेझीम पथके यांचा ताफा असे. गुलाल, फुले इधळली जात. मोठमोठे कटआऊट, पोस्टर्स लावलेल्या गाड्याही बरोबर असत. मिरवणुकीनंतर सभाही घेतली जाई.

सर्वांत मोठी सभा पलूसला झाली. या सभेत एका कार्यकर्त्याने आपल्या उजव्या हाताच्या बोटाला शस्त्राने काप घेतला आणि डॉ. पतंगरावांच्या कपाळाला रक्ताचा टिळा लावला. उपस्थितांना आवाहन करून तो म्हणाला, ''येथील तमाम जनतेच्या साक्षीने या रक्ताची शपथ घेऊन सांगतो ! तुम्ही आमचे नेते आहत. तुमच्या नेतृत्वावर आमचा विश्वास आहे. आमची मते 'सिंहालाच' मिळतील. उमेदवार तुम्ही नसून या मतदारसंघातला प्रत्येक मतदार हा उमेदवार आहे. आपणास प्रचंड बहुमताने आम्ही निवडून आणणार आहोत.'' उपस्थित जनतेच्या टाळ्यांच्या प्रचंड गजराने व घोषणाच्या जल्लोषाने या आश्वासनाला इत्स्फूर्त दाद मिळाली.

जिल्हा वर्तमानपत्रांतून-सांगलीदर्शन, अग्रदूत, राष्ट्रशक्ती,प्रतिध्वनी, मतवादी यांतून डॉ. पतंगरावांच्या प्रचाराची, प्रचारसभांची वार्तापत्रे पहिल्या पानावर प्रसिद्ध होत होती. अशा प्रकारच्या इस्फूर्त सभा, मिरवणुका सांगली जिल्ह्याचे नेते वसंतदादा पाटील यांच्या निवडणूक प्रचाराच्या वेळी असायच्या. असे लोक सांगत होते.

निवडणूक संपली, प्रचाराची रणधुमाळी शांत झाली. आता मतमोजणीचे व निकालाचे वेध लागले. निकालाचा दिवस उजाडला. विटे नगरपरिषदेच्या नवीन इमारतीमध्ये मतमोजणी सुरू झाली. सर्वांना डॉ. पतंगरावांच्या विजयाची खात्री होती. फक्त किती अधिक मतांनी विजय होणार हेच जाणण्याची इत्सुकता होती. संध्याकाळी ५ वाजता निकाल जाहीर झाला. ३० हजार १६५ मताधिक्क्याने डॉ. पतंगराव निवडून आले आणि त्यांनी सर्व महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकाची ६३ हजार मते मिळवून एक गौरवास्पद उच्चांक प्रस्थापित केला होता.

या ऐतिहासिक निवडणुकीत भिलवडी-वांगी मतदारसंघातील महिलांनी घरोघर जाऊन डॉ. पतंगराव कदम यांचा प्रचार केला होता. वृद्ध महिला, नवविवाहित सौभाग्यवती, शिकणाऱ्या कुमारिका यांनी सोनसळ ते औदुंबर अशा २५ गावांतून झंझावती दौरा केला होता. महिलांनी त्यांचे कर्तव्य यशस्वीरीतीने पार पाडले होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात महिलांनी प्रचार आघाडी इघडल्याची महाराष्ट्रातील ही पहिलीच घटना होती.

खंबाळे हे भिलवडी-वांगी मतदारसंघातील एक छोटेसे गाव. या गावचे डॉ. पतंगराव कदम यांच्यावर अलोट प्रेम. या गावच्या घराघरातून डॉ. पतंगराव कदम यांचे फोटो लावले आहेत. येथील ग्रामस्थ मतदारांनी एक विक्रमच घडवला होता. येथील एकूण मतदार ७६१ पैकी संपूर्ण ७६१ मतदारांनी डॉ. पतंगराव कदम यांना मतदान केले होते. १०० टक्के मतदान एकाच उमेदवाराला करणारे खंबाळे हे महाराष्ट्रातील एकमेव गाव ठरले.

श्री. नथुराम पवार म्हणाले होते, की ''यशवंतराव चव्हाणांच्या जन्मभूमीत वाढणाऱ्या नेतृत्वाचा अंकुर जर कोणी खुडावयाचा प्रयत्न केला तर सर्वसामान्य जनता ते कधीही सहन करणार नाही. चव्हाणसाहेबांच्या

मागे प्रयत्न करणाऱ्या तरूण, तडफदार नेत्याची निवड २ मार्च,१९८५ या दिवशी निबतीने केली व भिलवडी-वांगी मतदारसंघात नवा इतिहास निर्माण झाला. सर्वसामान्यांच्या प्रयत्नांचे सार्थक झाले. तरूणांना नवा नेता मिळाला. राजकारणाला नवी कलाटणी मिळाली आणि मतदारांना 'मेंढरे' समजणाऱ्यांना अक्कल आली.

'डॉ. पतंगरावांची इच्छाशक्तीच जबरदस्त आणि विलक्षण, मेहनती असल्याने त्यांना इच्छाशक्तीचे वरदान मिळाले आहे.' या वसंतदादांनी डॉ. पतंगरावांच्या बाबतीत केलेल्या विधानाची प्रचीती आली.

डॉ.पतंगराव कदम यांनी १९८५ ची निवडणुकीची लढाई जिंकली. पण ती विषम होती. इंदिरा काँग्रेस- त्यांचा देश व महाराष्ट्र पातळीवरील फौजफाटा, त्यांचे अखिल भारतीय कीर्तीचे नेते, महाराष्ट्रातील आमदार, खासदार, मंत्री व या अनुषंगाने त्यांची सर्वांगीण प्रचारसाधने, तर दुसऱ्या बाजूला लोकांचे प्रेम व आशीर्वाद घेऊन उभे राहिलेले एकाकी डॉ.पतंगराव कदम. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लोकसभा निवडणुकीत येऊन गेलेली पंतप्रधान राजीव गांधी यांची लोकप्रियतेची लाट. या अशा पार्श्वभूमीवर तर इंदिरा काँग्रेसच्या विरोधात उभे राहणे हे आत्मघातकी धाडस होते. अर्थात डॉ. पतंगराव कदम यांनी भिलवडी-वांगी मतदारसंघासाठी व शेतकऱ्यांसाठी कोणतेही पद नसताना ग्रामीण विकास प्रतिष्ठानमधून जे काही केले होते त्याची माहिती त्यांना होती. त्यांना हे धाडस असे मुळीच वाटले नाही. त्यांना पूर्ण खात्री होती, की डॉ.पतंगराव कदम हे या निवडणुकीत विजयी होणार आणि नुसते विजयी नव्हे तर विक्रमी मतांनी विजयी होणार आणि तसेच घडले. सांगली जिल्हा खरे तर इंदिरा काँग्रेसचा बालेकिल्ला, पण त्याला अपवाद ठरला होता भिलवडी-वांगी मतदारसंघ !

या निवडणुकीत त्यांना मिळालेले उज्ज्वल यश बरेच काही सांगून गेले. डॉ.पतंगराव कदम तळागाळातल्या गोरगरीब माणसाची उन्नती करण्यासाठी विसाव्या वर्षापासून जे अविश्रांत कष्ट करीत राहिले, त्यातून भारती विद्यापीठ व तिच्या असंख्य शाखा निर्माण झाल्या. त्यांच्यासारखा कार्यक्षम विचारवंत नेता विधानसभेत असणे हा विधानसभेचाच गौरव झाला होता. गरीब जनतेचे जटिल प्रश्न सोडवण्यात त्यांना सुयश मिळेल अशी खात्री जाणकारांनी व्यक्तकेली होती.

इंदिरा काँग्रेस पक्षाने १९८५ साली डॉ. पतंगराव कदम यांना तिकीट दिले नव्हते; पण ते स्वतंत्र उमेदवार म्हणून निवडून आले. १९९० च्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी मात्र इंदिरा काँग्रेसने त्यांना भिलवडी-वांगी मतदारसंघाचे तिकीट दिले. हाताचा पंजा या इंदिरा काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर डॉ. पतंगराव कदम फेब्रुवारी १९९० मध्ये झालेल्या निवडणुकीतही विक्रमी मतांनी निवडून आले.

भारती विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी, व्यवस्थापक, कार्यकर्ते यांनी २ मार्च, १९९० रोजी धनकवडी शैक्षणिक संकुलात डॉ. पतंगराव कदम यांचे भव्य स्वागत केले आणि यथोचित सत्कार केला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, ''माझा विजय हा तुमच्या सर्वांच्या प्रयत्नातून मिळालेला आहे. या पदाचा उपयोग मी विधायक कामासाठी करीन. समाजकारण आणि राजकारण या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी आणि परस्परपूरक आहेत असे मी मानतो. राजकारणाचा उपयोग समाजकारणासाठी करण्याचा प्रयत्न मी करणार आहे.''

डॉ. पतंगराव कदम आमदार झाल्यामुळे सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्याचा अविकसित, मागासलेल्या व सतत दुष्काळाच्या छायेत वावरणाऱ्या जनतेला डॉ.पतंगराव कदम यांच्या रूपाने आशादायी नेतृत्व मिळाले. त्या भागातील लोकांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे उत्साहाचे तेज दिसू लागले. कुठेतरी आशेचा दिवा तेवताना दिसू लागला.

डॉ.पतंगराव कदम यांनी संपूर्ण दुष्काळी भागाची पाहणी केली आणि त्यांची खात्री झाली, की खानापूर तालुका पाण्याखाली भिजला पाहिजे. त्याशिवाय येथील जनतेला तरणोपाय नाही आणि त्या दृष्टिने त्यांचे प्रयत्न सुरू झाले. सांगली जिल्ह्याचे नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी खानापूर तालुक्याला वरदान ठरणारी ताकारी पाणीपुरवठा योजना मंजूर केली.१०० कोटी रुपये मंजूर केले आणि कामही सुरू झाले; पण त्याला म्हणावा तसा वेग येत नव्हता.

आमदार डॉ. पतंगराव कदम या वस्तुस्थितीमुळे अस्वस्थ झाले होते; कारण आपल्या आमदारपदाच्या कारकिर्दीत त्यांनी ताकारी योजनेवर ६५ वेळा विधानसभेत भाषणे केली होती. ही योजना लवकरात लवकर मूर्त स्वरूपात

यावी या मागणीसाठी १३ जानेवारी, १९८७ ला कडेगावला त्यावेळचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी, शेतमजूर यांचा मेळावा आयोजित केला होता, त्यामुळे ताकारी योजनेस चालना मिळाली, पण पुढे सत्ताबदल होऊन शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. आमदार डॉ. पतंगराव कदम यांनी मुख्यमंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली कडेगावला दिनांक १७ मे, १९९० रोजी शेतकरी, शेतमजुरांचा भव्य मेळावा आयोजित केला होता.

या मेळाव्याला या भागातील सुमारे पन्नास हजाराहून अधिक शेतकरी हजर होते. त्याचबरोबर महाराष्ट्राचे थोर विचारवंत श्री. यशवंतराव मोहिते, महाराष्ट्राचे ग्रामीणविकास मंत्री, शिवाजीराव देशमुख, पशुसंवर्धन खात्याचे राज्यमंत्री शिवाजीराव शेंडगे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष विष्णूअण्णा पाटील, खानापूरचे आमदार अनिलराव बाबर, वाळव्याचे आमदार जयंत पाटील, जतचे आमदार सनमाडीकर, तासगावचे आमदार आर. आर. पाटील, सांगली जिल्ह्याचे खासदार प्रकाशबापू पाटील, सांगली जिल्हा परिषद अध्यक्ष शिवाजीराव नाईक आणि सांगली जिल्ह्यातील अनेक नेते व कार्यकर्ते हजर होते.

या शेतकरी मेळाव्याचे संयोजक, भिलवडी-वांगी मतदारसंघाचे आमदार डॉ.पतंगराव कदम यांनी आपल्या स्वागतपर भाषणात खानापूर तालुक्याच्या विकाससंबंधित गरजेच्या गोष्टींबद्दल बोलताना म्हणाले, ''शेतकरी व शेतमजूर मेळाव्याला आणि भारती विद्यापीठाच्या बहुउद्देशीय कन्या प्रशालेच्या नूतन इमारतीच्या उद्‌घाटनाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार आल्यामुळे मला अतिशय आनंद होत आहे.''

''यापूर्वी या मतदारसंघातले दोन वेळा त्यांचे नियोजित कार्यक्रम रद्द झाले होते. त्यामुळे आमच्यासंबंधी आणि आमच्या भारती विद्यापीठासंबंधी अनेक अफवा पसरल्या होत्या. त्यामुळे या खेपेला मी ठरवले होते, की कोणत्याही परिस्थितीत मुख्यमंत्री शरद पवार आल्याशिवाय कार्यक्रम करायचाच नाही. मला खरोखर आनंद होत आहे , की तुम्ही या कार्यक्रमाला आलात. तुमचे मी भारती विद्यापीठातर्फे आणि या भागातील नागरिकांच्या वतीने हार्दिक

स्वागत करतो. मी फार मोठा भाग्यवान माणूस आहे; कारण मी जी जी स्वप्ने पाहिली ती ती स्वप्ने साकार झाली. शिक्षणाचे काम आम्ही पुण्यात सुरू केले. पुणे हे शिक्षणाचे माहेरघर आहे. येथे पावलापावलाला विद्वान सापडतात. अशा ठिकाणी भारती विद्यापीठाची स्थापना केली. ही संस्था चाकोरीबाहेरची, पूर्णपणे वेगळी शिक्षणसंस्था आहे. येथे सर्व जाती-जमातीचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. तसेच वेगवेगळ्या धर्मांचे, वेगवेगळ्या प्रांतातील अनेक अध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य काम करीत आहेत. एका वेगळ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेचे स्वरूप आम्ही आमच्या संस्थेत निर्माण केले. मला सांगायला मोठा अभिमान वाटतो, की आमच्या शैक्षणिक शाखांचा निकाल ऐंशी टक्केपेक्षा अधिक आहे. भारती विद्यापीठाने मेडिकल कॉलेजची मागणी शासनाकडे केली होती. ती मागणी मुख्यमंत्री शरद पवार यांनी पूर्ण तर केलीच; पण मला डेन्टल कॉलेज सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. आज भारती विद्यापीठात मेडिकल कॉलेज, डेन्टल कॉलेज, नर्सिंग कॉलेज, आयुर्वेदिक कॉलेज, होमिओपॅथिक कॉलेज अशी मेडिकल शाखेतील सर्व कॉलेजेस सुरू झाली आहेत. मेडिकलची सर्व कॉलेजेस सुरू करणारी भारती विद्यापीठ ही एकमेव संस्था आहे.''

'' मला सांगायला अभिमान वाटतो, की शरद पवार यांनी मुलींच्या शिक्षणासंबंधी ठोस भूमिका घेतली आहे. या त्यांच्या नव्या निर्णयाला अनुसरून आम्ही स्त्री-शिक्षणाबाबत एक वेगळी भूमिका घेतली आहे. स्त्रिया नुसत्या शिकून भागणार नाही, तर त्या स्वत:च्या पायावर उभ्या राहून स्वावलंबी झाल्या पाहिजेत. या दृष्टिने भारती विद्यापीठाने कडेगाव व पलूस येथ मुलींच्या शिक्षणाची सोय तर केलीच; पण स्त्रिया स्वावलंबी व्हाव्यात यासाठी कडेगाव येथे मुलींचे आय्.टी.आय्.सुरू केले. आज या आय्.टी. आय्.मध्ये ड्रेस मेकिंग, टी.व्ही.-रेडिओ दुरूस्ती, इलेक्ट्रॉनिक्स हे ट्रेड सुरु केले आहेत. या संस्थेतून या मुली हे शिक्षण घेऊन बाहेर पडल्यानंतरही त्यांना स्वावलंबी करण्यासाठी स्वतंत्र औद्योगिक सोसायटी स्थापन केली जाईल.''

''याशिवाय या भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी महिला आधार केंद्रही स्थापन केले जाणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या आवाहनानुसार महात्मा फुले शताब्दी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती शताब्दीनिमित्त भारती विद्यापीठ, शंभर मुली संपूर्ण शिक्षणासाठी दत्तक घेणार आहे. मला या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करायची आहे, की आम्ही कडेगाव येथे मुलींचे सिनिअर कॉलेज सुरू करीत आहोत. त्यासाठीही त्यांनी आम्हांला परवानगी द्यावी.''

''या इमारतीच्या उद्‌घाटनाबरोबर आज आम्ही येथे शेतकरी आणि शेतमजूर मेळावा आयोजित केला आहे. पुण्या-मुंबईच्या पुष्कळशा लोकांचा दक्षिण महाराष्ट्रासंबंधी बराच गैरसमज आहे. त्यांना असे वाटते, की संपूर्ण दक्षिण महाराष्ट्र ऊस, द्राक्षांनी बहरून गेला आहे; पण वस्तुस्थिती तशी नाही. या माझ्या खानापूर तालुक्याच्या पूर्व भागातली दुष्काळी अवस्था स्वातंत्र्य मिळूनही गेल्या चाळीस वर्षांत बदलली नाही. येथे पाऊस फार कमी आणि अनियमित पडतो; म्हणून महाराष्ट्राचे एक थोर नेते आणि माजी मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांना ताकारी योजना मंजूर केली; पण मला सांगायला खेद होतो, की ही योजना ज्या प्रमाणात गतिमान व्हायला पाहिजे, तेवढी ती झाली नाही आणि म्हणून माझी आपणाला विनंती आहे, की ताकारी योजनेच्या दुसऱ्या डिव्हिजनचे काम सत्वर सुरू व्हावे.''

''ही योजना सुरू झाल्यानंतर सोनहिरा साखर कारखाना या जिल्ह्यातला उत्तम कारखाना बनेल. आज या साखर कारखान्याला कृष्णा सहकारी साखर कारखान्याने तेहेतीस गावे देऊ केली आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांना मी धन्यवाद देतो; कारण त्यांनी आमच्या साखर कारखान्याची केंद्राकडे उत्तम शिफारस केली आहे. आपणाला माहीत आहेच, की हा जिल्हा कै. वसंतदादा पाटील आणि कै. यशवंतराव चव्हाण यांचा जिल्हा आहे. या दोन नेत्यांनी देशात उत्तम अशा विधायक कार्याची साखळीच निर्माण केली आहे. त्यांचे संस्कार घेऊन तुम्ही महाराष्ट्रात काम करीत आहत. या तुमच्या कार्याच्या पाठीमागे आम्ही खंबीरपणे उभे राहू आणि आपले नेतृत्व अधिक मजबूत करू, अशी येथील जनतेच्या वतीने ग्वाही देऊन मी माझे हे प्रास्ताविक संपवतो, जयहिंद! जय महाराष्ट्र ! ''

यानंतर मेळाव्याचे अध्यक्ष महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ''मला प्रथम सांगितले पाहिजे, की मी दोन वेळा कार्यक्रम ठरवूनही आलो नाही. अडचणी होत्या. ही गोष्ट खरीच आहे. त्यामुळे मी या खेपेला ठरवले होते, की डॉ. पतंगराव कदम यांच्या मतदारसंघातील हा कार्यक्रम कोणत्याही परिस्थितीत चुकवायचा नाही. त्याप्रमाणे अनेक अडचणी सहन करून मी या कार्यक्रमाला हजर राहिलो आहे.''

''आता डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले, की अफवा पसरतात. अफवा पसरणारच. तुमचा हा काळ सासुरवासाचा काळ आहे. त्यात त्रास सहन करावा लागतो. विरोध सहन करावा लागतो. आम्हीही असा दहा-दहा वर्षांचा सासुरवास सहन केला आहे. हा काळ कधीतरी संपणार असतो. तसा तुमचाही संपेल.''

''पण डॉ. पतंगराव मला हे आवर्जून सांगितले पाहिजे, की चांगल्या कामासाठी माणसे मिळत नाहीत. तुम्ही शिक्षणाच्या क्षेत्रात अतिशय चांगल्या प्रकारचे काम केले आहे. पुण्यासारख्या ठिकाणी भारती विद्यापीठासारखी उत्तम शिक्षणसंस्था तुम्ही चालवीत आहत. आज राज्य शासन पंधराशे कोटी रूपये शिक्षणावर खर्च करीत आहे. यापैकी पासष्ट टक्के रक्कम उच्च शिक्षणावर आणि पस्तीस टक्के रक्कम प्राथमिक शिक्षणावर खर्च होत आहे. आता ही परिस्थिती बदलण्याची वेळ आली आहे. आज प्राथमिक शिक्षण ज्या पद्धतीचे आणि ज्या दर्जाचे दिले जात आहे, ते पाहिले, की शिक्षणाची पुनर्रचना करण्याची वेळ आली आहे असे वाटू लागते. शंभर मुले पहिलीत प्रवेश घेऊन शाळेत गेली, की ती सर्वच मुले काही कॉलेजच्या पायरीपर्यंत जात नाहीत. या शंभर मुलांपैकी चार मुलेच फक्त कॉलेजपर्यंत जातात. म्हणजे गळतीचे प्रमाण प्रचंड आहे. ही शाळा सोडणारी मुले कोणाची आहेत? शाळा सोडणारी काही मुले बाह्यात तर असतातच, पण ती विमुक्त, भटक्या जमातीतील, आदिवासी समाजातील, मागास वर्गातील असतात. याचा सरळ अर्थ असा आहे, की आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील मुलांच्या शिक्षणाचा खेळखंडोबा चालला आहे. महाराष्ट्रात त्रेपन्न टक्के पुरूष निरक्षर आणि स्त्रिया पासष्ट टक्के निरक्षर आहेत.''

''ही जी स्थिती आहे, त्यामुळे आपण प्रगत, पुरोगामी महाराष्ट्राची कल्पनाच करू शकत नाही. सर्वांच्यापुढे मुलांच्या शिक्षणाची चिंता आहे. मुलगा शिकला पाहिजे असे प्रत्येकाला वाटते. मुलगा शिकला तर नोकरी करेल, चांगली शेती करेल, आणि हुंडाही मिळेल अशी आपली कल्पना आहे; पण मुलांबरोबर मुलींनाही शिकवले पाहिजे हा विचार आपल्या समाजात खोलवर रूजत नाही. ज्या खेड्यात सातवीपर्यंतची शाळा आहे, त्या खेड्यातल्या मुली सातवीपर्यंतच शिकतात. ज्या गावात एस्.एस्.सी. पर्यंत हायस्कूल आहे, त्या गावातील मुली एस्.एस्.सी.पर्यंत शिकतात; पण मुद्दाम मुलीला शिक्षणासाठी परगावी पाठवावे असे आपणाला वाटत नाही. ती घरात राहिली तर घरकाम करते. धाकट्या भावाला सांभाळते. यामागे आपला पूर्वग्रह आहे. तो असा, की मुलीपेक्षा मुलगा हुशार असतो; पण ही वस्तुस्थिती नाही. वस्तुस्थिती अशी आहे, की मुलांपेक्षा मुलीच अधिक हुशार व कार्यक्षम असतात. माझे एक मित्र आमदार आहेत. ते सतत आमच्याबरोबर फिरत असतात. तेव्हा मी त्यांना म्हणालो, ''अहो, तुम्ही सतत फिरत असता, मग तुमची शेतीवाडी कोण पाहते?' यावर ते म्हणाले, 'अहो, माझी बायको! माझ्यापेक्षा ती चांगल्या रीतीने शेती करते. पाहते, देखरेख ठेवते' हे उत्तर बरेच काही सांगून जाते. कर्तृत्वाचा मक्ता काही पुरुषांनाच दिलेला नाही. स्त्रीसुद्धा कर्तृत्वसंपन्न असते याची आम्ही आता कुठेतरी नोंद घेतली पाहिजे. खरा प्रश्न असा आहे, की आम्ही मुलांच्यासाठी काही गुंतवणूक करणार आहोत की नाही? एक लक्षात ठेवा, की ज्या राष्ट्रातली स्त्री घराच्या उंबरठ्याच्या आत असते, ते राष्ट्र नेहमी मागासलेले राहते. आता आपण लोकनियुक्त सर्व संस्थांत तेहेतीस टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत. त्यासंबंधी आपण कायदा केला आहे. अशा अवस्थेत स्त्री शिकली पाहिजे ही आता काळाची गरज आहे. आमदार डॉ. पतंगराव कदम यांनी मुलींच्यासाठी आय्.टी.आय्. सुरू केले, याबद्दल त्यांना धन्यवाद देतो तसेच त्यांचे अभिनंदन करतो.''

''या ठिकाणी ताकारी योजनेचा उल्लेख केला गेला. मी या संदर्भात आपणास एवढेच सांगू इच्छितो, की ताकारी योजनेचे काम युद्धपातळीवर सुरू केले जाईल. यासाठी दुसरी डिव्हीजनही कार्यान्वित होईल. माझ्या दृष्टिने यात फारशी अडचण येणार नाही.''

"शेतकऱ्यांनी आता शेतीचा वेगळ्या दृष्टिकोनातून विचार केला पाहिजे. जिथे पाणी कमी आहे तिथे आता फलोद्यानाचा कार्यक्रम राबवला पाहिजे. जे शेतकरी फलोद्यानाचा कार्यक्रम राबवणार आहेत, त्यांना शंभर टक्के अनुदान देण्यास शासन तयार आहे."

"आज प्रत्येकजण ऊसाचे पीक घेत आहे. चालू वर्षी तीन कोटी चाळीस लाख टन ऊस गाळला. महाराष्ट्राने भारतात साखर निर्माण करण्याचा विक्रम केला आहे. एवढ्या मोठया प्रमाणात ऊस पिकवल्यामुळे काही ऊसाचे गाळप झालेले नाही. त्याबाबत शासन योग्य निर्णय घेणार आहे. पण मला शेतकरी बंधूना विनंती करायची आहे, की त्यांनी ऊसाची खरी नोंद केली पाहिजे. शिक्षण कर चुकवण्यासाठी जर खोट्या नोंदी झाल्या तर आताच्यासारखे प्रश्न निर्माण होतात.

"आपण या ठिकाणी सहकारी कुक्कुटपालन संघ निर्माण केल्याचे सांगितले. डॉ. पतंगराव, ही फार चांगली गोष्ट झाली आहे. एक जुलैपासून महाराष्ट्र शासन पन्नास हजार मुलांना उकडलेली अंडी देण्याचा कार्यक्रम अमलात आणणार आहे. या नवीन योजनेसाठी कवठे महांकाळ, मिरज आणि आटपाडी तालुक्यातील तुमच्या संघाची अंडी खरेदी केली जातील."

" आमदार डॉ.पतंगराव कदम यांनी शिक्षणाबरोबरच या भागात विधायक कार्याचे जाळे निर्माण केले आहे. त्यामुळे या तुमच्या विधायक कामामागे मी भक्कमपणे उभा आहे. आपण या एवढ्या मोठ्या बहुसंख्येने येथे उपस्थित राहिलात आणि माझे विचार शांतपणे ऐकून घेतले याबद्दल मी आपला आभारी आहे."

आपल्या भिलवडी-वांगी मतदारसंघातील प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न आणि घेतलेला पुढाकार लक्षात घेऊन मुख्यमंत्री सुधाकर नाईक यांनी आपल्या मंत्रिमंडळात डॉ. पतंगराव कदम यांना शालेय शिक्षण, पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास, माजी सैनिक कल्याण खात्याचे राज्यमंत्रीपद २८ जून, १९९१ रोजी दिले. त्यानंतर १६ सप्टेंबर, १९९४ रोजी शरद पवार यांच्या मंत्रिमंडळात ते उच्च व तंत्रशिक्षण, सेवायोजन मंत्री झाले. डॉ. पतंगराव कदम यांनी आपल्या मतदारसंघात विकासाचे प्रचंड काम केले. असे असूनही १९९५ च्या

फेब्रुवारीच्या व नंतरच्या मध्यावधी निवडणुकीत दुर्दैवाने त्यांना विजय मिळाला नाही. डॉ. पतंगराव कदम म्हणतात, ''आयुष्यात मी कुणाचा हेवादावा केला नाही. क्षुद्र हेतू मनात ठेवून अनेक विध्वंसक शक्ती एकत्र येऊन कट शिजला. मी बेसावध राहिलो व पराभूत झालो.''

अशा वेळी आचार्य अत्रे यांचे शब्द आठवतात. ते म्हणाले होते, कोणत्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर अपयश पचवण्यास शिका. डॉ. पतंगराव कदम यांनी अपयश पचवले आणि सप्टेंबर १९९९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भरघोस मतांनी निवडणूक जिंकली.

१९९५ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये आणि नंतरच्या पोटनिवडणुकीमध्ये अपयश आले तरी डॉ.पतंगराव कदम यांनी घेतलेला लोकशिक्षणाचा, लोकमदतीचा, ग्रामविकासाचा, वसा कायम चालू ठेवला होता. अशातच त्यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त कडेगाव येथे दिनांक ८ जानेवारी १९९९ रोजी भव्य शेतकरी मेळावा आयोजित केला होता. त्याप्रसंगी पूर्वी दै. महाराष्ट्र केसरीस मुलाखत देताना डॉ. पतंगराव कदम म्हणाले होते, की 'ध्येय आणि जिद्द कायम असल्याने जनसामान्यांचा पाठिंबाही कायम आहे. त्यामुळे विजयाने हुरळून गेलो नाही की पराभवाने खचलेलो नाही. त्यामुळे सर्वच क्षेत्रांत विधायक भूमिका घेऊन अखंडपणे कार्यरत राहिलो आहे, यापुढेही राहीन.' या शब्दात त्यांच्या जिद्दी स्वभावाची व आत्मविश्वासाची प्रचीती येते. खरे तर ५४ व्या वाढदिवसाचा कार्यक्रम हा डॉ.पतंगराव कदम यांच्यापुढे होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराची नांदीच होती. त्यावेळी सर्व उपस्थित नेत्यांनी पूर्वी झालेली चूक पुन्हा घडणार नाही याची ग्वाही दिली. आणि वसंतदादा पाटील यांच्यानंतर सांगली जिल्ह्याचे राजकीय नेतृत्व डॉ. पतंगराव कदम यांनी करावे असेही सुचवले होते.

पुढे सप्टेंबर १९९९मध्ये महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका लोकसभेच्या निवडणुकांबरोबर घेण्याचे जाहीर झाले. दरम्यान, काँग्रेस पक्षातून फुटून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. ज्यांनी डॉ.पतंगरावांना वाढदिवशी शुभेच्छा दिल्या होत्या. ते कार्यकर्ते व नेते विरोधी पक्षात गेले. सप्टेंबर १९९९ च्या विधानसभेच्या निवडणुकीकडे साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष

लागले होते; कारण त्या वेळी प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून राज्याची राजकीय पक्षबांधणी, निवडणूक यंत्रणा, प्रचार, नियोजन इत्यादी कामांतही त्यांना लक्ष घालणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील अनेक नेते 'राष्ट्रवादीत' गेले. त्यामुळे सांगली जिल्ह्यातील काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन, ताकद व दिशा देण्याची जबाबदारीही त्यांना सांभाळायची होती. अशा परिस्थितीत भिलवडी-वांगी मतदारसंघातून त्यांना विधानसभेचे तिकीट मिळाले.

या अटीतटीच्या निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ दि. २० ऑगस्ट, १९९९ रोजी तीर्थक्षेत्र औदुंबर येथील विराट सभेत झाला. या सभेत डॉ. पतंगराव कदम यांचे स्फूर्तिदायक असे ऐतिहासिक भाषण झाले. या भाषणातून डॉ. पतंगराव कदम हे राज्यातील काँग्रेसचे खंबीर नेते, जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे आधारस्तंभ, निवडणुकीच्या रणधुमाळीत ठाम वैचारिक बैठक असलेले लढवय्ये नेते म्हणून लोकांना पुन्हा पाहावयास मिळाले. या सभेतील लाखोंच्या संख्येने हजर असलेल्या जनसागराची मने त्यांनी जिंकली.

त्यानंतरच्या व्यापक प्रचार मोहिमेत व प्रभावी जनसंपर्क मोहिमेत डॉ. पतंगराव कदम यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सर्व स्तरावर व्यापक प्रचारमोहीम राबवली आणि गावोगावी, वाड्यावस्त्यांवर, घरोघरी थेट मतदारांपर्यंत पोहोचून प्रभावी जनसंपर्क साधला.

कोणत्याही निवडणुकीतील यश हे लहानमोठ्या कार्यकर्त्यांच्या निष्ठापूर्वक प्रयत्नावर, योग्य दिशेने केलेल्या जागरूक वाटचालीवर आणि सतर्क राहून राबवलेल्या प्रचारमोहिमेवर अवलंबून असते. साहेबांचे काम हिमालयासारखे प्रचंड, उत्तुंग आहे. त्यांनी हजारो कुटुंबांचे कल्याण केले आहे. मतदारसंघात अनेक प्रकल्प-योजना राबवल्या आहेत. त्यामुळे साहेब सहज निवडून येतील. आपण विशेष कष्ट घेण्याची गरज नाही, असे विचार पूर्वीच्या दोन वेळच्या निवडणुकांत करून आपण गाफिल राहिलो, याची सर्व प्रामाणिक व निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मनात खंत व बोचणी होती. गेल्या दोन्ही वेळा निवडणुकीतील विरोधकांनी कटकारस्थाने करून डॉ. पतंगराव कदम यांना दगा दिला होता. या गोष्टी लक्षात घेऊन या निवडणुकीत डॉ.पतंगराव कदम यांचे सर्व कार्यकर्ते सुरुवातीपासूनच पूर्णपणे सावध राहून ईर्षेने कामाला

लागले होते. साहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम या कार्यकर्त्यांनी उत्तम रीतीने पार पाडले. त्यामुळे डॉ. पतंगराव कदम यांच्यासारख्या ताकदीचा, स्वच्छ प्रतिमेचा आणि धडाडीचा उमेदवारच आपल्या मतदारसंघाचा आमदार झाला पाहिजे, अशी एक लाट समस्त जनतेत आली.

डॉ. पतंगराव कदम यांचे सुपुत्र विश्वजीत कदम यांनी निवडणूक प्रचारात तरुण वर्गाचे उत्तम नेतृत्व केले. निवडणूक प्रचाराच्या काळात सकाळी सात वाजल्यापासून दिवसभर आणि रात्री ऊशिरापर्यंत तरुण मुलांना बरोबर घेऊन गावागावामध्ये, नदीकाठच्या मळीवर, वाड्यावस्त्यांवर, विश्वजीतने पदयात्रा केली. पदयात्रेत फिरताना घरोघरी वयोवृद्ध मंडळींचे दर्शन घेऊन साहेबांना मतदान करण्याबद्दल केलेली विनंती, घोंगडी किंवा गोणपाटावर बैठक मारून लोकांना साहेबांच्या कार्याबद्दल दिलेली माहिती, लोकांना दिलेला दिलासा, तरुण कार्यकर्त्यांमध्ये वाढवलेला अमाप उत्साह यामुळे विश्वजीतने साहेबांच्या प्रचारमोहिमेत जिवंतपणा निर्माण केला.

तसेच या निवडणुकीत साहेबांचे धाकटे बंधू डॉ. शिवाजीराव कदम यांनीही सिंहाचा वाटा उचलला. त्यांनी कुंडल, पलूस, रामानंदनगर, भिलवडी, अंकलखोप परिसरात प्रभावी जनसंपर्क साधल्यामुळे प्रचारकार्यात भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळाले. स्थानिक मतभेदामुळे जे कार्यकर्ते बाजूला राहिले होते त्यांना प्रचारकार्यास प्रवृत्त होण्याची दिशा मिळाली. अप्रत्यक्षपणे प्रचारकार्य करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना आपल्या कामाची कोणीतरी प्रमुखाने दखल घ्यावी असे वाटत असते ती उणीव डॉ. शिवाजीराव कदम यांनी भरून काढली.

निवडणुकीच्या प्रचारमोहिमेच्या काळात पदयात्रा, मिरवणुका, सभा, घरोघर संपर्क, मतदारप्रबोधन, कार्यकर्त्यांवर कामे सोपविण्याची जबाबदारी, प्रचारसाहित्याचा उपयोग वगैरे सर्व कामांचे नियोजन करण्याची तात्काळ व अचूक निर्णय घेण्याची गरज असते. ही जबाबदारी प्रामुख्याने सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष या जबाबदाऱ्या पार पाडलेले डॉ. पतंगरावांचे थोरले बंधू मोहनशेठ कदम यांनी सांभाळली होती. एक शांत,

संयमी, अभ्यासू व करारी स्वभावाचे, तळागाळातील लोकांमध्ये व्यापक जनसंपर्क असणारे लोकप्रिय नेते म्हणून ते ओळखले जातात. त्यांच्या प्रभावी जनसंपर्काचा निवडणुकीत मोठा उपयोग झाला.

त्याचबरोबर डॉ.पतंगराव कदम यांनी आपल्या भिलवडी-वांगी मतदार संघामध्ये अव्याहतपणे जनहिताची, विकासाची कामे सुरू ठेवली. त्यांनी सुरु केलेल्या सहकारी संस्था उत्तम व चोख चाललल्या होत्या. त्यांनी सुरू केलेली कडेगाव येथील सागरेश्वर सहकारी सूतगिरणी, सूत उत्पादन व निर्यातीमध्ये महाराष्ट्रातील पहिली सहकारी संस्था आहे. अनेक अडचणी, अडथळे पार करून सोनहिरा सहकारी साखर कारखाना सुरू होण्याच्या मार्गावर आणला होता. राजकारण करीत असताना तत्त्वनिष्ठ व स्पष्ट भूमिका असावी. निर्णय घेताना चांगले पायंडे पाडावेत, दुर्लक्षित व दुर्बल घटकांना न्याय मिळावा असा डॉ. पतंगराव कदम यांचा आग्रह असतो. त्यादृष्टिने खानापूर पंचायत समितीच्या सभापतीपदी वांगी येथील धनगर समाजातील भगवान वाघमोडे यांची नेमणूक त्यांनी करवून घेतली. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी मोहित्यांचे वडगाव या खेड्यातील सौ. मालन मोहिते या सुविद्य महिलेस काम करण्याची संधी दिली.

पारंपरिक पद्धतीने आजपर्यंत हितसंबंधांचे राजकारण करणाऱ्या इतर सर्व नेत्यांपेक्षा डॉ. पतंगराव कदम यांची कार्यपद्धती आवडली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती व जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची सोय, इंदिरा आवास योजनेखाली गरिबांना घरकुले, निराधार लोकांना संजय गांधी योजनेखाली मासिक अर्थसाहाय्य, रस्त्यांचे डांबरीकरण, शाळांच्या व समाजमंदिरांच्या इमारती उभारल्या, तसेच वेगवेगळ्या प्रसंगी सभा, समारंभ, खासगी व सार्वजनिक उपक्रमांद्वारा मतदारसंघात सतत जनसंपर्क ठेवला होता.

डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रचारमोहिमेत झालेल्या सभांमुळे जनसागर ढवळून निघाला. शेवटची प्रचारसभा दिनांक ३ सप्टेंबर, १९९९ रोजी कडेगाव येथे झाली व ती ऐतिहासिक अशी झाली; या सभेने डॉ. पतंगरावांच्या विजयाची खात्री पटवून दिली.

दि. ५ सप्टेंबर, १९९९ रोजी मतदान झाल्यानंतर मतमोजणी सुरू झाली. जसजसे प्रत्येक फेरीचे निकाल जाहीर होत, तसतसे डॉ. पतंगराव कदम यांचा विजय निश्चित होणार हे स्पष्ट झाले आणि डॉ. पतंगराव कदम यांचा विरोधकापेक्षा १७ हजार ८२९ एवढ्या मताधिक्क्याने देदीप्यमान विजय झाला.

मिरज येथील वखार महामंडळाच्या गोदामातील मतमोजणी केंद्रातून सर्वांचे लाडके नेते डॉ. पतंगराव कदम विजयी मुद्रेने विजयाच्या घोषणा देत थांबलेल्या हजारो लोकांच्या समुदायाकडे अभिवादन करीत आले, उत्साहाने, आनंदाने बेहोश झालेल्या तरुणांनी आपल्या लाडक्या नेत्याला अक्षरश: उचलून खांद्यावरून मिरवतच गाडीपर्यंत आणले. सांगलीमध्ये भारती भवन इमारतीपुढे जमलेल्या हजारो हितचिंतक कार्यकर्त्यांसमोर भाषण करताना ते म्हणाले, ''माझ्या मतदारांचा, तरुणांचा आणि कार्यकर्त्यांचा मी आभारी आहे. भागाच्या विकासासाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी ही एकी कायम ठेवून विकासकार्याच्या मोहिमेत सर्वांना सामावून घेतले पाहिजे. या निवडणुकीत जनतेने दिखाऊ, नाट, की भ्रष्टाचारी आणि दहशतवादी राजकारण्यांना दूर लोटले. दिशाभूल करणाऱ्यांना धडा शिकवला. सत्याची बाजू जनतेने उचलून धरली. युवकवर्ग जिद्दीने पेटून उठला. महिलांनी भक्कम आघाडी उघडली आणि काँग्रेसला विजयी केले. हा विजय माझ्या एकट्याचा नाही तर दमदार युवकांचा, म्हणजेच निष्ठावान कार्यकर्त्यांचा आणि जिद्दी महिला वर्गाचा, समस्त जनतेचा हा विजय आहे अशी माझी नम्र भावना आहे.'' त्यानंतर त्यांनी ''सर्वांनी आपापल्या गावी शांतपणे परत जावे'' असे आवाहन केले. हा अविस्मरणीय विजयी सोहळा समक्ष पाहण्याचे भाग्य मला लाभले होते.

भिलवडी-वांगी मतदारसंघाकडे साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले होते. डॉ.पतंगराव कदम यांना पराभूत करण्यासाठी विरोधकांनी जंग जंग पछाडल; पण डॉ. कदम यावेळी सर्वांनाच पुरून उरले. डॉ. पतंगराव यांना प्रकाशबापू पाटील, शिवाजीराव देशमुख, आनंदराव मोहिते यांची साथ मिळाली. त्यामुळे सांगली जिल्ह्यात राष्ट्रीय काँग्रेसला जे प्रचंड यश मिळाले त्यात डॉ.पतंगराव कदम यांचा सिंहाचा वाटा आहे हे विरोधकही नाकबूल करणार नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे, असे विश्लेषण 'महाराष्ट्र टाईम्स' चे सांगलीचे प्रतिनिधी रवींद्र दफ्तरदार यांनी केले.

सत्काराला उत्तर देताना आमदार डॉ. पतंगराव कदम म्हणाले, ''आपण शिक्षण, सहकार, ग्रामीण विकास, युवक व महिला कल्याण या क्षेत्रात काम केले, त्याची पावती भिलवडी-वांगीच्या जनतेने दिली. या कार्यक्षेत्रातले अडथळे दूर व्हावेत, त्याला आणखी चालना मिळावी या दृष्टिने मी राजकारणाकडे बघतो.''

''आपण उद्या मुंबईला सरकार बनवण्यासाठी जात आहोत' अशी सूचक घोषणा डॉ. पतंगराव कदम यांनी टाळ्यांच्या कडकडाटात केली. त्यामुळे आमदार डॉ. कदम यांच्यावर महाराष्ट्राच्या मंत्रिपदाची का मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी राष्ट्रीय काँग्रेस सोपवणार, याचे आडाखे बांधणे सुरू झाले.

**२००४ मधील निवडणूक वृत्तांत**

काँग्रेस पक्षाचे डॉ.पतंगराव कदम यांना निवडणुकीचे तिकीट मिळाले. प्रचार नियोजन झाले. अनेक विरोधक उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली. एकदोन किरकोळ उमेदवार रिंगणात राहिल्याने निवडणूक लागली. कडेगाव व पलूस तालुक्यांत डॉ. पतंगरावांची प्रचारफेरी म्हणजे सर्व कार्यकर्त्यांचा एकोपा झाल्याने जयजयकार चालू राहिला. प्रचंड समुदायांच्या प्रचार सभा झाल्या. विरोधक कार्यकर्तेसुद्धा डॉ. पतंगरावांच्या प्रचारात सामील झाले. गावोगावी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. 'न भूतो न भविष्यती' या प्रमाणे मतदान झाले. विजयाची खात्री सर्वांनाच झाली आणि १ लाख ३० हजार मताधिक्क्याने डॉ.पतंगराव कदम निवडून आले. आनंद सोहळा पार पडला. महाराष्ट्रात उच्चांकी मताधिक्क्याची नोंद झाली. सर्वांना आनंदाचे डोही आनंदी आनंद झाला आणि डॉ.पतंगराव कदम पुन्हा कॅबिनेट सहकार व पुनर्वसन मंत्री झाले.

डॉ.पतंगराव हे २००९, २०१४ मधील निवडणुकीत प्रचंड मताने विजयी झाले.

***

## १६. आदिवासी शिक्षण विकासासाठी भारती विद्यापीठ

भारती विद्यापीठाचे शैक्षणिक कार्य हे राजधानी दिल्ली पासून जव्हार येथील आदिवासींच्या वाड्यापाड्यापर्यंत सुरू आहे. भारती विद्यापीठाने १९९२ साली जव्हार येथे शैक्षणिक संकुल सुरू केले आहे.

जव्हार हे आदिवासी राजाचे भूतपूर्व संस्थान होते. स्वातंत्र्यानंतर जव्हार हे तालुक्याचे ठिकाण झाले. जव्हार ठाणे जिल्ह्यामध्ये येते. जव्हार संस्थान हे आदिवासी कोळी राजाचे संस्थान होते. दैन्य, दारिद्र्य, अंधश्रद्धा हे आदिवासीच्या पाचवीला पूजलेले. अविद्या हे सर्व दु:खाचे मूळ आदिवासींना शिक्षण मिळणे अत्यंत गरजेचे होते. जव्हार संस्थानमधील सर्व प्रजाही आदिवासी!

जव्हारचा पहिला राजा जयबा मुकणे हा होता. या राजाच्या प्रदेशात २२ किल्ले होते व तत्कालीन ९ लाख महसुलीचा मुलुख होता. या आदिवासी संस्थानचा इतिहास १३४३ सालापासून पुरातन असा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेवर स्वारी केली, त्यावेळी ते जव्हार मार्गावरून गेले. त्यावेळच्या जव्हारच्या विक्रम शहा राजाने महाराजांच्या टोपात शिरपेच खोचून शिरपा माल या टेकडीवर सत्कार केला होता. हे ऐतिहासिक स्फूर्तिस्थान म्हणून या टेकडीवर आजही भगवे निशाण फडकवत ठेवले जाते.

शिक्षणापासून वंचित असलेल्यांना शिक्षण देणे हे भारती विद्यापीठाचे ध्येय. आदिवासीमध्ये शैक्षणिक कार्य करण्याचा डॉ.पतंगराव कदम यांचा विचार होताच. याचवेळी अनाकलनीय अशी घटना घडली. १९९२ साली जव्हारजवळ वावरवांगी या दुर्गम पाड्यात(आदिवासींच्या १५/२० झोपड्यांच्या गावाला वाडा, पाडा असे म्हणत.) एक दुर्दैवी घटना घडली. पावसाळ्याचे दिवस होते. साथीने व कुपोषणांनी ५०/६० आदिवासींची मुले मरण पावली. त्याचे तीव्र पडसाद देशभर उमटले. प्रसार माध्यमांनी हलकल्लोळ केला. विधानपरिषदमध्ये प्रश्नोत्तरे झाली. नामदार सुधाकरराव नाईक हे त्यावेळी मुख्यमंत्री होते. घटना घडलेले वावरवांगी ठिकाण दुर्गम असल्याने मुख्यमंत्री हेलिकॉप्टरने जाऊन समक्ष पाहणी केली. आदिवासी भागामध्ये अशा घटना नेहमी घडत असत. कायमस्वरूपी यावर उपाय केला पाहिजे,

असा विचार झाला. त्यावेळी भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ.पतंगराव कदम हे शिक्षणमंत्री होते. आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड, मंत्री शंकरराव नम, जव्हार नगराध्यक्ष बबनशेठ तेंडुलकर, शिक्षणप्रेमी मंडळी यांची मंत्रालयामध्ये मिटींग झाली.

सर्वांगीण विकासाचा पाया शिक्षण असून आदिवासीमध्ये चांगले शिक्षण झाले पाहिजे. त्यावेळी भारती विद्यापीठ संस्थेने मध्यवर्ती असलेल्या जव्हार येथे शैक्षणिक कार्य सुरू करावे असा सर्वानुमते विचार झाला. भारती विद्यापीठाचे समाज परिवर्तनाचे, मानवी विकासाचे, गतिमान शिक्षणाद्वारे चाललेल्या कार्याची माहिती असल्याने भारती विद्यापीठ संस्थेचाच सर्वांनी आग्रह धरला. शिक्षण कार्य त्वरित सुरू करण्याकरिता नगरपालिकेच्या कक्षेत असलेला जव्हार राजाचा जुना राजवाडा दिला आणि डॉ.पतंगरावांनी भारती विद्यापीठाचे शैक्षणिक संकुल सुरू केले.

आदिवासी आश्रम शाळेने संकुलाची सुरुवात झाली. आदिवासी शाळेकरिता मुले कशी मिळवायची हा पहिला प्रश्न होता. आजूबाजूच्या आदिवासी वाड्यापाड्यात जायचे. लोक जमा करावे लागे. जेवणखाण मिळते, कपडालत्ता मिळतो, राहायला मिळते हे सांगावे लागत. शाळा म्हणजे काय, शिक्षण म्हणजे काय, हे त्यांना माहीत नसायचे. छोट्या मुलाला सांभाळणार कोण? घरची गुरे कोण सांभाळणार? अशी त्यांची कारणे असायची.

जंगल प्रदेशात आदिवासींची वस्ती असायची. विशिष्ट पद्धतीच्या कुडाच्या झोपड्या, शेतात काम करणारे, गुरे चारवणारे स्त्री–पुरुष. आदिवासी कमरेला लंगोटी, वरचे अंग उघडे, स्त्रियांचा वेषही तसाच. जुनीपुराणी साडी, सारे अंग उघडे, लज्जा झाकण्यापुरते कपडे असायचे.

आदिवासीमध्ये अनेक जाती आहेत. वारली, महादेव कोळी, ठाकूर, कातकरी, कोरकू, काळाम, गोंड, माडिया. कातकरी हा स्वत:ला जंगलचा राजा समजतो. जेमतेम भाताची पेज, कंदमुळे, खेकडे, मासे यावर गुजराण करणारे आदिवासी जंगलच्या राजाचा अभिमान बाळगतात. आदिवासी मुले खूप चंचल असतात. स्थिर जीवन त्यांना माहीत नाही. झाडावर वानरासारखी चढतील. नदीमध्ये मासे, खेकडे पकडतील, झाडावरील फळे तोडून खातील.

शिक्षण कार्यांकरिता नगरपालिकेने राजवाडा दिलेला होता. अनेक वर्षे तो पडून होता. नगरपालिकेचे ते जणू गोडाबूनच होते. खूप साहित्य, घाण पडून होती. इंदीर, घुशी, मांजरे यांचा सुळसुळाट होता. गावातील जनावरांचे हक्काचे निवासस्थान झालेले होते. घाणीचे तेथे साम्राज्य होते.

भारती विद्यापीठ शिक्षकांनी स्वच्छता मोहीम सुरू केली. हाताखाली आदिवासींची मुले होती. संस्थेचे संस्थापक हे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संस्थेमधील लेबर स्कीममधील 'काम करा व शिका' योजनेतील विद्यार्थी होते. त्यांच्या कार्यकर्त्यांचा आदर्श होताच. आदिवासी मुलां-मुलींकडूनच राजवाड्याची कमालीची स्वच्छता केली गेली. सारे रूपच पालटून गेले. नवख्या आदिवासी मुला-मुलींचे नृत्य बसवले होते. लता-पल्लवांनी व रांगोळ्या घालून नगराध्यक्षांच्या हस्ते व सर्व जव्हारकरांच्या उपस्थितीत संकुलाचा उद्घाटन समारंभ धुमधडाक्यात संपन्न झाला. राजवाड्याचे सारे रूपच पालटून गेलेले पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले. दिवसेंदिवस विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली. सुरुवातीला मुले कशी मिळतील ही चिंता होती. पुढे प्रवेशाकरिता रांगा लागू लागल्या. आश्रमशाळा ही अनुदानित होती. अनुदान ही मुलांच्या जेवणाकरिता व शिक्षकांच्या पगाराकरिताच होते. अंथरूण-पांघरूण, कपडे, शैक्षणिक साहित्य, भांडी फर्निचर करिता खर्च संस्थेलाच करावा लागे. जेवणाकरिता लागणारे धान्य बहुतेक आश्रमशाळा या रेशनिंगचे वापरतात. भारती विद्यापीठाकडून उत्तम प्रकारचे धान्य वापरले जाते. रेशनिंगचे धान्य वापरले जात नाही. आदिवासी मुलांच्या शिक्षणाकरिता लाखो रुपये संस्थेने खर्च केलेले आहेत. आश्रमशाळेमध्ये परिसरातील २०० वाड्यापाड्यातून विद्यार्थी शिक्षणाकरिता येतात. आदिवासींच्या मुलांच्या शिक्षणाची सोय झाली. संस्थेने इतर शाळा सुरू केलेल्या आहेत. आज या संकुलात आदिवासी आश्रमशाळा, प्राथमिक विद्यालय, माध्यमिक विद्यालय, ज्युनिअर कॉलेज, इंग्रजी प्रायमरी, प्री-प्रायमरी व माध्यमिक विद्यालय या शाखा सुरू केलेल्या आहेत. सर्व शाखांचा निकाल प्रथम क्रमांकाचा असतो. माध्यमिक शिष्यवृत्तीमध्ये मेरिटलिस्टमध्ये येतात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या वाढीकरिता विविध सांस्कृतिक विज्ञान उपक्रमांचे कार्यक्रम ठेवले जातात. क्रीडा स्पर्धा ठेवल्या जातात. सर्व सुविधांनी सज्ज अशा प्रयोगशाळा आहेत.

सांस्कृतिक स्पर्धेत, क्रीडा स्पर्धेत मुलांना उच्च दर्जाची पारितोषिके मिळतात. ३० आदिवासी मुलांनी सुरू झालेल्या संकुलात आज २००० विद्यार्थी शिक्षण घेतात. या संकुलामध्ये परिसरातील दीडदोनशे वाड्यापाड्यांतून मुले-मुली येतात.

शाखा विस्ताराच्या दृष्टिने राजवाड्यातील जागा अपुरी पडू लागली. संकुलाकरिता संस्थेने स्वत: ११ एकर जागेची खरेदी केली. त्या जागेवर सर्व सुविधाने सुसज्ज अशी संकुलाची ४ कोटींची भव्य वास्तू उभी केली आहे. ही वास्तू पाहण्याकरिता लोक येतात. भारती विद्यापीठ शैक्षणिक संकुलाच्या वास्तू, वास्तूशास्त्राच्या सौंदर्याने नटलेल्या भव्य व संबंधित शाखांना लागणाऱ्या सुविधांनी परिपूर्ण असतात. जव्हार जवळ विक्रमगड येथेही डॉ.पतंगराव कदम यांनी आदिवासी संकुल सुरू केले आहे.

जव्हार येथील आदिवासी विकास संकुलाच्या वास्तूचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री ना. सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते २ फेब्रुवारी, २००४ रोजी झाले. या समारंभाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री मधुकरराव पिचड होते. या कार्यक्रमास आदिवासी खासदार रामजी बरढा, दामू शिंगडा, नगराध्यक्ष बबनराव तेंडुलकर आदि मान्यवर व परिसरातून वीस हजार लोक उपस्थित होते. सुरुवातीला सहकार्यवाह विश्वजीत कदम यांनी मान्यवरांचा मुख्यमंत्र्याच्या हस्ते स्वागत केले. रानफुलांनी नटलेल्या मण्यांच्या माळांनी, मोरपिस लावलेल्या सज्ज केलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांनी ढोलाच्या तालावर देहभान हरपून टाकेल अशा नृत्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

''डॉ.पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाद्वारे जव्हार येथे शैक्षणिक संकुल उभे करून आदिवासींच्या जीवनामध्ये प्रकाश निर्माण केला असून आदिवासी भागातील त्यांचे कार्य गौरवपूर्ण आहे,'' असे मुख्यमंत्री यांनी धन्योद्‌गार काढले. मंत्री मधुकरराव पिचड म्हणाले, ''जंगलात, डोंगरकपारीत राहणाऱ्या आदिवासीचा प्रश्न सामाजिक जाणिवा असणारीच माणसे सोडवू शकतात. वंचिताला शिक्षण देण्याचे ऐतिहासिक कार्य डॉ.पतंगराव कदम यांनी केलेले आहे.'' भारती विद्यापीठाचे संस्थापक-कुलपती डॉ.पतंगराव कदम म्हणाले, ''जव्हार येथील आदिवासींचे संकुल देशातील एक आदर्श संकुल

करण्याचे प्रतिपादन केले.'' भारती विद्यापीठाचे आजीव सेवक व डॉ.पतंगराव कदम यांचे सुरुवातीपासूनचे निष्ठावंत सहकारी बा. ग. पवार यांनी भारती विद्यापीठ आदिवासी संकुलाचे सुरुवातीपासून संघटक म्हणून काम केले. त्यांचा संस्थापक-कुलपती डॉ.पतंगराव कदम व मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते मानचिन्ह देऊन गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला.

❊❊❊

## १७. दूरदृष्टिने हिताचे निर्णय घेणारे शिक्षणमंत्री

डोक्यावर पत्र्याची पेटी घेऊन सोनसळहून डॉ. पतंगराव, सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या शिवाजी कॉलेजमध्ये आले. 'कमवा व शिका' योजनेखाली महाविद्यालयीन शिक्षण कष्टाने सुरु केले. त्यानंतर पुण्याच्या वाडिया कॉलेजमधून अनेक अडचणींना तोंड देत टी. डी. झाले.

शिक्षणात आपल्याला आल्या तशा अडचणी इतरांना येऊ नयेत म्हणून शिक्षणक्षेत्रातच कार्य करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. काही काळ अर्धवेळ शिक्षकांची नोकरी करून भारती विद्यापीठाची १० मे, १९६४ रोजी स्थापना केली. या विद्यापीठाच्या बालविकास मंदिर, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, वैद्यकीय आणि तंत्रज्ञानाची महाविद्यालये, व्यवस्थापनशास्त्राची महाविद्यालये, अशा आज १८० च्या वर शाखा आहेत. हजारो प्राध्यापक, शिक्षक ज्ञानदान करीत आहेत व लाखो विद्यार्थी त्याचा लाभ घेत आहेत. पुढे याच विद्यापीठाचे ते तहह्यात कुलपती झाले. एक नामवंत कृतिशील शिक्षणतज्ज्ञ म्हणून डॉ.पतंगराव कदम आता सर्वांना परिचित आहेत.

शिक्षण क्षेत्रातील असा गाढा अनुभव असलेले डॉ.पतंगराव कदम शासनाची शैक्षणिक धोरणे राबवीत होते. त्यांच्यावर आता महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण ठरवण्याची, राबवण्याची व कार्यान्वित करण्याची जबाबदारी आली. भिलवडी-वांगी मतदारसंघातून निवडून आलेले आमदार डॉ.पतंगराव कदम यांची सुधाकर नाईक यांच्या मंत्रिमंडळात शिक्षण खात्याचे राज्यमंत्री म्हणून दि.२६ जून, १९९१ रोजी निवड झाली.

भारती विद्यापीठाचे संस्थापक-कार्यवाह डॉ.पतंगराव कदम यांचा महाराष्ट्र मंत्रिमंडळात शिक्षण, तंत्रशिक्षण खात्याचे राज्यमंत्री म्हणून समावेश झाला. या घटनेने भारती विद्यापीठ परिवाराला अतिशय आनंद झाला. गेली २७ वर्षे शिक्षण क्षेत्रात डॉ.पतंगराव कदम यांनी निरलसपणे सेवा करून शैक्षणिक कार्याचा एक हिमालयच उभा केला.

दि.२८ जून, १९९१ रोजी राजभवनावर राज्यमंत्री म्हणून शपथविधी झाल्यावर आपल्या खात्याची सूत्रे डॉ.पतंगराव कदम यांनी हाती घेतल्यावर पुणे येथील भारती विद्यापीठाच्या सत्कार सोहळ्यासाठी दि. ११ जुलै, १९९१ गुरूवारी सकाळी साडेनऊ वाजता भारती भवन येथे त्यांचे आगमन झाले. भारती विद्यापीठाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे हार्दिक स्वागत केले.

भारती भवनच्या आठव्या मजल्यावरील सभागृहात डॉ.पतंगराव कदम यांचा वेगवेगळ्या विभागांतर्फे पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. भारती विद्यापीठातर्फे सहकार्यवाह डॉ.शिवाजीराव कदम यांनी पुष्पहार अर्पण केला.

सत्काराला उत्तर देताना डॉ.पतंगराव कदम म्हणाले, ''महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मला स्थान मिळाले, याचा मला जरूर आनंद आहे; पण त्याहीपेक्षा मी जे शिक्षणाचे कार्य गेली सत्तावीस वर्षे करीत आलो आहे, त्यात मला जास्त आनंद आहे; शेवटी सत्तेपेक्षा सेवा मोठी आहे. आता मी मंत्री झाल्यामुळे माझी उपस्थिती येथे फारशी असणार नाही. त्यामुळे येथील सेंट्रल ऑफिसच्या सर्व सेवकवर्गाने अतिशय आत्मियतेने आणि जिव्हाळ्याने आपले काम करावे. कुणीतरी आपल्यावर सुपरव्हिजन करीत आहे असे समजून काम करावे.''

त्याच दिवशी दुपारी तीन वाजता एरंडवणे शैक्षणिक परिसरातर्फे डॉ. पतंगराव कदम यांचा सत्कार करण्यात आला. या परिसरातील भारती विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक शाखा व त्यामधील विद्यार्थी, प्राध्यापक, अध्यापक, सेवक व नागरिक मोठ्या संख्येने हजर होते. पौड रोडवरून संस्थेच्या प्रवेशद्वारापर्यंत दुतर्फा विद्यार्थी-विद्यार्थिनी गणवेशात उपस्थित होते. त्यामधून जात असताना बँड, लेझिम, झांज यांची पथके जोशात नृत्य करीत चालली होती. ठिकठिकाणी मंत्रिमहोदयांना सुहासिनी पंचारतीने ओवाळत होत्या.

सत्कारानिमित्त प्रास्ताविक करताना प्राचार्य व. भा. म्हेत्रे म्हणाले, ''डॉ.पतंगराव कदम मंत्री झाल्याने भारती विद्यापीठ परिसराला अतिशय आनंद होत आहे. भारती विद्यापीठाच्या जीवनात आजचा दिवस सुवर्णदिन म्हणून गणला जाईल.'' शाखाप्रमुखांच्या समयोचित भाषणानंतर श्री.शंकरराव खरात

म्हणाले, ''शिक्षणाच्या क्षेत्रातही आता चातुर्वर्ण्य आले आहे, याचा विचार डॉ.पतंगराव कदम यांना करावा लागणार आहे.''

यानंतर डॉ. पतंगराव कदम सत्कारास उत्तर देताना म्हणाले, ''खरे तर मी नाईलाजाने मंत्रिमंडळात सामील झालो आहे. भारती विद्यापीठाचे काम हे ईश्वर सेवेसारखे काम आहे. गेली सत्तावीस वर्षे मी या ठिकाणी काम करीत आहे. या कामातूनच मला अनेक गोष्टी साध्य करता आल्या. राष्ट्रीय एकात्मता, सहकार, ग्रामीण विकास इत्यादि अनेक गोष्टी मी भारती विद्यापीठाच्या अनुषंगाने करीत आहे. आज मला महाराष्ट्र पातळीवर काम करायला मिळत आहे, याचा मला जरूर आनंद आहे. विशेषत: शिक्षणासारखे मानवात आमूलाग्र बदल करणारे माध्यम माझ्याकडे आल्यामुळे–मला आता नव्याने मुलभूत विचार करावा लागणार आहे. प्राथमिक शिक्षण हे आजचे सर्वांत दुर्लक्षित खाते आहे. त्याबाबत नव्याने धोरण आखण्याची गरज निर्माण झाली आहे. लवकरच यासंबंधी निर्णय घेतला जाईल.''

अंगी कर्तृत्व व नेतृत्व असलेल्या डॉ. पतंगराव कदम यांनी सांगली जिल्ह्यातील नेत्यांना राजकीय कर्तृत्व दाखवण्याचे आवाहन केले होते.

शिक्षणक्षेत्राइतकेच राजकीय रंगमंचावर डॉ. पतंगराव कदम ठळकपणे चमकू लागले. शिक्षणक्षेत्रात राजकारण आडवे आले नाही, की राजकारण करीत असताना शिक्षणक्षेत्र अडथळा निर्माण करू शकले नाही. दोन्ही आघाड्यांवर सारख्याच प्रमाणावर त्यांनी पकड घेतली आहे.

अशी चतुरस्त्र व्यक्ती क्वचितच पाहावयास मिळते. अशी व्यक्ती ज्या क्षेत्रात जाईल त्या क्षेत्रात केवळ विजयाचाच इतिहास लिहिला जातो. सर्वांना असे भाग्य लाभत नाही. हे भाग्य डॉ. पतंगराव कदम यांच्यासारख्या एखाद्याच व्यक्तीच्या भाळी लिहिलेले असते. अशी ही महान व्यक्ती सांगली जिल्ह्यातील आहे, याचा आमच्याबरोबरच असंख्य लोकांना अभिमान आहे.

'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' या संत उक्तीतील गर्भितार्थ डॉ. पतंगराव कदम यांच्या बाबतीत तंतोतंत लागू पडतो. विजिगीषू वृत्तीने त्यांनी शिक्षण क्षेत्रात प्रवेश केला आणि आज त्यांच्या कार्याचे क्षेत्र अवघा

महाराष्ट्र व्यापून टाकू पाहतो आहे. डॉ. पतंगराव कदम यांना शिक्षण राज्यमंत्री म्हणून जी संधी मिळाली आहे त्या संधीचा फायदा अर्थातच शिक्षण आणि तंत्रशिक्षण या विभागाला महाराष्ट्रात जरूर होणार आहे. त्याचबरोबर सध्याच्या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल होऊन जीवनाभिमुख शिक्षणपद्धती सुरू करण्यासाठी डॉ. पतंगराव कदम पावले उचलतील असे वाटते.

डॉ. पतंगराव कदम शिक्षण राज्यमंत्री झाल्यावर त्यांची मुलाखत सुभाष सूर्यवंशी यांनी 'लोकराज्य' पाक्षिकाकरता घेतली होती. त्यावेळी त्यांनी विविध विषयांवर आपले स्पष्ट विचार मांडले होते.

महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक धोरणाबद्दल त्यांनी सांगितले, की महाराष्ट्र राज्य शैक्षणिक दृष्ट्या प्रगतिपथावरचे राज्य आहे. त्याची कारणे अनेक आहेत. आपल्या राज्यामध्ये महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, महर्षी अण्णासाहेब कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील अशा अनेक महान नेत्यांनी शैक्षणिक चळवळीला दिशा दिली. रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी अशा अनेक संस्थांचा आपल्याला नामोल्लेख करता येईल, की ज्यामुळे शैक्षणिक कार्य महाराष्ट्रामध्ये फार चांगले झाले आहे. आजपर्यंत महाराष्ट्रात खासगी शिक्षणसंस्था लोकांच्या आश्रयावर आणि काही अंशी शासनाच्या मदतीवर चालत होत्या; परंतु त्यांच्यांत महत्त्वाचा बदल वसंतदादा पाटील मुख्यमंत्री असताना १९८३ साली झाला. वसंतदादांनी विनाअनुदान तत्त्वावर इंजिनिअरींग, पॉलिटेक्निक, मेडिकल कॉलेजेस काढण्याची परवानगी देण्याचा अत्यंत धाडसी निर्णय घेतला. त्या निर्णयाची पार्श्वभूमी अशी आहे, की १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून राज्यामध्ये इंडस्ट्रीज खूप मोठ्या प्रमाणावर वाढल्या. परंतु तांत्रिक शिक्षण देणारी एकही संस्था शासन काढू शकले नाही. वसंतदादांनी १९८३ साली निर्णय घेतल्यानंतर आजचे सुधाकर नाईक हे त्यावेळी शिक्षणमंत्री होते. त्यांनी धाडसाने ही योजना राबवली आणि त्या वेळी सुरू केलेली इंजिनिअरींग, पॉलिटेक्निक कॉलेजेस कमीत कमी ७० टक्के उत्तम तऱ्हेने काम करीत आहेत.

शिक्षणक्षेत्रातील वाटचालीबद्दल सांगताना ते म्हणाले, ''एकशिक्षकी शाळेतील समस्या काय आहेत ते मला ठाऊक आहे. स्वावलंबनाचे शिक्षण

घ्यायचे ही कर्मवीर भाऊराव पाटील यांची घोषणा होती. त्या घोषणेला अनुसरून मी टीचिंग डिप्लोमा कोर्स पुरा केला आणि रयत शिक्षण संस्थेत अर्धवेळ शिक्षकाची नोकरी केली. आज मी रयत शिक्षण संस्थेचा एक विद्यार्थी, सेवक, कार्यकर्ता व कार्यकारी मंडळाचा सदस्य आहे. त्यामुळे माध्यमिक शिक्षण, त्यातले प्रश्न यांची मला पूर्ण जाणीव आहे.

''महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्रातील जटिल प्रश्नाबाबत त्यांनी सांगितले, की मुंबई विद्यापीठाचा एकशे चौतीस वर्षांचा इतिहास मागे टाकून मतांचा उच्चांक करून मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर निवडून आलो. त्यामुळे शिक्षणामध्ये आज जे अनंत प्रश्न आहेत, त्या सर्व प्रश्नांची थोडी फार जाणीव व कल्पनाही मला आहे. साक्षरतेचे प्रश्न, प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेचे प्रश्न, ग्रामीण भागातील शाळांमधील मुलांचे गळतीचे प्रश्न, स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रश्न, आदिवासी आणि इतर मागासलेल्या मुलांचे प्रश्न असे विविध प्रश्न आज या क्षेत्रामध्ये आहेत.''

''महाराष्ट्र राज्याचा शिक्षण राज्यमंत्री म्हणून मला सातत्याने असे वाटते, की कुठेतरी ठाम व ठोस नियोजन व निर्णय घेण्याची आवश्यकता आहे आणि म्हणून एकशिक्षकी शाळेमधील अडचणी दूर करून सक्तीचे प्राथमिक शिक्षण गुणवत्तेच्या दृष्टिने अधिक प्रभावी कसे होईल, विद्यार्थ्यांची गळती कशी थांबेल, याला अग्रक्रम देण्याची गरज आहे. मुलींच्या शिक्षणाला, आदिवासी विभागातील शिक्षणाला अग्रक्रम देण्याची गरज आहे. राज्यात आर्थिकदृष्ट्या अतिशय मागासलेले वर्ग आहेत. त्यांची मुले शाळेत न जाता गुरेढोरे वळणे, घरातील लहान भावंडांना सांभाळणे आदी कामाला लागतात. अशा मुलांसाठी वेगळा विचार करण्याची गरज आहे. ही मुले शाळेत कशी येतील. या मुलांना दुपारचे जेवण सकस आहाराद्वारे देता आले तर ते आवश्यक आहे, असे मला वाटते. तेव्हा प्राथमिक शिक्षणाच्या सगळ्या प्रश्नांचा आपल्याला विचार करावा लागेल.''

''माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत खासगी शिक्षणसंस्थांना प्रोत्साहन देण्याची अधिक गरज आहे आणि उच्च शिक्षणाच्या बाबतीत शासनाला यापुढील काळात अधिक खर्च करणे परवडणार नाही. त्यासंबंधीचे वास्तववादी

स्वरूपाचे निश्चित असे धोरण वसंतदादांनी घेतलेले होते. त्यानंतर कायदा झाला. या सर्वांचा विचार करून पूर्वी ज्या पद्धतीने महाराष्ट्रामध्ये काही सरकारी मदत आणि बाकी समाजाने शिक्षणाची सर्व सामाजिक चळवळ म्हणून जी धुरा सांभाळली, त्याच पद्धतीने पुन्हा एकदा वातावरण निर्माण करण्याची गरज आहे.''

''जग एकविसाव्या शतकाकडे जात असताना विज्ञान व तंत्रज्ञानाच्या शिक्षणाबद्दल सांगताना ते म्हणाले, एकविसाव्या शतकाकडे तर आपल्याला जावेच लागेल. याबद्दल जाणकारांची अनेक मते आहेत. आपल्या देशामध्ये अजून आपली सर्व क्षेत्रामधली गती ही वेगाची नसते. तरीसुद्धा जग ज्या वेगाने विज्ञानाकडे आणि तंत्रज्ञानाकडे झेपावत आहे त्याकडे आपल्याला दुर्लक्ष करून चालणार नाही, म्हणून आपल्याला एकविसाव्या शतकाकडे जेट विमानाच्या वेगाने जावे लागणार आहे. वेगाने जात असताना बॅकलॉग भरून काढण्याच्या बाबतीतही याचेही आपल्याला नियोजन करावे लागेल.''

''थोर शिक्षणतज्ज्ञ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक चळवळीचा मागोवा घेताना त्यांनी सांगितले, की ''कर्मवीर भाऊराव पाटलांचे ग्रामीण भागातील शैक्षणिक कार्य आणि क्रांती सर्वांच्याच परिचयाची आहे. प्रथम व्हॉलंटरी प्राथमिक शाळा काढल्या. ज्या वेळेला प्राथमिक शाळा काढण्याचा शासनाने निर्णय घेतला, त्यावेळी त्या शाळा अण्णांनी शासनाला देऊन टाकल्या आणि माध्यमिक शाळा सुरू केल्या. त्यासाठी त्यांना सर्वार्थाने लोकांचा सहभाग मिळाला. यामुळे रयत शिक्षण संस्था ही खऱ्या अर्थाने रयतेची-लोकांनी चालवलेली लोकांच्या गरजेतून निघालेली असे त्याचे वातावरण तयार झाले होते. पुढे शासनाने शाळांना अनुदान देण्याची पद्धत सुरु केल्यामुळे कर्मवीरांनी, जो लोकांनी लोकांसाठी शिक्षणसंस्था काढण्याचा वसा दिला होता, तो स्वतंत्रपणे शाळा काढण्याचा वसा काहीसा मंदावला, असे मला वाटते.''

मुलींच्या शिक्षणावर भर देण्यासंबंधी, त्यांना सोई उपलब्ध करून देण्यासंबंधी, अपेक्षा व्यक्त करताना ते म्हणाले, ''मुलींच्या शिक्षणाची महत्त्वाची समस्या आहे, ती सोडवण्यासाठी माझ्या मते मुलींना त्यांच्या

गावामध्ये शिक्षण मिळाले पाहिजे; परंतु सर्वच गावामध्ये शाळा निर्माण करणे शक्य नाही. ते परवडणार नाही. म्हणून त्यासाठी तालुक्याच्या गावाला आणि एकदोन भागात जेथे मुलींचे शिक्षण व्हायचे आहे तेथे वसतिगृहाची सोय केली पाहिजे. त्याचबरोबर वसतिगृहात जेवणाची सोयदेखील माफक दरात करून इतर सुविधा मिळवून दिल्याशिवाय मुलींचे शिक्षण होणार नाही; म्हणून पुढच्या काळात मुलींच्या शिक्षणाचा जास्तीत जास्त विचार करताना शाळांचे जाळे पसरवणे आणि ज्या ठिकाणी शाळा काढू शकणार नाही अशा परिसरामध्ये मोठ्या गावात किंवा तालुक्याच्या ठिकाणी मुलींच्या वसतिगृहांची सोय, हा एकच उपाय होऊ शकतो.

वर सुचवलेली योजना भारती विद्यापीठाने राबवलेली आहे. त्याबद्दल सांगताना ते म्हणाले, की ''कडेगाव येथे तालुक्याचे गाव नसलेल्या ठिकाणी आम्ही मुलींची शाळा सुरू केली. महाराष्ट्रातील पहिले मुलींचे आय्.टी. आय्. सुरू केले. तेथील मुलींना मोफत शिक्षण दिले. खेड्यापाड्यातून मुली येतात. त्यांना संस्था बसच्या पासाचे पैसे देते. त्यानंतर त्याच ठिकाणी एक वसतिगृह सुरु केले. तेथे शंभर मुली आहेत. सर्व मुलींना राहण्याची, जेवणाची मोफत सोय केली आहे. आय.टी.आय्.ची सरकारमान्य फी पंधराशे रूपये आहे; परंतु आम्ही एकाही मुलीकडून एक रूपयादेखील फी घेत नाही. मुलींचे शिक्षण देखील मोफत केले जाते. आता कॉलेजही सुरू केले असून मुलींना त्याच सवलतीत कॉलेजचे शिक्षण घेतानाही देत आहोत. त्यामुळे ज्या गावात एकही मुलगी शिकली नव्हती. अशा गावातूनसुद्धा अतिशय मोठ्या प्रमाणात कडेगावात मुली येऊ लागल्या आहेत आणि मुलींचे पर्यायाने स्त्रियांचे शिक्षण म्हणून खानापूर तालुक्यात एक क्रांतीचे पर्व सुरू झाले, असा अनुभव आम्हाला आणि परिसरातील जनतेला येऊ लागला आहे.''

सहकारी चळवळ आणि शैक्षणिक चळवळ एकमेकांना परस्पर पोषक होऊ शकतात. याबद्दल बोलताना ते म्हणाले, ''सहकार आणि शिक्षण यांचा भारती विद्यापीठाने जसा प्रयोग केला त्या पद्धतीने सहकारी संस्था-साखर कारखान्यांनी काही संस्था काढलेल्या आहेत; परंतु. प्राथमिक शाळांच्या इमारतीचे प्रश्न, माध्यमिक शाळांच्या इमारतींचे प्रश्न आहेत. सहकार

चळवळीतून मोठ्या प्रमाणावर निधी उभा केला पाहिजे. मी तर म्हणेन, राज्यपातळीवरील फायनान्स कॉर्पोरेशनसारख्या संस्थांनी इमारतीसाठी, शाळांना लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी किंवा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांसाठी कर्ज दिले पाहिजे. सहकारी चळवळ आणि शैक्षणिक चळवळ या अधिकाधिक एकमेकांना पोषक कशा होतील या पद्धतीने विचारविनिमयाने निर्णय घेण्याची आजच्या परिस्थितीत फार मोठी आवश्यकता आहे.''

तंत्रशिक्षणाचा प्रसार तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याबद्दलच्या शासनाच्या प्रस्तावित योजनांबद्दल खुलासा करताना ते म्हणाले, ''राज्याने आता केंद्राच्या योजनेप्रमाणे दहा अधिक दोन अधिक तीन हा अभ्यासक्रम स्वीकारला आहे. त्यामध्ये कल्पनाच अशी आहे, की दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या मुलांना बौद्धिकदृष्ट्या शिक्षणाची शक्यता कमी आहे किंवा आर्थिकदृष्ट्या पुढील शिक्षण घेणे शक्य नसेल, तर अशा मुलांनी छोटे छोटे कोर्सेस घेऊन व्यवसाय करावेत. ज्याला आपण व्होकेशनल म्हणतो ते. मोठ्या प्रमाणात ११ वी, १२ वीला असे व्होकेशनल कोर्सेस द्यायचे शासनाचे धोरण आहे.''

''शैक्षणिक कार्य ज्या संस्था करू शकतात, त्यांना केंद्र सरकारची ७५ टक्के ग्रॅन्ट आहे. राज्य शासन २५ टक्के खर्च देते. तेव्हा त्यालाही प्रोत्साहन देण्याची गरज आहे. इंजिनिअरींग व पॉलिटेक्निकमध्ये खूप सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. शासनाच्या वतीने आता आय्.टी.आय्. सुरू झाली आहेत. काही खासगी संस्था पुढे आल्या तर त्यांनासुद्धा शासन विनाअनुदान तत्त्वावर आय्.टी.आय्.सुरू करण्यास संमती देण्याचे धोरण ठरवू शकेल.''

ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा खालावल्याबद्दल बोलताना ते म्हणाले, की ''ग्रामीण तसेच नागरी भागातसुद्धा काही ठिकाणी अशी परिस्थिती आहे खरी. शिक्षणाचा दर्जा विशेषत: प्राथमिक शिक्षणाचा दर्जा – फारच खालावला आहे. त्यासाठी केंद्र शासनाच्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला आहे, की शिक्षणाची जबाबदारी त्या त्या गावच्या पालक, विद्यार्थी, इतर लोक यांनी उचलावी. त्या ठिकाणी शिक्षणसंस्थेची काळजी घेण्यासाठी पन्नास टक्के स्त्रियांचा सहभाग असलेली सर्वसमावेशक अशी एक

समिती नेमायची, सर्व लोकांचे प्रतिनिधी असलेल्या समितीनेच सर्वसाधारणपणे आपली शाळा योग्य चालली आहे की नाही हे पाहायचे आहे. शाळा उत्तम चालण्यासाठी शाळेचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टिने कोणते नवे प्रयोग करता येतील. त्याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

''राज्यात आतापर्यंतचे झालेले शिक्षणाचे कार्य पुन्हा एकदा तपासून पाहून ते बरोबर चालले आहे काय, त्यात काय त्रुटी आहेत, याचा आढावा घेऊन त्यात सुधारणा केल्या पाहिजेत, त्यांचे एकदा पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ आली आहे, असे माझे मत आहे. गरजेप्रमाणे शाळा काढणे, मग त्या कोणी मागितल्या आहेत याचा विचार न करता निर्णय घेतले जाणे या सर्व बाबींच्या नियोजनाची गरज आहे.

शिक्षण घेतलेला तरूण स्वयंरोजगारामुळे स्वावलंबी होण्यासाठी काय करता येईल, याबद्दल सांगताना ते म्हणाले, सबंध शिक्षणाचा आपण आजपर्यंत जो अर्थ लावला आहे तोच मुळी बदलला पाहिजे आणि बदललेला अर्थ विद्यार्थ्यांना समजावून सांगणे गरजेचे आहे. 'नोकरीसाठी-शिक्षण' ही अवस्था-ही भूमिका बदलली पाहिजे. यापुढच्या काळात शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतो, स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा विश्वास त्याच्यात निर्माण होतो. समाजात वावरताना व्यवहार समजून घेण्याची क्षमता त्याच्यात निर्माण होते आणि त्यासाठीच आपण शिक्षण घेतो, ही भूमिका त्याने घेतली पाहिजे. तांत्रिक शिक्षणाने तयार होणाऱ्या सर्व पदवीधरांना नोकऱ्या लागतील ही अपेक्षा यापुढे करता येणार नाही. त्यांतल्या काही लोकांना नोकऱ्या लागतीलही; परंतु बाकीच्यांनी नोकरीसाठी तिष्ठत न बसता स्वत:चा उद्योग सुरू करावा. त्यातून तरूणात स्वबळावर उभे राहण्याचा आत्मविश्वास निर्माण करावा. स्वत:चा व्यवसाय, कामधंदा उभा करण्यासाठीच घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करण्याची गरज आहे. त्यासाठी राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा सहकारी बँकांची मदत घ्यावी. तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीत पुढे या पद्धतीची भूमिका आणि या पद्धतीची कल्पना ही समाजात रुजवण्याची अतिशय गरज आहे आणि ही कल्पना रुजली, की या तांत्रिक शिक्षणाचा निश्चितपणे इतर कोणत्याही शिक्षणापेक्षा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही असा मला विश्वास वाटतो.''

डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे शालेय शिक्षण खात्याचा स्वतंत्र कार्यभार सोपवला होता. त्यानंतर पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास, माजी सैनिक कल्याण या खात्यांचा अतिरिक्त कार्यभारही त्यांच्यावर सोपवला होता.

डॉ.पतंगराव कदम भारती विद्यापीठाचे कार्यवाह म्हणून २७ वर्षे काम पाहत होते. पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर १२ वर्षे सदस्य होते. मुंबई विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर विक्रमी मतांनी निवडून आले होते. रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद संस्था, डेक्कन एज्युकेशन संस्था, सिम्बॉयसीस संस्था अशा शिक्षण संस्थांत मार्गदर्शक सदस्य व पदाधिकारी म्हणूनही काम पाहत होते. डॉ. पतंगराव कदम यांना माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांपासून विद्यापीठापर्यंतच्या सर्व शिक्षण संस्थांतील कार्यपद्धतीचा भरपूर अनुभव आहे.

डॉ.पतंगराव कदम शालेय शिक्षण राज्यमंत्री झाल्याबरोबर प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, शालेय शिक्षणाची गुणवत्तावाढ, मुलींच्या शिक्षणाला अग्रहक्क,दुर्लक्षित आदिवासी मुलांकरिता आश्रमशाळा अशा महत्त्वाच्या कामांना त्यांनी प्राधान्य दिले-चालना दिली. राज्यातील मुले-मुली कोणत्याही परिस्थितीत प्राथमिक शिक्षणाच्या सुविधेपासून वंचित राहू नयेत, म्हणून राज्यात प्रत्येक एक किलोमीटर अंतरावर प्राथमिक शाळा असा महत्त्वपूर्ण पुरोगामी निर्णय घेतला. याबरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थिनींची घटती उपस्थिती पाहून त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी विद्यार्थिनींना प्रतिदिन एक रूपया उपस्थिती भत्ता देण्याचा निर्णय घेतला. त्याकरिता पंधरा कोटी रूपयांची व आदिवासी मुलांना पुस्तके देण्यासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद केली. मराठवाड्यात चार हजार शाळांना जोडून बालवाड्या सुरु केल्या. एकशिक्षकी पंधरा हजार शाळांचे रूपांतर दोनशिक्षकी शाळांमध्ये केले. दहा हजार नवीन शिक्षकांच्या भरतीचा निर्णय घेतला.

शालेय विद्यार्थ्यांना दररोज मोफत दूध, अंडी, पोषक आहार योजना, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तक पेढी, ग्रामीण परिसरातील शाळांवर स्थानिक समित्यांची नियुक्ती, तसेच त्यांत महिलांना प्राधान्य असे अनेकविध विधायक निर्णय डॉ. पतंगराव कदम यांनी घेतले. शाळा प्रवेशामध्ये सुलभता, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची व २० कलमी कार्यक्रमातंर्गत शैक्षणिक उपक्रमांची

धडाडीने कार्यवाही, प्रौढसाक्षरता, पाठ्यपुस्तकनिर्मिती महामंडळाच्या कार्यास गती, देशातील पहिल्या शिक्षक भवनासाठी राज्य शासनामार्फत ९४ लाखाचा निधी उभारण्यास साहाय्य, पाटबंधारे खात्यांतर्गत पाटबंधारे योजनांना गती व ताकारी योजनेचे काम अधिक वेगाने पूर्ण होण्यासाठी विशेष प्रयत्न अशी ऐतिहासिक कामे डॉ.पतंगराव कदम यांनी केली.

शारीरिक शिक्षण हा दुर्लक्षित विषय होता. खिलाडू वृत्तीने, आरोग्यसंपन्न नागरिक तयार होण्याच्या दृष्टिने शारीरिक शिक्षणाला महत्त्व देऊन त्याची कार्यवाही केली. असे अनेक ऐतिहासिक निर्णय घेऊन डॉ. पतंगराव कदम यांनी राज्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागाचा चेहरामोहराच बदलला.

शिक्षणखात्याचे मंत्री म्हणून काम करण्यास त्यांना एक वर्षाचा कालावधी मिळाला.फेब्रुवारी, १९९५ मध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. या अल्पकाळातही त्यांनी धाडसाने ऐतिहासिक निर्णय घेऊन शिक्षण खात्यात चैतन्य आणले होते. त्या अल्पकाळात १५ हजार एकशिक्षकी शाळांना द्विशिक्षकी करून १० हजार नव्या शिक्षक भरतीचा क्रांतिकारी निर्णय मोठ्या आत्मविश्वासाने घेतला. तसेच शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दरमहा रूपये १००/- पदवीधारकांना दरमहा रूपये ३००/- बेकारभत्ता योजना अंमलात आणली. त्याच पदवीधारकांना रूपये ३००/- ते रूपये १,०००/-पर्यंत विद्यावेतन देण्याची योजना कार्यान्वित केली.

ग्रामीण भागाचा औद्योगिक विकास घडवणे ही प्रथमपासूनची डॉ. पतंगराव कदम यांची भूमिका. या दृष्टिकोनातून भावी काळात ग्रामीण भागात उभ्या राहणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांना पूरक असे कुशल कारागीर या परिसरातून निर्माण व्हावेत म्हणून प्रत्येक तालुक्यात आय्.टी.आय्.आणि त्यातही मुलींना २० टक्के राखीव जागा असाव्यात असा ठोस निर्णय मंत्री म्हणून डॉ.पतंगराव कदम यांनी घेतला. त्याचा उपयोग महाराष्ट्राचा औद्योगिक विकास होण्यासाठी निश्चितपणे झाला आहे.

***

# १८. पतंगस्वामिनीची खंबीर साथ

महात्मा गांधींच्या जीवनात कस्तुरबा गांधी, पं. नेहरूंच्या जीवनात कमला नेहरू, महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनात सावित्रीबाई फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनात लक्ष्मीबाई पाटील, फिरोज गांधींच्या जीवनात इंदिरा गांधी तसेच राजीव गांधींच्या जीवनात सोनिया गांधी, त्याचप्रमाणे भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती, महाराष्ट्र राज्याचे उद्योग व जलसंधारण मंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या जीवनात विजयमाला कदम यांनी महत्त्वाची कौटुंबिक जबाबदारी पार पाडली आहे - पार पाडीत आहेत.

विजयमाला यांचे वडील श्री. शरदराव शिंदे हे कारागृह खात्यातील वरिष्ठ अधिकारी होते. एक कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. अशा कुटुंबात विजयमाला यांचे बालपण गेले. वडिलांच्या बदल्यांमुळे वेगवेगळ्या ठिकाणी प्राथमिक शिक्षण झाले. नगर जिल्ह्यात विसापूर येथे रयत शिक्षण संस्थेच्या विद्यालयात माध्यमिक शिक्षण झाले. जत येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात असताना १९७५ साली त्यांचा विवाह झाला आणि त्या विजयमाला डॉ. पतंगराव कदम झाल्या. वडील त्यावेळी सांगलीस होते. याच वर्षी डॉ. पतंगराव कदम पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीवर निवडून गेले व तेथे ते १९८७ पर्यंत होते.

पुण्यामध्ये भारती विद्यापीठाच्या प्रगतीसाठी धडपडताना आणि आपले स्वत:चे एम.ए., पीएच.डी.चे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करताना डॉ. पतंगराव कदम यांच्या जीवनात कौटुंबिक पोकळी होती, ती विजयमाला कदम यांनी भरून काढली. विवाह झाल्यावर कौटुंबिक जबाबदारी पार पाडणे महत्त्वाचे समजून त्यांनी आपली शिक्षणाची महत्त्वाकांक्षा बाजूस ठेवली. त्यांना तीन अपत्ये झाली. थोरला अभिजीत १९७७ मध्ये, कु.अस्मिता १९७९ मध्ये व विश्वजीत १९८१ मध्ये जन्मले.

कु.अस्मिताचा जन्म झाला त्या १९७८-७९ या वर्षी डॉ. पतंगराव कदम यांनी भारती विद्यापीठाची तीन महाविद्यालये एरंडवणे संकुलात पुणे येथे सुरु करण्याचे धाडस केले होते. हा धाडसी विचार साकार करण्यासाठी



संस्थापक डॉ. पतंगराव व विजयमाला कदम

ब्रहन महाराष्ट्र मराठी मंडळ व भारती विद्यापीठ यांच्या संयुक्त सहभागाने
२०१० पासून नॉर्थ अमेरिका व कॅनडा येथे विविध शहरात मराठी शाळा
एकूण ६२ सेंटर्स आज पर्यंत चालू आहेत.



प्रा. डॉ. शिवाजीराव कदम ब्रहन महाराष्ट्र मंडळ (नॉर्थ अमेरिका)
श्रीमती माधुरी जोशी व सुनंदा टोमणे यांचे स्वागत करताना

डॉ. पतंगरावांना जे कष्ट उपसावे लागले ते लक्षणीय असे होते. त्या काळात कौटुंबिक स्वास्थ्य राखण्याचे, डॉ. पतंगराव कदम यांना साथ देण्याचे, महत्त्वाचे कार्य विजयमाला कदम यांनी केले आहे.

मुले मोठी झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्याची महत्त्वाकांक्षा एका शिक्षणसंस्थेच्या संस्थापकाची पत्नी म्हणून पुरी करण्याचे त्यांनी ठरवले आणि १९९६ साली टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या त्या पदवीधर झाल्या. आता पुणे विद्यापीठाच्या एम.ए. झाले आहेत.

विजयमाला यांनी आपल्या मुलांच्या शिक्षणातही जातीने लक्ष घातले. त्यांच्या उच्च शिक्षणास पाठिंबा व प्रोत्साहन त्या देत असतात. अभिजीतने तांत्रिक शिक्षण घेतले होते. अस्मिताने वैद्यकीय शिक्षण घेतले आहे आणि विश्वजीत याने कॉम्प्युटर इंजिनिअरींग पदवी, एम.बी.ए व पीएच.डी. करून सध्या भारती विद्यापीठाचा कार्यवाह म्हणूनही काम पाहत आहेत. ए.आय. सी.टी.ई. चे सर्वात तरूण सदस्य डॉ. विश्वजीत आहेत.

त्या म्हणाल्या,''आम्ही सर्वजण असे एकत्र सकाळच्या वेळी जमत नाही. मुले कॉलेजात जातात, त्यामुळे त्यांचे आवरणे सुरू असते आणि साहेब घरी असल्यावर सकाळी उठल्यावर फिरायला जात होते. मुंबईला गेल्यानंतर ते जमत नाही. वर्तमानपत्रे आल्यावर दिवसभरात वेळ मिळेल तेव्हा तपशिलाने वाचतात. सायंकाळी त्यावर चर्चा होते.''

''साहेबांना भेटावयास मुंबई, पुणे किंवा सांगली येथे सकाळी सहा वाजल्यापासून माणसे येतात. रात्री बारापर्यंत हे चालते. महत्त्वाचे फोन घेत, सरकारी काम करीत भेटायला येणाऱ्या कुणाही माणसाला भेटल्याशिवाय राहत नाहीत. भेटायला येणारी माणसे वेगवेगळ्या थरातील, वेगवेगळ्या क्षेत्रातील असतात. त्यांचा साहेबांवर विश्वास असतो, की साहेब काम करणारच. साहेबांनी हा जो विश्वास आपल्या कामांनी संपादन केला आहे त्याला तडा जाईल असे आम्ही काही करीत नाही.''

''आत्तापर्यंत महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील मंत्री, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, बॅ. बाबासाहेब भोसले, शिवाजीराव निलंगेकर, शरद

पवार आणि माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख तसेच भारताचे माजी पंतप्रधान पी.व्ही.नरसिंह राव हेही आमच्याकडे आले. त्यांचे आम्ही यथोचित आदरातिथ्य केले आहे.''

''साहेब मंत्री होण्यापूर्वी पुण्यात असताना सकाळी आठनंतर लोकांना भेटत. दुपारी एकपर्यंत भारती भवनमध्ये जात, जास्त काम असलेतर थांबावे लागे, त्यामुळे परत यायला तीनही वाजत. आल्यानंतर जेवण करून एक तासभर विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा भारती भवनमध्ये जाऊन सहा-साडेसहापर्यंत घरी येत. आल्यानंतर मग ते कुठे बाहेर पडत नसत.''

''दुपारचे जेवण अनिश्चित असते; पण रात्रीचे जेवण मीच तयार करून त्यांचे आवडीचे पदार्थ करून घालते. त्यांना साधेच जेवण आवडते. पिठले, तुरीच्या डाळीची आमटी, वांग्याची भाजी, कोणतेही भरीत आवडते. मांसाहारामध्ये झिंगे मासे त्यांना आवडतात.''

''वैचारिक साहित्य वाचायला साहेबांना खूप आवडते. चांगली नाटके, सिनेमा ते आवर्जून पाहतात. पण महत्त्वाचे काम निघाले की चित्रपट अर्ध्यावर सोडून घरी परत यावे लागते. त्यांना राज कपूरच्या चित्रपटातील गाणी आवडतात. मराठी भावगीते, लावण्या आणि भक्तिसंगीतही त्यांना आवडते.''

''कलावंत ही परमेश्वरी देणगी असून प्रतिभेमुळे तो रसिकांचा चाहता असतो. अशा कलावंतांना अडचणीच्या वेळी मदत करायला साहेबांना नेहमी आनंद वाटतो त्यामुळे त्यांच्याकडे येणारा कलावंत त्यांचा स्नेही बनून जातो.''

''साहेबांना घरासाठी नि कुटुंबीयांसाठी वेळ देता येत नाही; पण ते करीत असलेल्या कामाचे स्वरूप लक्षात घेतल्यानंतर आलेला राग लगेचच शांत होतो. हजारो लोकांच्या सुखदु:खाशी साहेब निगडीत आहेत. त्यांच्या भेटीमुळे जर या लोकांना जीवनात सुख मिळत असेल तर प्रसंगी आम्ही आमच्या सुखाचा त्याग केला पाहिजे, ही भूमिका आम्ही स्वीकारली. त्यामुळे भेटायला येणाऱ्या माणसांचा किंवा त्यांना भेटत असलेल्या साहेबांचा राग येत नाही.''

''साहेबांना भारती विद्यापीठाच्या शाखाप्रमुखांकडून, अधिकाऱ्यांकडून कामाबद्दल अद्ययावत माहिती हवी असते, पण ते अधिकारी ती माहिती देऊ शकले नाहीत तर त्यांच्यावर रागावतात; पण क्षणातच ते मनाची समजून करून त्याला सुधारण्याची समज देतात.''

''साहेबांनी गोरगरिबांच्या कल्याणात आपले सुख मानले आहे. त्यासाठी ते अहोरात्र कष्ट करतात. लोकांच्या कामासाठीच संबंधितांना भेटत असतात. अशावेळी त्यांना साथ देणेच फक्त आमच्या हाती असते.''

''आमच्या विवाहाच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना नव्याण्णव साली थोरल्या अभिजीतचे अपघाती दु:खद निधन झाले. आम्ही घरातील सर्वजण दु:खाच्या वज्राघाताने खचून गेलो होतो. माझ्या मनामध्ये खूप नैराश्य आले होते; पण साहेबांनी भारती विद्यापीठाचा वाढवलेला व्याप सांभाळण्यासाठी आणि धाकट्या दोन मुलांचे जबाबदारी पार पाडण्याची जाणीव असल्याने दु:खाचा आवेग सावरला. स्वत:मुळे मुलांचे नुकसान होऊ नये या मातेच्या भावनेने सावरून घेतले आहे. त्यासाठी विश्वजीत आणि अस्मिता यांनी मोलाची साथ दिली आहे. आमच्या या संयमामुळेच साहेबांना मंत्री म्हणून काम करण्यात यश मिळत आहे.''

''साहेब मंत्री झाल्यापासून सोमवार ते शुक्रवार मंत्रालयातील कामात व्यस्त असतात. शनिवार, रविवार सांगली जिल्ह्यातील मतदार संघाच्या कामासाठी सांगलीत असतात. कार्यक्रमानुसार पुण्यातही असतात. मुंबई असताना सकाळी सहा वाजल्यापासून लोकांना भेटत असतात. मंत्रालयात दुपारचा जेवणाचा डबा मागवतात आणि तेथेच जेवतात. सायंकाळी बंगल्यावर आल्यावर पुन्हा लोकांना रात्री बारा वाजेपर्यंत भेटत असतात.''

''सध्या आमच्या कुटुंबाची तीन ठिकाणी मुख्यालये आहेत. मुंबई-पुणे-सांगली या गावी त्रिस्थळी यात्रा साहेबांची चालूच असते. त्याचबरोबर कामानिमित्त महाराष्ट्रात तसेच दिल्लीलाही जावे लागते.''

''साहेबांच्या जबाबदारीच्या कार्यपद्धतीची जाणीव असल्यामुळे प्राप्त परिस्थितीबद्दल काहीही वाटून घेत नाही त्याची आता सवय झाली आहे'' असे त्यांनी सांगून मुलाखत संपवली.

विजयमाला कदम यांनी भारती विद्यापीठाच्या पुण्यातील व पुण्याबाहेरील कडेगाव, पलूस येथील मुलींच्या शाळा, पुण्यातील इंग्लीश व मराठी माध्यमाच्या शाळांच्या स्कूल कमिटीच्या त्या चेअरमन आहेत. तसेच महिला औद्योगिक सहकारी सोसायटी कडेगावच्या त्या चेअरमन आहेत. पुणे येथील भारती बझार ग्राहक संस्थेच्या त्या उपाध्यक्षा आहेत. अनाथ व निराधार महिलांना स्वतंत्रपणे व स्वाभिमानाने जगण्यासाठी या संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत. भारती बझार ग्राहक संस्थेत नव्वद टक्के महिलाच काम करतात. संचालक मंडळही महिलांचेच आहे. महिला महिलांचे प्रश्न जवळकीने समजून घेत असतात. यानंतर कडेगाव, पलूससारख्या ग्रामीण भागात अनाथ मुली, महिला यांच्या साठी अनाथाश्रम सुरू करण्याची त्यांची इच्छा आहे.

विजयमाला कदम यांनी डॉ. पतंगराव कदम यांना त्यांच्या कार्यात सहकार्य तर दिलेच, पण अंगीकृत कार्यात खारीचा वाटाही उचलला आहे. त्या समजूतदार, सहनशील आहेत; म्हणूनच कदम कुटुंबियांचा अश्वमेध चौफेर यश मिळवित आहे. व्यापक सुखासाठी आणि ध्येयपूर्तीसाठी पायाला चक्र लावल्यासारखे डॉ. पतंगरावांना प्रवास करावा लागे. त्यावेळी घराकडे दुर्लक्ष होणे क्रमप्राप्त असे. कौटुंबिक ताणतणाव विजयमाला यांना सहन करावा लागला. थोडी नाराजी आली असणार, पण त्या मोबदल्यात सर्व कुटुंबालाच सुखसमाधान लाभले आहे. थोरल्या चिरंजीवाच्या अपघाती निधनाचा अपवाद सोडता विजयमाला कदम यांनी नाराजी आणि सुख यांची बेरीज-वजाबाकी करता सर्व कुटुंबाला समाधान दिले आहे; म्हणून 'पतंगस्वामिनी' विजयमाला या डॉ. पतंगराव कदम यांच्या 'यशोगंधाच्या मानकरी' आहेत.

यासाठी एरंडवणे परिसरातील कन्या प्रशालेस 'सौ. विजयमाला कदम प्रशाला' असे नामकरण करण्यात आले आहे.

***

# १९. समाजाभिमुख कदम कुटुंब

भारतरत्न राष्ट्रसंत विनोबा भावे यांनी आईची थोरवी सांगताना म्हटले आहे, की 'अगदी पहिल्या प्रथम उंचच उंच अशी परमेश्वराची पहिली प्रतिमा जी मुलासमोर उभी राहते ती मातेची. 'मातृ देवो भव'. आईच्या पूजेने मोक्ष मिळणे अशक्य नाही. आईची पूजा म्हणजे वत्सलतेने उभ्या राहिलेल्या परमेश्वराची पूजा. आई निमित्तमात्र आहे. उत्कृष्टांतील उत्कृष्ट मातृपूजा म्हणजे परमेश्वराची पूजा. आई या शब्दाहून आणखी उच्च शब्द आहे कोठे? आईच्या ठिकाणी ईश्वर पाहावयास शिका.'

अमेरिकेतील नवकोट नारायण अ‍ॅन्ड्र्यू कार्नेजी याने म्हटले आहे , की 'मातृत्व ही जगातील सर्वात मोठी साधना आहे. सर्वांत मोठी तपस्या आहे. आई या शब्दाचा अर्थ आहे दया, माया व क्षमा. प्रेम व वात्सल्याचे अंतिम रूप म्हणजे आई.'

अगदी अशाच आहेत डॉ. पतंगरावांच्या मातु:श्री बयाबाई. थोर मातांची सर्व विशेषणे त्यांना लागू पडल्याचे मला दिसून आले आहे. आपल्या सात मुलांच्या उज्ज्वल भविष्यकाळाची काळजी घेणाऱ्या त्या एक थोर माता आहेत. त्यांच्या पहिल्या भेटीतच त्या म्हणाल्या, ''डॉ. पतंगराव पहिल्यापासून धडपड्या नि शिकण्याची आवड असलेला माझा मुलगा. कौटुंबिक परिस्थिती सांभाळून मुलांना शिक्षणासाठी वेगळा खर्च परवडणारा नव्हता. पण मी थांबले नाही. डॉ. पतंगरावांच्या शिक्षणासाठी माझे डोरले साठ रुपयाला गहाण ठेवले आणि त्या पैशांमधून कुंडलला शिकत असलेल्या डॉ. पतंगरावांसाठी खाकी चड्डी, पैरण, पिशवी, पुस्तके, कॉटन पँट घेतली. पुढे सहासात वर्षांनी ते डोरले सोडवून आणले.''

पूर्वी घेतलेल्या कौटुंबिक कष्टाच्या दिवसांत बयाबाईंनी आपल्या सासूबरोबर भल्या पहाटे उठून जात्यावर दळण दळले आहे. दिवस उगवायच्या आत जनावरांचा गोठा साफ करून त्या शेतात कामाला जात होत्या. लहान मुले सासूजवळ टाकायची, बडदी पोरे खेळायची व कळती पोरे शाळेत जात असत. शेतातली कामे करून गुराढोरांची वैरण काढून संध्याकाळच्या

स्वयंपाकाची तयारी करायला दिवस बुडायच्या आत घरात यायच्या. त्या म्हणतात, ''माझ्या घरासाठी सगळे केले; पण कशाची लाज वाटली नाही.''

बयाबाईंच्या घरात श्रावणात पोथीवाचन बरीच वर्षे चालत असे. दर बुधवारी वडगाव वगैरे बाजारात जाऊन बयाबाई कडधान्ये, अंडी वगैरे विकून किरकोळ खर्चाची तोंडमिळवणी करीत. शेजारच्या गावाच्या बाजाराला जाणे म्हणजे मोठे कष्टाचे काम होते; पण बयाबाईंनी घेतलेल्या काबाडकष्टाचे चीज झाले. अष्टपुत्र सौभाग्यवतींना सात मुलगे, एक मुलगी, नातवंडे-पतवंडांचा परिवार पाहत पाहत बयाबाईंना आज सोन्याचे दिवस आले आहेत.

एक भारदस्त व्यक्तिमत्त्वाच्या माता, अंगावर धडीची साडी, खणाची चोळी, गळ्यात कोल्हापुरी साज, रंग गोरा, माफक उंची आणि भव्य कपाळ. भूतकाळातील घटनांची साक्ष सांगणारा चेहरा पाहून कोणीही त्यांच्यापुढे नतमस्तक होत होता. सोनसळच्या 'सोनहिरा' या निवासस्थानातील सोप्यातील मंचावर बसून लहान-थोरांची आदराने चौकशी करणाऱ्या बयाबाई आज एकट्या कदम कुटुंबाच्या नव्हे, तर सोनहिरा खोऱ्यातील सर्वांच्या आधार.

बयाबाईंचे धनी श्रीपतराव कदम हे सोनसळचे एक कष्टाळू शेतकरी होते. गावातील लहानथोरांचे ते आदरणीय 'तात्या' होते. त्यांचे शेतीव्यवसायावर आगळेवेगळे प्रेम होते. त्यांनी शेती व्यवसायातील सारे चढउतार, सारे फायदेतोटे माहीत असूनही ते सोसले; पण त्यांचे भूमीवरील प्रेम कधीही कमी झाले नाही. ते शेतीला आपली आई मानत. त्यामुळे शेतीची सारी कामे वेळेवर व्हावीत म्हणून त्यांचा कटाक्ष असे. त्यांना शेतीकामात हलगर्जीपणा खपत नसे.

एकेकाळी कोरडवाहू असणारी जमीन त्यांनी मोठ्या कष्टाने विहीर खणून पाण्याखाली भिजवली. शेतीत अधिक उत्पादन यावे यासाठी ते नवे-नवे प्रयोग करीत. शेतातल्या पिकाचे हिरवेगार भरगच्च ताटवे पाहून त्यांना अपूर्व असे समाधान मिळत असे.

कुटुंबाचा पसारा वाढल्यामुळे घर बांधण्यापेक्षा अधिक जमीन घ्यावयास ते उत्सुक होते. त्यासंबंधातील एक आठवण सांगताना प्राचार्य सगरे सांगतात,

''डॉ. पतंगराव कदम भारती विद्यापीठाचा पसारा पुण्यामध्ये राहून वाढवत असताना त्यांचे लक्ष सोनसळच्या आपल्या वडिलोपार्जित जुन्या घराकडे होते. जुने कौलारू घर दुरूस्त करण्याऐवजी सोनसळ गावात शिरताना असलेल्या प्राथमिक शाळेच्या इमारतीला लागून असलेली पडीक जागा डॉ. पतंगराव कदम यांनी खरेदी केली नि तिथे सर्व कुटुंबाला पुरेल असा दुमजली बंगला बांधण्याचा संकल्प केला. त्या बंगल्याचे भूमिपूजन करण्यासाठी डॉ. पतंगराव कदम यांचेबरोबर सोनसळला गेलो. दिवस होता १९८० सालचा गुढीपाडवा. त्यावेळी डॉ.पतंगराव कदम यांचे वडील श्रीपतराव तात्या म्हणाले, ''आपल्याला काय करायचं आहे एवढं मोठ घर. त्याऐवजी जमीन घेऊया.'' त्यावर डॉ. पतंगराव मध्येच म्हणाले, ''तात्या, घरही बांधूया नि जमीनही घेऊया.'' त्यावर श्रीपतराव तात्या बंगल्याच्या भूमिपूजनास तयार झाले व त्यांनी श्रीफळ वाढवून भूमीपूजन केले.

मनात योजलेल्या संकल्पाची सुरूवात आपल्या पित्याच्या हस्ते झाल्यामुळे डॉ. पतंगराव कदम यांना खूप समाधान झाले. अशा आनंदात असतानाच समजले, की कऱ्हाडला यशवंतराव चव्हाण आले आहेत व त्यांचा मुक्काम त्यांच्या 'विरंगुळा बंगल्यात आहे; म्हणून डॉ. पतंगराव त्यांना भेटण्यास गेले. त्यावेळी सोनसळला बंगला बांधित असल्याचे यशवंतराव चव्हाणांना त्यांनी सांगितले. त्यावर यशवंतराव डॉ. पतंगरावांना म्हणाले, ''डॉ. पतंगराव, शहरात गेलेली पोरं परत खेड्यात जात नाहीत. शहरातच बंगले बांधून राहतात आणि खेड्यातलं घरदार विकून टाकून परत खेड्याकडे येत नाहीत; पण तू आईवडिलांसाठी सोनसळला बंगला बांधत आहेस हे ऐकून मला बरं वाटलं.''

शेती करीत श्रीपतराव तात्यांनी आपल्या मुलाबाळांसह साठ माणसांचे कुटुंब अभंग ठेवले. आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीच्या जमान्यामध्ये साठ सदस्यांचे कुटुंब एकत्र असणे हे एक आश्चर्य मानावे लागेल.

वेगवेगळ्या क्षेत्रांत सर्व मुले कर्तबगार निघाली व त्यांनी विविध क्षेत्रांत नावही कमावले आहे. हे पाहण्याचे भाग्य त्यांना लाभल्यावर नियतीच्या निर्णयानुसार ८०व्या वर्षी श्रीपतराव तात्यांचे अल्पशा आजारानंतर पुणे येथे

दिनांक २४ जुलै, १९९९ रोजी सकाळी ८.३० वाजता निधन झाले. श्रीपतराव तात्यांच्या निधनानंतर बयाबाई सर्व मुलांच्या व परिवाराचा आधार होऊन राहिल्या. कर्तबगार मुलांची प्रगती, प्रतिष्ठा पाहून पतीच्या अकाली झालेल्या निधनाचा धक्का त्या सहन करत होत्या.

अशा थोर मातापित्यांचे सुपुत्रही भाग्यवान आहेत.

थोरले सुपुत्र श्री. मोहनराव कदम, सोनसळचे माजी सरपंच, खानापूर पंचायत समितीचे माजी सभापती, सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, सोनहिरा सहकारी साखर कारखान्याचे प्रमुख प्रवर्तक आणि सहकारी क्षेत्रातील जाणकार कार्यकर्ते व प्रगतिशील शेतकरीही आहेत. त्यांना सर्वजण 'मोहनराव शेठ' म्हणून संबोधतात. त्यांनी वाजेगाव येथे उत्तम शेती वाढवली आहे, तेथेच त्यांचे वास्तव्य असते. सध्या ते डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर काखान्याचे चेअरमन आहेत. सांगली जिल्हा काँग्रेस आय चे अध्यक्ष आहेत. तसेच विधानपरिषदेचे आमदार आहेत.

दुसरे सुपुत्र चरित्रनायक डॉ.पतंगराव कदम हे भारती विद्यापीठाचे संस्थापक म्हणून सर्व महाराष्ट्राला परिचित आहेत. असे म्हटले जाते, की डॉ. पतंगराव कदम हे व्यक्तिमत्त्व म्हणजे सांगली जिल्ह्याने महाराष्ट्राला दिलेली एक बहुमोल देणगी आहे. ते भारती विद्यापीठाचे शिल्पकार, महाराष्ट्राचे माजी शिक्षणमंत्री, माजी उद्योगमंत्री, भारती बँक, भारती प्रेस, भारती बझार, पोल्ट्री फार्म, कडेगाव, सागरेश्वर सूतगिरणी, मागासवर्गीय सूतगिरणी, पलूस, सोनहिरा सहकारी साखर कारखाना अशा सहकारी संस्थांचे प्रवर्तक व संस्थापक आहेत. या सहकारी संस्था स्थापण्यात, वाढवण्यात आणि नावारूपाला आणण्यात त्यांचा पुढाकार आहे. शैक्षणिक कार्याचे महत्त्व पटवल्यामुळे भारत सरकारने भारती विद्यापीठास अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिला आहे व डॉ.पतंगराव कदम त्या विद्यापीठाचे तहहयात कुलपती आहेत. डॉ.पतंगराव कदम सांगली जिल्ह्यातील भिलवडी-वांगी मतदारसंघाचे विधानसभेतील प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाचे उद्योग व जलसंधारण मंत्री होते. तसेच सहकार, पुनर्वसनमंत्री म्हणून मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख मंत्रिमंडळात लोकसेवा करीत होते. नंतर ते

वनमंत्री झाले. वन खात्याचे महत्त्व त्यांनीच वाढविले आणि योजना राबविल्या कुंडल येथे वनखात्याचे ट्रेनींग कॉलेज सुरू केले.

छापखान्याला लागणारा कागद व शैक्षणिक संस्थांना लागणारी स्टेशनरी पुरवण्याचा व्यवसाय श्री. आत्माराम कदम हे पुणे येथे करीत होते. परिचित असे सर्वजण त्यांना 'अप्पा' म्हणतात. हे तिसरे पुत्र.

सोनसळ या गावाचे भूषण म्हणून कदम घराण्याकडे पाहिले जाते. त्यामुळे या गावचे नेतृत्व श्री.मोहनशेठ यांच्यानंतर श्री. जयसिंगराव यांनी स्विकारून सोनसळच्या सरपंचपदाची जबाबदारी पार पाडली आहे. रांगड्या स्वभावाच्या जयसिंगरावांनी वडिलोपार्जित मातीशी इमान राखून आपल्या वडिलांचा वारसा पुढे जोपासला आहे. आदर्श गावासाठी, सोनसळच्या विकासासाठी धडपडणारे व्यक्तिमत्व म्हणजे जयसिंगराव. उत्तम शेतकरी कसा असावा याचे ते उदाहरण आहेत. उत्तम शेतकरी व कुशल संघटक म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

शिक्षणक्षेत्रात महत्त्वाकांक्षी योजना राबवणारे डॉ.पतंगराव कदम व त्यांचे धाकटे बंधू डॉ. शिवाजीराव कदम म्हणजे राम-लक्ष्मणाची जोडी म्हणावयास हरकत नाही. भारती विद्यापीठाचे कार्यवाह, भारती अभिमत विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य अशा अनेक जबाबदाऱ्या डॉ. शिवाजीराव कदम पार पाडल्या आहेत. भारती विद्यापीठ व त्याच्या संलग्न संस्था, शाखा यांच्या प्रगतीत व यशस्वी व्यवस्थापनात डॉ. पतंगराव कदम यांच्याबरोबर डॉ.शिवाजीराव कदम यांचाही महत्त्वाचा वाटा आहे. डॉ. पतंगरावांच्या सर्व उपक्रमांत डॉ.शिवाजीराव कदम यांचाही महत्त्वाचा वाटा आहे. डॉ. पतंगरावांच्या सर्व उपक्रमांत डॉ. शिवाजीरावांचा मोलाचा सहभाग असतो आणि आहे. डॉ.पतंगरावांच्या सर्व उपक्रमांत डॉ. शिवाजीरावांचा मोलाचा सहभाग असतो आणि आहे. स्वभावाने शांत, मितभाषी व संयमी असलेले डॉ. शिवाजीराव यांनी पुणे विद्यापीठात व भारती विद्यापीठात एक आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे. सध्या डॉ. शिवाजीराव हे भारती विद्यापीठ विश्वविद्यालय, पुणे याचे कुलपती आहेत, विद्यापीठ अनुदान आयोगाचे(पदी) दोन वेळा सदस्य होते. भारतीय फार्मास्युटीक्स असोसिएशनचे

सदस्य आहेत. शिवाय विट्याजवळ 'उदगिरी' नावाने खाजगी साखर कारखाना चालू केला आहे. त्या कारखान्यास राष्ट्रीय पातळीवर बहुमान मिळाला आहे.

साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय देण्याचा सतत प्रयत्न करणारे रघुनाथराव उर्फ रघुकाका हे श्रीपतरावांचे धाकटे सहावे सुपुत्र. त्यांचा मुक्काम कऱ्हाड येथे असून ते काही वर्षे कृष्णा सहकारी साखर कारखान्याचे संचालक होते. तसेच वाजेगाव येथे त्यांचा पोल्ट्री फार्मही आहे. मातोश्री बयाबाईंचा मुक्काम त्यांच्याकडेच असायचा. सध्या ते अथणी येथील खाजगी साखर कारखान्याची उभारणी करीत आहेत.

सर्वांत लहान श्री. सुबराव कदम यांनी सोनसळ सोडून पुण्यात सार्वजनिक क्षेत्रात भक्कम पाय रोवले होते. पुण्याच्या पश्चिम भागातील कोथरूडचे ते पुणे महानगरपालिकेतील नगरसेवक होते. काही काळ स्थायी समितीचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम केले आहे. तसेच त्यांचा स्वतःचा आदर्श असा डेअरी व्यवसायही आहे.

एकुलती एक कन्या श्रीमती सुमन जाधव, ही दुशेरे, ता. कऱ्हाड येथील जाधव घराण्यात सुखाने नांदते आहे.

श्रीपतराव कदम व बयाबाईंच्या या सुपुत्रांनी घराण्याचे पांग फेडले आहेत आणि सोनसळच्या कदम घराण्याला सांगली जिल्ह्यात व महाराष्ट्रात प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. म्हणून बयाबाई व श्रीपतराव कदम हे भाग्यवान मातापिता आहेत.

श्रीपतरावांच्या व बयाबाई या मातापित्यांच्या निधनानंतर त्यांचे अर्धपुतळे सोनसळच्या आवारात त्यांच्या सुपुत्रांनी उभारले आहेत. त्या पुतळ्यांच्या साक्षीने सर्व बंधू दीपावलीच्या निमित्ताने सोनसळ येथे जमतात व आई-वडीलांच्या स्मृतीस वंदन करतात.

एवढ्यावरच डॉ. पतंगराव कदम थांबले नाहीत. रयत शिक्षण संस्थेचे शिरवळ येथील महाविद्यालय प्रगतिपथावर नेण्यासाठी शिक्षणप्रेमी दानशूरची वाट पाहत होते. ती उणीव डॉ. पतंगराव कदम यांनी भरून काढली. शिरवळ येथील पुणे-बेंगलोर महामार्गाला लागून असलेल्या महाविद्यालयाचे नामकरण

'श्रीपतराव कदम महाविद्यालय' असे करण्यात आले आणि त्या शैक्षणिक परिसराचे 'डॉ.पतंगराव कदम शैक्षणिक संकुल' असे नामकरण करण्यात आले. एका आदर्श पित्याचे व आदर्श पुत्राचे सामाजिक बांधिलकीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

याचप्रमाणे अंबक (चिंचणी) या गावी भारती विद्यापीठाने १९९२ मध्ये माध्यमिक विद्यालय सुरू केले. त्या विद्यालयाचे 'श्रीपतराव(तात्या) कदम प्रशाला अंबक' असे नामकरण करून डॉ. पतंगराव कदम यांनी आपल्या थोर पित्याचे उचित स्मारक उभारले आहे.

पंढरपूर येथे होणाऱ्या वारकरी व यात्रेकरूंसाठी श्रीपतराव कदम यात्री भवन व महिला निवास कदम बंधूंनी बांधले आहे. या यात्री भवनच्या उद्‌घाटनप्रसंगी दिनांक २२ ऑगस्ट, १९९९ रोजी थोर विचारवंत व संत साहित्याचे अभ्यासक बाळासाहेब भारदे म्हणाले, की 'धार्मिक व सांस्कृतिक भावनेतून दीनदुबळ्यांना दिलासा व आधार देत आपले जीवन समर्पित करणाऱ्या कै. श्रीपतराव कदम यांच्या नावे पंढरपूर येथे बांधलेल्या यात्री भवन व महिला निवास समाजाचे सांस्कृतिक व अध्यात्मिक परिवर्तनाचे व्यासपीठ बनावे.'

डॉ. पतंगराव कदम यांचा जन्म परोपकारी वृत्तीने जगणाऱ्या आणि आध्यात्मिक वारसा लाभलेल्या घरात झाल्यामुळे वारकरी संप्रदायासाठी उचललेले पाऊल अत्यंत गौरवास्पद आहे. सर्वसामान्य व दीनदलितांचे अश्रू पुसण्याचे कार्य डॉ.पतंगराव कदम गेली ५० वर्षे सातत्याने करीत होते आणि त्यांची उमेद कमी झाली नव्हती.

याप्रसंगी डॉ. पतंगराव कदम आपल्या वडिलांची थोरवी सांगताना म्हणाले, की 'वडिलांनी लहानपणापासून दुसऱ्यासाठी जगण्याचा मंत्र स्वतःच्या वागण्यातून दिला. संसार सांभाळून इतरांना त्रास न होता तात्या समाजासाठी काहीतरी करीत असावयाचे. आईवडिलांनी आम्हा भावंडांवर जे संस्कार केले त्या शिदोरीवर आम्ही सामाजिक कार्य करीत आहोत. विविध संस्थांच्या माध्यमातून समाजातील दारिद्र्य कमी करण्याचा प्रयत्न केला. शिक्षणातून सुसंस्कृत समाज घडवण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहिलो. फक्त एक उणीव होती. वारकरी संप्रदायासाठी पंढरपुरात यात्री भवन बांधावे, अशी इच्छा होती. त्याला मूर्तस्वरूप प्राप्त होत आहे. तसेच श्रीपतराव फौंडेशनची

दहा लाख रुपयांची ठेव येथील रुक्मिणी सहकारी बँकेत ठेवणार आहे, त्याच्या व्याजातून वारकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देता येतील.'

कदम घराण्याचे कुलदैवत म्हसवड येथील सिद्धेश्वर आहे. श्रीपतराव कदम म्हसवडच्या सिद्धेश्वराची पूजा करण्यास दरवर्षी जात होते. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या मुलांनी हा परिपाठ कायम ठेवला आहे. वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ. पतंगराव कदम यांनी श्री सिद्धेश्वराच्या मंदिरात यात्रेकरूंसाठी एक प्रशस्त हॉल बांधला आहे. यात्रेकरूंना त्याचा उपयोग होत आहे.

धनकवडी येथील भारती हॉस्पिटलच्या माध्यमातून श्रीपतराव कदम मेडिकल फौंडेशन गरीब व गरजू रुग्णांची सेवा करीत आहे आणि समाजसेवेचेही सूत्रधार डॉ. पतंगराव कदम हेच आहेत.

अशा भाग्यवान माता पित्याच्या कुटुंबास नियतीची दृष्ट लागली व अल्प आजारामध्ये डॉ.पतंगराव कदम यांचे पितामह श्री. श्रीपतराव कदम यांचे दुःखद निधन सन १९९० साली झाले. सोनसळ येथे पित्याचे स्मरणार्थ उचित स्मारक उभारले आहे.

त्यानंतर गेली १० वर्षे मातोश्री बयाबाई कदम कर्तबगार मुलांच्या कार्याकडे पाहत, नातवंडांचे कौतुक करीत आपले जीवन समाधानात व आनंदात घालवत होत्या. वयपरत्वे प्रकृती साथ देत नव्हती व शेवटी दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी आजारपणात कराड येथे त्यांचे महानिर्वाण झाले. सोनसळ येथे हजारोंच्या उपस्थितीत अंत्यविधी व अंत्यसंस्कार झाले. डॉ. पतंगराव कदम व त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात हजारोंनी लोक सामील झाले होते.

''आज मागे वळून पाहताना जाणवते माझी आई जरी अडाणी होती तरी तिचे विचार प्रगत होते. ती अंधश्रद्धा नव्हती. शिक्षणाबद्दल तिला आस्था होती. तिचा दृष्टिकोन पुरोगामी होता. गरिबांबद्दल तिला कळवळा होता. दुसऱ्याला मदत करण्याची तिची वृत्ती होती. परोपकाराची भावना होती. मुलगा/मुलगी असला भेदभाव तिने कधी केला नाही. सामाजिक प्रगतीची चाड तिला होती. हे सारे लक्षात घेऊनच आम्ही तिच्या नावाचा एक ट्रस्ट केला आहे व त्याद्वारे आम्ही महिलांसाठी विविध उपक्रम चालवित आहोत. हीच तिला खरी श्रद्धांजली.''

***

# २०. उद्योग, जलसंधारण मंत्री आणि उद्योग, व्यापार व वाणिज्य मंत्री

सन १९९९ मध्ये विधानसभा निवडणूक झाली. सत्ताधिकारी शिवसेना-भाजप युतीस मतदारांनी नाकारले. राष्ट्रीय काँग्रेसला सर्वाधिक जागावर निवडून देऊन सत्तेवर येण्याची संधी दिली, तरी निर्विवाद बहुमत नसल्यामुळे इतर पक्षांबरोबर आघाडी करण्याशिवाय गत्यंतर नाही असा संकेतही दिला. त्याचबरोबर मोठे पक्ष आपल्याबरोबर कोण युती करण्यास पुढे येतील याचे आडाखे बांधू लागले आणि छोटे पक्ष व अपक्ष मोठ्या पक्षांपैकी बहुमतासाठी कोणता पक्ष आपल्याला बोलवतील याची चाचपणी करू लागले.

युती किंवा आघाडी करण्याचे डावपेच चालू असताना राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांनी तावडतोब कृती केली व दि.८ ऑक्टोबर, १९९९ रोजी राष्ट्रीय काँग्रेसचे नेते सर्वश्री शिवाजीराव निलंगेकर, विलासराव देशमुख, डॉ. पतंगराव कदम, प्रतापराव भोसले, सुरेश कलमाडी यांनी राज्यपाल माननीय डॉ.पी.सी. अलेक्झांडर यांची राजभवनावर भेट घेऊन सर्वांत जास्त संख्याबळ असलेल्या राष्ट्रीय काँग्रेस पक्षास सरकार बनवण्यास सांगावे अशी मागणी केली.

काँग्रेस पक्षातून बाहेर पडून नुकताच स्थापन झालेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला जवळचा होता. त्यामुळे दोन्ही पक्षांची आघाडी करण्याची खलबते सुरु झाली. वाटाघाटीचे गुऱ्हाळ दीर्घकाळ चालले. तसेच होण्याची जी कारणे सांगितली जातात त्यात राष्ट्रवादी-भाजपा यांच्यात आघाडी होण्याचे एक होते. शरद पवार आणि संगमा यांना केंद्रात स्थान देऊन राष्ट्रवादीने युतीला पाठबळ द्यावे अशी तडजोड होती; पण राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना काँग्रेसबरोबरच आघाडी व्हायला हवी होती. कार्यकर्त्यांच्या दबावामुळेच काँग्रेस आघाडीचे सरकार स्थापण्याबाबत एकमत झाले. दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी समंजसपणा दाखवला आणि दि.१७ ऑक्टोबर, १९९९ रोजी सहा दिवसांच्या अस्थिरतेच्या वातावरणानंतर राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आघाडी सरकार स्थापन करण्याचे निश्चित झाले. या आघाडीस आठ पक्षांच्या १५१ आमदारांनी पाठिंबा दिला.

डॉ. पतंगराव कदम यांची मात्र मंत्रीपदावर निवड होणार ही वादातीत गोष्ट होती. त्यांनी पूर्वी शिक्षण राज्यमंत्री, शिक्षणमंत्री म्हणून ऐतिहासिक कार्य केले होते. भारती अभिमत विद्यापीठाचे ते तहह्यात कुलपती होती. सांगली जिल्ह्यात राष्ट्रीय काँग्रेसला लक्षणीय विजय मिळवून वसंतदादानंतर सांगली जिल्ह्याचे नेतृत्व टिकवले होते. भिलवडी-वांगी मतदार संघातील निवडणुकीमध्ये, प्रतिस्पर्ध्याच्या पातळीवर न जाता आपला मोठेपणा कायम ठेवून त्यास नामोहरम करून खरा नेता हे भूषण मिळवले होते. मतदार संघामध्ये प्रचंड लोकोपयोगी कार्यामुळे मतदारांनी भरघोस मतांनी त्यांना निवडून दिले होते. सप्टेंबर १९९९ रोजी आमदार म्हणून निवडून आले.

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रीय काँग्रेसचे उपाध्यक्ष म्हणून डॉ. पतंगराव कदम यांनी आघाडी सरकार बनवताना महत्त्वाची भूमिक बजावली. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे ते खंदे पुरस्कर्ते व फार वर्षांपासूनचे जीवलग मित्र व हितचिंतकही आहेत. धनकवडी येथील भारती विद्यापीठाच्या कर्मवीर विद्यालयाच्या एका समारंभात काही वर्षांपूर्वी विलासराव देशमुखांचा सत्कार करताना सदिच्छा व्यक्तकेल्या होत्या की 'विलासराव, तुम्ही एक दिवस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होणार' ही डॉ. पतंगरावांची भविष्यवाणी खरी झाली; म्हणून असे वाटते, की डॉ. पतंगराव कदम शिक्षणसंस्थांचे संस्थापक तर आहेतच, पण राजकारणातील जाणते नेते व भविष्यवेत्तेही होते.

भारतामध्ये औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र सातत्याने अग्रेसर राहिला आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात तर महाराष्ट्राने भारताचे नाव जागतिक बाजारपेठेमध्ये ठळकपणे नोंदवले आहे. त्याचे श्रेय केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाच्या उद्योग खात्याकडे जाते. उद्योजकांना प्रेरणा, प्रोत्साहन व मार्गदर्शन करणारी मिटकॉन यंत्रणा, कच्चा माल पुरवून विक्रीस मदत करणारे लघु उद्योग विकास महामंडळ, आर्थिक मदत करणारे राज्य वित्तीय महामंडळ व सिकॉम, नवीन उद्योगास जागा, पाणी, वीज रस्ते, योग्य इमारती यासारख्या पायाभूत सोयी उपलब्ध करणारे औद्योगिक विकास महामंडळ या प्रमुख संस्था महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक विकासाच्या ध्येयधोरणाची पूर्तता उद्योग खात्यामार्फत करीत आहेत.

अशा या महत्त्वाच्या उद्योग खात्याचा कार्यभार स्वीकारल्यापासून महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या क्षेत्रात सध्या मंदीचे वारे वाढत असले तरी उपलब्ध साधनांचा वापर करून उद्योग व्यावसायिकांना दिलासा मिळेल असे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासन आर्थिक संकटाच्या कालखंडातून जात असताना परदेशातील भारतीयांना महाराष्ट्रात माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहनात्मक सवलतीही जाहीर केल्या आहेत आणि त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या महाराष्ट्रातील मागास भागातील औद्योगिक वसाहती सुरू करण्याचा व्यापक असा कार्यक्रम हाती घेऊन औद्योगिक विकासाचा समतोल राखण्यावर भर देण्यात आला आहे. उद्योगविकासाचे नियंत्रण व नियमन करणाऱ्या उद्योग अधिकाऱ्यांनी आता आपल्या कार्यालयात काम करण्याबरोबर उद्योजकांपर्यंत जाऊन गरजेची मदत व सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. एकूण, महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचे एक नवे पर्व नव्या उत्साहाने सुरू करण्याचा प्रयत्न उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी सुरू केले. ते खानापूर तालुक्यासारख्या दुष्काळी भागातून आले असल्यामुळे दुष्काळी भागातील जलसंधारणाच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी प्राधान्य दिले.

महाराष्ट्र शासनाने १९९९ च्या उद्योग, व्यापार व वाणिज्य खात्याच्या धोरणानुसार अनिवासी भारतीय विदेशी उद्योजकांनी त्यांचे उद्योग उभारावे, यासाठी महाराष्ट्रात नऊ ठिकाणी पंचतारांकित दर्जाच्या पायाभूत सुविधा असलेली औद्योगिक नागरी संकुले स्थापन करण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार ८५२.९८ हेक्टर जमिनीवर महाड येथे पहिले पंचातारांकित नागरी संकुलाचे उद्‌घाटन डॉ. पतंगराव कदम यांनी दि.२७ जानेवारी, २००० या दिवशी केले. यांत्रिकी व संगणक उद्योगासाठी आवश्यक त्या सर्व सुविधांनी युक्त अशा या औद्योगिक संकुल उभारणीच्या उद्‌घाटनाने एक गतिमान औद्योगिक पर्व सुरू झाले आहे.

याच सुमारास म्हणजे दि.१३ फेब्रुवारी, २००० रोजी भारताचे माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी मुंबईस भेट दिली. लोकसभेत बहुमत सिद्ध

करण्यास झारखंड मुक्ती मोर्चाच्या खासदारांना तथाकथित लाच दिल्याप्रकरणी कोर्टामध्ये चालू असलेल्या दाव्यामुळे नरसिंह राव काँग्रेस संघटनेत एकाकी पडल्यासारखे झाले होते. विदर्भातील रामटेक मतदार संघातून निवडणूक लढवून ते लोकसभेवर गेले होते. यांचे हितचिंतक महाराष्ट्रातही आहेत. अशा वेळी पत्रपंडितांनी त्यांच्या भेटीची वेगवेगळे अर्थ लावून राष्ट्रीय काँग्रेसच्या ज्येष्ठ वर्तुळात संभ्रमाचे वातावरण निर्माण केले होते. त्यास उत्तर म्हणून की काय, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख, पी.व्ही. नरसिंह राव यांच्यासाठी भोजनाचे आयोजन केले. डॉ. पतंगराव कदम यांनीही त्यांची भेट घेतली. पंतप्रधान असताना पी.व्ही. नरसिंह राव भारती विद्यापीठाच्या रौप्यमहोत्सवी समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून आले असताना डॉ. पतंगराव कदम यांच्या महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील शिक्षणकार्याचे कौतुक केले होते. भारती विद्यापीठाच्या प्रगतीसाठी राव यांनी शक्य ते सहकार्य मानव साधनसंपत्ती मंत्री असताना व पंतप्रधान असताना केले होते. ते डॉ. पतंगराव कदम विसरले नाहीत. राजकारणात चढ-इतार होतच असतात. तरीसुद्धा कृतज्ञताबुद्धीने पूर्वीचे सलोख्याचे-जिव्हाळ्याचे संबंध टिकवण्यात डॉ. पतंगराव कदम कधीच मागे राहिले नाहीत. त्यामुळेच राष्ट्रीय काँग्रेस श्रेष्ठांच्या वर्तुळात त्यांनी लोकोपयोगी काम करणारा तळमळीचा कार्यकर्ता नेता म्हणून एक स्थान मिळवले आहे.

''माहिती तंत्रज्ञान उद्योगाच्या विकासावर राज्य शासनाने संपूर्ण लक्ष केंद्रित केले आहे. या उद्योगासाठी अंधेरी येथे सिपलामध्ये, ऐरोली (वाशी) आणि पुणे येथील हिंजवडी येथे माहिती तंत्रज्ञान संकुल उभारण्यात येत आहे. तेथे उच्च दर्जाच्या पायाभूत सुविधा पुरवण्यात आल्या आहेत. तशाच सुविधा नागपूर आणि औरंगाबाद येथेही उपलब्ध आहेत. जवाहरलाल नेहरू बंदराजवळीत द्रोणागिरी येथे हार्डवेअर पार्क उभारण्याचा प्रस्ताव आहे.'' डॉ. पतंगराव कदम यांनी महाराष्ट्रात माहिती तंत्रज्ञान उद्योगाचा विस्तार कसा होत आहे व झाला आहे याची ओळखच औद्योगिक क्षेत्रातील संबंधितांना करून दिली.

डॉ. पतंगराव कदम मंत्रालयातील कामात गर्क असले तरी भिलवडी-वांगी मतदार संघातील बांधवांचे, भारती विद्यापीठाच्या शाखांचे, त्यांनी स्थापन केलेल्या सोनहिरा सहकारी साखर कारखान्याचे किंवा सागरेश्वर सहकारी सूतगिरणीच्या कामावर सतत लक्ष होते. 'घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी' या म्हणीप्रमाणे फोन, मोबाईलद्वारा चौकशी करीत असतात. दीड वर्षांपूर्वी त्यांनी स्थापन केलेल्या, कमी खर्चात व कमी वेळात सुरू केलेल्या सोनहिरा सहकारी साखर कारखान्यात पहिल्या चाचणी गळित हंगामातील साखरेच्या पहिल्या सात पोत्यांचे पूजन कारखान्याचे अध्यक्ष मोहनशेठ यांनी दि.१७ फेब्रुवारी, २००० रोजी केल्याचे ऐकून कारखान्याच्या संचालकांचे, अधिकाऱ्यांचे, वालचंदनगर कारखाखान्याच्या अभियंत्यांचे अभिनंदन केले.

वसंतदादानंतर डॉ. पतंगराव कदम यांच्याकडे सांगली जिल्ह्याचे नेतृत्व आले. दि.२० फेब्रुवारी, २००० रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात भिलवडी-वांगी मतदारसंघातील अडी-अडचणी समजावून घेण्यासाठी जनता दरबार आयोजित केला होता. लोकांच्या सर्व अडचणी ऐकून संबंधित अधिकाऱ्यांना त्याबाबत तेथेच सूचना देऊन दिलासा दिला. शेवटी डॉ. पतंगराव कदम यांनी रस्ते विकास, पिण्याचे पाणी, शेतीचे पाणी, याचा नियोजनबद्ध कृती आराखडा करण्याचे आदेशही दिले. तसेच खानापूर, आटपाडी, जत तालुक्यातील लोकांना पाहिजे असलेली म्हैसाळ, टेंभू व ताकारी पाणी योजना लवकरात लवकर कार्यान्वित होईल अशी ग्वाही दिली.

वसंतदादा पाटील यांच्या सांगली येथील स्मारकाचे काम बरीच वर्षे रेंगाळले होते. जेव्हा डॉ. पतंगराव कदम वसंतदादा स्मारक समितीचे अध्यक्ष झाले, तेव्हा त्यांनी लक्ष घालून महाराष्ट्र शासनाकडून जरूर ते आर्थिक साहाय्य मिळवले आणि या स्मारकाच्या परिसरात पूर्ण संरक्षण भिंतीच्या बांधकामाला सुरूवात झाली. दि.२४ फेब्रुवारी, २००० रोजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ केला. त्यावेळी मा.मुख्यमंत्री यांनी कै. वसंतदादा या महान नेत्याच्या स्मारकाचे काम गतीने पूर्ण केले जाईल अशी ग्वाही दिली. या प्रसंगी डॉ. पतंगराव कदम म्हणाले, ''या स्मारकाचे काम दोन टप्प्यात करण्यात येणार असून पहिल्या टप्प्यासाठी ४६ लाख रूपये शासनाने उपलब्ध

करून दिले आहेत. पूररक्षक भिंतीच्या बांकामासाठी १ कोटी ४७ लाख रूपये खर्च येणार असून ही रक्कम जिल्हा नियोजन व विकास समितीकडून उपलब्ध झाली आहे.'' यशवंतराव चव्हाण यांचे देवराष्ट्रे येथील भव्य स्मारक डॉ. पतंगराव कदम यांनी उभे केले. आता वसंतदादा यांचेही भव्य स्मारक डॉ. पतंगराव कदम यांच्या पुढाकारानेच होत आहे हा योगायोगच आहे.

सांगली जिल्हा औद्योगिक जिल्हा होण्यासाठी डॉ. पतंगराव कदम यांनी मनाशी ठाम निर्धार केला. त्या योजनेची कल्पना देताना तासगाव तालुक्यातील कवठेएकंद येथील एका कार्यक्रमात दि.२६ फेब्रुवारी, २००० रोजी ते म्हणाले, की राज्यातील औद्योगिक वसाहतीमध्ये यापुढे स्वतंत्र 'कृषी औद्योगिक झोन' निर्माण करून सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. कृषी औद्योगिक विकासावर शासनाने सर्वाधिक लक्ष केंद्रित केले आहे. राज्यात कृषी औद्योगिक क्रांती घडवण्यासाठी अधिकाधिक दर्जेदार शेती-उत्पन्नाबरोबरच शेतीप्रक्रिया कारखानदारी निर्माण करण्यावर भर दिला आहे. यापुढे औद्योगिक वसाहतीची मदत ही कृषी औद्योगिक क्रांतीसाठी घेण्यात येईल. सांगली जिल्ह्यात उद्योगधंद्याचे जाळे निर्माण करून औद्योगिक जिल्हा बनवण्यात येईल. गेल्या दोन-तीन महिन्यांत राज्यात अधिकाधिक उद्योगधंदे, औद्योगिक वसाहती वाढवण्याचा प्रयत्न सुरू असून नवे-नवे व मोठे उद्योग-प्रकल्प राज्यात उभे राहत असून औद्योगिक गुंतवणूकीसाठी पूरक पोषक वातावरण निर्माण झाले आहे. औरंगाबाद येथे १ हजार कोटीचा प्रकल्प सुरू होत असून तळेगाव येथे ५०० कोटीचा नवा औद्योगिक प्रकल्प उभा करण्याचा मानस आहे. सांगली जिल्ह्यातही औद्योगिक वसाहती उभारण्यावर लक्ष केंद्रित केले असून अलकुड, मणे राजुरी, विटा, तासगाव, कडेगाव व पलूस येथे औद्योगिक वसाहती लवकरच सुरू होतील. औद्योगिक वसाहतीसाठी पिकाऊ जमीन घेतली जाणार नाही, असे स्पष्टीकरण यावेळी त्यांनी केले.'' वसंतदादांनी कृषी उद्योगाची स्थापना सांगली जिल्ह्यात केली आणि त्याचा विस्तार करण्याचे काम आता डॉ. पतंगराव कदम यांनी हाती घेतले आहे.

माहिती व तंत्रज्ञानविषयक आंतरराष्ट्रीय परिषद, नवी दिल्ली येथे दि. ३ मार्च, २००० रोजी आयोजित केली होती. त्या परिषदेत महाराष्ट्रात

उपलब्ध असलेल्या सोयींबद्दल डॉ. पतंगराव कदम म्हणाले, ''विदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूकदारांचे महाराष्ट्रात इष्ट स्थान असून राज्यातील उद्योगधंद्यांना अनुकूल अशा पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळेच महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान उद्योगाचेसुद्धा महत्त्वाचे केंद्र बनले आहे. महाराष्ट्रात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती व तंत्रज्ञानात जागतिक संपर्क असलेले 'सिप्ला' हे केंद्र २५ वर्षांपूर्वी सुरु करण्यात आले. मुंबई, नवी मुंबई व पुणे या शहरांना ऑप्टिक फायबर व केबलडक्टच्या सहाय्याने जोडणारा माहितीमार्ग तयार झाला आहे. या माहिती-मार्गामुळे खासगी व सार्वजनिक उद्योगांना लागणाऱ्या पायाभूत सुविधा लवकरच उपलब्ध होणार आहेत. एम.आय.डी.सी. हा राज्य सरकारचा उपक्रम सिप्ला, बेलापूर व ऐरोली या ठिकाणी संगणक सॉफ्टवेअरच्या संदर्भात सेवा उपलब्ध करून देत आहे. नवी मुंबई येथे मिलेनियम बिजनेस पार्क, तसेच हिंजवडी, खराडे, तळवडे-पुणे येथे माहिती तंत्रज्ञान पार्क व जवाहरलाल नेहरू बंदरावर द्रोणागिरी हार्डवेअर पार्क असे विविध प्रकल्प उभे राहिले आहेत. टी.सी.एस., विप्रो, इन्फोसिस, जॉमेट्रिक, अशा खासगी कंपन्यांच्या सहभागाने पुणे माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे प्रधान केंद्र बनले आहे. त्या पाठोपाठ औरंगाबाद, नागपूर या शहरातसुद्धा अशाच सुविधा उपलब्ध करून देऊ.''

''महाराष्ट्र राज्याने सरकारी कर्मचाऱ्यांना प्रवेशासाठी संगणक साक्षरता आवश्यक केली आहे. तसेच दोन हजार सरकारी कार्यालये संगणकाद्वारे जोडण्याचा व सरकारी कर्मचाऱ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राज्य सरकार राबवीत आहे. राज्य सरकारने माहिती तंत्रज्ञान या विषयाचे शालेय स्तरावर अध्यापन करण्यास सुरुवात केली आहे. राज्यात प्रशिक्षित मनुष्यबळ हा खासगी उद्योगधंद्यांचा पाया मजबूत आहे. महाराष्ट्रातील विविध वैज्ञानिक व तांत्रिक संस्थांमधून दरवर्षी दीड लाख विद्यार्थ्यांना माहिती व तंत्रज्ञान विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. अमेरिकेतील कार्नेजी मेलन विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पुण्याच्या सॉफ्टवेअर इंजिनिअरींग कॉलेजमध्ये माहिती व तंत्रज्ञानविषयक प्रशिक्षण दिले जात आहे.''

दि. १२ मार्च, २००० रोजी पालकमंत्री जयवंतराव आवळे यांच्या उपस्थितीत जि.प. सभागृहात आयोजित केलेल्या सभेत डॉ. पतंगराव कदम यांनी सांगली जिल्ह्यांच्या विकासकार्यात अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार न थांबवल्यास त्या अधिकाऱ्यांना घरी पाठवू, अशा कडक शब्दात इशारा दिला. जलसंधारणास ७ कोटी आणि माहिती तंत्रज्ञान केंद्रास ३ कोटी, जिल्हा परिषदेसाठी २ कोटीच्या निधीस मंजुरी व वाढीव दराच्या पाणीपट्टीस तहकुबी या आमसभेत दिली.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या विद्यमाने राज्यातील उद्योजकांच्या प्रश्नांबाबत उद्योग मंत्र्यांनी चेंबरच्या कार्यालयात बैठक आयोजित केली होती. त्याप्रसंगी डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले, की 'राज्यातील औद्योगिक घटकांच्या समस्या जाणून त्या सोडवण्यासाठी दर मंगळवारी मी आणि उद्योगाशी संबंधित अधिकारी मंत्रालयात उपलब्ध होतील. तसेच सोमवारी राज्याच्या मुख्यालयातील सर्व अधिकारी उद्योजकांना भेटतील अशी व्यवस्था आहे. असे विविध उपाय करुन उद्योजक व अधिकारी यांचा समन्वय साधण्याचा व समस्या सोडवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.'

जागतिक मराठी चेंबरने दि.१२ एप्रिल, २००० रोजी आयोजित केलेल्या उद्योजक, व्यापारी, मंत्री, वरिष्ठ शासकीय अधिकारी यांच्या स्नेहसंमेलनात बोलताना उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले, की 'राज्यातील प्रगतीसाठी लवकरच एक सुटसुटीत नवे औद्योगिक धोरण आखण्यात येणार असून त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात येईल. मराठी उद्योजक पुढे येण्यासाठी परवानगी पद्धतीतील क्लिष्टता कमी करण्यावर या धोरणात भर देण्यात येईल. जागतिक मराठी चेंबरचे कार्य महाराष्ट्रभर पसरवण्यासाठी प्रत्येक जिल्हा उद्योग केंद्रात चेंबरला दिली आहे.' या अनुषंगानेच महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व इंडो इटालियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने निर्यात संधीवर प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन एप्रिल, २००० मध्ये सांगली येथे करताना उद्योगमंत्र्यांनी सांगितले, की 'गेल्या पाच महिन्यांत राज्यात औद्योगिक क्षेत्राला पुरेसा वाव देण्यात आला आहे. नवेनवे उद्योजक राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करीत आहेत.

राज्यात औद्योगिक गुंतवणुकीसाठी विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यात राज्यातील लोकशाही आघाडी सरकार यशस्वी ठरले असून यापुढील काळात नवनवे उद्योग प्रकल्प आणण्यावर भर दिला जाईल.' या योजनेस पूरक असे माहिती-तंत्रज्ञान उद्योगाचे प्रदर्शन 'बियाँड-२०००' इंडियन मर्चंटस् चेंबरने मुंबईत दि.१८ एप्रिल, २००० रोजी आयोजित केले होते. त्याचे उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री विलासराव देशमुख म्हणाले, की ''माहिती आणि तंत्रज्ञान उद्योगासह महाराष्ट्राचे औद्योगिकरण प्रथम क्रमांकावरच आहे. महाराष्ट्रात नोंदवलेल्या माहिती तंत्रज्ञान उद्योगांची संख्या बंगलोर आणि हैदराबाद येथील माहिती तंत्रज्ञान उद्योगाच्या एकत्रित संख्येपेक्षा जास्त आहे.'' त्याचवेळी नव्या अर्थव्यवस्थेत माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील घडामोडींची माहिती देण्यासाठी एक चांगले व्यासपीठ चेंबरने उपलब्ध करून दिल्याबद्दल उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी चेंबरचे अभिनंदन केले.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे उद्योगमंत्री हे पदसिद्ध अध्यक्ष असतात. डॉ. पतंगराव कदम यांनी एम.आय.डी.सी. च्या माध्यमातून मागास भागात औद्योगिक वसाहती उभारून विकास कार्यास गती दिली. माहिती तंत्रज्ञान उद्योगास पायाभूत सुविधा उपलब्ध करून पंचतारांकित वसाहती उभारून परदेशी गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन दिले. हे करत असताना एम.आय.डी. सी. च्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याची घोषणा कोल्हापूर येथे उद्योग भवनात कर्मचाऱ्यांच्या राज्य अधिवेशनात दि.१४ मे, २००० रोजी केली. जयप्रभा स्टुडिओजवळ कोल्हापूर येथे माहिती तंत्रज्ञान केंद्राच्या इमारतीचे भूमिपुजन दि.१६ मे, २००० रोजी केले. तसेच पुणे, नागपूर, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद या केंद्रांच्या संलग्नीकरणास १० कोटी रूपये मंजूर केल्याचे डॉ. पतंगराव कदम यांनी सांगितले.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादांचे स्मारक सांगलीत त्यांच्या कर्तृत्वाला साजेसे व्हावे असे प्रयत्न स्मारक समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. पतंगराव कदम करीत आहेत. नदीजवळील स्मारकाशेजारील पूरसंरक्षक भिंतीचे काम पूर्ण झाल्यावर स्टेशन चौकातील स्मारकाच्या जागेवर होणाऱ्या

सभागृहाचे भूमिपूजन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते आयोजित केले. त्याप्रसंगी डॉ. पतंगराव कदम यांनी स्टेशन चौकात यशवंतराव चव्हाण यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्याचे जाहीर केले.

डॉ. पतंगराव कदम यांच्या प्रोत्साहनांमुळे आणि गतिमान कार्यपद्धतीमुळे एम.आय.डी.सी.च्या माहिती तंत्रज्ञान संकुलाच्या कामांना चालना मिळाली आणि नव्या मुंबईतील न्यू मिलेनियम बिझनेस पार्कच्या ५३ इमारती पूर्ण झाल्या. मे, २००० पर्यंत ८५ टक्के विक्रीही झाली. एकत्रित क्षेत्रफळ विकत घेणाऱ्या कंपन्यांमध्ये हेक्झावेयर, टेक्नॉलॉजी, मास्टर लिमिटेड, अपटेक, हर्डिलिया ग्रुप, सीएमसी कॉम्प्युटर, एडीसीस होस्टेल कॉम्प्लेक्स, पीडी लाईट इंडस्ट्रीज, रोल्टा इंडिया लि., अलोक टेक्सटाईल, स्वीट इन्फोसिस, टाटा, बी.ई.ओ. इन्फोटेक कंपन्यांचा समावेश आहे.

## अमेरिका-लंडन - शिष्टमंडळ दौरा-मुख्यमंत्री विलासराव देशमुख

माहिती तंत्रज्ञान उद्योगांचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन परदेशातील संभाव्य गुंतवणूकदार व जागतिक बँकेचे अधिकारी यांच्याबरोबर चर्चा करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने २० जून, २००० ते ६ जुलै, २००० या काळात न्युयॉर्क, लॉस एंजेलिस, सॅन होजे, वॉशिंग्टन आणि लंडनला भेटी दिल्या. या शिष्टमंडळात उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम व उद्योग राज्यमंत्री जयदत्त क्षीरसागर, मुख्य सचिव अरूण बोंगिरवार, सचिव विनय बन्सल, जॉनी जोसेफ, यशवंत भावे, जयंत कावळे, प्रवीण परदेशी व प्रभाकर देशमुख होते.

या दौऱ्याचा प्रमुख हेतू अमेरिकेतील महाराष्ट्रीय उद्योजकांना महाराष्ट्रात उद्योग सुरू करण्यास काय पायाभूत सोयी उपलब्ध आहेत याची माहिती करून देणे हा होता. तसेच जागतिक बँकेकडून वीज मंडळाच्या योजना पूर्ण करण्यास अर्थसाहाय्य मिळवणे हाही होता.

अमेरिकेत संस्थेबरोबर मुक्कामात न्यूयॉर्क येथे 'ग्लोबल ऑर्गनायझेशन ऑफ पीपल ऑफ इंडियन ओरिजिन' या संस्थेबरोबर खुलासेवार चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांनी भारतीय उद्योजकांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्याचे आवाहन केले.

लॉस एंजेलिस येथील माहिती तंत्रज्ञान उद्योजगासाठी महाराष्ट्रात असलेल्या संधी, सुविधा सवलतींची माहिती आणि वीजनिर्मितीसाठी महाराष्ट्रातील नैसर्गिक उपलब्धतेची माहिती या लॉस एंजेलिस येथील गुंतवणूक करणाऱ्या उद्योजक व उद्योग कंपन्यांना करून देण्यात आली. प्रश्नोत्तरांतून खुलाशामुळे शंका दूर झाल्या.

जागतिक मराठी चेंबर ऑफ कॉमर्सच्या लॉस एंजेलिसच्या बैठकीत उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी अमेरिकेत अनेक उद्योगधंद्यात पुढाकार घेतलेल्या मराठी उद्योगपतींना महाराष्ट्रात उद्योगधंद्यासाठी दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट दर्जाच्या सुविधांची माहिती दिली. त्या विचारात घेता मराठी उद्योजकांनी आपल्या मायभूमीत उद्योग उभारावेत असे आवाहन केले. त्यांना सर्व प्रकारचे सहकार्य देण्याची ग्वाही दिली. या आवाहनास चांगला प्रतिसाद मिळाला.

सॅन होजे येथे स्थानिक मराठी उद्योजकांची बैठक आयोजित केली होती. त्यामध्ये महाराष्ट्रातील उद्योगवाढीसाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत डॉ. पतंगराव कदम यांनी सविस्तर चर्चा केली. त्यानंतर अमेरिकेतील मराठी उद्योजकांसाठी मरोळ येथे व्हेंचर कॅपिटल पार्क उभारण्याचे उद्योजमंत्र्यांनी तेथेच जाहीर केले.

वॉशिंग्टन येथील इसरानी टेक्नॉलॉजी कंपनीबरोबर बॅटरीवर चालणाऱ्या दुचाकी वाहनांच्या उत्पादनाचा करार करण्यास उद्योगमंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी पुढाकर घेतला. तसेच जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांबरोबर वीज मंडळासाठी आर्थिक साहाय्याबाबत मंत्र्यांच्याबरोबर चर्चेत भाग घेतला.

लंडन येथे भारतीय उद्योगपतींच्या बैठकीत डॉ. पतंगराव कदम यांनी भाग घेऊन मार्गदर्शन व चर्चा केली. महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या सोई-सुविधांचा विचार करून मराठी उद्योजकांनी महाराष्ट्रात गुंतवणूक करावी, असे आवाहन त्यांनी केले.

या दौऱ्यामध्ये अमेरिकेतील व इंग्लंडमधील तज्ज्ञांनी डॉ. पतंगराव कदम यांचे भारती विद्यापीठ स्थापन करून शिक्षण क्षेत्रामध्ये केलेल्या महत्त्वपूर्ण कार्याचे कौतुक केले आणि भारती विद्यापीठाचा विस्तार परदेशात

करण्याच्या सूचनाही केल्या. एकूण या दौऱ्याचे फलित म्हणजे माहिती तंत्रज्ञान उद्योगक्षेत्रामध्ये सुमारे ९०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव दाखल झाले. आयबीएम कंपनीने संगणक साक्षरता वाढवण्यासाठी महाराष्ट्रातील शाळा-कॉलेजांना लोटस नोटस् व लोटस स्मार्ट सूट सॉफ्टवेअर मोफत पुरवण्याचा करार मुख्यमंत्र्यांबरोबर केला. या उपक्रमाचा फायदा महाराष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी व माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी निश्चित झाला आहे.

लंडन येथील महाराष्ट्र मंडळात मराठी उद्योगपतींसमोर बोलताना मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी परदेशातील मराठी माणसाने महाराष्ट्रासाठी आर्थिक राजदूत व्हावे असे आवाहन केले. जागतिक बँकेने महाराष्ट्रातील आर्थिक, औद्योगिक विकासकार्याची प्रशंसा करून भरीव आर्थिक साहाय्याचे आश्वासन दिले. त्याचा प्रत्यय लवकरच येणार आहे.

अमेरिका-इंग्लंडच्या यशस्वी दौऱ्यानंतर डॉ. पतंगराव कदम यांनी उत्साहाने कामास पुन्हा जुंपून घेतले. अमेरिकेच्या दौऱ्यामुळे इतर देशांतील उद्योगपतींनी महाराष्ट्रात माहिती तंत्रज्ञान उद्योग सुरू करण्यास सुरुवात केली. एकनवके टेलिकॉमने जपानच्या आय.एम.एक्स.के. या कंपनीच्या सहकार्याने अत्याधुनिक एकात्मिक बहुमाध्यम दूरसंपर्क यंत्रणेची मालिका कार्यान्वित केली. तिचे उद्घाटन ऑगस्ट, २००० मध्ये डॉ. पतंगराव कदम यांनी केले. त्याप्रसंगी ते म्हणाले, की 'माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी सुमारे नऊशे एकर जागेवर पसरलेल्या ४१.४० लाख चौ.फूट जागेवर १५ इन्फरमेशन टेक्नॉलॉजी पार्क उभारण्याची योजना आहे. राज्याच्या माहिती तंत्रज्ञानासाठी पायाभूत सुविधा, जोडणी, वित्तीय व बिगर वित्तीय सवलती, मनुष्यबळ विकास आणि संस्थात्मक चौकट पुरवण्यात येईल. त्यामुळे विदेशी गुंतवणूकदार आकर्षित होत आहेत. त्यामुळे नवीन रोजगार उपलब्ध होऊन औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.' या पार्श्वभूमीवर जपानच्या पंतप्रधानांनी भारताच्या २२ ऑगस्ट, २००० पासूनच्या चार दिवसांच्या दौऱ्यात जाहीर केले, की माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात भारताशी सहकार्यवाढीस जपान उत्सुक आहे.

याच दरम्यान केंद्र शासनाच्या वतीने पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी लघुउद्योग क्षेत्रासाठी अनेक सवलती जाहीर केल्या. त्यांचे डॉ. पतंगराव कदम यांनी स्वागत केले.

भारतीय औद्योगिक क्षेत्राचे मूल्यमापन करणाऱ्या सी.एम.आय.ई. आणि भारत सरकारच्या एस.आय.ए. या दोन्ही संस्थांनी आपल्या अहवालात महाराष्ट्राच्या गतिमान आद्योगिक प्रगतीचा सविस्तर आढावा घेताना म्हटले आहे , की महाराष्ट्रातील औद्योगिक गुंतवणुकीतील भक्कम स्थिती कायम आहे. राज्याचे उद्योगमंत्री डॉ. पतंगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राची औद्योगिक विकासाची घोडदौड सुरू असून २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात गाठलेली मजल अन्य राज्ये मारू शकणार नाहीत.

आपल्या आईच्या निधनाचा आघात सोसून डॉ. पतंगराव कदम यांनी आपल्याला पुन्हा कामात गुंतवून घेतले. डॉ. पतंगराव कदम यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारल्यापासून एक वर्षात झालेल्या कामाची माहिती पत्रकारांना दि. २० ऑक्टोबर, २००० रोजी देताना म्हणाले, की 'माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्राने धाडसाचे निर्णय घेऊन खूप मोठे काम केलेले असतानाही आंध्र प्रदेशाच्या तुलनेत योग्य ती प्रसिद्धी आपल्या वाट्याला आली नसल्याने महाराष्ट्र मागे असल्याचे चित्र दिसते याची खंत वाटते. औद्योगिक विकास महामंडळाने इतर महत्त्वाकांक्षी योजनांबरोबच नवी मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, सांगली, लातूर व सोलापूर या क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञान संकुले उभारण्याचे ठरवले आहे. राज्याच्या संतुलित विकासावर भर देताना पुण्या-मुंबईसारख्या प्रगत औद्योगिक केंद्राबाहेर मागास विभागाच्या औद्योगिक विकासावर लक्ष केंद्रित करण्याचे आपण ठरवले आहे. त्यावेळच्या आकडेवारीनुसार हैदराबादमधील सॉफ्टवेअरची निर्यात दरसाल २००० कोटी रूपयांची आहे; तर केवळ पुण्यातून १२०० कोटी रूपयांची व मुंबईतून ३५०० कोटी रूपयांची सॉफ्टवेअर निर्यात होते. हे विचारात घेतल्यास या क्षेत्रात आपण खूपच पुढे असल्याचे स्पष्ट होईल. महामंडळाने १२ कोटी रूपयांचे बिनव्याजी कर्ज टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाला उपलब्ध करून दिले आहे. राज्यातील

महामंडळाच्या विविध औद्योगिक वसाहतींमधील रस्ते, दिवे, पाणीपुरवठा, मलनिस्सारण यंत्रणा आदी सुविधांच्या विकासासाठी ऑक्टोबर, १९९९ पासून आजपर्यंत १०,६३५ लाख रुपयांचा प्रशासकीय खर्च केला आहे. कोल्हापूर येथील विमानतळासाठी ३.५ कोटी रूपये खर्चाला मंजुरी दिली असून जिल्हावार विमानसेवेच्या कामाचे सर्वेक्षण करण्याचे काम टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसकडे सोपवले आहे.' राज्यात औद्योगिक विकासासाठी सर्वात जास्त गुंतवणूक करणाऱ्या महामंडळाचा कार्यभार स्वीकारल्यापासून महाराष्ट्र डॉ. पतंगराव कदम यांच्या नेतृत्वाखाली औद्योगिक विकासामध्ये आघाडीवर राहिला आहे. लोकशाही आघाडी शासनाचे हे महत्त्वपूर्ण यश आहे.

मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेच्या दौऱ्यात झालेल्या करारानुसार मरोळ-अंधेरी येथील एम.आय.डी.सी. च्या 'समृद्धी' या इमारतीतील व्हेंचर पार्कमध्ये नवउद्योजक व व्हेंचर कॅपिटॅलिस्ट व तंत्रज्ञ एकत्र येण्याची सुविधा झाली. असे केंद्र स्थापन करण्याचे अमेरिकेतील उद्योजकांनी सुचवले होते. अमेरिकेतील महाराष्ट्रीय उद्योजक डॉ. सुहास पाटील यांनी या व्हेंचर पार्कमध्ये २७०० चौरस फूट जागा घेतली असून यामुळे मुख्यमंत्र्यांनी अमेरिकेत दिलेल्या आश्वासनाची पूर्ती झाली आहे. २१ व्या शतकात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाचे योगदान करणाऱ्या अमेरिकेतील तुफान इन्कोटेक इंडियाचे डॉ. सुहास पाटील, हरिष मेहता, देवांग मेहता, अतुला निम्मार यांचा मुख्यमंत्री व उद्योगमंत्र्यांनी गौरव केला.

१९८३ साली वसंतदादा पाटील तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी घेतलेल्या अनेक धाडसी निर्णयांमधील 'पाणी अडवा पाणी जिरवा' हा शेतकऱ्यांना दिलेला मूलमंत्र ऐतिहासिक ठरला. भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खाली जात असताना या महामंत्राचा पाठपुरावा शासनाच्या योजनांद्वारे केला जात आहे. अण्णा हजारे यांच्यासारखे समाजसेवक कृतीने या योजनांचे महत्त्वसिद्ध करीत आहेत. डॉ. पतंगराव कदम यांनीही खानापूर तालुक्यातील दुष्काळी पश्चिम भागात भारती विद्यापीठाच्या ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या वतीने अनेक नव्या विहिरी खोदल्या, जुन्या विहिरी खोल केल्या व अनेक पाझर तलाव बांधून घेतले. खानापूर, जत आटपाडी या दुष्काळी

भागातील शेतकऱ्यांच्या जीवनाची घडी बसवण्यासाठी कृष्णा नदीचे पाणी उचलून ते या दुष्काळी भागस देण्याची मागणी शेतकऱ्यांच्या मेळाव्यात डॉ. पतंगराव कदम यांनी केल्यामुळे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी दि. ३ एप्रिल, १९८४ रोजी नागेवाडी येथे ८० कोटी रूपयांची ताकारी योजना मंजूर केल्याचे जाहीर केले. त्या योजनेचा पाठपुरावा डॉ. पतंगराव कदम यांनी करून शिक्षणमंत्री झाल्यावर ताकारी योजनेसाठी अधिक निधी महाराष्ट्र शासनाकडून मंजूर करून घेतला आणि प्रत्यक्ष कामास गती दिली.

महाराष्ट्र राज्यातील ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी १८०.६४ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. यापैकी ८५% क्षेत्र कोरडवाहू असल्यामुळे आणि पर्यायाने ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था कोरडवाहू शेतीवर अवलंबून असल्यामुळे जास्तीत जास्त म्हणजे ३०% शेती ओलिताखाली आणण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत, कारण ग्रामीण भागाचा विकास हा प्रामुख्याने कोरडवाहू क्षेत्राच्या विकासाशी निगडीत आहे.

कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्याकरिता अवसंधारणाची कामे शासनाने हाती घेतली असे करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. शेतीच्या व पिण्याच्या पाण्याची परिस्थिती चिंताजनक झाली असल्यामुळे जलसंधारण कामास प्राधान्य दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या आघाडी शासनाने सामाजिक वनीकरण, पाटबंधारे प्रकल्प, पाणलोट व जलसंधारण कामाचे प्रचालन व नियमन करण्यासाठी २२ ऑगस्ट, २००० रोजी एका अध्यादेशाद्वारे महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ स्थापन करण्यात आले. जलसंधारण मंत्री हे महामंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. डॉ. पतंगराव कदम यांनी जलसंधारण मंत्री म्हणून कार्यभार स्वीकारल्यापासून महाराष्ट्रातील जलसंधारण कामास गती दिली आहे.

सर्वंकष पाणलोट क्षेत्र विकास, नदी खोरे प्रकल्प, एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास, आदर्श गाव योजना, पश्चिम घाट विकास कार्यक्रम, अवर्षणप्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, भूविकास योजना इत्यादी योजना डॉ. पतंगराव कदम यांच्या जलसंधारण खात्यामार्फत राबवल्या गेल्या.

अनेक वर्षे रेंगाळलेली ताकारी उपसा जलसिंचन योजना मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते शेवटी कार्यान्वित झाली. डॉ. पतंगराव कदम यांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील हा इच्छापूर्तीचा, आनंदाचा दिवस होता. कारण १९८४ साली या योजनेस मंजुरी मिळाल्यापासून त्यांनी सारखा पाठपुरावा केला होता. शेतकरी मेळावे घेऊन शासनाकडून अधिक निधी मिळवला होता. शेवटी खानापूर, जत व आटपाडी तालुक्यातील शेतकऱ्यांना वरदान देणारी योजना प्रत्यक्षात सुरू झाली. डॉ. पतंगराव कदम यांनी जिद्दीने सागरेश्वर सहकारी सूतगिरणी मंजूर करून घेऊन सूत उत्पादनास सुरुवात केली. सोनहिरा सहकारी साखर कारखानाही जिद्दीने मंजूर करून घेऊन अल्पावधीत साखर उत्पादन सुरू केले. या यशापाठोपाठ ताकारी उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित झाल्यामुळे सामाजिक कार्याची हॅटट्रिकच त्यांनी केली असे वाटते.

राज्यातील जलसंधारण योजना पुऱ्या करण्यास पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही डॉ. पतंगराव कदम यांनी वेळोवेळी अनेक प्रसंगात दिली होती. त्या अनुषंगाने अहमदनगर येथे २४ ऑक्टोबर, २००० रोजी एका कार्यक्रमात जाहीर केले, की राज्यातील जलसंधारण प्रकल्पाची रेंगाळलेली कामे मार्गी लावण्यासाठी विविध जलविकास महामंडळामार्फत पाच अब्ज रुपये उभे करणार आहे. जलसंधारण प्रकल्पासाठी कर्जरोख्यांद्वारे पाच अब्ज, तर सरकारी निधीतून पाच अब्ज रुपये खर्च करण्याचा क्रांतिकारक निर्णय राज्य सरकारने घेतल्याचेही त्यांनी सांगितले. जलसंधारण महामंडळाचे अध्यक्ष सुधाकरराव नाईक व वनराईचे प्रवर्तक मोहन धारिया यांच्यातील वाद मिटल्यामुळे स्वयंसेवी संस्थांची जलसंधारण कार्यात सहयोग वाढेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य विधानसभेच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात डॉ. पतंगराव कदम यांनी सरकारच्या अर्थसंकल्पातून पाचशे कोटी रुपये जलसंधारण महामंडळासाठी मिळवले व त्यानुसार जलसंधारण कामाचा आराखडा तयार करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना त्यांनी दिल्या. क्षारपड जमिनीचा विकास, पुरामुळे खचणारे नदीकाठ बंदिस्त करणे, प्रत्येक गावात पावसाचे पाणी साठवणे व जिरवणे अशा योजनांचा समावेश आराखड्यात केला जावा अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

जलसंधारण मंदिराचा पाया मुख्यमंत्री वसंतदादा यांनी घातला. नंतरचे मुख्यमंत्री सुधाकरराव यांनी त्यावर मंदिर बांधले आणि आता जलसंधारण मंत्री डॉ. पतंगराव कदम हे त्यावर कळस चढविण्याचे कार्य करीत आहे असे म्हणावयास हरकत नाही.

मध्यंतरी मुख्यमंत्री ना.विलासराव देशमुख यांनी काही मंत्र्यांच्या खात्यामध्ये फेरबदल केले. डॉ. पतंगराव कदम यांचेकडे उद्योग, व्यापार व वाणिज्य खाते सोपविले. त्यानंतर पूर्वीप्रमाणे त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी डॉ. पतंगराव कदम पार पाडीत होते.

तसेच मुंबई येथे मंत्रालयामध्ये मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संपूर्ण राज्यभरात विविध २५ नवीन प्रकल्प तीन हजार कोटी रूपये खर्च करून उभारण्याचे जाहीर केले. हे प्रकल्प विकसित करताना खाजगी क्षेत्राशी संयुक्त भागीदारी करण्याचे योजिले आहे.

पुणे, जालना येथे जैव तंत्रज्ञान उद्याने, ऐरोली तळेगाव येथे उच्च तंत्रज्ञान उद्याने, मुंबई-पुणे क्षेत्रात ज्ञाननगरी, तळेगाव दाभाडे येथे पुष्पसंवर्धन उद्यान, अलकुड, मनेराजुरी (सांगली), तुटीबौरी (नागपूर) अन्न प्रक्रिया उद्यान व विंचूर (नाशिक), पलूस (सांगली) द्राक्षापासून मद्याची निर्मिती असे प्रकल्प सुरु करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविले आणि डॉ. पतंगराव कदम हे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाने या योजना कार्यान्वित झाल्या आहेत.

***

## २१. नावामागील प्रेरणा

''सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेऊन आपल्या स्वकर्तृत्वाने ज्यांनी इतिहास घडवला, ज्यांच्या कार्याची इतिहासकारांनी इतिहास लिहिताना नोंद घेतली, अशा कर्तृत्ववान, महान व्यक्तींची नावे शिक्षण संस्थांना, तेथे शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून दिली जातात. हा एक प्रकारे त्या व्यक्तीच्या कार्याचा बहुमानच असतो. त्या त्या शिक्षण संस्थांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेचे नाव सांगताना अभिमानच वाटत असतो. मी रयत शिक्षण संस्थेचा माजी विद्यार्थी आहे याचा मलासुद्धा रास्त अभिमान आहे. यशवंतराव मोहिते यांचे राजकीय गुरू व खासदार शंकरराव मोरे यांचे नाव भारती विद्यापीठाच्या प्रथम स्थापन केलेल्या विद्यालयाला देऊन त्याचे शंकरराव मोरे विद्यालय असे नामकरण १९६९ साली करण्यात आले. यानंतर भारती विद्यापीठाच्या एरंडवणे शैक्षणिक संकुलातील आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजला यशवंतराव मोहिते असे १९८९ मध्ये नामकरण करण्यात आले.''

कोल्हापूरच्या श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने १९८४ पासून कुलाबा जिल्ह्यात पेण येथे आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय सुरु केले होते. कोकणातील या महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील एक आदर्श महाविद्यालय म्हणून लौकिक मिळवला आहे. स्थानिक दानशूर व्यक्तींच्या आर्थिक सहकार्यातून या महाविद्यालयाच्या भव्य इमारतीचे आणि त्या महाविद्यालयाचे 'डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय' असे नामकरण करण्याचा ऐतिहासिक समारंभ, पेण येथे संपन्न झाला.

पेण येथील या महाविद्यालयास डॉ.पतंगराव कदम यांचे नाव का दिले याचे स्पष्टीकरण श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या या ठरावामधून होईल : ''श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने पेण शहराचे गणपती संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत. या श्री. गणेशाच्या नगरीमध्ये विद्येचे माहेरघर असलेले पुणे या ठिकाणी भारती विद्यापीठ अत्यंत प्रशंसनीय कार्य करीत आहे. सद्य:स्थितीत 'राष्ट्रीय एकात्मता' हा देशासमोरील सर्वाधिक ज्वलंत, अत्यंत मुलभूत आणि अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न आहे. असे अनेक प्रश्न

समाजाच्या, राष्ट्राच्या प्रवाहात निर्माण होत असतात. त्याची उकल देखील त्या प्रवाहाच्या संदर्भातच होत असते. 'लेखन आणि वाचन' एवढ्यापुरती शिक्षण प्रक्रिया मर्यादित न ठेवता लोकशाहीभिमुख भावनेने 'मानवतावादी चिंतन' हे शिक्षणाचे मुख्य ध्येय मानून स्वातंत्र्योत्तर काळातील गतिमान आधुनिक शिक्षणाचा वेध घेणाऱ्या भारती विद्यापीठाद्वारे दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून होत असलेल्या समाजपरिवर्तनाने अशा गंभीर प्रश्नांची उकल व्हायला मदत होईल अशी दृढ श्रद्धा आहे. अशा राष्ट्रीय विचारांचे डॉ. पतंगराव कदम यांचे नाव श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने पेण येथील आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेजला देण्याचे ठरावाने मंजूर केले आहे.''

या ऐतिहासिक ठरावाची अंमलबजावणी होण्यासाठी विवेकानंद संस्थेचे सचिव प्राचार्य अभयकुमार साळुंखे व सहसचिव प्राचार्य गजेंद्र ऐनापुरे यांनी आवश्यक ते प्रयत्न केले. डॉ.पतंगराव कदम यांचे विचार पेण येथील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहेत. दि. १६ जानेवारी, १९९९ रोजी पेण येथील कॉलेजला शिक्षण क्षेत्रात सुप्रसिद्ध असलेल्या डॉ.पतंगराव कदम यांचे नाव देऊन श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने एक ऐतिहासिक कार्य केले आहे. विवेकानंद शिक्षणसंस्थेचे संस्थापक कै. डॉ. बापूजी साळुंखे व डॉ.पतंगराव कदम यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते आणि डॉ.पतंगराव कदम हे विवेकानंद शिक्षण संस्थेचे एक हितचिंतक असल्यामुळे त्यांचे नाव कॉलेजला देऊन एक ऐतिहासिक औचित्य साधले. माणसाच्या जीवनाला मर्यादा असतात; पण शिक्षण संस्थांचे जीवन अजरामर असते. अशा वेळी ज्या महान व्यक्तीचे नाव शिक्षण संस्थांना दिले जाते, त्यावेळी त्या महान व्यक्तीचे कार्यही अजरामर होत असते. असे भाग्य डॉ.पतंगराव कदम यांना लाभले. त्यांच्या पारदर्शी सत्कार्यामुळे त्यांनी ते मिळवले आहे.

सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यात पूज्य सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव या जन्मगावाजवळ शिरवळ या गावी रयत शिक्षण संस्थेने आर्टस्, सायन्स, कॉमर्स महाविद्यालय सुरू केले होते. दुष्काळी भागातील हे महाविद्यालय संथ गतीने प्रगती करीत होते. डॉ. पतंगराव कदम यांनी हे जाणले. कारण रयत शिक्षण संस्थेच्या सल्लागार मंडळावर व कार्यकारिणीवर

ते असल्यामुळे शिरवळच्या कॉलेजची स्थिती कशी आहे हे ते जाणून होते. त्या कॉलेजची प्रगती गतिमान करण्याची गरज होती. रयत शिक्षण संस्थेने शिरवळच्या या कॉलेजला डॉ.पतंगराव कदम यांच्या वडिलांचे 'श्रीपतराव कदम महाविद्यालय' असे नाव दिले. आणि त्या कॉलेजच्या परिसराचे 'डॉ.पतंगराव कदम शैक्षणिक संकुल' असे नामकरण केले. परीसाचा स्पर्श होताच लोखंडाचे सोने होते तसे शिरवळच्या या परिसराचे व महाविद्यालयाचे रूप आज पालटले आहे व ते वेगाने प्रगतिपथावर आहे.

बाहेरच्या संस्थांनी डॉ.पतंगराव कदम यांचे नाव शिक्षण संस्थांना देऊन आघाडी घेतली. राखेतून फिनिक्स पक्ष्याचा जन्म व्हावा तसे नावारूपास आणलेल्या भारती विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळात प्राचार्य डॉ. एम्. एस्. सगरे यांनी दुसऱ्यांदा ठराव मांडून पास करून घेतला, नंतर दोन महिन्यानंतर डॉ.पतंगराव कदम यांचे नाव देण्यासाठी सर्वसंमती मिळाली आणि सांगली येथील आलिशान इमारतीत भरत असलेल्या महाविद्यालयास डॉ.पतंगराव कदम यांचे नाव देण्याचे ठरवले. हा नामकरण समारंभ सांगलीच्या कॉलेजच्या आवारात डॉ. पतंगराव कदम यांच्या ५४ व्या वाढदिवशी एका भव्य समारंभात संपन्न झाला. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर सेवकांनी ५४,०००/- रूपयांची थैली अर्पण केली. डॉ.पतंगराव कदम यांनी तितकीच रक्कम रूपये ५४,०००/-त्यामध्ये घालून महाविद्यालयातील प्रत्येक वर्गात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना कायमस्वरूपी ठेवीच्या व्याजातून पारितोषिके देण्याचे जाहीर केले.

सांगलवाडी येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे 'डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय' असे नामकरण भारती विद्यापीठाचे अध्यक्ष माननीय यशवंतराव मोहिते यांच्या हस्ते दि. ०८ जानेवारी, १९९९ रोजी झाले. त्यावेळी श्री. मोहिते म्हणाले, ''वैचारिक क्रांतीशिवाय समाजात बदल होणे अशक्य आहे. त्याचवेळी धर्माचा खरा अर्थ समजावून घ्यावला हवा, त्याची माहिती विद्यार्थ्यांना द्यायला हवी. डॉ. पतंगराव कदम यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव आहे. एकाच छत्राखाली प्राथमिक शाळेपासून तंत्र, विज्ञान, आरोग्य असे विविध विषयांचे शिक्षण

देताना या क्षेत्रात प्रचंड क्रांती केली आहे, परंतु त्यांचे मोठेपण मान्य करण्याची कुवत आजच्या समाजात नाही. शैक्षणिक, सहकार, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रांत प्रचंड प्रगती करणारी डॉ. पतंगरावांसारखी व्यक्ती आज केवळ सांगली जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात शोधूनही सापडणार नाही.''

याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक शंकरराव खरात म्हणाले, की 'शिक्षणातील असमतोल नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख यांच्या परंपरेतील डॉ. पतंगरावांनी आजही शिक्षण कुणासाठी, याचा शोध सुरू ठेवला आहे. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात अनेक नामवंत शिक्षणसंस्था असताना डॉ.पतंगराव कदम यांनी स्पर्धेत उतरून स्वत: निर्माण केलेले अस्तित्व कौतुकास्पद आहे.'

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे म्हणाले, की 'पस्तीस वर्षांच्या अल्प कालावधीत भारती विद्यापीठाने उत्तुंग यश मिळवले आहे. अफाट, प्रचंड या शब्दांचे अर्थ भारती विद्यापीठाचा विस्तार पाहून लक्षात येतात. अफाट कर्तृत्वानेच डॉ.पतंगराव कदम यांनी सर्व क्षेत्रातील मर्यादा ओलांडल्या आहेत. एका माणसाचे कर्तृत्व पाहून अचंबित व्हावे अशीच ही कामगिरी आहे.'

भारती विद्यापीठाचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, सेवक आणि हितचिंतक मित्रमंडळींनी डॉ. पतंगराव कदम यांच्या ५४ व्या वाढदिवसाच्या शुभप्रसंगी सांगलीतील भारती विद्यापीठाच्या महाविद्यालयास त्यांचे नाव देऊन कृतज्ञता व्यक्त केली आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डॉ. पतंगराव कदम यांचे महान कार्य प्रेरणादायी ठरणार आहे.

सांडगेवाडी, ता.पलूस येथील धडाडीचे व चिकाटीचे माजी सरपंच पांडुरंग सूर्यवंशी यांच्या पुढाकाराने सुरू केलेल्या आश्रमशाळेच्या शिक्षण संस्थेस 'डॉ.पतंगराव कदम शिक्षणसंस्था' हे नाव देऊन फार मोठे औचित्य साधले आहे. एका शिक्षणमहर्षीचे नाव भटक्या जमातीच्या आश्रमशाळेस देऊन भटक्या जमातीचा सर्वांगीण विकास अजरामर होणार आहे.

कोल्हापूर येथे प्रा. दिनकर विष्णू पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरावा असा उपक्रम 'डॉ. पतंगराव कदम फौंडेशन, कोल्हापूर' या संस्थेद्वारे सुरू केला आहे. या फौंडेशनतर्फे प्रतिवर्षी ख्यातनाम व्यक्तींना पुरस्कार दिले जात आहेत.

सांगली येथील क्रीडाप्रेमी नागरिकांनी क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंना विविध सुविधा पुरवून त्यांच्या गुणांना वाव मिळावा या हेतूने 'डॉ.पतंगराव कदम स्पोर्टस् क्लब' स्थापन करण्यात आला आहे. या संस्थेच्या वतीने दरवर्षी खेळाचे सामने आयोजित केले जातात.

सांगली येथे डॉ. पतंगराव कदम यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याची प्रेरणा या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना सतत मिळत राहावी, या हेतूने 'डॉ.पतंगराव कदम पतसंस्था' स्थापन झाली आहे. सांगली जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आनंदराव मोहिते यांनी या पतसंस्थेस शुभेच्छा देताना म्हटले होते, की 'डॉ.पतंगराव कदम यांनी शिक्षण, सहकार व सामाजिक क्षेत्रात यशस्वी वाटचाल केली असल्याने त्यांचे नाव सभासदांनी पतसंस्थेस दिल्याने संस्थेची पत निश्चितच वाढली आहे.'

सांगलीच्या पूर्वेकडील नवीन वसाहतीस तेथील रहिवाशांनी त्या विभागास 'डॉ. पतंगराव कदम नगर' असे नाव दिले आहे. त्या भागात भारती विद्यापीठाची एक शाखा लवकरच सुरू होत आहे.

पुण्यातील धनकवडी शेजारील आंबेगाव परिसरातील नवीन वसाहतीस तेथील रहिवाशांनी 'डॉ.पतंगराव कदम नगर' असे नाव दिले आहे. भारती विद्यापीठातील विविध शाखांमध्ये काम करीत असलेले कर्मचारी त्या भागात राहत आहेत.

डॉ.पतंगराव कदम यांच्या अथक व भगीरथ प्रयत्नांमुळे सुरू झालेल्या खानापूर तालुक्यातील सोनहिरा सहकारी साखर कारखान्यात साखर उत्पादन सुरू झाले आहे. सुमारे १६५ एकरांमध्ये सुरू झालेल्या या साखर कारखान्याच्या परिसरास 'पतंगनगर' असे नाव साखर कारखान्याच्या भागधारकांनी दिले आहे. डॉ.पतंगराव कदम यांच्या निधनानंतर सदर कारखान्याचे नामकरण 'डॉ.पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखाना (पतंगनगर), वांगी' असे केले आहे.

दौंडज येथील हायस्कूलला 'शिक्षणमहर्षी डॉ.पतंगराव कदम विद्यालय' असे मूळच्या संस्थेने नाव दिले आहे.

डॉ.पतंगराव कदम यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य लक्षात घेऊन मान्यवर संस्थांनी त्यांचे नाव विविध शाखांना देऊन कृतज्ञता तर व्यक्त केली आहेच, पण त्याचबरोबर त्या संस्था अगर शाखा यांना एका अर्थाने प्रतिष्ठाही मिळाली आहे.

डॉ.पतंगराव कदम यांनी मात्र भारती विद्यापीठाच्या शाखांना धनवान व्यक्तींची किंवा नेत्यांची नावे देण्याचे कटाक्षाने टाळले आहे. समाजाला, देशाला ज्या व्यक्तींनी वैचारिक शिदोरी दिली आहे, आपल्या नि:स्वार्थ सेवेच्या योगदानाने विधायक समाज परिवर्तनासाठी आपले आयुष्य वेचले आहे अशाच समाजसुपुत्रांची नावे भारती विद्यापीठाच्या शाखांना देण्यात आली आहेत. धनाऐवजी केवळ ध्येयवादाला, आदर्श समाजसेवेला महत्त्व देऊन त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

काँग्रेस पक्षातील एक ज्येष्ठ नेते, शेतकरी-कामगार पक्षाचे संस्थापक, माजी खासदार, पत्रकार, प्रभावी वक्ते, लेखक, साहित्यिक, राजकीय विचारवंत शंकरराव मोरे यांचे नाव भारती विद्यापीठाच्या एरंडवणे येथील पहिल्या माध्यमिक विद्यालयास दिले आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील विचारवंत, सहकार क्षेत्रातील मार्गदर्शक, समाजवादी क्रांतीसंबंधीचे अभ्यासक, फुले-शाहू-आंबेडकर विचारप्रवाहाचे पुरस्कर्ते, महाराष्ट्राचे माजी मंत्री, बुद्धिवादी, अभ्यासू, चारित्र्यसंपन्न, सुसंस्कृत माननीय 'यशवंतराव मोहिते' यांचे नाव भारती विद्यापीठाच्या एरंडवणे येथील महाविद्यालयाला दिले आहे.

कै. यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अपूर्व असे योगदान लक्षात घेऊन पुणे येथील भारती विद्यापीठाच्या समाजशिक्षण शाखेस 'यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स स्टडीज् अ‍ॅण्ड रिसर्च' असे नाव दिले आहे.

डॉ.पतंगराव कदम यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या सातारा येथील शिवाजी

कॉलेजमध्ये घेतले होते. अनेक वर्ष बहुजन समाजातील शिक्षणापासून वंचित असलेल्यांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करण्याचे ऐतिहासिक शैक्षणिक कार्य केलेल्या 'कर्मवीर भाऊराव पाटील' यांचे नाव भारती विद्यापीठाच्या धनकवडी येथील माध्यमिक विद्यालयास देऊन डॉ.पतंगराव कदम यांनी खूप मोठे औचित्य साधले आहे.

महाराष्ट्रात शैक्षणिक विकास सर्वसामान्य जनतेमध्ये व्हावा, यासाठी पुढाकार घेतलेल्या महात्मा जोतिबा फुले यांचे बहुजन समाजावर खूप मोठे ऋण आहे. तसेच शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मागासवर्गीयांना राजकीय प्रतिष्ठा मिळवून देणारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचे दलित वर्गाच्या विकासासाठी खूप मोठे योगदान आहे. या दोन महान देशभक्तांची नावे अनुक्रमे भारती विद्यापीठाच्या शिंदेवाडी येथील विद्यालयाचे महात्मा जोतिबा फुले प्रशाला असे नामकरण केले आहे आणि कोथरूड परिसरातील विद्यालयास 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय' असे नामकरण केले आहे.

सांगली जिल्ह्यात शिवाजीनगर येथील भारती विद्यापीठाचे छत्रपती शिवाजी विद्यालय, खंडोबाची वाडी येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील विद्यालय, चिंचणी अंबक येथे श्रीपतराव (तात्या) कदम विद्यालय ही नावे देणे म्हणजे त्या समाजपुरूषांना अभिवादन केल्यासारखे आहे. सोहोली येथील विद्यालयास लोकनेते मोहनराव कदम विद्यालय, सोहोली आणि कृषी महाविद्यालयास 'लोकनेते मोहनराव कदम कृषि महाविद्यालय', सोनसळ-हिंगणगाव असे नामकरण केले आहे. तसेच पुणे येथील ज्युनिअर कॉलेजला 'लोकनेते सुबराव कदम ज्युनिअर कॉलेज, एरंडवणे, पुणे ३८' असे नामकरण केले आहे. अमरापूर येथील विद्यालयास अभिजीत कदम प्रशाला असे नामकरण केले आहे.

भारताचे भाग्यविधाते, भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आधुनिक यांत्रिक व तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून भारताच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचा पाया घातला, एक प्रगतिशील राष्ट्र म्हणून भारताला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या कार्याची प्रेरणा विद्यार्थ्यांना मिळावी; म्हणून धनकवडी येथील भारती विद्यापीठाच्या पॉलिटेक्निकला 'जवाहरलाल नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' हे नाव दिले आहे.

संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे नाव पुणे विद्यापीठाच्या कौन्सिल हॉलला देण्यासाठी डॉ.पतंगराव कदम यांनी पुढाकार घेतला. वर्तमानपत्रात चर्चाही झाली. पण डॉ.पतंगराव कदम यांनी पुणे विद्यापीठाच्या कार्यकारी समितीत ताठर भूमिका घेतली आणि विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये डॉ.पतंगराव कदम यांनी मांडलेला ठराव पास झाला. यशवंतराव चव्हाण यांचे नाव विद्यापीठाच्या कौन्सिल हॉलला देण्यात आले. त्या हॉलमध्ये यशवंतराव चव्हाण यांचा फोटोही लावण्यात आला आहे. डॉ.पतंगराव कदम यांना अखेरपर्यंत साथ दिलेल्या व काटेकोरपणे संसार जपणाऱ्या विजयमाला कदम यांचे एरंडवणे परिसरातील कन्या प्रशालेस 'सौ. विजयमाला कदम कन्या प्रशाला, एरंडवणे' असे नामकरण केले आहे.

हे सर्व घडवण्यामागे महान समाजपुरूषांबद्दलची डॉ.पतंगराव कदम यांनी दाखविलेली कृतज्ञता दिसून येते. विविध ठिकाणी शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनावर आदर्श संस्कार व्हावेत हीच भूमिका डॉ. पतंगराव कदम यांची असावी असे वाटते.

❊❊❊

## २२. सेवक मेळावा ५४ व्या वाढदिवसाचा

वाढदिवस हा व्यक्तीच्या आणि तिच्या कुटुंबीयांच्या आनंदाचा दिवस; आणि ती व्यक्ती जर सार्वजनिक किंवा राजकीय क्षेत्रात काम करणारी असेल तर तिचा वाढदिवस हा सार्वजनिक उत्सवाचा आनंदसोहळा असतो. व्यक्तीच्या जीवनमानाला नियतीने मर्यादा घातलेल्या असतात. तरीसुद्धा वाढदिवसाचा आनंद एवढा मोठा असतो, की आपला जीवनकाळ एक वर्षाने कमी झाला आहे हे त्या व्यक्तीच्या लक्षातच येत नाही. फक्त एक वर्षाने आपण मोठे झालो आहोत यातच त्या व्यक्तीचा आनंद सामावलेला असतो.

परंतु, संस्थेच्या जीवनमानाला मर्यादा नसते. त्या वटवृक्षाच्या फांद्या सारख्या फोफावत असतात विशेषकरून ज्या संस्था सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य करतात त्यांना भूतलावर अमरत्व लाभत असते. यापैकी आदर्शवत संस्थांच्या प्रगतीत व लाभलेल्या प्रतिष्ठेत त्या संस्थांच्या संस्थापकांचे समाजातील योगदान, मिळालेले श्रेष्ठत्व समजून येत असते.

अशा व्यक्तीचा वाढदिवस व संस्थेचा वर्धापन दिन म्हणजे त्या व्यक्तीच्या व संस्थेच्या प्रगतीस हातभार लावणाऱ्या आणि संस्थेच्या कार्यामुळे जीवन सुखकर झालेल्यांचा एक सार्वजनिक आनंदसोहळा असतो हे आपण पाहतो.

दिनांक ०८ जानेवारी, १९९९ हा भारती विद्यापीठाचे संस्थापक आणि भारती अभिमत विश्वविद्यालयाचे कुलपती डॉ.पतंगराव कदम यांचा ५४ वा वाढदिवस. एका ज्येष्ठ विद्याविभूषित व्यक्तीने अल्पकाळात एक आदर्श अशी शिक्षणसंस्था स्थापन करण्यात, वाढवण्यात व त्या संस्थेला प्रतिष्ठा मिळवून देण्यात सुयश मिळवले आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ झालेल्या भारतातील व महाराष्ट्रातील भारती विद्यापीठ ह्या एकमेव शिक्षण संस्थेस लोकमान्यता आणि राज्यमान्यताही लाभली आहे.

सकाळी सातच्या सुमारास डॉ.पतंगराव कदम प्रसन्न मुद्रेने दिवाणखान्यात आले. उपस्थितांनी त्यांना अभिवादन केले आणि अभिष्टचिंतनाचा कार्यक्रम झाला. त्याप्रसंगी डॉ.पतंगरावांच्या असंख्य हितचिंतकांनी, मित्रांनी, सहकाऱ्यांनी, त्यांच्या संस्थेतील सेवकांनी, नातेवाईकांनी त्यांच्या ५४ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या.

डॉ. पतंगराव कदम यांना त्यांच्या ५४ व्या वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा देताना डॉ. पतंगरावांच्या इतर वैशिष्ट्यांबरोबर त्यांनी आपला पक्ष आणि आपल्या बरोबरीचे नेते यांना योग्य मार्गावर आणण्याचा जो प्रयत्न केला तो फार महत्त्वाचा आहे. त्या प्रयत्नाचा, त्या कार्याचा, त्या औदार्याचा गौरवही होणे आवश्यक आहे. डॉ.पतंगराव कदम यांना त्यांच्या उर्वरित कार्यात भरघोस यश लाभो आणि त्यांच्या हातून सामान्य माणसासहित सर्व स्तरावरील जनतेची सेवा घडो.

डॉ.पतंगराव कदम यांच्या ५४ व्या वाढदिवशी सांगली येथील भारती विद्यापीठाच्या महाविद्यालयाचा 'डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय' असा नामकरण सोहळा थोर विचारवंत यशवंतराव मोहिते यांच्या हस्ते दिनांक ०८ जानेवारी, १९९९ रोजी सकाळी संपन्न झाला. त्याप्रसंगी डॉ. पतंगराव कदम यांच्या शैक्षणिक व राजकीय वाटचालीचा आढावा घेताना श्री. यशवंतराव मोहिते म्हणाले, की 'पस्तीस वर्षांपूर्वी डॉ. पतंगराव कदम यांनी सुरू केलेल्या भारती विद्यापीठाने शिक्षण हा सामाजिक क्रांतीतील एक महत्त्वाचा दुवा मानला आणि त्यादृष्टिने वाटचाल उद्दिष्ट या विद्यापीठाने नजरेसमोर ठेवल्याने सर्वसामान्यांना विविध क्षेत्रांत प्रगतीची झेप घेणे शक्य झाले आहे. डॉ. पतंगराव कदम यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचाराचा प्रभाव आहे. एकाच छत्राखाली प्राथमिक शाळेपासून तंत्र, विज्ञान, आरोग्य असे विविध विषयांचे शिक्षण देताना या क्षेत्रात प्रचंड क्रांती केली आहे; परंतु, त्यांचे मोठेपण मान्य करण्याची कुवत आजच्या समाजात नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.'

'ज्या ज्ञानाची व्याप्ती जगात वाढते आहे त्याच्याशी भारती विद्यापीठाने संबंध जोडला आहे. शिक्षणक्षेत्रात प्रचंड झेप घेऊनही डॉ. पतंगराव कदम यांना राजकारणात फारसे यश आले नाही. ही खंत त्यांना आहे. एखाद्यावर टीका करावी, त्याचे व्यंग दाखवावे; परंतु त्याचे मोठेपण नाकारणे योग्य नाही. शैक्षणिक, सहकार, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रांत प्रचंड प्रगती करणारी डॉ. पतंगरावांसारखी व्यक्ती आज केवळ सांगली जिल्ह्यातच नव्हे तर राज्यातही शोधून सापडणार नाही. त्यांचे हे मोठेपण नाकारणे म्हणजे पुढे

जाणाऱ्याचे पाय ओढण्यातलाच प्रकार आहे; परंतु एकविसाव्या शतकात जाताना डॉ. पतंगरावांसारख्या कर्तबगार माणसाला पाठिंबा द्यायला हवा. डॉ. पतंगरावांसारख्या मोठ्या मनाचा माणूस कोत्या मनाच्या समाजजीवनात जन्माला आला हे त्याचे दुर्दैव आहे, असे वाटते. त्यांचे मोठेपण मान्य करून त्यांच्या मतदारसंघातील जनतेने राजकारणातही त्यांना यश मिळवून द्यावे'.

❊❊❊

डॉ. पतंगराव कदम मातेसमवेत





श्रीमती सोनिया गांधी यांच्या समवेत डॉ. पतंगराव कदम, श्रीमती विजयमाला व डॉ. विश्वजीत कदम

जनते बद्दल जिव्हाळा असणारे आदर्श दाम्पत्य



## २३. डॉ. पतंगराव कदम – जीवनपट

०८ जानेवारी, १९४४ : श्री. श्रीपतराव कदम व सौ. बयाबाई कदम यांच्या पोटी सोनसळ येथे जन्म.

१९४९–१९५५ : सोनसळ, शिरसगाव प्राथमिक शिक्षण

१९५५–१९५९ : स्वा. सेनानी नाना पाटील बोर्डींग, कुंडल येथे राहून प्रतिनिधी हायस्कूल, कुंडलमधून एस.एस.सी. उत्तीर्ण.

१९५९–१९६० : रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा येथे शिक्षण

१९६१–१९६४ : वाडिया कॉलेज, पुणे येथून टी.डी. नंतर रयत शिक्षण संस्थेच्या हडपसर येथील साधना विद्यालय, पिंपरी विद्यालयात अर्धवेळ शिक्षक

१० मे, १९६४ : कसबा पेठ, पुणे येथे रहाळकर मंदिरात १०X१० च्या खोलीत भारती विद्यापीठाची स्थापना. शिक्षक नोकरीचा राजीनामा. इंग्रजी–गणित परीक्षा सुरू.

१९६५ : घ. नं. ४३४, सदाशिव पेठ, पुणे येथे एक इमारत बांधून भारती विद्यापीठाचे काम सुरू.

१० जून, १९६८ : एरंडवणे, पुणे येथे झोपडपट्टी परिसरात शंकरराव मोरे विद्यालय स्थापना.

१९६८–१९७२ : महाराष्ट्र राज्य एस.टी. महामंडळाचे संचालक

२२ जून, १९६९ : एरंडवणे येथे मोरे विद्यालयाच्या इमारतीचे ना. बाळासाहेब देसाई यांचे हस्ते उद्घाटन.

०८ मे, १९७० : अक्षयतृतीयेचे दिवशी भारती प्रिंटींग प्रेसचे मा.पी.जी. साळवी यांचे हस्ते उद्घाटन.
विचारभारती मासिक सुरू.

१४ ऑगस्ट, १९७१ : खानापूर तालुका दूध उत्पादक, कृषीपूरक उद्योग संघाची कडेगाव येथे स्थापना.

| | | |
|---|---|---|
| ०८ सप्टेंबर, १९७१ | : | भारती बँकेची पुणे येथे स्थापना. |
| ०२ ऑक्टोबर, १९७२ | : | भारती सहकारी ग्राहक भांडार, पुणे सुरू |
| १५ जून, १९७८ | : | उच्च शिक्षण क्षेत्रात प्रवेश, भारती विद्यापीठाचे कला, शास्त्र, वाणिज्य महाविद्यालय, एरंडवणे येथे सुरू आणि १९७९ मध्ये यशवंतराव मोहिते महाविद्यालय असे नामकरण केले. |
| ०४ सप्टेंबर, १९७८ | : | इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड आंत्रप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट, एरंडवणे येथे सुरू. |
| १० सप्टेंबर, १९७८ | : | पूना विधी महाविद्यालय, एरंडवणे येथे सुरू |
| ऑक्टोबर, १९७९ | : | रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलर सदस्य म्हणून निवड झाली. |
| १९७९ | : | ग्रामीण विकास प्रतिष्ठान, सांगली स्थापना. |
| १९८० | : | महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत ५८ मताने अपयश |
| जून १९८१ | : | फार्मसी पदविका कॉलेज, एरंडवणे येथे सुरू |
| ०१ जून, १९८२ | : | महात्मा ज्योतीराव फुले, शिंदेवाडी विद्यालय सुरू |
| जून, १९८२ | : | फार्मसी पदवी कॉलेज, एरंडवणे येथे सुरू |
| २५ जून, १९८२ | : | विधी महाविद्यालय, कोल्हापूर सुरू |
| ०९ जुलै, १९८३ | : | इंजिनिअरींग कॉलेज व पॉलिटेक्निक, एरंडवणे येथे सुरू नंतर १९८४ मध्ये धनकवडी परिसरात स्थलांतर झाले. |
| १९८३ | : | नवी मुंबई येथे प्रायमरी स्कूल, हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज सुरू |
| १९८३ | : | डॉ. प्र. चि. शेजवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे विद्यापीठातून पीएच.डी. |
| १९८४ | : | मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट, सोलापूर सुरू, तसेच प्राथमिक शाळा /माध्यमिक विद्यालय व महाविद्यालय सुरू |

| | |
|---|---|
| १९८५ | : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भिलवडी-वांगी मतदार संघातून ३० हजार १६५ मताधिक्याने विजयी. |
| जून, १९८५ | : कडेगाव-पलूस येथे मुलींची विद्यालये सुरू, ज्युनिअर व सिनिअर कॉलेजेस सुरू |
| १३ सप्टेंबर, १९८५ | : कला, शास्त्र, वाणिज्य महाविद्यालय सांगलीत सुरू |
| १९८५ | : पुणे शहरातील पहिली दहा मजली ''भारती विद्यापीठ भवन'' इमारत उभारणी केली. |
| १२ ऑक्टोबर, १९८६ | : कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, धनकवडी, पुणे ना. विलासराव देशमुख यांच्या हस्ते सुरू. |
| जून, १९८७ | : कन्या प्रशाला, एरंडवणे सुरू |
| जुलै, १९८७ | : सपत्निक युरोप-अमेरिका दौरा |
| २६ जुलै, १९८७ | : खानापूर तालुका सह. कुक्कुटपालन संस्था सुरू |
| ३० ऑक्टोब्रर, १९८७ | : पांचगणी येथे भा. वि. ॲकॅडमी, प्राथमिक शाळा विद्यालय सुरू |
| ०९ फेब्रुवारी, १९८९ | : धनकवडी परिसरात मेडिकल कॉलेज सुरू |
| १९८९ | : डेन्टल कॉलेज व हॉस्पिटल सुरू |
| जून, १९९० | : कन्या महाविद्यालय, कडेगाव सुरू |
| जुलै, १९९० | : भिलवडी-वांगी मतदार संघातून दुसऱ्यांदा विक्रमी मताने आमदार म्हणून निवड. |
| २४ जुलै, १९९० | : पिताश्री श्री. श्रीपतराव कदम यांचे पुणे येथे दुःखद निधन |
| ०१ ऑगस्ट, १९९० | : नवी मुंबई इंजिनिअरींग कॉलेज व पॉलिटेक्निक सुरू |
| १६ ऑगस्ट, १९९० | : भारती हॉस्पिटल सुरू, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक कॉलेजेस सुरू. |

| | | |
|---|---|---|
| १८ डिसेंबर, १९९० | : | कडेगाव येथे सागरेश्वर सहकारी सूतगिरणी व पलूस येथे कृष्णा वेरळा मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी सुरू |
| ०७ मार्च, १९९१ | : | मुंबई विद्यापीठ, सिनेटवर विक्रमी मताने निवड |
| २८ जून, १९९१ | : | मुख्यमंत्री ना. सुधाकर नाईक मंत्रिमंडळात शालेय शिक्षण, पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास, माजी सैनिक कल्याण खात्याचे राज्यमंत्री |
| १४ नोव्हेंबर, १९९१ | : | कोल्हापूर जिल्ह्यात बेलेवाडी काळम्मा येथे विद्यालय सुरू. |
| जून १९९२ | : | कन्या प्रशाला धनकवडी सुरू |
| | : | धनकवडी येथे इंग्लिश मिडीयम स्कूल सुरू |
| | : | जव्हार येथे आदिवासींसाठी प्रशाला सुरू |
| १९९२ | : | शिक्षण व पाटबंधारे खात्याचे कॅबिनेट मंत्री झाले. |
| २२ जून, १९९२ | : | प्रशाला अंबक(सांगली) येथे सुरू |
| ०१ ऑगस्ट, १९९२ | : | इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी, धनकवडी येथे सुरू |
| १७ सप्टेंबर, १९९२ | : | भारती विद्यापीठाचे श्री शिवछत्रपती विद्यालय, शिवाजीनगर(सांगली) येथे सुरू |
| १९९२ | : | दिल्ली येथे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सुरू शैक्षणिक संकुलाची स्थापना करणारी महाराष्ट्रातील पहिली शिक्षण संस्था. |
| २४ फेब्रुवारी, १९९३ | : | सोहोली, अमरापूर(जि. सांगली) येथे प्रशाला सुरू |
| १० ऑक्टोबर, १९९३ | : | फार्मसी कॉलेज, नवी मुंबई येथे सुरू |
| २५ जानेवारी, १९९४ | : | वैद्यकीय संकुल व श्रीपतराव कदम मेडिकल फौंडेशनचे भारती हॉस्पिटलचे उद्घाटन, धनकवडी येथे पंतप्रधान ना. पी.व्ही. नरसिंगराव यांचे हस्ते. |

| | | |
|---|---|---|
| २५ मार्च, १९९४ | : | सोनहिरा सह. साखर कारखान्यास नोंदणीपत्र मिळाले. देशातील सर्वोत्कृष्ट साखर कारखाना म्हणून निवड. |
| जून, १९९४ | : | कदमवाडी-कोल्हापूर येथे मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट सुरू |
| | : | वास्तुशास्त्र(आर्किटेक्ट) महाविद्यालय, धनकवडी सुरू |
| | : | एन्व्हायर्नमेंट (पर्यावरण) एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर, धनकवडी सुरू |
| ०१ ऑगस्ट, १९९४ | : | कराड येथे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सुरू |
| १६ सप्टेंबर, १९९४ | : | मुख्यमंत्री ना. शरद पवार मंत्रिमंडळात उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण सेवायोजन मंत्री |
| १९९४ | : | जव्हाण, जि. पालघर येथे आदिवासी मुला-मुलींकरिता शैक्षणिक संकुल उभारले. |
| २५ डिसेंबर, १९९४ | : | इंग्लंडचे प्रिन्स फिलिफ यांचे हस्ते एन्हार्यरमेंट एज्युकेशन अॅन्ड रिसर्च सेंटर इमारतीचे उद्घाटन |
| जून, १९९५ | : | इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, सांगली येथे सुरू |
| जून, १९९६ | : | कला(चित्रकला) महाविद्यालय, धनकवडी येथे सुरू |
| १९९६ | : | भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाची स्थापना व डॉ.पतंगराव कदम तहह्यात कुलपती झाले. |
| जून, १९९७ | : | हॉटेल मॅनेजमेंट कॉलेज, धनकवडी सुरू |
| | : | विधी महाविद्यालय, सांगली सुरू |
| नोव्हेंबर, १९९७ | : | सागरेश्वर सूतगिरणीत सूत उत्पादन सुरू |


| | | |
|---|---|---|
| जानेवारी, १९९९ | : | १) स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पेण येथील महाविद्यालयास ''डॉ.पतंगराव कदम कला, शास्त्र, वाणिज्य महाविद्यालय'' असे नामकरण<br>२) रयत शिक्षण संस्थेचे शिरवळ येथील महाविद्यालय श्रीपतराव कदम महाविद्यालय नामकरण व डॉ.पतंगराव कदम शैक्षणिक संकुल नामकरण<br>३) सांगली येथील कॉलेजचे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय नामकरण |
| ०५ मे, १९९९ | : | भारती अभिमत विश्वविद्यालयाचा पहिला पदवीदान समारंभ |
| जून, १९९९ | : | दिल्ली येथे इंजिनिअरींग कॉलेज व पॉलिटेक्निक सुरु |
| ०६ सप्टेंबर, १९९९ | : | भिलवडी-वांगी मतदार संघातून तिसऱ्यांदा विरोधकापेक्षा १७ हजार ८२९ मताने विजयी |
| १९ ऑक्टोबर, १९९९ | : | मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख यांचे मंत्रीमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. उद्योग, व्यापार, वाणिज्य, जलसंपदा व संसदीय कामकाज खात्यांचे कॅबिनेट मंत्री. टेंबु योजनेला आग्रही पुढाकार. |
| ३१ ऑक्टोबर, १९९९ | : | महाराष्ट्राचे उद्योग व जलसंधारण मंत्री |
| २७ नोव्हेंबर, १९९९ | : | ज्येष्ठ सुपुत्र अभिजीत कदम यांचे पुणे-सोलापूर रस्त्यावर अपघाती दुःखद निधन |
| २२ एप्रिल, २००० | : | सोनहिरा सहकारी साखर कारखान्याचे आ.भा.कॉं. कमिटीच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांचे हस्ते उद्घाटन |
| जून, २००० | : | धनकवडी येथे महिला इंजिनिअरींग कॉलेज सुरु |

| | | |
|---|---|---|
| २० जून २००० | : | मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख बरोबर युरोप-अमेरिका दौरा |
| १४ सप्टेंबर, २००० | : | कराड येथे मातोश्री श्रीमती बयाबाई यांचे दुःखद निधन. सोनसळ येथे अंत्यविधी व अंत्यसंस्कार. |
| १२ एप्रिल, २००१ | : | डॉ.जे.डब्ल्यू.आयरन अॅकॅडमी, सातारा येथे भारती विद्यापीठाची शाखा म्हणून कार्यरत. |
| २४ ऑगस्ट, २००१ | : | धनकवडी येथील डेन्टल कॉलेज व हॉस्पिटलच्या नव्या इमारतीचे आ.भा.काँ. कमिटीच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांचे शुभहस्ते उद्घाटन. |
| २००२ | : | कडेगाव तालुक्यात जीवनदायिनी ताकारी योजना कार्यान्वित केली. |
| २००४ | : | महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत चौथ्यांदा १ लाख ५ हजार मताधिक्याने कडेगाव-पलूस मतदार संघातून निवडून आले आणि सहकार, पुनर्वसन खात्याचे कॅबिनेट मंत्री झाले. |
| २००५ | : | सांगली येथे वैद्यकीय संकुल स्थापना-मेडिकल, डेन्टल व नर्सिंग कॉलेजेस सुरू |
| २००८ | : | महसूल मंत्री म्हणून पदभार स्विकारला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे खजिनदार व अर्थ समितीचे अध्यक्ष झाले. सहकार खात्यांतील पदाधिकाऱ्यांना घेऊन ब्राझील दौरा झाला. |
| २००९ | : | पाचव्यांदा आमदार, वने, पुर्नवसन, भूकंप पुर्नवसन खात्यांचे कॅबिनेट मंत्री |
| २०१० | : | उदगिरी शुगर फॅक्टरी शुभारंभ |
| २०१३ | : | भारती विद्यापीठ सुवर्ण महोत्सव शुभारंभ. खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे |
| २०१४ | : | देश पातळीवरील वन विकास प्रशासन व कला स्थापन प्रशिक्षण केंद्र, कुंडल येथे सुरु केले. |

| | | |
|---|---|---|
| २०१४ | : | पलूस-कडेगाव विधानसभा मतदार संघात सहाव्यांदा आमदार म्हणून निवड |
| २०१५ | : | भारती विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सव समारोप राष्ट्रपती डॉ. प्रणव मुखर्जी यांचे हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खासदार शरद पवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ.पतंगराव कदम यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान झाला. |
| २०१८ | : | ०९ मार्च, २०१८ निधन |

***

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - १.



**डॉ. महादेव शिवलिंग सगरे**
M.Sc., Ph.D., D.Sc.

१९६५ ते १९७८ यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड येथे फिजिक्स विषयाचे प्राध्यापक.
१९६९ ते १९७८ कॅप्टन-एनसीसी ऑफिसर.
१९७८ पासून भारती विद्यापीठात यशवंतराव मोहिते कॉलेजचे प्रथम प्राचार्य.
१९८५-२००२ पर्यंत भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीचे निवृत्त प्राचार्य.
२००३ पासून भारती विद्यापीठात डायरेक्टर हायर एज्युकेशन व २००७ पासून सहकार्यवाह म्हणून आजतागायत कार्यरत.
एम.फील. व पीएच.डी.चे मार्गदर्शक व संशोधनात पेटंट प्राप्त.
निवृत्तीनंतर २००७ मध्ये नॅनोटेक्नॉलॉजी मेडीसीनमध्ये डी.एस्सी. (कोलंबो) पदवी प्राप्त.
राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधनाचे शोध निबंध सादर व प्रकाशित.
पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठात माजी सिनेट व कार्यकारिणी सदस्य.
भारती विद्यापीठात आजीव सदस्य, नियामक मंडळ कार्यकारिणी मंडळ सदस्य व विश्वस्त.
काशी विश्वनाथ शिक्षण संस्था, पुणे चेअरमनपदी व महाराष्ट्र पत्रकार कल्याण-निधी, फलटणचे विश्वस्त.
भारती मध्यवर्ती ग्राहक भांडारचे माजी चेअरमन व भारती सहकारी बँकेचे संचालक.
भारती विद्यापीठ ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे सचिव (१९७९ ते १९९७)
सांगली जिल्ह्यात खेडे गावातून अनेक शासकीय प्रकल्प राबविले.
इंडियन सायन्स काँग्रेसचे (कलकत्ता) आजीव सदस्य.
बालभारती, पुणे चे अशासकीय माजी सदस्य.
आंतरराष्ट्रीय थिऑसॉफिकल सोसायटीचे आजीव सदस्य.
पंतप्रधानांच्या हस्ते विशेष सन्मान.
शांताई शिक्षण संस्था, कोल्हापूरकडून छत्रपती शाहू पुरस्कार प्राप्त.
एकूण १२ परदेशांत शोध निबंध सादर करण्याच्या निमित्ताने प्रवास.
'साकारलेल्या स्वप्नांचा प्रवास', 'लोकशाहीसाठी शिक्षण', 'भावतरंग' पुस्तकांचे लेखन व प्रकाशन.

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई